
# आरसा : आदिवासी जीवन शैलीचा!

प्रा.डॉ.भा.व्यं.गिरधारी



- आरसा : आदिवासी जीवन शैलीचा !
  प्राचार्य डॉ. भा. व्यं. गिरधारी

Aarasa : Aadiwasi Jiwanshailicha
Prin. Dr. B. V. Girdhari

- प्रकाशक : सौ. रजनी डोळस
  युगांतर, पंजाब कॉलनी, नाशिकरोड - ४२२१०१
  दूरध्वनी : (०२५३) २४६१९५१, ३२३५३४०

- मुद्रक : श्री. विक्रम पळशीकर
  प्रिंटोरिअम, आर्टीलरी सेंटर रोड,
  नाशिकरोड
  दूरध्वनी : (०२५३) २४५६३५९

- अक्षर जुळणी : सौ. वैशाली देव, नाशिक
  भ्रमणभाष : ९८२३२ ३०५६१



© प्रिं. डॉ. भा. व्यं. गिरधारी
विभा, पर्णश्री सोसायटी, नाशिक - ४२२००५
दूरध्वनी : (०२५३) २५७३०९७



- मुखपृष्ठ : धनंजय गोवर्धने

- प्रथमावृत्ती : ऑक्टोबर २००३
  द्वितीय आवृत्ती : मार्च २००४

- एकूण पृष्ठ्ये : १७०

- मूल्य रुपये : १५०/-

# प्रकाशकाचे मनोगत

## दुसऱ्या आवृत्तीचे निमित्त

प्रिंसिपॉल डॉ. भा. व्यं. गिरिधारी यांचे "आरसा : आदिवासी जीवनशैलीचा" हे पुस्तक अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरल्याने त्याची पहिली आवृत्ती फारच लवकर संपली यावर विश्वास बसत नाही. अभ्यासपूर्ण लिखाणाबद्दल प्रि. डॉ. गिरिधारींचे अभिनंदन-कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. त्यामुळे दुसऱ्या आवृत्तीबद्दल त्यांना विचारले असतां त्यांनी आनंदाने होकार दिला. पुस्तकामधील लिखाणामध्ये कांहीच करायचे नसल्याने आमचे कामही सोपे झाले. त्यांतच प्रिंटोरिअम, नाशिकचे श्री. विक्रम पळशीकर व श्री. भानुदास देव यांनी आवश्यक असलेले सहकार्य त्वरीत देऊ केले. त्याबद्दल त्यांचे आम्ही आभार मानतो.

आमच्या दृष्टीने सर्व समाजामध्ये समता, स्वातंत्र्य व बंधुत्वाची भावना निर्माण होणे ही भारतीयांसाठी काळाची गरज आहे. जागतिकीकरण, खासगीकरण याच्या चक्रामध्ये सर्वसामान्य माणसाला खंबीर मनाने उभे राहायचे आहे. आदिवासी बांधवांना त्यासाठी योग्य मार्गदर्शन होण्याची गरज आहे. डॉ. गिरिधारी यांनी त्यांना मार्गदर्शन केले आहे त्याबरोबर शासनाला पथदर्शक दिशाही दिलेली आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती श्री शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी पुरोगामी विचारवंतांना हवा असलेला सुदृढ भारत निर्माण करणे शक्य होणार आहे. त्यासाठी प्रत्येक भारतीयाने या पुस्तकाचा अभ्यास करून आपल्या देशबांधवांच्या प्रगतीसाठी झटले पाहिजे एवढीच आमची माफक अपेक्षा आहे.

सौ. रजनी डोळस
प्रकाशक
युगांतर प्रकाशन, पंजाब कॉलनी,
नाशिकरोड
दूरध्वनी : (०२५३) २४६१९५१

मार्च २००४

# दुसऱ्या आवृत्तीचा आनंद !!

आरसा : आदिवासी जीवन शैलीचा ! पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचा योग लगेच येत आहे, यापेक्षा लेखकाचे दुसरे महाभाग्य ते कोणते ? प्रस्तुत आदिवासी विषयाचे अभ्यासक,जाणकार आणि पुरोगामी वाचकांनीच प्रतिसाद देऊन दुसऱ्या आवृत्तीने माझा आनंद द्विगुणित केला त्यांचेही आभार कोणत्या शब्दात मानावे?

खरे तर पूजा कॉम्प्युटर्सने हा वैचारिक लेखसंग्रह प्रकाशित करण्याचे धाडस केले याचेच मला नवल वाटले होते. अर्थात भीत भीतच त्यांनी मोजक्या प्रती काढल्या आणि त्याही हातोहात संपल्या.

आता ही जबाबदारी युगांतर प्रकाशनाच्या सौ. रजनीताई डोळस यांनी स्वीकारली ही खरीतर आनंदाची गोष्ट आहे. युगांतर संस्थेने या पुस्तकाचा, नव्हे तर आदिवासींचाच फार मोठा गौरव केला आहे. युगांतर प्रकाशनाचे आभार मानण्यासाठी माझे शब्दभांडार अपुरे आहे. म्हणून युगांतर च्या ऋणात राहून त्यांच्या या अकृत्रिम स्नेहाला जपणेच मला महत्वाचे वाटते.

आदिवासी कला साहित्य संस्कृतीची जोपासना व्हावी आणि त्यांच्या नितळ जीवनशैलीचा सर्वांगीण विकास घडून यावा हा सद्भाव मनात बाळगणाऱ्या जाणकार वाचकांकडून या दुसऱ्याही आवृत्तीचे यथोचित स्वागत होईल याची खात्री आहे. माझ्या प्रमाणेच सर्वांच्या जीवनाला आत्मविश्वास आणि निर्भयता प्राप्त करवून देणाऱ्या आदिवासी बंधू भगिनींना हा ग्रंथ मी अर्पण करतो.

नाशिक, मार्च २००४

प्रिं. डॉ. भा. व्यं. गिरिधारी
विभा, पर्णश्री सोसायटी,
एच. पी. टी. कॉलेजजवळ,
नाशिक - ४२२००५

# आरसा : आदिवासी जीवन शैलीचा !

प्रस्तावना ७

समाजजीवन

१. जव्हारचे दिवस १५
२. ठाणे जिल्हा : एक अदृश्य चेहरा १८
३. लोकसंस्कृतीच्या अभ्यासाची गरज २७
४. आदिवासी ग्रामदैवत ३०
५. आदिवासी लोककला ३४
६. आदिवासी लोकसाहित्य ४२
७. आदिवासी साहित्य संवर्धन : काही विचार ५३
८. आदिवासी सांस्कृतिक जीवनाचा अमोल ठेवा : बोहाडा ५६
९. आदिवासींचे काज ६०
१०. लोकसंवादासाठी माध्यम : थाळगान ६६
११. दसरा : जव्हारच्या आदिवासींचा ६८
१२. आदिवासी : मौखिक संपदा ७२

शैक्षणिक जीवन

१३. आदिवासी शैक्षणिक विकासाची भारतीय संकल्पना ८१
१४. आदिवासी विद्यार्थी जीवन ९४
१५. आदिवासी विद्यार्थ्यांच्या लक्षवेधी समस्या ९८
१६. आदिवासी विद्यार्थ्यांच्या उत्कर्षाची नवी दिशा १०३
१७. नवे शैक्षणिक धोरण आणि आदिवासी विद्यार्थी विकास ११०
१८. आदिवासींचा शैक्षणिक विकास ११५
१९. आदिवासी विद्यार्थी विकासासाठी विविध उपयुक्त योजना ११९
२०. आदिवासी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने पाठ्यपुस्तके १२४
२१. आदिवासी महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व १२८
२२. आदिवासी मुलींचे शिक्षण : काही विचार १३४

२३. आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती १३८
२४. आदिवासी महिलांची साक्षरता १४३
२५. आदिवासींचे प्रौढ शिक्षण : एक अनुभव १४५

औद्योगिक विभाग
२६. आदिवासी क्षेत्रातील उद्योजकता १४७

आदिवासी व्यक्तिवेध
२७. पेठचे वनबंधू : गंगाराम आवारी गुरुजी. १५२

परिशिष्ट
अ. आदिवासी कल्याण पदविका अभ्यासक्रम १५७
ब. आदिवासी निवडक साहित्य-सूची १५९
क. आदिवासींची नियतकालिके. १७५

# प्रस्तावना

- प्रा. केशव मेश्राम

डॉ. भास्कर गिरधारी हे लोकसाहित्याचे साक्षेपी अभ्यासक आहेत. आरसा : आदिवासी जीवनशैलीचा हा त्यांचा, ह्या विषयावरील नवा ग्रंथ. आदिवासी पट्ट्यात डॉ. गिरधारी यांनी, जे काम केले आहे, ते मुंबई विद्यापीठाच्या पातळीवर आणि लोकमानसातही मान्यता पावले आहे.

प्राचार्य डॉ. भास्कर गिरधारी हे नुसते लोकसाहित्य आणि आदिवासींच्या आयुष्याचे कोरडे ग्रांथिक अभ्यासक नाहीत, तर जव्हार, मोखाडा, विक्रमगड भागात प्रत्यक्ष आदिवासी लोकांत आणि विद्यार्थ्यांत, त्यांच्यातलेच एक होऊन, मन रमलेले, सुधारकी पुरोगामी विचारांचे, चिंतनशील अभ्यासक आहेत.

ह्या ग्रंथात त्यांनी, आपल्या वेळोवेळी केलेल्या सत्ताव्वीस लेखांचे आणि संग्राह्य तीन परिशिष्टांचे संकलन सादर केले आहे.

इंग्रजी विद्येला विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी वाघिणीचे दूध म्हटले होते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, शिक्षण हाच प्रगतीचा महामंत्र आहे हे ओळखून, शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा ! असा संदेश समस्त तळागाळातील वर्गाला दिला होता.

ह्या ग्रंथातील लेखांचे चार प्रभागात विभाजन केले आहे. आपली समाजव्यवस्था, आपली शिक्षणव्यवस्था आणि आदिवासींना स्वयंपूर्ण करण्यासाठी उद्योगव्यवसायांची उभारणी करण्याचे अगत्य आणि परिशिष्टांतर्गत आदिवासी निवडक साहित्यसूची आणि आदिवासी नियतकालिके, अशा चार भागात मांडणी केली आहे. ग्रंथसूची व पेठच्या आवारी गुरूजींचाही परिचय महत्त्वाचा आहे.

ह्या विविध लेखांतून प्रकट झालेले प्राचार्य डॉ. भास्कर गिरधारी यांचे विचार,

त्यांचे मनोगत व महत्त्वपूर्ण निरीक्षणे, आदिवासींचे दैनंदिन आयुष्य, त्यातील अपार कष्ट, त्यांच्या समजुती व अंधश्रध्दा, आदिवासींचे शिक्षण, त्यातील अडचणी, त्या विद्यार्थ्यांची मानसिकता व व्यथा, काम करणाऱ्या लोकांची विगारटाळू प्रवृत्ती, सरकारी योजना कशा कुचकामी, हे सिध्द करू पाहणाऱ्या मध्यस्थ यंत्रणा, त्यांच्यातील देवदेवस्की व भगतवर्गाचा प्रभाव, त्यांची नृत्ये, गानप्रकार, विवाह प्रकार, आदिवासींना जागरूक व प्रशिक्षित करण्याचे निमित्त साधून, त्यांना अकारण बंडखोरी नक्षलवादाकडे किंवा आत्मघातकी विचारांकडे नेऊन, शेवटी आदिवासींच्याच अडचणीला कारण होणारे, काही राजकीय पक्ष आणि तरूण भांबावलेला वर्ग, ह्या अवघ्याच सांस्कृतिक अंगोपांगाचा धांडोळा, ह्या पुस्तकात प्राचार्य डॉ. गिरधारी यांनी आत्मियतेने व संसूचक वेधकतेने घेतला आहे. ह्या ग्रंथाचे हे एक महत्त्वपूर्ण असे वलस्थान, म्हणूनच नोंदावे लागेल.

विज्ञाननिष्ठेचा अभाव आणि अंधश्रध्देचा प्रभाव हे आदिवासींच्या मागासलेपणाचे मूलकारण आहे असे डॉ. गिरधारी यांचे अनुभवजन्य निरीक्षण आहे.

आपली जिल्हावाटप पध्दतीही त्यांना पुनर्विचार करून तिची नवरचना व्हावी, असे डॉ. गिरधारी म्हणतात. ठाणे जिल्ह्यात सूर्यानगर ही एक परिपूर्ण आणि उत्कृष्ट वसाहत असल्याचे ते निःसंकोचपण सांगतात. मोठे जिल्हे किंवा महानगर यांचे केवळ रूप किंवा एक चेहरा पण त्याखेरिजही एक जिल्ह्याचा म्हणून काही अज्ञात अनोळखी चेहरा असतो. असेही भाष्य आदिवासी विकासाच्या दृष्टीने गिरधारी करतात ते अचूक असेच आहे.

आपल्या देशात जातीपोटजातींच्या विषवल्लीमुळे आणि तिच्या पिढ्यापिढ्यांच्या लागणीमुळे किती भयानक नुकसान झाले आहे, त्याकडे त्यांनी वेधलेले लक्ष आणि दिलेले उदाहरण सुन्न करणारे आहे, ते असे -

वसतिगृहात राहून शिकणारी, दुसऱ्यांच्या केवळ मेहेरबाणीने जगणारी दरिद्री आदिवासी मुलेही कातकरी बाईने शिजवलेले अन्न खाण्यास नकार देतांना

पाहिल्यावर लेखकानी खंत सादर केली आहे.

आदिवासींच्या हजारो वर्षांच्या सांस्कृतिक परंपरेचा लेखकाने करून दिलेला परिचयही अत्यंत मनोज्ञ असा आहे. होळी पौर्णिमेच्या दिवशी आदिवासी त्यांच्या परंपरागत नृत्यगान उत्सवात आणि धार्मिक कामकाजात मग्न होऊन आपले जीवन काहिसे सुसह्य व कसे रोचक बनवतो याचे चांगले चित्रण, डॉ. भास्कर गिरधारी यांनी केले आहे.

बोहाडा उत्सवाची माहिती देण्याआधी दिवाळी, आखाती (अक्षय्यतृतीया) दसरा, कवळी भाजी, पोळा, नागपंचमी आणि बीजा, ह्या सणांचे आदिवासी जीवनातील वेगळेपण त्यांनी मोठ्या खुबीदारपणाने पण सहजतेने स्पष्ट केले आहे.

होळी पौर्णिमा आणि धूलिवंदन आटोपले की बोहाडा उत्सवाची तयारी सुरू होते. आदिमाता जगदंबा हिचा विविध पण ठरीव वारी सोंगे काढून साजरा केला जाणारा उत्सव म्हणजे बोहाडा. शुक्रवार, शनिवार, रविवार, सोमवार आणि मंगळवार या पाच वारांनाच हा उत्सव केला जातो. देवदेवतांपासून तो मासा; राक्षस, सायदेव, पुंडलिक, रामतारी, झकारी ताटी, सखाई, होरा भिलीन, ताटी, करणीदेव, गवळ, कासव, वाघोबा, विमान, चारुण, खंडेराव. चंद्र, सूर्य राजा अशी एकेचाळीस सोंगे कशी नाचवली जातात, त्यांचे नेटके दृष्यांकन डॉ, गिरधारी यांनी केले आहे.

संबळ, तुतारी, सूरवाद्य, यांच्या तालासुरात ही सगळी सोंगे नाचतात. प्रत्येक देवाची नाचण्याची पध्दत ठरलेली असते. थाळगानाची माहितीही उद्बोधक आणि अनोखी आहे. त्यांच्या विविध गीतांची, डॉ. भास्कर गिरधारी यांनी पेश केलेल्या झलकही वेधक आहे. सीता हाक मारवे, जंगल, कुंतीचे गाणे, सासरच्या घरी, हळदीनं भरलंय पातळ बायचं, काजळ्या डोहो माजविला, चल पोरी भर पाणी, दर्याच्या किनाऱ्याला उगवेला चंद्र, श्रावण बाळ जातो काशीला, आज मी नवस घेईन देवाला, आई तुझा नवस कोणी घेतला आणि शेवंतीची फुले, अशी बारा गीते त्यांनी नोंदली आहेत. त्यातील काव्य, कल्पनाविलास लयबध्दता

आणि शब्दांची मांडणी ही छंदशास्त्राच्या दृष्टीनेही प्रभावी आणि पृथगात्म अशी आहे.

आदिवासींच्या लग्न, काज, मर्तिक, नव्या पिकाचे वाजत गाजत पूजा करुन देवास अर्पण करणे, नवसासायास, लक्ष्मीला सोन्याचे कमळ वाहून नवस फेडणे, काजाच्या दिवशी जोड्या जमवणे, ह्या सर्व प्रथांची डॉ. भास्कर गिरधारी यांनी यथोचित ओळख करुन देऊन, ग्रंथाच्या मौलिकतेला रंजन उद्बोधनाची मितीही जोडली आहे. हे एक लेखकाच्या सखोल अभ्यासाचे फलितच म्हणावे लागते.

आदिवासींच्या जीवनसारणीच्या अभ्यासाकडे आता प्रगत पौर्वात्याचे आणि पाश्चिमात्यांचेही लक्ष वेधले गेले आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात अर्थपुरवठाही केला जातो. पण त्यामुळे आदिवासींच्या स्थितीत फारसा फरक पडलेला नाही, हे डॉ. गिरधारी खेदपूर्वक नमूद करतात. आरंभीच त्यांनी आदिवासींच्या विविध रीतींच्या शोषणाकडे लक्ष वेधले आहे. ते म्हणतात, बाहेरच्या लोकांची प्रसिध्दीसाठी घेतली जाणारी गाजावाजा शिबिरे प्रत्यक्षात काहीही बदल, आदिवासींमध्ये घडवण्यास निकामी आहेत.

स्थानिक पातळीवर आदिवासींसाठी चालविल्या जाणाऱ्या चळवळींचीही त्यांनी वस्तुनिष्ठ मीमांसा केली आहे. नक्षलवादी व साम्यवादी विचारांचे लोक, (सच्च्या कार्यकर्त्याला आदिवासी) त्यांना आदिवासींचा हाच अडाणीपणा टिकवून ठेवण्यात रस असतो. असे धीट विश्लेषणही डॉ. गिरधारी करतात हे तर खूपच महत्त्वपूर्ण आहे असे मला वाटते.

आदिवासींच्या भाषेचे वाक्प्रचार आणि म्हणींचेही मोठे आस्वाद्य भांडार, ह्या लेखसंग्रहात अनुस्यूत केले आहे. 'कणगीत दाणा तर भिल्ल उताणा', 'झाडं तथ वारा.. पडती पाण्याच्या धारा', 'शाळा दाराशीं, पोरं गुराशी', ह्याचा वानगीदाखल विचार करता येईल.

ह्या लेखसंग्रहातील सगळ्यात मौलिक भाग म्हणजे, आदिवासी तरुण

विद्यार्थ्यांच्या मनांची सर्वांगीण मशागत कशी करता येणे शक्य आहे, ह्याअनुरोधाने डॉ. भास्कर गिरधारी यांनी आपल्या अनुभवातील कडूगोड घटकांतून सिध्द केलेली उपाययोजना आणि त्याचा दूरगामी विचार, म्हणावा लागेल.

१. पहिली गोष्ट म्हणजे, त्याला शिक्षण, आरोग्य, नोकरी या सुविधा सवलतींसह पुरवून समान (समाज नव्हे) पातळीवर आणले पाहिजे. मग विशेष सवलतींची गरज राहणार नाही. आज जसे त्याचे शोषण होते तसे होता कामा नये.

२. त्याच्या कलांचा सूक्ष्म अभ्यास होणे गरजेचे आहे.

३. केवळ जेवणाचे हिशोब ठेवणाऱ्या वसतिगृहप्रमुखांपेक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनाचे हिशोब मांडणारे हाऊसमास्टर्स पाहिजेत.

४. आदिवासींसाठी उत्कर्ष योजना गंभीरपणे राबवण्याची गरज आहे.

५. आदिवासींना सुयोग्य शिक्षण व कालेचित संस्कार घडणे डॉ गिरधारी अग्रक्रमाचे मानतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भाऊराव पाटील यांची नावे त्यांना कळणे त्यामुळेच अगत्याचे वाटते. आदिवासींना शिकविणे हे आव्हान ध्येयवादी व्रती बनून पेलले पाहिजे. मनःस्वास्थ गमावलेला माणूस, आदिवासी भागात विशेषकाहीकरू शकत नाही.

६. आजच्या शिक्षणाबद्दल, सातत्याने तीन तपे शिक्षण व्यवसायात व्यतीत करणाऱ्या डॉ. भास्कर गिरधारी यांचे निदान, संवेदक अभ्यासकांनी आणि विचारवंतांनी गंभीरतेने दखलपात्र समजून, त्यावर सुयोग्य उपाययोजना करायला पाहिजे. एके ठिकाणी ते म्हणतात, आजच्या शिक्षणामधून स्वाभिमान व स्वावलंबन या गोष्टी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत याचे दुःख वाटते.

७. पाठ्यपुस्तकातील पाठांचा, त्यातील भाषेचा व आशय संपृक्ततेचाही डॉ. गिरधारी आवर्जून उल्लेख करतात. पाठ्यपुस्तक निर्मितीच्या वेळीं आदिवासींचा विचार केला पाहिजे. असे ते ठासून सांगतात. कारण त्यातच आदिवासी शिक्षणाच्या अनास्थेचे मूळ आहे, हेच त्यांना दाखवून द्यायचे आहे.

आदिवासींच्या उत्कर्षाच्या नव्या दिशेचे प्राचार्य भास्कर गिरधारी यांनी केलेले चिंतन व मार्गदर्शन अंजनाप्रमाणे आहे असे मला वाटते. इतकेच नव्हे तर आजच्या ह्या माहितीतंत्रज्ञानाच्या काळात, जाहीर खूप काही होतं पण प्रत्यक्षात कामे

पूर्णस्वरुपात यायला अक्षम्य विलंब होतो तो टाळला पाहिजे. हे शासकीय धोरण,त्यातली लाल फीत आणि नोकरशाहीची ओतप्रोत अनास्था ह्यावरील कढवट भाष्य ठरावे, यात शंका नाही.

'एकंदरीत आरसा : आदिवासी जीवनशैलीचा' हा लेखसंग्रह, माहिती, मार्गदर्शन, चिंतन, कानउघाडणी आणि वस्तुनिष्ठ व्यवहार्यता, ह्यादृष्टीने मौलिक झाला आहे. त्याबद्दल प्राचार्य डॉ. भास्कर गिरधारी यशस्वी ठरले आहेत असे निःसंकोचपणे म्हणावे लागेल.

असे असूनही ह्या पुस्तकातील काही छोट्या त्रुटीही आस्वादात विक्षेप आणतात. जरी हे लेखन वेळोवेळी व प्रासंगिक कारणांनी केले गेले असले तरी थाळगान, बोहाडा, सण, उत्सव, उपाय ह्याबाबतीत चारपाच ठिकाणी, ठराविक अंतराने येणारी पुनरुक्ती खटकत राहते.

काही इंग्रजी संज्ञांना अद्यापही नेमके सार्थ मराठी प्रतिशब्द उपलब्ध नाहीत, हे मान्य करूनही अर्धवट सेट, नुसत्या नोटस, हाऊसमास्टर्स, पेपरला, ट्रेड, स्टेज, कोच, पब्लिक स्कूल, बँक मॅनेजर, अकाऊंटींग, रेक्टर, रिमांड होम हे शब्द मात्र कानाला खटकत राहतातच हे कोणीही मान्य करेल.

इतकेच नव्हे तर डॉ. श्रीकांत जिचकार यांनी माडिया गोंडाबद्दलची जी माहिती दिली आहे, ती खूप खूप भूतकाळातली अशी आहे. वीज, एस.टी.ची बस, केळे सोलून खाणे, पालाचे वस्त्र (वल्कले) परिधान करणे वगैरे न पाहणारा एखादुसराच असल्याच असावा. माहिती रंजक वाटत असली तरी कालोचिततेपासून निराळीच अशी आहे. डॉ. गिरधारी यांनी स्वतः त्यावर तीव्र भाष्य करणे आवश्यक होते.

लिहिण्याच्या ओघात काही वाक्प्रयोग विचारदुष्ट व तर्काला छेद देणारे उरले आहेत. ते जाणीवपूर्वक विपर्यस्त लिहिले असतील तर ते ललित लेखणात चालले असते. विचार, चिंतनात ते अप्रस्तुत वाटतात. डोक्यावरून पाणी फिरणे,

शिक्षणाचा गंध न जाणे वगैरे असे आहेत. त्याचेही नेमके परिष्करण केले जाते, तर बरे झाले असते.

आदिवासी, वनवासी ह्या शब्दांबाब्बतही प्रस्तुत अभ्यासकाची भूमिका धरसोडीची अशी आहे. वनवासी शब्द जर डॉ. गिरधारी यांना पटून अन्वर्थक वाटला असता तर त्यांनी त्याचा स्वीकार करून, ग्रंथाचेच नाव, 'आरसा : वनवासी जीवनशैलीचा' असे ठेवायला हरकत नव्हती. पण मनातून ते अनिश्चित असावेत. खरे तर ह्या देशात आपण ज्यांना भटके, विमुक्त, टोळीवाले, जंगली, नेटिव्ह, वनवासी वगैरे म्हणतो ते मूळ निवासी, आदिनिवासीच आहेत. आक्रमकांनीच त्यांना वनवासी अज्ञानी व कणवेची चीज बनवले आहे हे कारण त्यामुळेच बाजूलाच पडते.

त्या आदिवासींमध्ये काम करणाऱ्या मिशनऱ्यांबद्दलही काही लिहिण्यापेक्षा, माणसे धर्मांतर का करतात? हा प्रश्न स्वतःशी विचारून आपल्या सदोष वर्तनाचा हा परिणाम आहे अशा तऱ्हेच्या नोंदींची मला डॉ. भास्कर गिरधारी यांच्यासारख्या संयत अभ्यासकाकडून अपेक्षा होती.

पण ह्या मला व्यक्तिशः जाणवणाऱ्या त्रुटी असूनही डॉ. भास्कर गिरधारी यांचा 'आरसा : आदिवासी जीवनशैलीचा !' हे पुस्तक अत्यंत लक्षवेधी आणि वैशिष्ट्यपूर्ण असेच वाटते. कारण ह्या लेखनात अनुभवसिध्द प्रांजळ अभ्यासक, अत्यंत तळमळीने आणि पोटतिडकीने शब्दबध्द केला गेला आहे. त्यांनी स्वतःच एके ठिकाणी नोंद केली आहे, आदिवासी आयुष्याबद्दलच्या अनेक समस्या अनुत्तरीत आहेत.

ह्या अनुत्तरीत प्रश्नांचा छडा लावण्यासाठी प्राचार्य डॉ. भास्कर व्यंकटेश गिरधारी यांच्यासारख्या समृध्द अनुभवांच्या कार्यकर्त्या शिक्षकी पेशातल्या, समाजसुधारकाने अधिक सखोल चिंतन व मांडणी करुन आमच्यासारख्यांना ह्या विषयाचे सर्वंकष मंथन करणारा नवा मार्गदर्शक आदर्श ग्रंथ द्यावा अशी अपेक्षा बाळगतो. ह्या विषयाचा माझा स्वतःचा स्वतंत्र, सखोल अभ्यास नसतांनाही

प्रस्तावनेचा आग्रह धरून माझा सन्मान करुन, पंचवीस वर्षाची मैत्री जागवली त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आणि मौलिक ग्रंथाबद्दल डॉ. गिरधारींचे अभिनंदन करतो.

ऑक्टोबर २००३

केशव मेश्राम
अ/२/३०, गुरुवर्य अर्जुनराव सहकारी गृहसंस्था,
गीतांजली नगर , माहीम (पूर्व) मुंबई - ४०००१७
फोन - ०२२-२४०९९७३०

# जव्हारचे दिवस ........

१९८३ च्या जून मध्ये गोखले एज्युकेशन सोसायटीने आदिवासी, अतिग्रामीण भागात महाविद्यालय सुरू करून आदिवासींच्या उच्च शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. या महाविद्यालयाचा आद्य संस्थापक प्राचार्य म्हणून संस्थेचे सेक्रेटरी डॉ. मो. स. गोसावी यांनी (एक आजीव सदस्य म्हणून) मोठ्या विश्वासाने माझी नियुक्ती केली. एका अर्थाने हा संस्थेचा फार मोठा अनुग्रह मानतो. त्यामुळेच आदिवासी, वनवासी भागाशी एवढा जवळून संबंध आला. त्यांच्याशी अतूट नातेही जुळले.

जव्हारमधील उण्यापुऱ्या ९ वर्षाच्या वास्तव्यात आदिवासींच्या सान्निध्यात मी निर्भय झालो. उद्याची चिंता आदिवासी बांधव करीत नाहीत. आपण मात्र अकारण करीत बसतो. त्यांना पेन्शन, ग्रॅज्युएटी, काही नसते तरी रात्र जागविणारा तारपा ढोल नाच त्यांना आनंदाने धुंद करीत असतो.

आदिवासींचे जीवन पाहिले, अनुभवले आणि आदिवासींमध्ये रमता आले, त्यांची सारी सुखदु:खे जवळून अगदी एकव्याने अनुभवली. दारूच्या नशेत वावरणारे, दारिद्र्य, अडाणीपणावर मात न करू शकणारे, लग्नाला पैसे नाहीत म्हणून घरजावई बनून शेतात कष्ट करणारे,पैशा अभावी विवाहापूर्वी एकत्र राहणारे, बुध्दिमत्तेची विलक्षण चमक डोळ्यांत घेऊन वावरणारे, परिस्थितीने रंजले गांजले तरी शहाणपण अंगी बाणलेले, भूक दडवून मरेपर्यंत कष्ट करणारे, गळफास घेतला तरी शांतपणे पोलीस ठाण्यातून सुटका कशी व्हावी यांचा प्रयत्न करणारे, लंगोटी लावून उघड्या अंगाने झाडावरुन राब करण्यासाठी झाडपाला तोडणारे, नोटा मोजण्याचा आर्थिक व्यवहार न उलगडणारे, हिरव्या आणि लाल रंगाच्या नोटा असे एकेक मोजणारे, डींग विकून कांदे घेणारे आणि मध विकून मीठ घेणारे, रजिष्टर पाकीट पोष्टाच्या डब्यात टाकणारे, डोळ्यातला मोतीबिंदू बाभळीच्या काट्याने काढू पाहणारे, शिक्षणाला, 'पायातल्या उन्हापासून संरक्षण करणाऱ्या वहाणाची' उपमा देणारे, प्रामाणिकपणाच्या साऱ्या कसोट्यांवर टिकणारे, भीक न मागणारे, गरोदर स्त्रीचाही पुन:र्विवाहासाठी स्वीकार करणारे, ओढ्या उत्सव सणवार साजरे करण्यासाठी कष्टाच्या मजुरीच्या पैशाला झुगारून गावची वाट

धरणारे, झाडपाला खाऊन भूक भागविणारे, आपले आचरण चोख राखणारे, असे आदिवासी पाहण्यात आले. त्यांचे जीवन, शिक्षण, संस्कृती आणि कला मनापासून समजून घेतल्या. त्याचा लळा लागला.

या लेखसंग्रहात काही ठिकाणी आलेली पुनरावृत्ती वेगवेगळया वेळी हे लेखन झाल्याने आलेली आहे. विषय आकलनासाठी तिची आवश्यकता वाटली. आदिवासींबद्दलच्या या जिव्हाळ्यातूनच 'आरसा : आदिवासी जीवन शैलीचा' म्हणजेच आदिवासी जीवन, शिक्षण कला आणि संस्कृतीचा हा लेखसंग्रह सिध्द झाला आहे. नाशिकचा कुंभमेळा जसा १२ वर्षांनी आला तसा या पुस्तकाच्या प्रकाशनाचा योगही १२ वर्षांनीच येत आहे. हा सुयोग आमचे स्नेही व सुप्रसिध्द साहित्यिक प्रा. केशव मेश्राम यांच्या प्रेमाने व सुनियोजनामुळे येत आहे. ते मुंबई विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख असतांना त्यांच्या निरपेक्ष प्रेमाचा, सोज्वळ स्वभावाचा, सुजाण जाणिवेचा प्रत्यय आला. त्यामुळे त्यांचीच अग्रक्रमाने प्रस्तावना घ्यावी हे ठरले व त्याला त्यांनी प्रस्तावना देऊन तत्पर प्रतिसाद दिला हाही एक सुयोग म्हणावा लागेल. जव्हारमधील ९ वर्षांच्या माझ्या वास्तव्यांचे या ग्रंथनिर्मितीने सार्थक होत आहे.

महाराष्ट्रातील 'युगवाणी', 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण', 'लोकराज्य', 'योजना', 'महाराष्ट्र टाईम्स', 'लोकसत्ता', 'रुची', 'भूषणराज', 'कालतरंग', 'शब्दरंजन', 'स्वयंप्रकाश', 'हाकारा', 'वनवासी', 'वनस्वर', 'वनबंधू', 'बनवार्ता' इत्यादी नियतकालिकांनी या आदिवासींच्या संदर्भातील लेखांना पूर्वप्रसिध्दी दिली त्याबद्दल त्या सर्व संपादकांचे ऋण व्यक्त करतो. मुद्रणप्रत तयार होतांना प्रा. प्रशांत देशपांडे, प्रा. तुकाराम रोंगटे, श्री. धोंडोपंत गवळी, श्री. जे. डी. शेख व श्री. शशांक व्यवहारे यांचे विशेष सहकार्य लाभले. एच. पी. टी. कॉलेजच्या ग्रंथालयाचे नेहमीच मला सहकार्य लाभत राहणार आहे. त्यांचेही मी आभार मानतो. या ग्रंथाच्या मुद्रणाची जबाबदारी मे. प्रिंटोरियमचे श्री. विक्रम पळशीकर यांनी, अक्षरजुळणी व रेखीव मांडणीची जबाबदारी सौ. अनघा देव आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रकाशनाची जबाबदारी युगांतर प्रकाशन, नाशिक यांनी आत्मीयतेने पेलली त्याबद्दल त्यांचाही मी अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ चित्रकार श्री धनंजय गोवर्धने यांनी कलात्मक दृष्टीने तयार केले त्याबद्दल त्यांचाही आभारी आहे. आदिवासींबद्दल आस्था असलेले अभ्यासक समाज मनस्क या ग्रंथाचे यथोचित स्वागत करतील याची खात्री आहे.

दिनांक - ४ ऑक्टोबर, २००३ भास्कर गिरधारी

# ठाणे जिल्हा : एक अदृश्य चेहरा

आपला भारत देश एक आगळा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण देश आहे. त्यात नानात्व असले तरी एकत्व सामावलेले आहेच. आपल्या देशातील ही विविधता कोणत्याही प्रकारची विषमता निर्माण करण्यात असमर्थ ठरली. उलटपक्षी या विविधतेतूनच एका सुसंवादाची निर्मिती झाली.

## भारतीय संस्कृतीचे अंत:प्रवाह :

याच भारतीय संस्कृतीचे अंत:प्रवाह आपल्याला त्यातील सर्व राज्यांमधून प्रवाहित झालेले दिसतात. कालभान आणि परिस्थितीनुसार काही वेगळेपण, बदल जाणवत असले तरी मुख्य स्त्रोत एक संध आणि मूलतत्त्वे अबाधित राहिल्याचे जाणवते. भारतातील विविध राज्यात देखील भारतीय संस्कृतीचा ओघ अखंडितपणे प्रवाही आहे. त्याच बरोबर राहणीमान आणि जीवनमान यातील वेगळेपणही राज्या राज्यात भरून राहिलेले आहे. उदाहरण म्हणून काश्मीर, गुजराथ, कर्नाटक, आंध्र, उत्तरप्रदेश इत्यादी कोणत्याही राज्याचा विचार करून पाहा.

## जिल्ह्यांचाही अपवाद नाही :

यादृष्टीने आपण विविध राज्यांतील जिल्ह्यांचाही विचार केला तर त्यातही प्रत्येक जिल्हा हा आपल्या विशेषांनी युक्त असून वेगळेपणाने उठून दिसतो. याला महानगरांचेही अपवाद नाहीत. मोठे जिल्हे किंवा महानगर याचे केवळ एक रूप किंवा एक चेहरा, पण त्याखेरिजही एक जिल्ह्याचा म्हणून काही अज्ञात अनोळखी चेहरा असतो. या अनोळखी वा अदृष्य चेहऱ्याची मात्र सर्वांनाच ओळख असते असे नाही. त्याची ओळख मुद्दाम करून द्यावी लागते. ज्यांना ती ओळख असते ते स्वत:च अपरिचीत असतात आणि अनभिज्ञही असतात.

## ठाणे जिल्हा : अदृष्य चेहरा :

आपण ठाणे जिल्ह्यापुरताच प्रस्तुत ठिकाणी विचार करावयाचा ठरविला तर ठाणे जिल्ह्याचे नागरी-शहरी स्वरूप शहरवासियांना ज्ञात आहे. पण तरीही

ठाणे जिल्ह्याचा बहुसंख्य भाग तसा अदृश्य आहे. तो चहरा लोकांना माहितीच नाही. उद्योगिकरण, व्यापारी भरभराट तंत्रज्ञानाचा विकास, शैक्षणिक विकास, लोकसंख्येचा विकास हे सगळे शहरी वातावरणात नजरेत भरते. वाहतूक आणि दळणवळण वाढीचा वेगही लक्षात येतो. पण ठाणे जिल्ह्याचा एक फार मोठा भाग आदिवासी वनवासी गिरिजन वसाहतींनी व्यापलेला आहे. हे किती लोकांना ठाऊक आहे. जवळून परिचित आहे.

## आदिवासी वस्तीचा मोठा टापू :

डहाणू , पालघर, वाडा, जव्हार, तलासरी, मोखाडा, शहापूर असा सात तालुक्यांचा एक फार मोटा पट्टा हा आदिवासी वस्तीचा भाग म्हणून ठाणे जिल्ह्यात आहे. त्यात विक्रमगड, सूर्यानगर यांसारखी महत्त्वाची गावे आहेत. या सगळयांसाठी एक स्वतंत्र जिल्ह्याचे खास आदिवासी ठिकाणच असावे असा विचार गेल्या काही वर्षात संतत पुढे येत आहे. किंबहुना या सगळ्या तालुक्यांमधून डहाणू ते नाशिक अशी एक रेल्वे लाईन टाकून रेल्वे खेळविली पाहिजे म्हणजे हा भाग सर्वांना परिचित होईल. आणि ज्याला प्रस्तुत लेखात अदृष्य चेहरा म्हटले आहे, तो ठाणे जिल्ह्याचा चेहरा सर्वांना सुपरिचित होईल.

## स्वतंत्र वनवासी विद्यापीठाची क्षमता :

जव्हार, मोखाडा, सूर्यमाळ, देवबांध, विक्रमगड, वाडा, पालघर, तलासरी, शहापूर, डहाणू, सूर्यानगर, कासा, मनोर यासगळया भागांना एका धाग्यात गुंफणारे एक स्वतंत्र वनवासी आदिवासींसाठी एक विद्यापीठ नव्याने स्थापण्याची गरज़ही आहे, असे म्हटल्यास ते अनाठायी होणार नाही. कारण आदिवासी संस्कृती कला, शिक्षण, समाज, जीवन याचा सांगोपांग अभ्यासाचे स्वतंत्र दालन एखादे आदिवासी विद्यापीठ स्थापन करून उघडता येईल. त्याची तेवढीच आवश्यकता व गरजही आहे. आदिवासी विद्यापीठासाठी सर्वोत्कृष्ट विभाग म्हणून या ठाणे जिल्ह्यातील सूर्यानगर वसाहतीचा उल्लेख करता येईल.

## आदिवासी जीवन आणि संस्कृती :

ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे जीवन त्यांची कला, त्यांची संस्कृती विशेष

अभ्यासनीय आहे. ठाणे जिल्ह्यात आदिवासींच्या एकूण ८ जाती आढळतात. महादेव कोळी, कोकणा, वारली, ढोर कोळी, मल्हार कोळी, क ठाकूर, म ठाकूर, आणि कातकरी. यामध्ये काहिसे शिकलेले व नौकरीमध्ये वर्ग १ वर्ग २च्या जागा पटकावणारे पदवीधर आढळतात. पण तुलनेने अन्य जाती मागासलेल्या आहेत. त्यातील कातकरी जात तर शिक्षणा पासूनही वंचित आहे. अद्यापही कातकरी लोक मेलेल्या ढोराचे मास खातात असे म्हणतात.

या जाती जाती मध्येही तसे अंतर आहेच. एकदा मागासवर्गीय जात म्हटली की निदान सर्व मागासवर्गीय जातीत तरी एकोपा एकजूट आपल्याला अपेक्षित असते पण तशी वस्तुस्थिती नाही. अत्यंत कडवेपणाने हा उपजाती पोटभेदही दुर्दैवाने अस्तित्वात आहे असे जवळून पाहिले, त्यांच्यात मिसळून समजून घेतले, तर लक्षात येते याचे एकच उदाहरण दिले तर ते पुरेसे होईल. एकदा एका लहान मुलांच्या वसतिगृहात गेलो नामोल्लेख उचित नव्हे, तर तेथील मुले जेवण करणार नाही असे म्हणत होते. कारण नेहमीचा कामाठी आचारी, उपलब्ध नव्हता आणि एका कातकारी बाई कडून आज स्वयंपाक करवून घेतला होता. मला धक्काच बसला. एवढीशी लहान लहान मुले वसतिगृहात सुधारण्यासाठी तथाकथित समाजातील मुल्य प्रवाहात आणण्यासाठी आणलेली. त्याना सुशिक्षित आणि सुसंस्कृत करायचं आणि समाजाकडून गोळा करुन आणलेल्या पै-पैशावर धान्यावर चालणारे हे वसतिगृह तेथील मुले म्हणत होती, आम्ही कातकरी बाईने शिजवलेले अन्न खाणार नाही - आम्हाला ते चालत नाही. जर या ठिकाणी दुसऱ्याच्या मेहरबाणीने राहणाऱ्या वसतिगृहात ही जातीयता विषमता तर मग गावात काय परिस्थिती असेल. शिवाय खूप वाईटही वाटले की कोणत्या थरापर्यंत हा जातीयवाद पेरला गेलेला आहे.? यातून आपली सुटका कशी होणार? कधी होणार?

### अठरा विश्व दारिद्र्याचीच सोबत :

अद्यापही खोलवरच्या फारतर एखादी एस.टी. बस दिवसभरात येऊन जाणाऱ्या अतिग्रामीण अशा एखाद्या पाड्यावर तुम्ही गेलात तर तेथे आपल्याला कमालीचे - अठराविश्व दारिद्र्य आढळेल. लंगोटी लावून उघडे बंब लोक झाडावर चढून विळ्याने सरपण काढतांना दिसतात. नदीवर बाया बापड्या उघड्याने आपले

एकुलते एक वस्त्र वाळत घालून आंघोळ करतांना दिसतात. आणि ही आंघोळही सवड मिळेल तेव्हा. नदीला पाणी असेल तेव्हा. अजूनही पिण्याच्या पाण्याची सोय नाही. शुध्द पाण्याचा मुद्दा तर त्यांना ठाऊकच नाही. एखाद्या झऱ्यातील आटत चाललेल्या पाण्यात आणखी खोल खड्डा करायचा तिथे गाडग्या मडक्यात थोडं थोडं करुन पाणी भरायचं आणि चढ उतार पार करीत ४ / २ मैलावरुन हे पाणी आणायचं स्वच्छतेच्या गप्पा सगळेच मारतात पण ह्या अडचणी कोण लक्षात घेतं ? शॉवर बाथ, बाथटप, वॉश बेसिन, २४ तासाचे नळ यांच्या सानिध्यात राहणाऱ्यांना केवळ अस्वच्छता आणि घाणेरडेपणा दिसतो. पण अगदी साधा साबण त्या पाड्यावरच्या कच्छीच्या किंवा बोहऱ्याच्या दुकानात सुगंधी साबणाच्या भावाने विकला जात असतो.

पिळवणूक शोषण चालूच आहे :

सगळेच शोषण आणि एक्सप्लॉयटेशन, अजूनही मोठ्या साहसाने माशा डसत असूनही मधाचे पोळ होळवून काढलेला गरीब बिचाऱ्या आदिवासींचा बिअरची बाटली भर मध तालुक्या शहराच्या गावात अवघ्या ५ रुपयाला विकत घेतला जातो. मेडिकल स्टोअर्स मधून हाच ५ रुपयाला १ लिटर घेतलेला मध, १०० ग्रॅमचे सुरेख बाटली पॅकींग करुन मोठ्या जबर किंमतीत विकला जातो. गावठी बाभळीचा डींग अजूनही भारोभार देऊन मीठ आणि कांदा विकत घेणारे, बटाटे विकत घेणारे आदिवासी आहेत. वनसंपत्ती आणि वनौषधी हिरडा, बेहडा, डींक, जांभळं, करवंद, बोरं, भोपळे, काकड्या मातीमोल भावाने विकून जीवनावश्यक पदार्थ तेल-मीठ विकत घेणे भाग पडते. पुन्हा नोटा मोजता येत नाही. एक हिरवी, एक लाल ५ + २ अशी मिळून ७ रुपये होतात असा अडाणी हिशोब चालू आहे. सावकारांचे फावते आहे. खाजगीतला हात उसना, कर्जबाजारी करणारा व्यवहार चालूच आहे. त्यांच्या मोबदल्यात फार तर सुधारित वेठबिगारी चालू आहे. असे म्हणावे लागेल. मी तुला म्हैस घ्यायला कर्ज देतो तू मला ५ रुपये भावाने एक लीटर दूध घालायचे, बी, बीयाणे, लग्न यासाठी कर्ज द्यायचे आणि त्या मोबदल्यात ऋणाईताला कायमचे दावणीला बांधायचे. रेशन कार्डावरची साखर विकत घ्यायला आदिवासींजवळ पैसे नसतात आणि त्याच्या नावाची साखर परस्पर दुकानदार विकत घेतात आणि आदिवासींच्या नावावर साखरेची पोतं नुसतीच रिकामी

होतात. मलिदा मिळतो; पुन्हा त्या धनिक दुकानदारालाच आणि सधन गावकऱ्याला.

## शिक्षणाबद्दलची उदासीनता :

आश्रमशाळा आणि वसतिगृह तसेच अनेक स्वयंसेवी संस्थांनी मिनशरी वृत्तीने चालू केलेली वनवासी क्षेत्रातील कामे लक्षात घेऊनही असे आढळते की अद्यापही या ठाणे जिल्ह्यातील आदिवासी पालकांचे पाल्याविषयी दुर्लक्ष आहे. या पालकांचा मुलांच्या शिक्षणात सहभाग शून्य प्रमाणातच आहे. बेरिस्ता, मेढे सारख्या भागात शेतीकामामुळे मुलांना शाळा सोडावी लागते. झाप, हिरडपाडा, सारख्या भागात धाकट्या भावंडांना सांभाळण्यासाठी मुलांना घरी ठेवतात. तर मोखाडा भागात शिक्षणाने मुलांना करणी केली जाते, तो जगत नाही, त्याला नजर लागते अशा समजुती आहेत. हुशार मुलेही बापाच्या अडाणी पणाचा फायदा घेऊन शिकायला घातलं की 'पोट दुखत' हा सोपा उपाय सांगून घरी बसतात. एकदा एका मुलाचं पोट मी खरच डॉक्टरकडून तपासलं तर त्याची ती लबाडी असल्याचे निदर्शनास आले. डॉक्टरही म्हणाले की पोट दुखत म्हटल्यावर कोणालाचं काही कळत नाही. आणि बोधही होत नाही. मुले शिक्षण टाळायचे असले की असा बहाणा करतात. आदिवासी मुलामुलींना मूळातच रानात मोकळं - मुक्त राहण्याची सवय, रिकामं हिंडायचं आणि रानचा वारा पीत हुंदडायचं अशीवृत्ती. मग वसतिगृहाच्या नियमात आणि शाळा कॉलेजमध्ये बसून तासातासात गुंतून राहायचे आवडत नाही.

एका आश्रमशाळेत तर असे आढळले की शिक्षकांनी मुलांचे पालक कधीच पाहिलेले नाहीत कारण ते दरीत राहतात. आणि दरीतूनच मुलांना आश्रम शाळेत पाठविले, कधीतरी नवे धान्य निघाले की ते देवाला वाहायला वाजत गाजत दरीतून बाहेर येतात. आणि पुन्हा गायब होतात. अशी ही शिक्षण स्थिती आहे. आज ठाणे शहरातील मुलाला ९०% गुण मिळवून देण्यासाठी धडपडणारा सुविद्य पालक कुठे? आणि त्याच ठाणे जिल्ह्यातील दरीत दडलेला हा आदिवासी पालक कुठे? असे हे विषम चित्र आहे.

शेतीसाठी आदिवासी पाड्याला चिकटून आहे. गाव सोडलं तर शेती हिसकावून घेतली जाईल असे त्याला वाटते. त्यामुळे मुलांची शिक्षणं अर्धवटच ! ७ वी ते ९ मध्ये रखडणारी मुले बहुसंख्य आहेत. शेतीवर राहिले नाही तर शेती आपली नाही हा अपसमज रूढ आहे. म्हणून गाव सोडायला आदिवासी तयार नाही. शिवाय बरेच दिवसात शिक्षण ठाऊक नाही कमाई माहित नाही. मग जेमतेम ८ वी १० फार तर १२ वी होऊन सुखाची नौकरी पत्करायची आणि शहरी वळणाने चैन करायची असे खूळ आदिवासी मुलांमध्ये निर्माण झाले आहे. राहणीमानाचे शहरी, अनुकरण वेषभूषा रंगीबेरंगी, लूझ कपडे एवढ्या पुरतेच मर्यादित आहे पण उच्च शिक्षण घेवून आय. ए. एस. / एम.पी.एस.सी. परीक्षा देऊन राखीव जागेचा लाभ घ्यावा असे त्याना मनापासून वाटत नाही. ती जिद्दही त्यांच्यामध्ये नाही. ही आमच्या ठाणे जिल्ह्यातील पदवीधर आदिवासी विद्यार्थ्यांची खरी शोकांतिका आहे. खुळ्या सारखे ते बिचारे एस.एस.सी डी.एड. आणि मिळणाऱ्या चतुर्थ श्रेणी नौकऱ्यातच निमग्न आहेत.

सर्वकाही मोफत होते या कल्पनेने शिक्षणाचा फार मोठा प्रसार करायला निघालेल्या शिक्षण संस्था नव्याने ठाणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात पाय रोवू लागल्या आहेत. सारे काही अनुदानावर चालते आणि नाहीतर फंड गोळा करता येतो. भांडायला, मागायला वाव सतत आहे ध्येयवादी आचार्य भिसेंची परंपरा कुठे आणि स्वार्थाची पोळी भाजणारी मंडळी कुठे ?

**अनारोग्याचे वरदान :**

एका पाण्यामुळे सगळे रोग होतात आणि ते पाणीच मुळी आदिवासी क्षेत्रातील प्रदूषित आहे. त्यामुळे हगवण, खरुज, रक्तदोष, त्वचारोग, नारू, कुपोषणाचे रोग, सर्रास ठाण मांडून बसले आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. त्यात फार थोडे सेवा भावी डॉक्टर्स आहेत. बाकीचे नावाला नोकरी संपर्कापुरती व अनुभवा पुरती स्वीकारून खाजगी हॉस्पीटल्स थाटण्याच्या विचारात असतात. त्यामुळे तशी प्राथमिक आरोग्य केंद्रावर सक्ती असूनही उपस्थिती मर्यादितच राहते. त्यांचाही पुन्हा औषधांच्या पुरवठ्या अभावी उपचारांचा नाईलाज असतो. अशा दवाखान्यांचे औषधी खरेदी तंत्रही द्राविडी प्राणायामच असते असे ते म्हणतात.

ॲम्ब्युलन्स ही कधीच दुरुस्त आणि गरीबांच्या कामाला उपलब्ध नसते. क्वचित चांगले अनुभवही येतात पण बहुधा गरिबांना सोलापुरी चादरीच्या झोळीत डीहायड्रेशन झालेला पेशंट घालून जिवंतपणी त्याची प्रेतयात्रा काढूनच हॉस्पिटल पर्यंत आणून घालावा लागतो. त्याने कोणतातरी झाडपाला खावून पोटाची भूक मारलेली असते आणि तीन दिवस भागवलेले असतात. हॉस्पिटलमध्येही जागा शिल्लक नसते मग कुठेतरी कॉटच्या खाली जमिनीवर, बाहेरच्या बाकड्यावर बसून पेशंटला ट्रीटमेंट घ्यावी लागते. तशी या भागात धनिकांची सेवाभावी वृत्तीने अनेक शिबिरे घेण्याची धडपड चालूच असते. मोफत दंत शिबिर, नेत्रशिबिर, रक्तदान शिबिर, रोगनिदान शिबिर, १० रुपयात चष्मे इत्यादी पण त्यात फार मोठे सातत्य राहत नाही. सोयीनुसार गाजावाजा करीत शिबिर पार पडतात. पेशंटला समाधान मिळते. तेवढ्यापुरते, फॉलोअप उपचाराचे घोंगडे भिजत राहते. शेवटी आदिवासींना भगत जवळचा वाटतो.

### विचित्र मानसिकता आणि अंधश्रध्दा :

आदिवासींची मानसिकता विचित्र आहे. अजूनही ठाणे जिल्ह्यातील खेड्यापाड्यात अंधश्रध्दा आणि या विचित्र मानसिकतेचा प्रत्यय येतो. गंडेदोरे, भगत, कोंबडे, बकरे सारेकरुनच मग 'लास्ट स्टेज' ला पेशंट दवाखान्यात आणण्याची त्यांची प्रथा आहे. खूप सांगून आणि प्रबोधन करुनही त्यात म्हणावा असा फार फरक पडत नाही. त्यांना नाडणारे ही तेथे असतातच. तुम्ही मला ५० रुपये द्या मी कोंबडं उतरवतो आणि अंगठीपण वाहतो. असं म्हणून काहीच न करता सोनार अंगठीचे आणि कोंबडीचे पैसे उकळून भगताला नैवेद्य दाखवतात. असेही याच ठाणे जिल्ह्यात ऐकायला मिळते की अजूनही डोळ्यातील मोती बिंदु बाभळीच्या काट्याने काढणारे महाभाग आहेत. एकीकडे डॉक्टरला दाखवायचे आणि दुसरी कडे गावठी भगताचे दारू, कोंबडे नैवेद्य चालूच असतात. आदिवासी जवळ वनौषधी चांगली आहे. त्यातला माहितगार माणूसही समंजस असतो, पण त्या एका निष्णात चांगल्या वैद्याचे रुपांतर भगतात होते.

विचित्र मानसिकतेबाबत सांगायचे तर एकदा डॉक्टर म्हणाले आज जेवायची इच्छा होत नाही. मी विचारले कारण काय ? तर आज असा विचित्र पोस्ट मार्टम

केला. ते म्हणाले किरकोळ घरगुती भांडणावरून एका आदिवासीने झाडाच्या शेंड्याला जाऊन गळफास लावून घेतला. ते प्रेत वरच कुजले आणि पोस्टमार्टम कसे करायचे, वास सुटला तेव्हा लोकांना त्या आत्महत्येचा शोध लागला. शेवटी आम्ही ते झाड खोडाच्या बाजून कुऱ्हाडीने मूळाकडून संपूर्ण आडवे करुन ते प्रेत खाली घेतले. एवढे काय घडले असेल की त्याने असा बेपर्वा आत्महत्येचा प्रयत्न केला. सासू सुनेच्या किरकोळ भांडणावरून आत्महत्येपर्यंत मजल जाते याचा अर्थ आदिवासींजवळ विचार आजचा तर नाहीच, उद्याचाही नाहीच नाही, अशी माणसं ही आहेत. गांवच्या पंचाकडे येऊन शांतपणे जणुकाही घडलेच नाही अशा पध्दतीने सावकाश सांगतात - 'ते जरा पोरानं गळफास घेतला', तेवढं पोलीसला आवरा, बस्स !

**आदिवासी लोककला आणि जीवन :**

ठाणे जिल्ह्यातील आदिवासींमध्ये तहानभूक हरपून बेभान होऊन, आपले कष्ट अर्धपोटी जगणं, नागडे उघडे राहणं विसरून तारपा नृत्य धुंद करणारे रात्र जागविणारे विशिष्ट मोसमात चालूच असते. ढोल नाच आहे त्यात पिरॅमिडस कसरती आहेत. हा नाचणारा काटक असतो. घामाघूम होई पर्यंत नाचतो त्यातच कसरत आणि सर्वस्वही असते. कोलांट उड्या असतात. तारपा वाजवणारा कसदार बळकट तरुण मानला जातो. या ताकदवान तारपा फुंकणाऱ्यांवर आदिवासी तरुणी खूष असतात. त्याच्या नादात त्या गुंगतात आणि सारी दुख- व्यथा- कष्ट विसरून आनंदी राहतात. डाका- ढोल-झांज-नाल वाजवत रात्र जागवतात. देवीचा गोंधळ, बोहाडा, अक्षय्यतृतीया सण, नवीन धान्य, कवळी भाजी, इत्यादी सारे धुंदीत चालू असते. भाताच्या बरोबर गूळ-कणकीची उंडी टाकून शिजवतात. गव्हाची पोळी हेच त्यांचे सणाचे पक्वान्न असते. मर्यादित माफक खर्चात अमर्याद आनंद ते उपभोगतात.

ठाणे जिल्ह्यातील 'थाळगान' ही कला या दृष्टीने वाखणण्याजोगी आहे. मेण, काशाचा थाळा आणि सनकाडी/ सागकाडी असले की थाळगानाला सुस्वर कंपनात सुरवात होते. जेवढा वेळ असतो तेवढा वेळ ते कथाकाराचे कथन चालू शकते. सामुदायिक विवाह जसे स्वयंसेवी संस्थांमार्फत चालू असतात. तसेच

'काज' नावाचा सामुदायिक 'श्राध्द' विधीही जोरात असतो. शेवटी वर्षभरातील विधवा आणि विधुर पुरुष यांचे पुनर्विवाह जुळवून पुनर्वसन करण्याचा प्रयत्न होतो. त्यात अनेकांचे भले झाले आणि संसार उभारले गेले आहेत. गरोदर स्त्री शीही लग्न करुन मनाचा मोठेपणा दाखवण्याची क्षमता याच आदिवासींमध्ये आहे. पूर्वीच्या घरोब्यातून या गरोदर स्त्रीला झालेल्या मुलाला 'ओढ्या' म्हणून आनंदाने या मुलाला नवा पती वाढवितो. स्त्रीदाक्षिण्य आणि औदार्याचे एवढे दुर्मिळ उदाहरण जगात शोधूनही सापडणार नाही.

त्यांच्या म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, कूट यात साहित्य गुण आहेत, पर्यावरण आहे, शास्त्र आहे. लोकगीत आणि लोककथा रंगतदार आहेत. ही लोकगीते गात राहावी वाटतात आणि कथा सांगत राहाव्या आणि श्रोत्यांनी ऐकाव्यात अशा आहेत. हे सगळं जपण्याची आणि जतन करण्याची आवश्यकता आहे. संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात हा मागासलेला ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाज आणताना त्यांच्या सुसंस्कारित मनाचा आणि उदात्त संस्कृतीचा विचका होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

उदा. - ठाणे जिल्ह्यातील आदिवासीमध्ये किंवा कोणत्याही आदिवासीमध्ये सामान्यतः खालील तीन गोष्टी शोधूनही आढळणार नाही.


१. आदिवासी उपाशी राहतो पण कधी भीक मागत नाही. आदिवासी भिकारी नाहीत. सकाळपासून संध्याकाळ पर्यंत उपाशी राहून तो काम करील, चकार शब्द बोलणार नाही, पण मला भूक लागली असे कधी म्हणत नाही.
२. आदिवासींमध्ये वेश्या व्यवसाय नाही.
३. आदिवासी कधी चोरी करीत नाही.

सामान्यतः अशी ही स्थिती आहे. संगणकाच्या युगात एकविसाव्या शतकात, उद्योगीकरणाच्या फेऱ्यात - वाहतूक आणि दळणवळणाच्या शोधात आणि सुविधात नागरी ठाणे विभाग गुंतला असला तरी ठाणे जिल्ह्याचा हा आहे दुसरा अदृष्य चेहरा तो या लेखाने थोडा प्रकाशात आणता आला त्यात समाधान आहे.

❑❑❑

# लोकसंस्कृतीच्या अभ्यासाची गरज

लोकसंस्कृतीचा सूक्ष्म अभ्यास केल्यानंतर असे लक्षांत येते की, लोकसंस्कृतीमध्ये सामाजिक समरतेची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत. तेवढ्या साठीच लोकसंस्कृतीच्या खऱ्या, कष्टसाध्य अभ्यासाची गरज आहे. आपली लोकसंस्कृती बहुंताशाने मौखिक परंपरेतूनच अवतरलेली आहे. लोकसंस्कृतीचे विशेष अद्यापही सर्वार्थाने लेखनाविष्ट व्हावयाचे आहेत. अलिकडे पाश्चात्य विद्वानांपासून प्रेरणा घेऊन लोकविद्येचा, लोकसंस्कृतीचा, लोकसाहित्याचा अभ्यास होऊ लागला आहे. या अभ्यासातून भारतीयतत्व, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समरसता, माणसामाणसातील नात्याचे अभिसरण आत्पस्वकीयांच्या बद्दलच्या सद्‌भावना सिध्द होत आहेत, साकार होत आहेत.




महाराष्ट्रातील प्रमुख १० आदिवासी जिल्हे

लोकसंस्कृतीचा अभ्यास म्हणजे लोकजीवनाचा, लोकमाणसांचा अभ्यास आहे. हे लोकजीवन, लोकमाणसात अभ्यासण्यासाठी अभ्यासकाने लोकांशी समरस होणे लोकात अगत्याने मिसळणे अत्यावश्यक आहे. त्याखेरीज या अभ्यासाला सुरुवात होत नाही. त्यांच्याशी एकरूप झाल्याशिवाय हा अभ्यास संभवत नाही. त्यासाठी एक ओळख खेड्यापाड्यावर असली पाहिजे. त्याआधाराने त्या कुटुंबाशी ओळख होईल. या कुटुंबाच्या ओळखीतूनच त्या गावांशी ओळख होईल. या अभ्यासातून घरगुती नाते प्रस्थापित होईल, त्यामुळे विनासंकोच लोकवाङ्मय ऐकायला मिळेल. चालीरीती, प्रथा, रुढी, अंधश्रध्दा कळतील. सामाजिक, आत्मिक, सांस्कृतिक रीतीचे भान होईल. साधारणपणे एका खेड्याची

जी परिस्थिती लक्षात येईल, त्यांच्याशी मिळती जुळती स्थिती शेजारच्या खेड्यापाड्याची असेल. आणि थोड्याफार फरकाने तालुक्याची, जिल्ह्याची, त्या विशिष्ट प्रदेशाची असेल. लोकसंस्कृतीच्या अभ्यासाला खरी सुरुवात खेड्यापाड्याला प्राप्त झालेल्या नावापासून होऊ शकते. उदा. जांभूळपाडा, म्हणजे पूर्वी त्या ठिकाणी जांभळाची झाडे अधिक असतील. मेट हा शब्द गावाच्या नावात येतो, त्याचा अर्थ घोडे बांधतात ती जागा, म्हणजे पूर्वी तेथे घोड्याचा पागा असावा. त्यानंतर आपल्या असे लक्षांत येते की, एखादे गांव विशिष्ट कुळनांव किंवा आडनाव बहुसंख्य असलेले आढळतात. उदा. कोलते, चौधरी, दळवी, कोरडे, या एकाचा आडनावाच्या माणसांची भरलेली गावे आहेत. तसेच विशिष्ट जाती आणि उपजाती यांचीही गावे वसलेली असतात. उदा. वारली, कातकरी, महादेव कोळी, कोकणी यांची गांवेच्या गांवे आहेत. लोकसंस्कृतीच्या अभ्यासाने नाव, गाव, जातपात, रीती-भाती यांना महत्व आहे. त्यातच लोकसंस्कृतीची बीजं आढळतात.

एखाद्या गावाच्या अभ्यासात कुटुंबाची दिनचर्या अभ्यासावी लागते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंतच्या त्या कुटुंबातील माणसे काय काय करतात. यांच्या एकात्मता, वर्तन, संकोच, आवडनिवड, वेशभूषा, एकूण जीवनमान, राहणीमान इत्यादींची कल्पना येते. हा अभ्यास त्यांच्या सतत सानिध्यांत (लोकांच्या) राहून करता येतो. आणि आपणांस तो लोकसंस्कृतीच्या अभ्यासाच्या दृष्टीने उद्बोधक ठरतो. पहाटेच्या उठण्यापासून, जात्यावरच्या ओव्यातून कुटुंबाच्या श्रध्दा आणि भावना, अगतिकता व आस्तिकता कळू शकते. देव्हाऱ्यातील देवांची अनोळखी नावे परिचित होतात. उदा. हिरवा देव, वेताळदेव, म्हसोबा, मरीआई, इत्यादी.

आहार विहारावरुन आर्थिक, सामाजिक स्थितीची जाणिव होते. कांही इष्ट-अनिष्ट प्रथाही कळतात. परंपरेने चालत असलेल्या आणि मनामध्ये रुजलेल्या लोकसाहित्याच्या अविष्कारातून कौटुंबिक स्थितीवर प्रकाश पडतो. यातूनच मग लक्षात येऊ लागले की, ग्रामीण, अतिग्रामीण खेड्यापाड्यावर माणुसकीचे झरे जिवंत आहेत. गावात आलेल्या पाहुण्यांला अजूनही भोजन-निवास याची

चिंता नाही. आपल्या गावात दुष्काळ असला तरी पाहुणे म्हणून गावाच्या गांव दुष्काळ पीडीत नसलेल्या गावी जाऊन सुखाने राहू शकतात. समजा तेथील रसद संपलीच तर ती दोन्ही गावे, तिसऱ्या ठिकाणी जातात. एरव्ही कणगीत दाणा भरलेला असल्यावर आकाशाकडे पाहात आळसात दिवस घालवतात. म्हणूनच म्हण आहे की, 'कणगीत दाणा तर भिल उताणा', गावात एखादी चांगली गोष्ट घडत असेल तर मंदिर बांधत असतील, बोहाड्यासारखा उत्सव असेल तर जे वर्गणी देऊ शकत नाहीत असे लोक पैशाच्या मोबदल्यात आपले श्रम देतात. म्हणजे एखाद्या सधन सावकाराकडे स्वतःला त्याच्या शेतीच्या कामात बांधून घेतात. व तो मालक त्याच्या वाट्याचे पैसे वर्गणी देतो. एव्हढेच काय, मातृसत्ताक पध्दतीप्रमाणे मुलीला देण्यासाठी तांदूळ, दागिने देहज या रुपात देतात. हुंड्याची ऐपत नसल्यास तो सासऱ्याकडे घरोंदा म्हणून रहातो. दोन तीन वर्षे शेतीत राबतो. परतफेड होताच स्वाभिमानाने बाहेर पडतो. विवाहित स्त्रीच्या मनात अन्य पुरुषाबद्दल भाव निर्माण झाल्यास व्यभिचार मान्य नसून सरळ विवाहाला परवानगी आहे. गावपंचायत बसून तिथेच काडीमोड घेतात. स्त्रीदाक्षिण्य, औदार्य एव्हढे की पूर्वीच्या पतीपासून राहिलेल्या गर्भाच्या पालनाच्या जबाबदारी सह स्त्रीला पटल्यावर स्विकारतात. विवाहासाठीलागणारा खर्च झेपत नसल्यास विवाहा अगोदरच एकनिष्ठेने राहण्याची परवानगी आहे. आणि नंतर झालेल्या मुलाबाळांच्या साक्षीने लग्नही लावतात. 'काज'मध्ये देखील सामुदायिक श्राध्द घालून झाल्यानंतरच लगेच विधुर पुरुष व विधवा स्त्री यांची लग्ने जमविली जातात. ती ही केवळ पदरांत एखादा रुपाया बांधून भाताचे पिंड परवडत नाहीत तर मातीचे पिंड करतात. या प्रथेतून दोन विस्कटलेल्या कुटुंबांचे पुनर्वसन होते आणि दोन्ही घरे उभी राहतात. जातिभेद आणि विषमता प्रत्यक्षात हे समाज मानत नाहीत. एव्हढेच काय पण नवीन भाजी डोंगरावरील शेतात आल्यास 'कवळी भाजी' नावाचा सण साजरा करतात. म्हणंजे सगळ्यांनी बसून शेजारी नातेवाईक परिचित यांना बोलावून पहिल्यांदा ती भाजी खातात आणि तिथून मग भाजी खायला सुरुवात करतात. शेतातील धान्य पहिल्यांदा देवीला वाहतात. या प्रसंगांमधून एकात्मता, विषमता रहित संस्कृतीचा प्रत्यय येतो. म्हणूनच असे म्हणता येईल की लोकसंस्कृतीच्या अभ्यासाची विशेष तीव्र गरज असून त्यात समरसतेचे प्रवाह रुजले आहेत. ❑❑❑

# आदिवासींचे ग्रामदैवत

एका इंग्लीश कवीने त्याचं नाव अलेक्झांडर पोप त्याने म्हटलं आहे की "The proper Study of mankind is man" याचा अर्थ माणसाचा अभ्यासच खऱ्या अर्थाने मानवजातीचा अभ्यास असतो. माणूस कळला की मानवी समाज कळतो. माणूस नावाचं सूत्र एकदा सापडलं की विविध मानवी समूहाची आपल्याला नीट ओळख होते. मानवी समूहा-समूहातील संबंध नाती गुंतागुंत त्यामुळे उलगडते. Man is the key of all social problems हेच खरं.

'मानसा मानसा कधी होशील माणूस
लोभासाठी झाला, मानसा चारे कानूस'

स्वार्थ हा माणसात जोपासलेला शाप आहे. लोभामुळेच त्याला माणूस बनता आलं नाही. हे या कवितांच्या ओळीतून बहिणाबाईनं सांगितलेल आहे. त्याच्याबद्दल आपण विचार केला तर असं लक्षात येतं की ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार या गोष्टींना महत्त्व देऊन जर, आपण माणसाला घडवलं तर हे घडू शकेल, अन्यथा आज माणसानंच माणसाला नागवलं आहे. त्याचं माणूसपण हिसकावून घेतलेलं आहे.

आदिवासी, भटक्या विमुक्त आणि अनेक उपेक्षितांवर, हे माणूसपण हिरावून घेतल्यानं यातनामय जीवन जगण्याची पाळी येऊन ठेपलेली आहे. समाजात काही माणसांचं जीवन सुस्थिर सुखी समृध्दीचं आहे. तर बहुसंख्यांकांच्या वाट्याला फक्त दुर्दैवी भोगच आलेले आहेत. उच्चभ्रू वेर्गापर्यंत उपेक्षितांचं दुःख जाऊन पोहचत नाही.

शेवटी गरीब, दरिद्री माणूस असला तरी त्याला एकाकी एकटेपणाचं जीवन जगता येत नाही. संस्कृतीच्या विरहीत त्याला अस्तित्वच उरत नाही. म्हणूनच त्यालाही आपल्या निष्ठा श्रध्दा जपाव्या लागतात. धर्मविधी, देवदेवता, निर्माण करुन त्यांची पूजा अर्चा करावी लागते. उपेक्षित बापुड्यांनीही आपलं जीवन असंच

सुसह्य करुन घेतलेलं असतं त्याला अन्य काही पर्यायच नसतो. यातूनच तो माणूस आपल्या सामाजिक परंपरा, उत्सव धार्मिकता निर्माण करीत असतो. यातूनच त्याच्या देवदेवतांना आकार प्राप्त झाला आहे. ग्रामदेवताचा विचार या संदर्भात आपल्याला करावा लागतो.

प्रत्येक खेड्यात आणि पाड्यापाड्यात आपण गेलो की तिथे आपल्याला ज्याचं त्याचं ग्रामदैवत हमखास पूजिल जातं असं दिसतं अख्ख्या गावाचं ते दैवत असल्यानं सगळा गांव त्याला भजत असतो. पूजा अर्चा उत्सव करतो ग्रामदैवताची यात्राही भरवितो. ती एक मामुली गोष्ट असूनही त्याच्या दृष्टीने महत्त्वाची बनते.

येरव्ही शहरी माणसं दिसतात तशी नसतात. त्याच्या लबाडी आणि स्वार्थी वृत्ती पेक्षा खेडवळ प्रांजळ माणूस आपल्याला परवडतो. त्याची नीतीमत्ता आणि आचरण चांगलं वाटतं. कारण तो पापभीरू असतो. शब्द पाळतो. कोणाचं दिलं घेतलेलं प्रामाणिक मनानं परत करतो. त्याला शब्द मोडणं आणि कोणाचं कर्ज बुडवून चोऱ्या करण मुळात माहितीच नाही. त्याला त्याची स्वतःची ओळखही नसते आणि नाव ही नसतं तरी तो एक समूह म्हणून जगत असतो.

ग्रामदैवताचा धाक त्यानंच स्वतःला घालून घेतलेला असतो. देव कोपेल पीक पाणी येणार नाही, दुष्काळ पडल, बरबादी होईल अशी त्याची निष्ठा या ग्राम दैवताशी जुळलेली असते. म्हणून तो ग्रामदैवताला भजत असतो. आपआपल्या ग्रामदेवतेचं महत्त्व वाढवित असतो. शेवटी आपले हितसंबंध जोपासण्यासाठीही त्याला त्यानंच निर्माण केलेल्या या ग्रामदेवताचा उपयोग होतो. लोकांच्या भाबड्या मनाला हे ग्रामदैवत एक विसाव्याचं ठिकाण होतं. आपापलं ग्रामदैवत मानण्याचा त्याच्या या वृत्तीमध्ये प्रगल्भ धर्मसंकेत आणि मूलगामी जीवन निष्ठा दिसते. हे पुरातन काळापासून चालत आलेलं आहे. भूमध्य सागरीय लोकांनी आपल्या संस्कृतीच्या उपासनेमध्ये देवी माता आणि पृथ्वी माता या दोन देवता फार पूर्वीच आपल्या शिव, उमा आदींच्या पूजा आज प्रचलित आहेतच. विष्णू व लक्ष्मी, विष्णूचे अवतार रामकृष्ण या प्रमुख देवता त्यांच्या उपदेवता, गणेश, स्कंद, नाग, नंदी, भैरव, हनुमान, गरुड, शितला देवी इत्यादी देवता त्यानंतर आलेल्या आहेत.

आदिवासी लोकांनी आपले देव वाघदेव, पांढरदेव, हिरवादेव, नारायण देव मानले आहेत. या देवदेवतांनीच ग्रामदेवता रुढ केल्या आहेत. या ग्रामदेवतांची पूजा अर्चा करून त्यांना प्रसन्न करुन घेतले की आपल्या जीवनात कधी आपत्ती येत नाही अशी त्यांची समजूत आहे. या समजुतीला का होईना पण त्याचा आचारविचार या ग्रामदेवतांनी शहरी माणसांच्या तुलनेत विशुध्द् राखलेला आहे. उदा. कातकरी या आदिवासी जातीची वाघ ही मुख्य देवता आहे. या ग्रामदेवतेची ते पूजा बांधतात. तर गोंड लोक दुल्हादेव, पेरसा, पेण, नुरमा, गंगड, रानतान बडियाताळ, वडादेव, इत्यादी देवतांना भजतात. महत्त्वाचे म्हणजे या ग्रामदेवतांच्या उत्सवात लहान मोठे, गरीब श्रीमंत असे भेदभाव उरत नाही हे महत्वाचे आहे. पेरसा पेन म्हणजे मोठा देव, काली देवी हे गोंडाचे देव आहेत. खंडोबा, बहिरोबा, आदिदेवता तडवी ही आदिवासींची एक जात मानते, भस्मदेव हा दुबळा या जमातीचा देव आहे: याशिवाय मरीमाता, वराई माता आदिमाता अशा देवता दुबळा जमात मानतेच. या ग्रामदेवतांना कोंबडे, बकरे वा इतर पकान्नाचे नैवेद्य दाखविले जातात. भिल्ल समाजात वाघ देव, शिवल्यादेव, नागदेव, खंडोबा, म्हसलेबाबा, बहिरोबा, मरी आई, आसरा इत्यादी देवता मानल्या जातात. ही सारी त्यांची ग्रामदैवतेच आहेत.

गावाच्या देवतांना आपण ग्रामदेवता म्हणतो. आपल्या भारतामध्ये खेड्यांची वस्ती पूर्वापार चालत आलेली आहे. अनेक माणसांचे कळप खेड्यामध्ये स्थाईक होतात. अशा लोकांच्या पूजा उपासनेच्या देवतांना ग्रामदेवता ही संज्ञा प्राप्त झालेली असावी, आदिवासींच्या सर्व जाती जमातींमध्ये ग्रामदेवतांची मंदिरे म्हणजे खेड्याला साजेशी साधारण छोटी व बिनखर्चाची असतात. एखादे मोठे झाड पाहून त्या झाडाच्या छायेत लाकडी वा दगडी मूर्ती कोरलेली असते. त्यावर एक बसके, झोपडेवजा उणपाऊसापासून संरक्षणासाठी छप्पर उभारलेले असते. विशेष म्हणजे ग्रामदेवतांचे पुजारी म्हणून पूर्वी कनिष्ठ व अस्पृश्य मानलेल्या जातीतील लोकांनाही मान वा अधिकार दिलेला आहे.

प्राचीन ग्रंथातही ग्रामदेवतांचे उत्सव आणि निवास यांच्या वर्णनात अनुसूचित जाती जमातींचा उल्लेख आलेला आहे.

ग्रामदेवता म्हणजे गावाच्या संरक्षक देवता होत. प्रामुख्याने त्या स्त्री स्वरूपात (दुर्गा, चामुंडा, यक्षिणी, यामाही, रेणुका इत्यादी) आढळतात. विशिष्ट काळ आणि अपेक्षित काम यांचा विचार करून ग्रामदेवतांची प्रतिमा निर्माण झाली असावी असे वाटते. 'स्त्री' त्वात निर्मिती व कलानिष्पतीची कल्पना असल्यामुळे ग्रामदेवते स्त्रीरूपात आढळतात.

आपण जमिनीला काळी आई म्हणतो. काळी म्हणजे काली जगदंबा म्हणून ग्रामदैवतेची रूपे गणली गेली जमिनीमध्ये पसाभर पेरले तर पाशेरी मिळते. हे निर्माण सामर्थ्य ग्रामदैवतांच्या मध्ये आढळते. म्हणूनच अवर्षण, पिकपाणी नाही, पिकांवर रोग, महामारीसारखी रोगराई आढळल्यास ग्रामदैवत कोपले असे मानण्याची प्रथा आहे. म्हणूनच ह्या देवता खेड्यातील लोकांना पूजनीय वाटतात. त्यासाठी नवस, पूजा, जत्रा, व्रत, मंत्रतंत्र बोलले जातात. या देवतांना पुढे देवघरातही स्थान मिळते. त्याच कुलदेवताही मानल्या जातात.

ग्रामदेवता गावाबाहेर पाषाण किंवा लाकडी खांबांच्या त्यात ओबडधोबड चौथऱ्याजवळ असतात. काही ठिकाणी डहाळ्यांचा मांडव पितळेची किंवा मातीची भांडी पाण्याने भरून त्यात कडूलिंबाच्या फांद्या खोचून ते उत्सवाचे स्थान बनवितात. या देवतेला रुईची फुले, जास्वंदीची फुले, कडूलिंबाच्या डाहाळ्या, ताडीमाडी, मध, भांग, गांजा, तंबाखू या वस्तू ग्रामदेवतेच्या पूजेच्या उपचारात वापरतात. आता नरबळी याऐवजी मांडवाला नारळ सांगतात.

तात्पर्य ग्रामदेवतेला आदिवासी गावात फार महत्त्वाचे स्थान असते. गावाचे ग्रामदेवतावाचून चालत नाही. आपत्तीच्या वेळी ग्रामदेवतेला शरण जावे याशिवाय पर्याय नसतो. ग्रामदेवतांचा, खेड्यातील लोकांचा-आदिवासींचा, जीवन मरणाशी संबंध असतो. म्हणून ग्रामदैवत त्यांचे जीवन सर्वस्व असते.

□□□

# आदिवासी लोककला (मुलाखत)

१. आदिवासींच्या लोककलेत कोणकोणत्या गोष्टींचा समावेश करता येईल ?

लोकसाहित्याचे एक मौलिक अंग म्हणून विविध आदिवासी लोककलांचा विचार करता येतो. त्याचप्रमाणे आदिवासींची लोकगीते, आदिवासींची नृत्यकला, आदिवासींच्या म्हणी, वाकप्रचार, समजुती, श्रध्दा, आदिवासींचे सणवार, राहणीमान-जीवनमान या साऱ्याच गोष्टींचा विचार करावा लागतो. त्यांच्या तपशीलात आपण जेवढे शिरावं तेवढं थोडंच आहे. आदिवासींचा कांबड नाच, घांगळ भगत, म्हणजे घांगळी वाजवत करतात तो. मांदोळ नाच, थाळगान, बोहाडा, काज, लगीनगीत, गौरीगीत, मृत्युगीत, भोंडवायनी, टिपऱ्यांचा नाच, तोरण बसवणं, डोंगरच्या मावल्या, डाका, तारपा, ढोल नाच, हस्त कला, चित्रकला या साऱ्यांचा समावेश होतो.

चित्रकलेचं उदाहरण घ्यायचं झालं तर गाईच्या शेणानं सारवलेल्या स्वच्छ आणि कुडाच्या लिपलेल्या भिंतीच्या झोपडीवर तांदळाच्या पीठानं आदिवासी आपली चित्रकला रेखाटतो. वारली पेटींग्ज म्हणून रेषांचं सामर्थ्य जाणलेली ही आंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त झालेली चित्रकला ओळखली जाते. विदेशातही आज या कलेला मागणी आहे.

बांबूच्या घायपाताच्या विणलेल्या टोपल्या टोपल्यातून सुपल्या, चटयातून ही हस्तकला दिसून येते. त्यात पुन्हा हातचलाखीचे काही खेळही आहेत. कोडी आहेत. जस आदिवासींच्या ढोल नाचात किंवा कोणत्याही नृत्यात कसरती आणि सर्कसी आहेत.

थाळगान ही तर गरीबांची कमखर्ची उत्तम कला आहे. त्याला सामग्री आहे, फक्त एक काशाचे पात्र-थाळा, सागाची काडी मेण आणि एक कथेकरी लागतो, बस्स ! काशाचा थाळा मांडीवर घेऊन त्यात मध्यभागी मेण लावून त्यात तो कतेकरी सनकाडी रोवतो आणि वरपासून खालपर्यंत दोन्ही हातांची बोटं त्या कांडीवरुन क्रमाने फिरवीत कंपयुक्त सुस्वर काढतो आणि एकासूरात रात्रभर

कथेकरी कथा जागवतो. ही कथा असते, श्रावण बाळाची, किंवा रामायणातली, नाहीतर महाभारतातली त्याला म्हणतात थाळगान ! हा गाणारा कथेकरी, मध्यभागी बसतो. भोवती गोलाकारात लोकांचा फड समुदाय जमतो आणि कथा रात्रभर रंगते. असे हे आहे अजब थाळगान एक लक्षवेधी आदिवासींची लोककला.

२. असेच आणखी काही आदिवासींचे तुम्ही पाहिलेले लोककला प्रकार सांगू शकाल का ?

काही ठराविक गावी विशिष्ट वर्षीच बोहाडा असतो. बोहाडा म्हणजे देवी जगदंबेचा उत्सव. या उत्सवात वेगवेगळी सोंगं आणली जातात. त्यात मुखवटे तयार करतात आणि त्या सोंगानुसार नाचण्याची आणि वाद्ये वाजवण्याची एक विशिष्ट पध्दत, लय असते किंवा चाल असते. उदा. गणपती, बहिरोबा, हिरवा देव, अहिरावण, महिरावण, वेताळ, नृसिंह, दुदंभी, म्हसोबा,नारद, सारंगा, लक्ष्मी, गावदेवी, आणि शेवटी जगदंबा असी ही सोंगं रात्रभर जागतात. पाड्यापाड्यावरचे लोक तर्र जागून पाहतात. या निमित्तानं इथे यात्राचं भरते. दुकान खाऊ मिठाईची ! खेळण्याची हारीत लागतात. त्या नृत्यातली बेहोशी आणि धुंदी अविस्मरणीय असते. तारपा नाच ही असाच. त्यात एक काठ्या प्रमुख म्होरक्या असतो. तो घुंगराची काठी आपटतो. त्या तालासूरावर सारे नाचतात. साऱ्या मुलामुलींनी परस्परांच्या कमरेला विळखे घालून फेर धरुन ठेक्यात पावले आलटून पालटून नाचायचं असतं. तारपा वाजवणारा भरदार माणूस न कंटाळत गाल फुगवून जोमदारपणे रात्रभर तारपा वाजवतो. आणि त्या धुंदीत आदिवासी तहान, भूक, कष्ट दारिद्र्य विसरून नाचतो. हे पाहून बर्ट्रांड रसेलसारखा तत्त्ववेत्ता एकदा म्हणाला माझे सगळे ग्रंथ आणि तत्त्वज्ञान मी आदिवासींना अर्पण करायला तयार आहे, पण फक्त बेहोषीचा, धुंदीचा तुमचाअनुभव आमच्या वाट्याला, माझ्या वाट्याला एकदाच येऊ देत... यात आदिवासींच्या कलेचे सारे मोल पुरेसे स्पष्ट प्रगट झाले आहे. काज हा आदिवासींचा असाच एक विधी. जशी आदिवासींच्या सामुदायिक विवाहाची योजना स्वयंसेवी संस्था गावोगाव करतात,तसंच परंपरेने आदिवासींनी आपले सामुदायिक श्राध्द घालणे, स्मृतिदिन साजरा करणे म्हणजे 'काज' यात वर्षभरातील मृत नातेवाईकांना जणू आवाहन करून अंगात येणाऱ्या वीरांच्या किंवा भगतांच्या मदतीनं मृताला त्याच्या आवडी

निवडीच्यावस्तू भेट देऊन, शोक प्रकट करायचा. गरीबीत मातीचे का होईना पण पिंडदान करायचे. एकाच भगताच्या मार्गदर्शनानं हे काज साजरे होत. त्यात तलवारीनं डोक्यात जखम करुन घेऊन एका दिवसात पुन्हा औषधी झाडपाला लावून ती बरी करण्याची व्यवस्था आहे. उध्वस्त कुटुंम्बांचे पुनर्वसन आहे विधवा स्त्री आणि विधुर बाप्या यांची लग्न बाईच्या पदरात अवघा एक रुपाया बांधून जुळवण्याचा प्रयत्न होतो.

३. आपण आम्हाला आदिवासी लोककलांबद्दल सद्यस्थिती कशी आहे ते सांगा?

शासनापासून स्वयंसेवी संस्थांपर्यंत अनेक अंगांनी आदिवासींच्या विकासाचे कार्यक्रम राबविले जातात; पण आदिवासी लोककलांना बहर येईल, त्या सर्वत्र मान्यता आणि प्रसिध्दी पावतील असा कार्यक्रम कोणी फारसा हाती घेतलेला दिसत नाही. आदिवासी भागात अद्याप सिनेमागृह पोहोचलेले नाही. जिथं टी. व्ही. नाही तिथं अजूनही चित्रपट ते पाहू शकलेले नाहीत.

मधूनच आदिवासींचे मेळावे आयोजित केले जातात. त्या मेळाव्यात किंवा उत्सवात त्यांचे काही सांस्कृतिक कार्यक्रम शहरी भागात राबविले जातात. पण ते तेवढ्या पुरतंच होतं आणि राहतं ते उत्सवात दाखवलेली कला, लोककला, म्हणून जतन व्हावी, तिला उत्तेजन मिळावे असा विचार होणे अगत्याचं आहे. जगभरातील आदिवासींची जी काही वैशिष्ट्ये आहेत त्यात त्यांच्या लोकनृत्यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. आदिवासींचं यापूर्वी सांगितलेल्या प्रकारच्या नाच गाण्यावर बेहद्द प्रेम आहे. असे हे त्यांचे कष्टाळू तरीही संगीत नृत्यासह जीवन आहे.

४. आदिवासी नव्या काळातही त्या पारंपारिक लोककलात कसे रमतात ? त्यांना आधुनिकतेची ओढ नाही कां ?

संस्कृतीचे अस्सल दर्शन घडविणारी कला म्हणजे लोककला लोकसाहित्याचेच ते एक अंग आहे. आदिवासी लोकसाहित्यातून या लोककलांतून आदिवासी संस्कृतीचं दर्शन घडायला फार मोठी मदत होते. डोंगर कपारीत, वनपरिसरात,

निसर्गाच्या सानिध्यात, दऱ्याखोऱ्यात, नागर भागापासून अलिप्त जीवन जगणारे वनवासी बांधव अद्यापही लोककलानंद नृत्यातून, गाण्यातून, सणवारातून, पारंपारिक विविध प्रथांमधून उपभोगतात आणि जागवतात. याचे कारण आधुनिक आशा आकांक्षा आणि तथाकथित नव्या सुधारणांच्या कोशात अजूनही ते फारसे गुरफटलेले नाहीत. लोकगीत हा त्यांचा फार मोठा आनंद ठेवा आहे तो आदिवासींनी शतकानुशतक परंपरेनं जतन करुन ठेवलेला आहे. अर्थातच मौखिक स्वरूपात, लिखित नव्हे या लोकगीतातून स्त्री पुरुष प्रेमाची अभिव्यक्ती आनंदाच्या आत्यंतिक प्राप्तिसाठी होत असते.

विदर्भातील कोलाम लोकगीतातील एक तरुण अगदी खुल्या दिलाने आपल्या तरुण मैत्रिणीला म्हणतो -

सखे ! तू बाजारात चल, मी माझ्याजवळचे सगळे पैसे खर्च करुन तुला हवे ते घेऊन देतो. चोळी, बांगड्या काहीही माग ! मागशील ते घेऊन द्यायला मी तयार आहे. या गीतांत अनेक भेटवस्तूंची नावं घालून ते लोकगीत रंगत जाते. डफ किंवा पावा या जोडवाद्यांच्या तालावर एक नवयुवक हे प्रेमगीत गातो आणि प्रेयसी नवतरूणी आणि इतर तरूण त्या गीताची साथ करून त्या नृत्यात रंगून जातात.

'विडा मिळून खा क ऊ .....,'

'विडा मिळून खा क ऊ ...' असे बेभान होऊन म्हणतात. वनवासींची लोकगीत प्रामुख्यात त्यांच्या समूहाच्या कार्यक्रमात गायची असतात. त्यामुळे त्यातली भावना आपोआप समूहरूपच बनते.

५. आदिवासींच्या लोकगीताबद्दल थोडं आणखी तपशीलात सांगा -

वनवासींची लोकगीतं प्रामुख्याने बहुतेक सणवार आणि उत्सव असेल की नृत्य, गायन, वाहन याच्या तालासूरात पार पाडली जातात. लिंगभेद न मानता आदिवासी स्त्री पुरुष धुंद होऊन नाचतात, गातात. वनवासींची लोकगीतं त्यांच्या या बेहोषवृत्तीचा परिचय करुन देतात.

परधानांच्या नारायणी म्हणजे नारायण देवाच्या गीतात, माशा, गोमाशा घेऊन आलेल्या शंकरानं पार्वतीसारखा हिरा झोळीत घालून पळवल्याचं वर्णन आहे. मुलगी पळवून नेऊन तिच्याशी विवाह करण्याची पूर्वापार रीत, रुक्मिणी-सुभद्रा- हरणाची आठवण व्हावी अशी हीं लोकगीतं आपल्याला करून देतात.

वऱ्हाडी नाचात मुलगी नवऱ्या घरी जाणार आहे, त्यामुळे घरचे गावचे सगळेच दुःखी अंतःकरणाने मुलीला समजूत काढतांना म्हणतात -

जो रडो हो माँ अी, का, केडाले, जुकनारो, आय ?

आज ने ते, काय आयू हूँ, इयज वाटी की, जाणार हाय.

(जा पोरी ! रडू नकोस हे कां कोणाला चुकणार आहे ! आज ना उद्या आम्हीही त्या मार्गाने जाणार आहेत.) हा त्यांच्या खडतर जीवनात ओलावा जाणवतो. शेवटी मैत्रिणी 'रुमाले निशाने थोबिजे' म्हणतात. निदान, मुली तुझा रुमाल तरी आम्हाला निशाणी म्हणून सोडून जा.

वनवासींच्या अशा या बहारदार पण थोड्याच लोकगीतांचं संकलन झालेलं आहे. ती लोकगीतं त्यांच्या नित्य जीवनाच्या विविध अंगांना स्पर्शून जाणारी आहेत. या लोकगीतांच्या संकलनाचे काम निष्ठेनं व्हायला पाहिजे.

६. आदिवासींच्या लोककलेत साधारणपणे कोणकोणत्या सणांना प्राधान्य आहे?

आदिवासींच्या वसंतोत्सवात पुढील सणात लोककलांना उत्तेजन मिळते.

१. मकरसंक्रांत - त्यांच्यात हळदी कुंकू नाही, 'पण तीळगुळ घ्या गोड गोड बोला' म्हणतात.

२. बीजा - म्हणजे द्वितीयेची चंद्रकोर या दिवशी उंडी तयार करतात. भाताच्या वाफेवर कणिकेत गुळ घाळून ही उंडी तयार करतात.

३. होळी - सणही मोठ्या उत्साहात साजरा होतो. कोठेही कामासाठी असला तरी आदिवासी घरी होळीला परततोच. पैसे नसले तर गावी तो कित्येक मैल पायी चालत येतो.

४. गुढीपाडवा - या सणाला त्याच्या झोपडीसमोर कलश रांगोळी-सजावट असते. त्रांदळाच्या पीठाची धिर्डी करून ते खातात.

५. कवळी भाजी सण - म्हणजे सगळे परिवारातील मिळून कवळी भाजी शिजवून एकत्रितपणे खातात आणि तिथून ती भाजी खायला सुरुवात होते.

६. अक्षय्य तृतीयाला ७ दिवस गाणी गातात. सासरी गेलेली गौर ७ दिवसासाठी माहेरी येते. म्हणून ही आनंदगीतं गातात. ८ व्या दिवशी ती सासरला जाते. याला ते आखातिजा म्हणतात.

७. घटस्थापना - १८ धन पेरतात. ती डोक्यावर घेऊन नाचतात. अशा अनेक सण उत्सवांचे लोककलात उल्लेख करता येतील.

७. आदिवासी लोककलांमध्ये रुढ असलेल्या काही म्हणी उखाणे, वाकप्रचार, रुढ कल्पना तुम्ही सांगू शकाल काय ?

आदिवासींमधील म्हणी या नुसत्याच म्हणी नाहीत तर त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आजच्या पर्यावरण शास्त्रज्ञाला त्या म्हणींतून अनेक सत्य गवसतील. उदाहरणार्थ -

'झाड तठ वारा ... पडती पाण्याच्या धारा -'
'जळो, पण पिको -' (सीता माईला रावण उचलून नेतो तेव्हा सोडवलं नाही म्हणून हा शाप. मग ती उःशाप देते ती कथा)
'तण- खाई धन'
'वावरात पिकू दे, आमचं पोट भरु दे-'
'माय माझी तू, घरात सोन पडू दे-'
अशा अनेक उद्बोधक म्हणी आहेत. त्याचप्रमाणे -
'मडक्यात दाणा तर भील उताणा.'
'फडका घे- मडका घे .... सूट' (सूडका घे ?) एक फडकं आणि एक मडकं एवढीच खरी
जगण्यासाठी माणसाला गरजेचे असते तेवढे पुरते.
'निलाजऱ्याला मारला पिढा त म्हणे मला बसाय दिला'
'शान्याला शब्द अन मूर्खाला टेंभूळ' (म्हणजे काठी)
'लाज मरे तो, भुखे मरे'

‘होली जळाली न थंडी पळाली.’
‘पोट हाय संगात काय पडल मांग’
‘ये ना मये न .... घमेल घेऊन पये’

आता काही उखाणे पहा :
‘आरवत कोंबडा, तरंगत जाय ... चार शिंग आठ पाय ...’
(म्हणजे नांगर यात शेतकरी, २ बैल, ४ शिंग, ८ पाय असे नांगरधारी शेतकऱ्यांचे चित्रण आलं आहे.)
‘सुकेतळ्या.... पाखरे फडफडती’ ( म्हणजे लाह्या भाजणे)
‘काळीगाय काटे खाय, पाण्याला पाहून उभी ऱ्हाय...’ (म्हणजे वहाण - चप्पल)
‘तल्याच्या काठी, ठोकली खिटी, हालते पण उपटतच नाही’ (हात आणि बोट)
‘काळी काठी तेल चाटी’ (केस)
असे हे उखाणे आहेत.

८. आदिवासींचे ‘महिने - नक्षत्र’ या संदर्भातील हा वाकप्रचार आडाखे आहेत का?

होय ! आदिवासी आपली दुःख कधी सांगत नाही ती जाणून घ्यावी लागतात. त्यांचे मराठी महिने आणि नक्षत्र यांच्याबद्दल साहित्य संग्रहित करता येईल ते आवश्यक आहे. त्यात ती दुःख साठवलेली आहेत.

काही नमुने पाहा -
‘जेठ अन पाण्याची भेट’, ‘भादवा अन हांडी मडकी वाजवा’. ‘पुस करी हुस’
‘माही बीजा, कोंबडी शिजा-’ पोशा पोशांनो उगाच निजा,
चैत म्हणजे दैत.
...पाणी आबादाणी... शेतकऱ्याला सोन्यावाणी
पडल उतरा त हाल खाईना कुतरा किंवा भात खाई ना कुतरा
‘....स्वाती त पिकती मोती’
‘पडल्या मघा नाही त वरती बघा’

'...अरदडा त नयी भरती गरदडा'
'...हाती त करिल अन्नाची माती'

आदिवासींची खास परिभाषाही लक्षात घेण्याजोगी आहे. आदिवासी पूर्व दिशेला 'उगवती', तर पश्चिम दिशेला 'मावळती' म्हणतो. 'बहिरोबा' म्हणजे 'बहिरोबा देव जिकडे आहे ती', उत्तर दिशा, तर दक्षिणेला म्हणतो. 'बैलविक्या', म्हणजे बैलांचा बाजार भरतो, ती दिशा. 'घरोंदा' म्हणजे घरजावई आणि 'मेढिगा' म्हणजे लग्न लावणारी अशी ही परिभाषा आहे. गरोदर स्त्रीला 'दोन जीवी' म्हणतात.

९. आदिवासींच्या लोककलेत समाविष्ट होणाऱ्या काही त्यांच्या समजुती श्रध्दा आपण सांगू शकाल का ?

आदिवासींचे काही आडाखे-समजूती मोठ्या लक्षात घेण्याजोग्या आहेत. मुंग्या आपली अंडी वर घेऊन चालल्या की समजावे भरपूर पाऊस यंदा पडेल. कारण त्या मुंग्या आपली अंडी सुरक्षित जागी घालतात.

कावळ्याने आपला घरटा शेंड्यावर बांधला तर समजावे की यंदा वारा पाऊस-पाणी कमी आहे. झाडाच्या मध्यावर घरटा बांधला तर मग पाऊस, वारा, वावधान यंदा जास्तीचा आहे असं समजावं. जमीनीत, कीडे, कीटक झाले, पिंपळाचं झाड हिरवं गर्द झालं, गुलमोहर आगी सारखा फुलला, पळसाला केसरी रंगाची फुलं आली म्हणजे मग पावसाळा सुरू होणार असं समजावं.

सोमवार हा गोडा दिवस, म्हणजे शाकाहारी, मंगळवार हा मोडा दिवस म्हणजे सुटीचा, कारण तो देवीचा वार आहे. वारूळाच्या वरच्या भागातील कंगोऱ्यावरुन होकायंत्राप्रमाणं आदिवासी उत्तर दक्षिण दिशा ओळखतो. अशा काही आदिवासींच्या लक्षात घेण्याजोग्या, अभ्यासनीय समजुती, अडाणी समजुतीची उदाहरणे द्यायची झाली तर 'गरोदर बाईला मृत्यू आला तर तिच्या पोटात भात भरतात.' अशाही काही त्यांच्या भयंकर समजुती आहेत.

(प्राचार्य डॉ. गिरधारी यांची डॉ. माधव पोतदार यांनी घेतलेली मुलाखत)

# आदिवासी लोकसाहित्य

अन्य कोणत्याही साहित्या पेक्षा वास्तववादाने युक्त, वस्तुस्थितीचे निदर्शक, लोकसंस्कृती आणि परंपरेचा वारसा पुढे चालविणारे, लोकांनी जतन करून ठेवलेले, शतकानुशतके चालत आलेले, असे हे लोकवास्तव आहे.

लोकसाहित्य हे निर्विवादपणे वास्तवपूर्ण साहित्य आहे. त्यातील लोकजीवन म्हणजे लोकसाहित्यातील वास्तव. लोकमानसाचा आविष्कार लोकसाहित्यात होतो. एका समष्टीच्या (समूहाच्या) मनाची ती अभिव्यक्ती असते. त्यातून लोकजीवन,लोकविद्या, लोकसंस्कृती, लोकविधी, लोकश्रध्दा, लोकभ्रम यांचे वास्तवपूर्ण दर्शन घडते.

लोकसाहित्यातील वास्तव निश्चितपणे आपल्या आगळेपणाने उठून दिसते. लोक म्हणजे 'पिपल' (People) , समानध्येय, विचार उद्दिष्टे, व्यवसायनिमित्ताने एकत्र आलेले नागरी व ग्रामीण भागातील समुदाय. त्या त्या समुदायाचे लोकांच्या कळपांचेही, एक आगळे मानसशास्त्र असते. लोकसाहित्यात या विविध गटांचे वेगवेगळे वास्तव साकार झालेले आढळेल.

ग्रामीण पातळीवरील लोकांचे लोकमानस लोकसाहित्यात अवतरले ते अस्सल ग्रामीणतेचा बाज घेऊन ! जात्यावरच्या पहाटे गावयाच्या ओव्या, दळण कांडणाची गीते, पिंगा, झिम्मा, फुगडी, कोंबडनाचसारखी खेळगीते, नागपंचमी, बारसे विवाह- मर्तिक-दसरा-दिवाळी अशा प्रसंगात म्हणावयाची सणवार विधींची गीते, ढोलनाच-थाळगान-बोहाडा-वग-तमाशा-गोंधळ-जागरण-ललित-दंडार-भारुड-वासुदेव-दशावतार-भुत्या-भोप्या यासाऱ्या सोंगाना वठवताना, त्या त्या प्रसंगाला अनुकूल अशी गीते आणि लोकवैद्यक -लोकाश्रित-कला-तंत्रमँत्र-लोकविश्वास या साऱ्यांमध्ये, लोक-साहित्यातील वास्तव प्रतिबिंबीत झालेले आहे. अन्य कोणत्याही साहित्यापेक्षा वास्तववादाने युक्त, वस्तुस्थितींचे निदर्शक, लोकसंस्कृती आणि परंपरांचा वारसा पुढे चालविणारे लोकांनी जतन करून ठेवलेले शतकानुशतके चालत आलेले असे हें लोकवास्तव आहे.

लोकसाहित्याचे एक मौलिक अंग म्हणून विविध लोककलांचा विचार आपल्याला करता येईल. लोकवाद्ये, लोकनृत्ये, लोकश्रध्दा, यांचा समावेश यात करता येतो. समाजाचे राहणीमान, जीवनमान यांचा तपशीलवार विचार या आधारे करता येतो.

मांदोळ नाच, काज, थाळगान, बोहाडा, लगीनगीत, गौरीगीत, भोंडल्या नि टिपऱ्यांचा नाच, मर्तिक नाच, तोरण बसवणं, डोंगरच्या मावल्या, डाका, तारपा, ढोलनाच, हस्तकला, चित्रकला या साऱ्यांचा समावेश या लोककला विचारात होतो.

चित्रकलेचे उदाहरण घ्यायचे झाले तर गाईच्या शेणाने सारवलेल्या, कुडाच्या लिंपलेल्या भिंती असलेल्या झोपड्यांवर तांदळाच्या पीठाने चित्रकला रेखाटलेली आढळते. आज रंग रेखांचे सामर्थ्य दर्शवणारी ही "वारली पेंटींग्ज" या कलेतील 'वास्तवा' मुळेच आंतरराष्ट्रीय गौरव आणि कीर्तीची बाब झालेली आहे.

बांबूच्या घायपाताच्या विणलेल्या टोपल्या, टोप्यातून आणि सुपल्या चटयांतून हस्तकला साकारलेली दिसते. त्यातही सूक्ष्मता आणि सौंदर्य आहे. परंपरेने ठेवा म्हणून दिलेले हातचलाखीचे काही खेळ आहेत. कुटे, प्रहेलिका किंवा कोडी आहेत. नृत्यातील कसरती आणि सर्कशी आहेत.

**थाळगान :**

'थाळगान' ही तर गरीबांची कमखर्ची उत्तम कला आहे. त्याला सामग्री आहे, फक्त एक काशाचा थाळा (पात्र) सागाची काडी, मेणाचा छोट्या आकाराचा गोळा आणि तालासुरात कथा लोककथा सांगणारा कथेकरी. बस्स एवढेच पुरे : तो कथेकरी काशाचा थाळा मांडीवर देतो. थाळ्याच्या मध्यभागी मेण लावून, त्यात सागाची काडी खोवतो आणि काडीच्या वरपासून खालपर्यंत दोन्ही हाताची बोटे अनुक्रमे खाली आणतो. त्याबोटांचा हळुवार स्पर्श, थाळ्याचा आणि काडीचा विशिष्ट कंपातून निघणारा सुस्वरातील आवाज, त्या आवाजाच्या धुंदीत एका नादमयतेने रात्रभर कथेकरी कथा लावतो, जागवितो.

पुन्हा ती कथा असते श्रावणबाळाची वा रामायणातील किंवा महाभारतातील एखादी कथा-उपकथा असते. वैशिष्ट्य म्हणजे ही कथा असते ग्रामीण, सभोवतालच्या निरक्षर, अडाणी माणसालाही समजेल अशा बोलभाषेतील, जिवंत रसरशीत अनुभवाला साकार करणारी, विविध रसांचा करूण गंभीरतेसह आविष्कार करणारी ही कथा, कोणत्याही संदर्भासाठी कधी अडत नाही. परंपरा सांगते तेच श्रावणाच्या आईवडिलांचे नाव होते. विठ्ठलपंत आणि रखुमाई- संशोधनाची वादंगं नाहीत, आहे ते स्वीकारून कथेकरी मध्यभागी आणि सभोवती गोलाकार समुदाय. माणसांचा फड जमतो. रात्रभर कथा रंगते आणि लोकही रंगतात, असे आहे ते अजब थाळगान : एक नमुना !

बोहाडा :

कुठे बोहाडा आहे याची चर्चा गावकरी करीत असतात. हा बोहाडा म्हणजे देवी जगदंबेचा उत्सव. या उत्सवात वेगवेगळ्या प्रकारची देवादिकांची सोंगे मुखवटे घालून, वेशभूषा परिधान करून आणली जातात. संबंधित देवाचा मुखवटा परंपरेनेच घालणे त्या व्यक्तीकडे चालत आलेले असते, मग त्या सोंगानुसार त्याची नाचण्याची एक वेगळीच चाल असते आणि त्याला अनुरूप साजेशी वाद्याचीही वेगळी ढब असते. गणपती, बहिरोबा, हिरवा देव, अहिरावण, वेताळ, नृसिंह, दुंदुभी, म्हसोबा, नारद, सारजा, गावदेवी, लक्ष्मी आणि सरतेशेवटी पहाटेच्या वेळी नाचत येते ते जगदंबेचं सोंग. अशी सारी सोंगं रात्रभर जागतात. खेड्यापाड्यावरचे लोक, रात्रभर जागून ही सारी सोंगं पाहून, पायी चालत पुन्हा, आपापल्या गावी परततात. बोहाडा म्हणजे त्या गावची एक जत्राच. त्या निमित्ताने खाऊ, मिठाईची, फुगे खेळण्याची गावकऱ्यांच्या नित्योपयोगी वस्तूंची दुकाने विक्रीसाठी लागतात. त्या नाचण्यातील बेहोषी आणि धुंदी केवळ अतुलनीय म्हणावी लागेल. तेथे सारे कष्ट शीणभार हलका होतो. दारिद्र्य आणि गरिबीचा विसर पडतो, माणुसकीला पाझर फुटतो, कौटुंबिक सुखदुःखे वाटून घेतली जातात, नवा हुरूप आणि नवी उमेद घेऊन मंडळी परततात.

तारपा :

आदिवासींमध्ये लोकप्रिय असलेला तारपा नाचही लक्ष वेधून घेणारा आहे.



आदिवासींची वाद्ये अ) तारपा ब) ढोल

या तारपा नाचात, गावातला एक तरुण धिप्पाड पोऱ्या प्रमुख म्हणजे म्होरक्या असतो. त्याला काठ्या म्हणतात. तो घुंगराची काठी आपटत, नाचत सगळ्यांचा मार्गदर्शक बनतो. त्या घुंगराच्या काठीच्या ठेक्यात, सूर ताल धरून, सगळे एका धुंदीत नाचतात. नाचात सहभागी होणारी तरुण मुले, प्रौढ, नातीगोती विसरून परिचय असो किंवा नसो, कमरेला हातांचे विळखे घालून फेर धरून ठेक्यात नाचतात. पावली आलटून पालटून खेळतात. तारपा वाजवणारा दमदार आणि भरदार गडी असतो. तो न थकता, कंटाळता, गाल फुगवून जोमदारपणे, रात्रभर तारपा वाजवितो. आणि त्या धुंद बेहोषीत आदिवासी तहान-भूक-कष्ट-दारिद्र्य सारे काही विसरून नाचतो.

ही धुंदी पाहून प्रसिध्द तत्त्ववेत्ता बर्ट्रान्ड रसेल याने उद्गारकाढले होते - 'माझे सगळे ग्रंथ आणि तत्त्वज्ञान' मी तुम्हाला अर्पण करायला तयार आहे, पण फक्त हा बेहोषीचा, तुम्ही उपभोगत असलेल्या नाचातला धुंद अनुभव मला द्या. एका तत्त्व चिंतकाचे हे उद्:गार आदिवासींच्या कलेचे सारे मोल करणारे आहेत. लोकसाहित्य आणि लोककला यांचे मर्म आणि मोठेपण त्यातून साकार झालेले आहे. याबद्दल यापेक्षा अधिक काहीही लिहिण्याची गरजच नाही.

**काज :**

'काज' हा विधी नाचातल्या परंपरेतीलच एक आदिवासींचा एक विधी आहे. त्याचे स्वरुप श्राध्दविधीचे आहे. हल्ली आदिवासींच्या सामुदायिकविवाहाची कल्पना जशी गावोगाव मूर्त स्वरुपात आणतात. तसेच आदिवासींनी आपले परंपरेने सामुदायिक श्राध्द घालणे, मृतात्म्यांचे स्मृतिदिन साजरे करणे म्हणजे 'काज.'

या काजामध्ये मृत नातेवाईक आप्त व्यक्तींना आवाहन केले जाते. ते जणू

काही प्रत्यक्ष भेटायला येतात अशी कल्पना आहे. आपापले वीर म्हणविणारे भगत मांत्रिक ओळखीने ज्याचे त्याने तेथे बोलावलेले असतात. गावोगावचे लोकसमूह म्हणून एकत्र येतात. अंगात वारे संचारल्यावर, त्या वीराच्या मदतीने, मृत व्यक्तीला त्याच्या आवडी-निवडीच्या वस्तू भेट देऊन शोक प्रगट करायचा अशी पध्दत आहे.

आत्यंतिक गरिबीमुळे तांदळाच्या भाताच्याऐवजी मातीचे पिंड तयार करतात. ते पिंडही सामूहिकच असतात. भात पिकविणाऱ्या आदिवासींना मृत व्यक्तींसाठी दान करायलाही भाताचे पिंड मिळू नयेत. मातीचे पिंड करावे लागावेत, यापेक्षा कठोर वास्तव कोणते असू शकेल ?

एकाच भगताच्या मार्गदर्शनाने हे काज साजरे होते. त्यात तलवारीने वीर आपल्या डोक्यात घाव घालून जखम करतात. त्या जखमेतील रक्त भळभळते ते पायाच्या अंगठ्यावर ठिपकून पडावे असा घाव तो वीर डोक्यात स्वतःच्या हाताने घालतो. पुन्हा एका दिवसात झाडपाला, वनौषधी लावून ती जखम संपूर्णपणे बरी करण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे. तशी व्यवस्था आहे. एका दृष्टीने या प्रथेत मानवी उदात्तता भरलेली आहे. कुटूंबाचे हे पुनर्वसन आहे. काज चालू असतांनाच विधवा झालेली स्त्री, पत्नी गमावलेला विधुर बाप्या यांची लग्न तिथल्या तिथे, काज आटोपताच आनंदोत्सव व्यक्त करून, मोठी जाणकार माणसे मध्यस्थी करुन जुळवतात. शेतीसाठी माणसं लागतात. रानावनात एकटे कसे जगायचे हा प्रश्न असतो. यासाठी ही सोपी पध्दत अवलंबिली जाते. बाईच्या पदरात अवघा एक रुपया बंदा बांधला तरी हा वाडनिश्चय साजरा होतो. अशी ही उदारता काज विधीच्या अखेरी दाखविली जाते. खडकांतले पाझर येथे अनुभवता येतात. माणसं गमावलेल्या उध्वस्त कुटुंबाचीही पुन्हा उभारणी होते. पुन्हा आदिवासींचे नाचगाण्यांनी भरलेले जीवन सुरू होते. कष्टाळू वृत्तीला तेवढाच दिलासा.

काही नोंदी :

विदर्भातील कोलाम लोकगीतातील एक तरुण अगदी खुल्या दिलाने आपल्या तरुण मैत्रिणीला म्हणतो - सखे तू बाजारात चल मी माझ्याजवळचे सगळे पैसे

खर्च करून तुला हवे ते घेऊन देतो. चोळी, बांगड्या काहीही माग. मागशील ते घेऊन द्यायला मी तयार आहे. या प्रकारच्या भावना व्यक्त करणाऱ्या लोकगीतांत मग अनेक भेटवस्तूंची दागदागिन्यांची नावे गोवून ते रंगत जाते. लोकगीत उत्स्फूर्तपणे खुलतच जाते. डफ किंवा पावा या जोडवाद्यांच्या तालावर पावले टाकून नादमय, भारावल्या वातावरणात ते लोकगीत, प्रेमगीत बनून प्रियकर गाऊ लागतो. इतर समवयस्क मित्र मैत्रिणीही मग त्या गीताला साथ करतात, ताल धरतात आणि त्या नृत्यात रंगून जातात.

'विडा मिळून खा क ऊ .....,

विडा मजूत खा क ऊ ...' असे बेभान होऊन म्हणतात. समूहानेच ही गीतं गायची असतात. मग त्यातील भावनाही समूहरूप घेऊन साकारते, सगळ्यांची बनते. सणवार, उत्सव असले की नृत्य, वादन, गायन यांच्या एकाच ताल-सुराला बहर येतो. लिंगभेद न मानता स्त्री पुरुष वावरतात, एकत्र नाचतात-गातात.

*परधाणांच्या 'नारायणोन' म्हणजे* नारायण देवाच्या गीतात माशा, गोमाशा घेऊन आलेल्या शंकराने पार्वतीसारखा सुंदर हिरा झोळीत घालून पळवून नेल्याचे वर्णन आहे. मुलगी मनपसंत असल्यास संगनमताने विवाह करण्याची रुक्मिणी सुभद्रा यांची पुराण परंपरेने टिकून राहिलेली रीत जतन केल्याची साक्ष ही लोकगीते आपल्याला देतात.

वऱ्हाडी नाचात मुलगी नवऱ्याघरी जाणार आहे. त्यामुळे घरचे, गावचे सगळेच दुःखी अंतःकरणाने मुलीची समजूत काढतांना म्हणतात- जो रडो हों माँ इ, का, केडाले जुकनारो, आय १ आज नेते, काल आमू हूँ, हमूज वाटी की जाणार हाय (जा पोरी रडू नकोस हे का कोणाला चुकणार आहे ? आज ना उद्या आम्हीही त्याच मार्गानें जाणार आहोत ) हा त्यांच्या खडतर जीवनातला ओलावा जाणवतो. शेवटी तिच्या मैत्रिणी, 'रुमाले निशाने भोबिजे' म्हणतात. निदान, मुली तुझा तेवढा रुमाल तरी आम्हाला निशाणी म्हणून सोडून जा ग म्हणतात.

अशा या बहारदार रान मेळ्याचे, लोकगीतांचे दंग करणारे हे वास्तव आहे. जीवनाच्या अंगांना ही लोकगीते स्पर्शून जाणारी आहेत.

लोकसाहित्यांच्या शब्दविष्कारात म्हणी, उखाणे, कूटे, लोकसमजुती यांचा आवर्जून समावेश करावा लागतो. त्यातील वास्तव, परिस्थितीवर झगझगीत प्रकाश टाकणारे आहे. त्यांचे मोल पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीनेही विशेष आहे. उदाहरणार्थ 'झाड तठ वारा... पडती पाण्याच्या धारा', 'तण .... खाई धन', 'जळो ... गग पिको', 'मडक्यात दाणा त..... भील उताणा', 'फडका घे.... मडका घे सूट' (जगण्यासाठी एका फडक्याची आणि मडक्याची माणसाला गरज असते) 'लाज मरे तो भुखे मरे', 'निलाजऱ्याला मारला पिढा त म्हणे बसाय दिला', 'पोट हाय संग ... त... काय पडलं मागं', 'होळी जळाली न थंडी पळाली', 'ये ना मये..... अन.... घमेले घेऊन पय',..... 'काळी काठी तेल चाटी' (उत्तर : केस) 'तळ्याच्या काठी ठोकली, खिटी हालते, पण उपटतच नाही' (उत्तर : हात व बोटे) 'सुके तळ्या पाखरे फडफडती' (उत्तर : लाह्या भाजणे) 'आरवत कोंबडा, तरंगत जाय... चार शिंगं ... दहा पाय' (उत्तर : नांगर, शेतकरी, दोन बैल, चार शिंगे, दहा पाय असे नांगरधारीचे वर्णन आहे), 'काळी गाय ... काटे खाय ... पाण्याला पाहून उभी ऱ्हाय' असा हा फार मोठा वास्तवाचा ठेवा लोककलेत आणि लोकसाहित्यात जतन केलेला आहे.

शृंगारातील रंगलेपणाची एक झलक पाहा....

'माही बीजा, कोंबडी शिजा,
पोषा पोषांनो, उगाच निजा.'

गोडा दिवस, मोडा दिवस म्हणजे सोमवार मंगळवार, उगवती-मावळती म्हणजे पूर्व-पश्चिम दिशा अशी ही सरळ, सोपी वस्तुस्थितीनिदर्शक लोकपरिभाषा आहे. सारेच लोकवास्तव वेधक आहे.

वनवासी जीवनाच्या समृध्दीचे प्रतीक वनवासी कला आणि साहित्य निर्विवाद आहेतच. या दमदार आणि कसदार कला, साहित्य आणि संस्कृतीने वनवासी बांधवाला तहानभूक विसरून बेहोषीचे, धुंद, आनंदी जीवन जगायला शिकविलेले आहे. वनवासी साहित्य आणि कलांमध्ये त्यांच्या भावना, विचार व्यक्त झालेले आहेत. यासाठी पुढील गोष्टींचा विचार होणे अगत्याचे आहे.

अ. वनवासींचे साहित्य आणि त्यांच्या विविध कला विकसित होण्यासाठी, त्या साहित्य कलांना चालना देण्यासाठी शासनाच्या, शासनेतर स्वयंसेवींच्या माध्यमातून अधिक प्रयत्न करता येतील. त्यासाठी पुढील गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे.

१. लिखाण करणाऱ्या नवशिक्षित वनवासी साहित्यिकांना उत्तेजन देणारे व्यासपीठ निर्माण करावे.

२. वनवासी साहित्यिकांचे मेळावे जिल्हावार भरवावेत. नांदेड, ठाणे, नाशिक, धुळे, अमरावती, चंद्रपूर, नगर, नागपूर, भंडारा, गडचिरोली या जिल्ह्यांचा त्यात प्रामुख्याने समावेश असावा.

३. वनवासी साहित्यिकांच्यासाठी लेखक प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे, त्यामध्ये कथालेखन, नाट्यलेखन, लोकसाहित्य सदृश लेखन, कादंबरी - आत्मचरित्र लेखन, समीक्षा लेखन इत्यादी शिबिरे आयोजित करावीत.

४. कथासंग्रह, आत्मचरित्र, नाटक, कादंबरी, वैचारिक इत्यादी स्वरुपाचे वनवासींचे साहित्य प्रकाशित केले जावे.

५. वनवासी साहित्यिकांना साहित्य प्रकाशनार्थ व वनवासी विषयक नियतकालिके चालविणाऱ्या संस्थांना विशेष अनुदान द्यावे.

६. ग्रंथ पुरस्कार देतांना उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीचा वनवासी लेखकांना स्वतंत्र पुरस्कार द्यावा.

७. वनवासी लोकसाहित्याचे आमूलाग्र संशोधन होणे नितांत गरजेचे आहे. त्यासाठी अशा संशोधकांना क्षेत्रीय अभ्यास करण्यासाठी व झालेले संशोधन प्रसिध्द करण्यासाठी एकूण कालावधीत पाठ्यवृत्ती (स्कॉलरशीप) शिष्यवृत्ती देण्याची तरतूद करावी. ती खर्चासह दरमहा पाच हजार रुपयेपर्यंत असावी. त्यात वनवासी बोलींचा अद्याप राहिलेला अभ्यास होईल. वारली, 'क' ठाकूर, 'म' ठाकूर, कोकणा, ढोरकोळी, याप्रकारच्या बोलींप्रमाणेच एकेका जातीचाही सविस्तर अभ्यास करण्याजोगा आहे. निर्मिती, दैनंदिन आचारविचार, जीवनमान, राहणीमान परंपरा इत्यादींच्या अनुषंगाने हा अभ्यास होऊ शकेल. त्यामुळे संस्कृती उलगडेल. आदिवासी लोकसाहित्याचे संकलन विश्लेषण, मूल्यमापन, यात आदिवासींच्या म्हणी, वाकप्रचार, कुटे, लोककथा, लोकगीते, आदिवासींचे सण वार उत्सव, लोकभ्रम, लोकरुढी,

श्रध्दा, अंधश्रध्दा, परंपरा तंत्रमंत्र. यासह लोकनृत्ये, लोकवाद्ये, लोकवैद्यक, वनौषधी, वनवासींची चित्रकला, वारली पेंटींग्ज, वनवासी क्रीडा, मुखवटे-कला, झाडांपासून रंगनिर्मितीची कला इत्यादी अनेक विषय वनवासी लोकविद्या आणि वनवासी साहित्यात येतात.

८. वनवासींच्या विविध कलांच्या आविष्काराला मुक्त संधी मिळावी यासाठी चित्रप्रदर्शने, लोककला उत्सव, लोकसाहित्य संमेलने यांना उत्तेजन द्यावे. मुंबईच्या जहांगिर आर्ट गॅलरीसारखे वनवासी लोकमंच (रिक्रिएशन हॉल) उभारले जावेत.

९. वनवासी संदर्भातील ग्रंथ, शाळा महाविद्यालयांमध्ये ग्रंथालय वाचकांस उपलब्ध असावेत. अशा ग्रंथांची यादीही देता येईल.

१०. विद्यार्थ्यांसाठी शासन तयार करीत असलेल्या बालभारती पाठ्यपुस्तकात वनवासींना आपले वाटणारे विषय आणि त्यांचे सण, उत्सव, गाणी, कला इत्यादींचा समावेश किमान असावा.

११. वनवासी नियतकालिकांना अनुदान तर द्यावेच पण त्याचबरोबर ती वाचनालये-ग्रंथालये यांना घेण्यास भाग पाडावे.

१२. संगीतकलेची, शिल्पकलेची, चित्रकलेप्रमाणेच वनवासींना आवड आहे. म्हणून चित्रकला-संगीतकला, शिल्पकला यांचे शास्त्रशुध्द शिक्षण अतिग्रामीण भागात जाऊन देण्याची शिबिरे भरवून व्यवस्था व्हावी.

वनवासींच्या या सर्वच साहित्य आणि कलांमध्ये वनवासी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाचे उत्तम तऱ्हेने प्रतिबिंब उमटलेले आहे. त्यातून वनवासींची प्रज्ञा-प्रतिभा-विज्ञाननिष्ठा-पर्यावरण शास्त्राचे भान, कलासक्ती - निसर्गप्रेम इत्यादी सारे काही स्पष्ट होते.

आजच्या संगणकाच्या, एकविसाव्या शतकाकडे झेपावणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्सच्या युगात वनवासींची लोककला, संस्कृती साहित्यकला आणि भाषा जतन केली पाहिजे. हजारो वर्षांची ही सांस्कृतिक मूल्यपरंपरा जतन करणे कर्तव्य आहे. अन्यथा वनवासी बांधव आपल्यापासून दुरावतील. त्यासाठी वनवासी लोकसंस्कृती, लोककला आणि लोकसाहित्याच्या संदर्भात जनजागरण घडविणे

महत्त्वाचे आहे. नव्या वैज्ञानिक संस्कृतीशी त्याचा उचित मेळ आपल्याला घालता आला पाहिजे.

ब. रा. स्व. संघ परिवार आदिवासींना वनवासी म्हणतो, म्हणून त्या शब्दप्रयोगाला विरोध करणे गैर आहे. त्याचा नीट अर्थ लावला पाहिजे. अनेक प्रकारे विचार केला असता वनवासी हा प्रयोग उचित वाटतो. म्हणून आदिवासी शब्दा ऐवजी वनवासी संज्ञा योजावी.

या संदर्भात डॉ. ल. नी. चाफेकर यांचे विवेचन :

भारतीय राज्यघटना १९५० साली तयार झाली. त्यातील १६ वा भाग हा सवलतींचा असून त्यात प्रारंभी ३३० व्या कलमात सवलतदारांचे वर्ग दिलेले आहेत. त्यात अनुसूचित जमातींचा समावेश अहे. राज्यपालांच्या सल्ल्याने राष्ट्राध्यक्ष ही यादी जाहीर करतात. लोकसभेला हा समाविष्ट करण्याचा व जाती वगळण्याचा अधिकार आहे. वर्गीकृत (शेड्युल्ड) जाती म्हणजे पूर्वास्पृश्य, विमुक्त जाती म्हणजे पूर्वीच्या गुन्हेगार, भटक्या जाती म्हणजे गावोगाव भटकणाऱ्या (कुडमेडे जोशी, गारूडी, डोंबारी, वैदू इत्यादी) वर्गीकृत अथवा अनुसूचित जमातींना-रानटी-डोंगरी टोळ्या, आदिवासी, वनवासी, वनजाती, वन्य जमाती, गिरिजन, भूमिजन, भूमिवासी, आरण्यक इत्यादी नावांनी संबोधिले जाते. (आदिवासी-आदिम जाती-जनजाती हे शब्द उत्तरेत रूढ आहेत)

१. आदिवासी शब्दाचे जनक आचार्य भिसे आहेत. (गिरिजनांची समस्या ) डॉ. ल. ना. चाफेकर (पान नं. २) 'ॲबओरिजनल या इंग्रजी शब्दाचा मराठी अवतार' आदिवासी शब्द आहे. हा शब्द अर्थहीन आहे. आपल्या स्थानी मूळचा नाही असे सांगून या शब्द योजनेचा ते कडक निषेध करतात. मूळापासून म्हणजे ? पृथ्वीची उत्पत्ती की माकडाचा मानव झाला तेव्हापासून ? म्हणून ही शब्द योजना हास्यास्पद आहे.
२. 'आदिवासी' शब्द कालवाचक आहे. जमातीनिदर्शक नाही. यामुळे वेगळेपणा, दुरावा वाढण्याची शक्यता आहे. म्हणून डॉ. आंबेडकर, ओरिसाचे माजी मुख्यमंत्री विश्वनाथ दास यांनी या शब्दप्रयोगास विरोध केला.

३. 'आदिवासी' या शब्दाला एक मागासलेपणा चिकटलेला आहे.

४. 'आदिवासी' म्हणजे आर्यपूर्व भारतीय लोक असे मानले जाते. हा गंर्भितार्थ दुजाभाव वाढविणारा आहे. शिवाय तो असत्य आहे.

यासाठी 'आदिवासी' हा शब्द टाळून 'वनवासी' हा शब्द शासनदरबारी रुढ व्हावा.

❑❑❑

# आदिवासी साहित्य संवर्धन : काही विचार

**आदिवासी साहित्य चळवळ अधिक तीव्र होण्याची गरज :**

महाराष्ट्रामध्ये आदिवासी साहित्यिक उदयाला येत आहेत. त्यातील काही लेखक म्हणून सुप्रतिष्ठितही झाले आहेत. या साहित्याच्या निर्मितीकडे अभ्यासक समीक्षकांचे लक्ष वेधले जावू लागले आहे.

महाराष्ट्रापुरता आदिवासी भागाचा विचार केला तर नागपूरातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, ठाणे जिल्ह्यातील पालघर, वाडा, जव्हार, विक्रमगड, मोखाडा, खोडाळा, नांदेड जिल्ह्यातील किनवट आणि नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, बागलाण (सटाणा) कळवण, काही प्रमाणात मालेगांव, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, हरसूल हा भाग आदिवासी म्हणून गणला जातो. परंतु तसे पाहिले तर शिक्षणाच्या निमित्ताने, नोकरीच्या निमित्ताने, प्रशिक्षणाच्या निमित्ताने, स्वयंसेवी संस्थेतील कामाच्या निमित्ताने आज आदिवासी बंधू-भगिनी पुणे, नागपूर, औरंगाबाद, ठाणे, कोल्हापूर या सारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये येवून स्थायिक झाले आहेत. परंतु आज असे लक्षात येते की, या आदिवासी बांधवांमध्ये आता नगरवासीय बनलेल्यांमध्ये- जाणीव जागृतीची आवश्यकता आहे. त्यांचे त्या त्या ठिकाणी एकत्रिकरण करून आदिवासींच्या हितांचे काही नवनवीन उपक्रम राबविण्याची गरज आहे. त्यातला आदिवासी साहित्य चळवळ हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे.

**आदिवासी लोकसाहित्यांचे जतन व्हावे :**

लोकसाहित्य ही आपली, तसे पाहिले तर वेदकालीन अतिप्राचीन साहित्य निर्मिती आहे. ज्यावेळी लिखित स्वरूपात काहीही उपलब्ध नव्हते, त्या काळात केवळ गेय, सुस्वरात, तालात म्हणता येईल व कानाला गोड वाटेल असेच केवळ तोंडी मौखिक स्वरूपातील साहित्य निर्माण झालेले आहे. आज आपण आदिवासी भागातील या लोकसाहित्याचे संशोधन, संकलन, मूल्यमापन त्यावरील अभ्यास प्रकाशित केले पाहिजे.

आदिवासी लोकसाहित्याचा मूलगामी अभ्यास होण्याची गरज एवढ्यासाठी की त्यात भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब पुरेपूर उमटलेले आहे. वेद, उपनिषद, पुराण, रामायण, महाभारत या सारख्या ग्रंथातील किती तरी व्यक्ती, प्रसंग, घटना, कथा, विचार यांचे ठसे आदिवासी लोकसाहित्यात उमटलेले सुस्पष्टपणे दिसतात. या वनवासी साहित्याचे संकलन व प्रकाशन फार उद्बोधक ठरणार आहे. अद्याप आदिवासी साहित्याच्या संकलनाचे प्राथमिक काम देखील पूर्ण झालेले नाही. त्याची पूर्तता झाल्यास नव्याने अनेक गोष्टी उलगडतील.

## आदिवासी साहित्य चळवळ :

आज आदिवासींचे साहित्य विपुल प्रमाणात निर्माण होत आहे. मात्र अत्यंत विरळ स्वरूपात, कचितच त्याला प्रसिध्दी मिळत आहे. आदिवासी साहित्य फारसे प्रकाशित होत नाही. तशी सुविधा उपलब्ध नाही, यंत्रणा नाही. याचा अर्थ आदिवासी साहित्यच निर्माण होत नाही असे नाही. कदाचित हे साहित्य खेडो-पाडी हस्तलिखित स्वरुपात पडून असेल आणि लेखक, कलावंत अलक्षित स्वरूपात आपले जीवन जगत असतील. संकोच, गरिबी, आणि धीटपणाचा अभाव यामुळे हे सारे कच्चे लेखन त्यांच्या जमातीपुरतेच मर्यादित राहते. आणि तेथेच तोंडी गायले आणि हस्तलिखीत वाचले जाते. केवळ एवढ्यासाठीच या साहित्यिकांचे एकत्रिकरण, संघटन आणि त्यांच्या साहित्याची जुळवाजुळव, संपादन आणि सार्थ-सदीप प्रकाशन करणे महत्त्वाचे व गरजेचे आहे. त्यातून मराठी वाङ्‌मयालाही नवे लेणे गवसेल.

## आदिवासी साहित्यिकाच्या चळवळीची दिशा :

या आदिवासी साहित्यिकाच्या एकत्रिकरणासठी आणि त्यांच्या साहित्याला उजेडात आणण्यासाठी आदिवासी साहित्याची चळवळ निर्मळ, निखल, विशुध्द हेतूने, राजकारणापासून अलिप्त ठेवून, उभी करणे गरजेचे आहे. त्यासाठी तालुकावार आणि जिल्हावार संघटन करणारे लेखक, साहित्य-कला अवगत असलेले संघटक, नियुक्त केले पाहिजेत. त्यांनी या आदिवासी लेखकांची नाव, पत्ता, लेखन तपशीलासह सूची तयार केली पाहिजे आणि या लेखकाचे भव्यस्वरूपात मेळावे भरविले पाहिजेत. प्रथमतः तालुकापातळीवर, त्यानंतर

जिल्हा पातळीवर, त्यानंतर राज्यपातळीवर अशी ही आदिवासी साहित्याची चळवळ उभी राहिली पाहिजे. त्याची गती वाढवणे हे लेखकाचे, कलावंतांचे, समाजाचे कार्य आहे. मग मोठे मेळावे व संमेलन घेता येईल.

आज आदिवासी साहित्य उपलब्ध नाही म्हणून ते पाठ्यपुस्तकात समाविष्ट होत नाही, आणि प्रकाशित होत नाही. म्हणून हे साहित्य प्रकाशित झाले पाहिजे. यासाठी आपण एकत्र आले पाहिजे. आदिवासी साहित्याचा शोध घेतला पाहिजे आणि वनवासी साहित्य प्रकाशित केले पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या राजकारणाशी संबंध न ठेवता केवळ आदिवासी सांस्कृतिक कार्य म्हणून हे मराठी साहित्य संमेलन, महाराष्ट्र राज्य पातळीवर आपल्याला निश्चितच भरविता येईल.

❑❑❑

# आदिवासी सांस्कृतिक जीवनाचा अमोल ठेवा : बोहाडा

आदिवासींमध्ये शिमगा, दिवाळी, आखाती (अक्षय्यतृतीया),दसरा, कवळी भाजी, पोळा, नागपंचमी, बीजा इत्यादी सण मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरे करण्याची प्रथा आहे. या सणांमधून आदिवासींची संस्कृती प्रकट होते. 'बोहाडा' या उत्सवाचे सर्वात जास्त महत्त्व आणि आकर्षण आदिवासी बांधवांमध्ये आहे असे जाणवते. जव्हारचे उदाहरण जरी पाहिले तरी या तालुक्यातील भरसटमेट, मोखाडा, नांगरमोडा, चामीलपाडा, बिवलधार, पिपरपाडा, वांगणपाडा, कापरीचा पाडा, नंदनमाळ, डुबीचा पाडा, शिवाकोरड्याची मेट, विनवल, बोराळहारी, वडपाडा, जामसर, सारसून, उंबरविहीर, वेलीचा पाडा, साखरा, झाप, नांदगाव, पवारपाडा, इत्यादी पाड्यांवर बोहाडा होतो याचा अर्थ सगळ्याच पाडयांवर बोहाडा होतो. एवढे या बोहाड्याचे आदिवासी जीवनात आणि संस्कृतीत महत्त्वाचे स्थान आहे.

होळी पौर्णिमा आणि धूलिवंदन आटोपले की गावोगाव हा बोहाडा क्रमाने सुरू होतो. शुक्रवार, शनिवार, रविवार, सोमवार आणि मंगळवार या फक्त ५ वारांमध्येच बोहाडा कार्यक्रम साजरा होतो. शुक्रवारी- शनिवारी लहान सोंग काढतात. सोमवारी-रविवारी मोठी व सगळी सोंगे काढतात म्हणजे ही विविध देवाची मुखवटे घालून घेतलेली सोंगे नाचवितात. बोहाडा म्हणजे देवी जगदंबेचा उत्सव या दिवशी अनेक देवांची ४१ सोंगे नाचवतात. सोमवारी प्रत्येक सोंगासमोर नारळ फोडावा लागतो. सोंग या वेळी नर्तनात दंग असते. या सोंगांमध्ये आंबापालवी गणपती, सारजा, लोढे, शिवाजी, राक्षस, मासा,महादेव, रामतारी, (डोक्यावर ताटी घेतलेली असते व त्या ताटीत मुखवटे बसविलेले असतात.) सायदेव, इंद्रदेव, पुंडलिक, झकारी ताटी, बम्भूदेव (ब्रम्हदेव) सरवाई, होरा (मूर्ती) भिलीन, ताटी, कृष्ण देव, करणीदेव,गवळ, ताटी कासव, वाघोबा, विष्णुदेव, भीम, विमान, अंबादास ताटी, चारण, खंडेराव, बहिरोबा, काळूला, पांडव ताटी, टोप वेताळा रावण, चंद्र, सूर्य, राजा, नरसिंह, देवी, अशी ही अनेकविध सोंगे असतात.

संबळ, तुतारी, सूरवाद्य यांच्या सुरात आणि तालात ही सगळी सोंग नाचतात. प्रत्येक सोंगाची नाचण्याची पध्दत वेगळी असते. प्रत्येक देवाची नाचण्याची पध्दत ठरलेली असते. एकमेकांचे बोहाडे पाहूनच हे नाचांचे अनुकरण होते. वाजवणारे तेच असतात. परंतु प्रत्येक सांगानुसार त्यांचे तालसूर ते वेगवेगळे धरतात. प्रत्येकाच्या घरांत परंपरा आहे. त्यानुसार त्या त्या घराण्यात ते ते सोंग चालत येते. वर्षभर बांधून ठेवलेले हे सोंग होळी आली की बाहेर काढतात. त्याला रंगरंगोटी करतात. आठवडाभर ती सोंग येणारे जाणारे पाहतात. एरवी वर्षभर ही सोंग आपापल्याघरात बांधून ठेवलेली असतात. भाड्याने सोंग एकमेकांना दिली जातात. देवादिकांची ही सोंग कागद, पाणी एका टिपाडात टाकून आठ दिवस तो लगदा कुजवायचा नंतर त्यात डीग टाकायचा, उखळातून तो कांडून घ्यायचा. मग सोंग घडविणारा सोंग तयार करतो. आदिवासींच्या जाती आणि उपजाती वारली, ढोर कोळी, मल्हार कोळी, कातकरी, 'क' ठाकूर, 'म' ठाकूर, महादेव कोळी इत्यादी असल्या तरी त्यांची सोंग सारखीच असतात. बायका या सोंगात प्रेक्षकांची भूमिका बजावतात. त्या प्रत्यक्ष सोंग घेत नाहीत. पुरुषानेच सोंग फक्त नाचवायची ही प्रथा आहे. अलिकडे अपवाद म्हणून एखादी स्त्री ही सोंग नाचवितांना दिसते. रांजण पाड्यावर हे आढळले.

झगा, फेटा, गदा, तलवारी,लेहंगा, चाळ घुंगरू ही वेषभूषा या सोंगाना लागते. शहराच्या गावाहून भरपूर भाडे देऊन हे सामान आणतात. काही पाड्यांवर स्वतःची वेषभूषा तयार असते. तर काही पाड्यावर विनावेषभूषा नेहमीच्याच कपड्यात सोंग नाचविली जातात. सोंग नाचवणे अमूक एका गोष्टीसाठी अडते असे नाही. सूट पँट नसली तर अंडरपँटवरही सोंग नाचविली जातात. दिवसा झोपा काढून रात्रभर जागरण करून सोंग पाहतात. आणि नाचवतातही. त्या निमित्ताने जवळपासचे तसेच लांबचेही नातेवाईक मित्रमंडळी पाहुणे येऊन आपापल्या लोभाच्या ठिकाणी राहतात. त्यांची सगळी व्यवस्था ज्याची तेच पाहतात.

सुरवातीला एका फळ्यावर सोंगाची नावे लिहून ठेवायची त्याप्रमाणे सा... क्रमाने येत होती. पण आता माईक लाऊड स्पीकरवरून सोंगाला बोलावले जाते.

जाहीर होताच ते सोंग हजर होते. वाजवणारांचे दोन ताफे असतात. रस्त्यावरच ही सोंग इकडून तिकडे नाचतात. अंदाजे २०० मीटर सडक (रस्ता) त्यासाठी वापरला जातो. सोंगांबरोबर बघ्यांची अमाप गर्दी उसळलेली असते. रस्त्यांच्या दोन्ही बाजूला तुफान गर्दी झालेली असते. या निमित्ताने त्या गावात् एक जत्राच भरते. रात्रभर दुकानातून खाणे पिणे, चहा पान बिडीतंबाखू देणे घेणे चालूच राहते. ढालकी, संबळ वाजवून त्याला 'थाप' म्हणतात. ती देऊन बोहडा सुरु होत असल्याची इतरांना सूचना मिळते व प्रचार होतो. प्रत्येक पाड्या पाड्यातून हा बोहडा पाहणाऱ्या तरुण तरुणींच्या हळूहळू ओळखी होऊन जोड्या जमायला लागतात. पण मूळ उद्देश लग्न जमविणे हा नाही. पोरं पोरं मिळूनच हा कारभार करतात. बोहाड्याच्याच ओळखीच्या आधारावर पुढे त्यांची मागणी घालून आईबापांच्या संमतीने लग्न जमतात. परस्परांच्या पसंतीचा भाग या बोहाड्यात होऊन जातो. पुढे रीतीनुसार लग्न होऊन सुरळित संसारही थाटतात. पण बोहाडा हे देवाचे काम आहे, ते लग्न जुळविण्याचे केवळ स्थळ नव्हे, मात्र पूर्वीच्या काळी दळणवळण नसल्याने याच सणाच्या, बोहाड्याच्या निमित्ताने भेटी गाठी होतात. सोईर संबंध जुळतात आणि काही वेळा लग्न संबंध तुटतातही. कारण घरात बायको असूनही अन्यत्र ओळखीतून प्रेम संबंध वाढतात, असे पण क्वचितच घडते, असे म्हणतात. खेळीमेळीने जातपात विसरुन, दंग होऊन, सगळे आदिवासी एकत्र येतात.

नागपंचमी ते दीपावलीपर्यंतच तारपा वाद्य वाजते आणि त्याच ताला सुरात नाच गाणे चालू असते. तसे होळी, फाल्गुनापासून तो पाऊस पडेपर्यंत बोहाडा चालू असतो. शेतीची कामे नसतात, म्हणून हे मनोरंजन आणि करमणुकीचे साधन ठरते. त्यातच भक्तीने देवपूजा पण बांधली जाते. बोहाड्याच्या शेवटच्या दिवशी देवीच्या सोंगाला बोकडाचा बळी देतात. जो बोकड देतो त्याच्या शेतावर एक दिवस सगळे मिळून काम करतात. शुक्रवारी गणपतीसमोर नारळ फोडून बोहाड्याला प्रारंभ होतो. आणि मंगळवारी देवीला बोकड अर्पून सांगता होते. सोमवारी प्रत्येक सोंगाला नारळ फोडून वाहतात. सोंगावरून पैसे शेवटच्या दिवशी जास्त प्रमाणात ओवाळले जातात. कापणीला, धरणाच्या कामाला बाहेर गावी गेलेले आदिवासी हमखास परत येतातच. ज्याचा त्याचा सोंग नाचविण्याचा

मान आणि हक्क प्रस्थापित झालेला असतो. पिढ्यान पिढ्या चालत आलेली ही सोंगं त्याच कुळातली माणसे पुढे चालवितात.

बोहाडा केला नाही तर भुताटकी किंवा अन्य काही तरी त्रास गावाला सुरू होतो, या समजुतीने हमखास बोहाडा करून आनंदोत्सव साजरा होतो आणि मनातील अरिष्ट आणि अनिष्ट संदेह गळून पडतात. सर्व मंगल मांगल्याचे पवित्र वातावरण गावात बोहाड्याने निर्माण होते. असा हा आदिवासींच्या संस्कृतीचा आणि सांस्कतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे हा बोहाडा उत्सव.

❑❑❑

# आदिवासींचे काज

दिवाळीनंतर अचानक आलेल्या निरोपामुळे प्रसिध्द गीतकार अशोक जी. परांजपे व श्री. नानासाहेब मेटकर यांच्यासह, जामसर जवळच्या हिरडपाड्याला जाण्याचा योग आला. तिथे गेल्यावर मला प्रथम वाटले की हिरपाड्यावर आज एखादी यात्राच आहे कारण अनेक आदिवासी स्त्रीया उत्साहाने सजून आलेल्या दिसल्या. अनेक दुकानेही लागलेली होती.

**अनावर रडणे :**

आम्ही मांडवांच्या दिशेने आणखी थोडे पुढे गेलो. सुरुवातीला मला काहीच बोध होईना. त्या ठिकाणी आठ आठ दहा दहा बायकांचे घोळके स्वतंत्रपणे बसले होते. त्यातील एका बाईच्या मांडीवर, कापडात गुंडाळेलेले गाठोडे ठेवलेले होते. बायकारडत होत्या. रडत रडत मृतात्म्याला साद घालीत होत्या. सगळीकडे नजर फिरवली. तर अशी जवळ जवळ तीस पंचवीस टोळकी त्या मांडवात बसलेली होती. नवीन येणारे नातेवाईक आपापल्या टोळ्यात सामील होत होते. आणि रडायला साथ देत होते. त्यामुळे दुःखाची भावना दरवेळी उफाळून येई आणि तेवढ्या : पुरती त्याची तीव्रता वाढे. याचे पार्श्वसंगीतही शोकानुभव गडद करणारे होते. काही घोळक्यांमध्ये भेदरलेली लहान मुले दिसत होती.

**'काजा' ची कल्पना :**

दहा पंधरा ढोलवाले ढोल घेवून विशिष्ट प्रकारे वाजवित होते. हे ढोल वाजविण्याचे भिन्न प्रकार होते. ते ढोल वाजविण्याचे भिन्न प्रकार आदिवासींमध्ये आहेत असे समजले. वारलीच्या काजात मात्र 'डाका' हे वाद्य दोन्ही बाजूला निमुळते होत जाणारे आणि गुडग्यावर घेवून वाजविण्याचे असते. ढोल हा देवाकार्याचा भिन्नप्रकारे वाजतो, काजासारख्या श्राध्दाच्या समारंभाच्या वेळी वेगळा वाजविला जातो.

तपशीलात जावून चौकशी केली तेव्हा कळले, की दिवाळीनंतर येणाऱ्या पहिल्या शनिवारी ज्या कुणाला त्यातल्या श्रीमंत आदिवासीला, हजार दोन हजार

रुपये खर्च करून काज घालायचा आहे. त्याच्या पाड्यावरती रात्रीच्या वेळी ढोल वाजविला जातो. म्हणजे निरोप न देता, निमंत्रणे न पाठविता सर्वांनी समजावयाचे, की त्या पाड्यात यंदा काज आहे.

प्रत्येक आदिवासींच्या उपजातीचे काज स्वतंत्रपणे साजरे होते. आम्ही गेलो होतो त्या हिरडपाड्यावर क ठाकूरांचे काज होते. या वर्ष सहा महिन्यात ज्यांच्या ज्यांच्या घरी कुणी दिवंगत झाले असेल अशा सगळ्या लोकांनी मिळून एकत्र येवून हे काज साजरे होते. त्याप्रमाणे त्या सूचना त्यांना ढोलाच्या विशिष्ट नादाने आपोआप मिळालेल्या असतात. हे काज साधारणपणे दिवस दिड दिवस चालते : म्हणजे २७ ऑक्टोबरलाच हे लोक येवून दाखल झाले होते. भर दुपारपासूनच रात्रभर काही न खाता उपाशी राहून सगळेच समदुःखी मृताला द्यावयाच्या वस्तूंचे गाठोडे कवटाळून, धाय मोकलून रडत राहिलेले होते. आणि दुसऱ्या दिवशी दुपारी म्हणजे २८ ऑक्टोबरला हा कार्यक्रम आटोपला. वारली समाजात पाच दिवस उपवास करण्याची प्रथा आहे. असे समजते.

**श्राध्दात रडणे :**

दुपारी रडून रडून त्यांच्या डोळ्यातील पाणी आटलेले दिसले आणि उपाशीपोटी आवाजही बसलेले होते. तरीही आक्रंदन चालूच होते. काही घोळक्यात "मोले घातले रडाया" अशीही स्थिती होती. सहाजिकच मृतात्मे निघून जावून बरेच दिवस झालेले आहेत. भावनांची तीव्रता कमी झालेली आहे. आणि तरीही या ठरलेल्या दिवशी सगळे हा समारंभ करीत आहेत. त्यामुळे मंडपभर चार पाचशे माणसे नुसती आक्रंदन करीत होती. इकडे ढोल गतीने वाजत होता. डोक्यात लख्खकन प्रकाश पडला. हे तर सामुदायिक श्राध्द आहे. सामुदायिक विवाह, सामुदायिक व्रतबंध, जसे साजरे होतात तसेच मृतांचे विधिवार न पाहता, ठरलेल्या दिवशी सर्वांनी मिळून, एकत्र येवून, श्राध्द करण्याची पध्दत आहे.

थोडा विचार केला. तेव्हा लक्षात आले ह्याच्या मुळाशी कदाचित आदिवासींची गरिबीही कारणीभूत असेल. प्रत्येकाला ब्राम्हण बोलावणे, तांदळाचे पीठ घालणे आणि जेवणावळी उठवणे हे कसे शक्य होणार? म्हणून सोप्या पध्दतीत

सामुदायिक श्राध्दाची एक थोर आणि उदात्त प्रथा आदिवासींमध्ये रूजली असावी, त्यातला काही थरारक भाग वगळल्यास, ही प्रथा अनुकरणीय आहे यात शंका नाही.

## समारंभ की सोहळा :

मोठ्या मांडवात हिरव्यागार बांबूंचा एक छोटा मांडव घातलेला असतो. त्या मांडवावर जे गवत असते त्याला काजाचे गवत असे म्हटले जात असावे. या छोट्या मांडवात साळ, वरई अशा धान्यांचे छोटे ढीग केले होते. एका कोपऱ्यात एक टोपली होती आणि त्या टोपलीत आदिवासींचा देव ठेवलेला होता. तो देव म्हणजे बहुधा हिरवा. बहिरोबा असावा तिथे काही लहान मोठया आकाराचे पिंड ठेवलेले होते. ते पिंड भाताचे नसून मातीचे होते. त्याच्या भोवताली वेगवेगळया प्रकारचा आवाज देणारी वाद्ये घेवून, वाजविणारी माणसे बसली होती. सुरुवातीला शंख फुंकले गेले, भजन म्हटले, टाळ वाजवले पण त्या रडण्याच्या एकच हलकल्लोळात शंखाच्या आवाजापलिकडे त्या गाणाऱ्याच्या गाण्यातला शब्दही कळत नव्हता.

प्रत्येक मृताच्या गटाबरोबर कमीत कमी एक वीर ढोलवाला अशी दोन माणसे ज्यांच्या अंगात नेहमीच वारे संचारीत अशी आणलेली होती. त्यांना भावे म्हणतात. मृतांच्या नातेवाईकांनी फार अगोदरच सुपारी देवून त्यांना आणलेले असते. आणखी विशेष म्हणजे हे भावे अनोळखी असतात व मृतात्म्यांच्या अंगात संचार झाल्यावर अचूकपणे गर्दीतून ते मृतात्म्यांच्या नातेवाईकांना हेरतात.

पाहता पाहता ढोलवाल्यांची संख्या व आवाज भरपूर वाढला. वातावरण निर्माण झाले. द्रुतगतीने सगळ्या हालचाली होवू लागल्या. मोहाच्या दारूचा भपकारा आसमंतात आणि मांडवात दरवळत होता. त्यावरून कित्येकांनी समारंभपूर्वक दारू घेतलेली होती याची कल्पना आली आणि ती धुंदी त्यातूनच निर्माण झालेली होती.

भर दुपारी तीनच्या सुमारास कांबळी, कांबळी म्हणजे श्राध्दाचे मंत्र म्हणणारा तो पुरोहित ! भिक्षुकी तो आदिवासींच्याच बोलीभाषेतून मंत्रोपचार करून

मृतात्म्याला आवाहन देतो. केवळ लंगोटी लावलेले संपूर्ण उघडे असे वीर काही ठराविक गावातून आलेले काळसर रंगाच्या तलवारी हातात घेवून त्या ठिकाणी उभे राहिलेले होते. त्यांनी त्यांच्या जवळच्या खंजीराच्या वाराने आपले मस्तक रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या त्यांचे रक्त मानेवर पोटावर छातीवर ओघळलेले दिसत होते आणि तरीही माणसे हू की चूं न करता आपापसात बोलत होती, भेटत होती. आणि हिंडत होती. या कार्यक्रमाबरोबरच प्रत्येक गटातील त्या दोन माणसांच्या अंगात मृताच्या संचार झाला. ते सर्वांगाने थरथरू लागले. मूठ आपटू लागले आणि बायका आपला मृतात्मा त्यांच्यात संचारला असल्याच्या कल्पनेने नमस्कार करू लागल्या. कडकडून भेटू लागल्या. पोहे आणि वरई त्यांच्या कपाळी लावत होत्या. भेटी घेत होत्या.

तो अंगात आलेला माणूसही प्रत्येक नातेवाईकाला ओळखून जवळ घेवू लागला व दसऱ्याच्या शिलांगण सोहळ्याप्रमाणे वयाच्या भेदाचा विचार न करता ते एकमेकास अलिंगन देतात. ते पाहता पाहता रडण्याचा भयानक आक्रोश मावळतो आणि आनंदाचे वातावरण निर्माण होते. गाठोड्यातील सर्व वस्तू, तेल, दिवा, तांब्या, पितळेचे काही दागिने इत्यादी त्या अंगात संचारलेल्या मृतात्म्याला दिले जातात.

तो अंगात आलेला भाव मूठ वळवून पायाची मांडी घालून बसतो. त्याला सगळे मिळून ताठ बसवतांना पायांना हालचाली देतात. त्यानंतर पूर्ववत ते माणसासारखे होतात.

हे काज एवढ्यावरच संपत नाही तर त्याठिकाणी काही पोक्त समजुतदार माणसे मृताच्या पत्नीला किंवा विधुराला भावी आयुष्यात उभे करण्याच्या दृष्टीने बाजूला घेवून बोलणी करतात. असेही ऐकायला मिळाले की काही वेळा जिथल्या तिथे जोडी निश्चित होवून पुन्हा उध्वस्त संसार उभारण्याला सुरुवात होते. लग्न जमते पण प्रत्यक्षात हा प्रकार आमच्या निदर्शनास आला नाही मात्र त्या एकत्र येण्यामागे तोही एक हेतू असावा हे जाणवले.

आपल्या वस्तीवर परतल्यानंतर काहीच मार्ग उरत नाहीत म्हणूनच या एकत्रीकरणातून तरी विवाह जुळून आणावेत असा प्रयत्न स्वाभाविक वाटतो.

डोक्याला प्रथम जखम करुन घेणारी व्यक्ती यांना एक खास वनस्पती औषधी माहिती असते की ज्यामुळे ते आपला घाव दोन तीन दिवसात बरा करतात.

दारूच्या देवाण घेवाणीचा प्रकार आणि वीरांचे रक्तबंभाळ होणे या दोन गोष्टी वगळल्यास या प्रथेचे निश्चितच उदात्तीकरण होवू शकते. त्यातील सदूहेतूही स्पष्ट होतो.

आदिवासींच्या या प्रथा नेमक्या किती वर्षांपासून सुरू आहेत व त्यांचे मूळ स्वरूप असेच होते का? या प्रश्नांचा शोध घेतल्यास अधिक काही हाती लागेल.

❑❑❑

# लोकसंवादासाठी माध्यम : थाळगान

आदिवासींच्या विकासासाठी आणि लोकशिक्षणासाठी सर्व थरांवर निकराचे प्रयत्न होत आहेत. शासन स्वयंसेवी संस्था व सामाजिक बांधिलकी मानणारे कार्यकर्ते कार्यरत आहेत. सर्वांचे लक्ष्य आदिवासी विकास असले तरी आदिवासींच्या पारंपारिक, उपजत कलांकडे पाहिजे तेवढे लक्ष वेधले गेलेले नाही. वस्तुतः लोकशिक्षणासाठी आदिवासींच्या सर्वच कला आदर्श माध्यम म्हणून स्वीकारता येण्याजोग्या आहेत. त्यासाठी या कलांचा अत्यंत सूक्ष्म अभ्यास होणे गरजेचे आहे. त्याचा दुहेरी फायदा होवू शकतो. आदिवासी कला, जीवन आणि संस्कृतीचे जतन आणि संरक्षण यामुळे होवू शकेल, आणि लोकशिक्षणासाठी या कलांचा वापर केल्यास परंपरा सांभाळतच उत्तम तऱ्हेने आदिवासी समाज प्रबोधनही साधू शकेल.

**लोककला आणि लोकप्रबोधन :**

लोककला आणि लोकप्रबोधन या दोन गोष्टी भिन्न न मानता त्यांची सांगड कशी घालता येईल. याचा विचार कलावंत आणि प्रबोधनकार यांनी एकत्र बसून करण्याची ही योग्य वेळ आहे. कारण, एकूण समाजजीवनात फक्त आदिवासी समाज त्यातही विशेष करून कातकरी समाज अधिक मागे असल्याचे ध्यानात आले आहे. तेव्हा कलाकार आणि प्रबोधनकार यांनी एकत्र येवून कला आणि जागृती यांचे नाते जोडले पाहिजे.

अशाच भूमिकेतून या ठिकाणी लोकशिक्षणासाठी गवसलेले थाळगान हे अत्यंत परिणामकारक माध्यम आहे असे लक्षात येते. म्हणून थाळगान या कलेचा परिचय येथे करून देत आहे.

**थाळगान :**

थाळगानसाठी कोणतेही किंमती वाद्य किंवा दुर्मिळ साधनसामुग्री लागत नाही. त्याच्या नावातच त्याची सामुग्री आलेली आहे. एक थाळा आणि त्याच्या आधाराने सादर केलेले गाणे म्हणजेच गीतात्म कथानिवेदन.

घरातील पीठ मळण्याची कोणतीही एक थाळी घ्यायची, जेवणाची घेतली तरी चालेल. ती थाळी बसून मांडीमध्ये धरावयाची किंवा मांडीवर ठेवायची, थाळीच्या मध्यभागी मधाच्या पोळ्याचे थोडे मेण घेवून त्याची गोळी चिकटवायची. त्यागोळीमध्ये आपण दोरी वळण्यासाठी जो तागा वापरतो. तो तागा ज्यापासून मिळतो अशी तागाची काडी (सनकाडी) ती रोवायची त्यानंतर अंगठा आणि तर्जनी यांच्या सहाय्याने दोन्ही हातांनी काडीच्या वरच्या टोकापासून खालच्या टोकापर्यंत काडी धरुन सतत फेऱ्या मारावयाच्या त्याचा परिणाम म्हणजे त्या थाळीतून एक सुरेख झंकार निनादतो. त्याला मंत्रमुग्ध करून टाकणारी एक लय आणि नाद लाभतो. त्या नादाच्या धुंदीमध्ये आणि थाळीच्या झंकारामध्ये नादात नाद आणि सूरात सूर मिसळून एक चांगली मनावर बिंबेल अशी पुराणप्रिय कथा लोकभाषेत कथेकरी सांगतो किंबहुना गातो, हेच थाळगान होय.

हा कथेकरी म्हणजे निरक्षर, पण जाणकार आदिवासीच असून, त्याच्या या कथा केवळ ऐकून परंपरेने चालत आलेल्या आणि श्रध्देने जतन केलेल्या असतात. त्याची भाषाही त्या त्या भागातील आदिवासी बोलीच असते. कथा सांगायला आरंभ अगदी हलक्या आवाजात आणि धीमेपणाने होत असला तरी पाहता पाहता कथा श्रवणकरणाऱ्यांना गुंगुवून टाकते.

या कथेला पुन्हा काळवेळ मर्यादा काही नसते. एकदा रात्रीचे थाळगान सुरू झाले की थांबवायचे ठरवले तरच थांबते. आदिवासी बोलीभाषेत ही कथा सांगितली जात असल्याने आदिवासी बांधवांना कथा समजत नाही हा प्रश्नच उरत नाही.

असे हे लोकशिक्षणासाठीही वापरता येण्याजोगे थाळगान एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. लोककला आणि लोकशिक्षण यांच्या समन्वयातून लोक प्रचार उत्तर रीतीने साधता येईल याची खात्री या कथेने पटते.

**नव्या युगातही प्रभावी :**

आता नव्या काळाच्या संदर्भात थाळगान हे माध्यम वापरावयाचे ! लोकांना एकत्र गोळा करून थाळी मांडीवर घेवून कथा लावायची ही कथा असेल पुराण

पध्दतीचीच,त्या जुन्याच वळणाची त्याच परिचित आदिवासी बोलीतील पण ती कथा आता असेल व्यसन मुक्तीची, विज्ञान निष्ठेची, स्त्री पुरुष समानतेची, पर्यावरण रक्षणाची, सुशिक्षणाची, सुसंस्काराची आणि कुटुंबकल्याणाची.

अंधश्रध्दा निवारण करून अडाणीपणा नाहीसा करून अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन या मूलभूत गरजा भागविण्याची दिशा दाखविणारी ही कथा असेल. अशा कथेने मग आमच्या आदिवासी बांधवांचे जीवनमान आणि राहणीमान उंचावेल, अशी आहे आदिवासींच्या थाळगानची कथा. एखाद्या जाणकार कलाकारांनी थाळगान ऐकून तृप्त व्हावे आणि थाळगान या माध्यमाचा लोकप्रबोधनासाठी मनसोक्त वापर करावा. थाळगानाला स्टेज लागत नाही. फक्त मंडळी एकत्र जमली आणि थाळगान गाणारा कथेकरी मध्यभागी बसला, एक थाळा, मेणाची गोळी आणि तागाची काडी शोधली की रात्र जागवणारे मंत्रमुग्ध करणारे थाळगान सुरू होते.

आदिवासी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी थाळगान कथा पध्दती शिकून जर आधुनिक समाज प्रबोधनाच्या गीतात कथा लावल्या तर आदिवासींचे थाळगान आदिवासींच्या उन्नतीला पोषक होईल याची खात्री आहे.

❑❑❑

# दसरा : जव्हारच्या आदिवासींचा !

दसऱ्याच्या दिवशी आदिवासी लोक खूप आनंदात बुडून जातात. 'दसरा सण मोठा नाही आनंदा तोटा' याचा प्रत्यय येतो. दसऱ्याच्या सुमारास आदिवासी लोकांचे शेतातील पीक, पिकावर भरास आलेले असते. शेतातील पीक गोळा करता करताच आदिवासी लोकांचा आनंदाचा सण 1दसरा2 जवळ आलेला असतोच.

घटस्थापना झाली की पहिली माळ चढते. तिथून आदिवासी लोकांमध्ये घरातील मुख्य माणूस दसरा येईपर्यंत पथ्य पाळीत असतात. उपवास धरत असतात. ज्या काही वस्तूंची पथ्ये पाळली जातात त्यात काकडी, डांगर, सफेत खेकडा, दोडा या वस्तूंचा समावेश होतो. या वस्तू ते या कालावधीत खात नाहीत.

अंबा देवीला शेवटची माळ चढली की त्या दिवशी सर्व घरातील देवाची पूजा केली जाते. उपवास सोडतात. मग मात्र काकडी, डांगर, सफेत खेकडा, दोडा या वस्तू खायला सुरुवात करतात.

दसऱ्याच्या दिवशी आदिवासी लोकांची मुख्य हत्यारांची पूजा केली जाते. दसऱ्याचा दिवस शुभ आणि चांगला मानला जातो. म्हणून आदिवासी लोक सर्व काही करत असतात.

आदिवासी लोकांना दसऱ्याची आनंद पर्वणी म्हणजे त्यांचे आवडते तारपानृत्य. या तारपा नृत्यानें ते धुंद होतात. आनंदाच्या डोहात डुंबतात, तल्लीन होतात. यावरून या नादलयात दुःख पचवून तरंगणाऱ्या आदिवासींच्या नृत्यकला प्रेमाची साक्ष पटते. आदिवासींचा दसरा एक विशिष्ट ठिकाणी साजरा करण्याची पध्दती आहे. त्या ठिकाणी सर्वजण आपले तारपानृत्य बरोबर घेऊन मेळावा भरवितात आणि रात्रंदिवस त्याच आनंदात नाचत राहतात. हे तारपानृत्य दसऱ्यापासून सुरू होते आणि थेट पुढं दिवाळीपर्यंत चालू राहते.

तारपानृत्या बरोबरच ढोल नाचही सादर केला जातो. आदिवासींच्या मधील ठाकूर जमात हा नाच जास्ती करून सादर करतात. या नाचात विशिष्ट तालावर ढोल वाजविला जातो. नाचणाऱ्यांच्या एका हातापायात घुंगरु बांधलेले असते. मोठ्या उत्साहात बेहोष होऊन नाचा ढोलाच्या तालावर नाचतो. ढोलाच्या ठेक्यावर विशिष्ट लयीत नाचणारा ढोलावर उलथे पालथे होऊन नाचत असतो. नव्हे धडाधड आदळत असतो. नाचता नाचता त्यात पिरॅमिडसही तयार केले जातात. एखाद्या दहीहंडीची आठवण व्हावी असे ते सारे खेळ असतात. घुंगरु आणि ढोल यांच्या नादात सारे जण त्यांचे सारे विश्वच जणू घामाने डबडबून जाते. त्याचवेळी तोंडाने गाणी म्हटली जातात. पण त्या गाण्यांचे बोल ढोल घुंगरु पायांच्या आवाजात लोपून जातात. नुसता लयीतला ध्वनी ऐकू येत राहतो.

जव्हारचा दसरा हा आदिवासींच्या दसरा साजरा करण्याच्या पध्दतीतील आणखी एक विलक्षण बहारदार अनुभव आहे. जव्हारचा दसरा हे साऱ्या महाराष्ट्राचे आणि आदिवासी परिसराचे आकर्षण आहे. एका विशिष्ट पध्दतीने परंपरेने चालत आलेल्या रीतीरिवाजाने हा दसरा सण साजरा होतो. खेडोपाडीचे आदिवासी, मग त्यात ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या आठही प्रमुख उपजाती आढळतील. त्या एकत्र येऊन दसरा साजरा करतात. त्यात महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी, क. ठाकूर, म. ठाकूर, वारली, कोकणी, कातकरी, इत्यादी विविध जमातीच्या लोकांचा समावेश असतो.

सगळे एकाच जव्हारच्या हनुमान पॉईंटच्या दिशेने वाट चालू लागतात. आपल्या अति ग्रामीण अगदी आतल्या खेड्यापाड्यातून कित्येक मैल जंगलातली खडकाळ, डोंगर दऱ्यातली विकट वाट पायी तेही अनवाणी तुडवत हे सारे आदिवासी पायी चालत आलेले असतात. तहान भूक विसरुन नाचत नाचत वाजत गाजत सगळे आदिवासी येतात आणि सगळे रस्ते आणि दिशा फुलून येतात. तारपा ढोल, घुंगरू यांच्या आवाजाने नादब्रह्मात सारे लीन होतात. ब्रह्मानंदी टाळी लागते. आदिवासी स्त्रीयांना मूळातच नटण्याची साजशृंगार करायची विलक्षण हौस असते. सोन्याचांदीच्या नसल्या तरी रुप्याच्या वाक्यानी, पितळी लोखंडी दागिन्यांनी त्या नटलेल्या असतात. गळ्यात रंगीबेरंगी मण्यांच्या माळा घालतात.

डोक्याला केसांचा अंबाडा, बुचडा किंवा चक्कर घालून त्यावर काळी जाळी बांधतात. विपुल क्लिपांनी हेअरपींन्सनी केस घट्ट बांधून बसवितात. केसांना चाफा, मोगरा, गुलाब, झेंडू मिळेल ती रान फुले पाने 'पत्रं पुष्पंम' लेवून त्या सजवतात. भडक रंगीबेरंगी रिबीन्स आवडीने लावतात. तसेच भडक रंगाचे कपडे करून आपापल्या पाड्यांतील माणसात मिसळून वाजत गाजत चालत गात नाचत येतात.

पुरुषांप्रमाणे स्त्रीयांचेही सीमोलंघन असते. पुरुष मात्र नेहमीप्रमाणेच दसरा हा मोठा सण असूनही त्यादिवशी लंगोटी, फडकी फार तर हल्ली अर्धी चड्डी घातलेले असतात. डोक्याला असते गुंडासे अथवा टोपी आणि असलीच तर अंगात बंडी, सदरा, अथवा नुसते बनीयनच. पण आनंदाला नसतो तोटा. ते आपल्या जव्हारच्या आवडत्या राजा महाराजांना पाहण्यासाठी, भेटण्यासाठी चालत जात असतात. थकवा विसरण्यासाठी त्यांनी जरूर मद्य प्राशन केलेले असते. त्यात स्त्रियाही मागे रहात-नाहीत. सगळ्यांचे डोळे लाल, मद्याच्या नशेमध्ये राजाच्या पायावरडोके ठेवण्यासाठी भरजरी पोषाखातील नंगी तलवार घेऊन राजबिंडा राजा पाहण्यासाठी त्याला अभिवादन करण्यासाठी मुजऱ्यासाठी, समाजासाठी ही दसऱ्याची प्रथा रुढ आहे. संपूर्ण जव्हारमध्ये दसऱ्याच्या दिवशी सकाळपासून ही शोभा यात्रा पाहायला मिळते. आदिवासींचे तांडेच्या तांडे फुलून बहरून रात्रंदिवस नाचनाचून, तारपा ढोल वाजवून सोंग घेऊन चालत असतात. निदान दसऱ्याच्या दिवशी तरी आपल्या व्यथेचे, दारिद्र्याचे त्यांना स्मरण होत नाही. ते सगळे विसरतात. स्वतःलाही विसरतात.

हनुमान पॉईटला भव्य यात्रेचे स्वरूप येते. सगळ्या नद्या सागराला तशा सगळ्या वाटा आणि आदिवासींचे जथे हनुमान पॉईंटला येऊन मिळतात. शेवटी कार्यक्रम असतो रावण दहनाचा. एक भला मोठा चिंध्यांचा रावण केला जातो. त्याला असंख्य आदिवासी बंधू भगिनीच्या आणि समस्त जव्हारकर नागरिकांच्या साक्षीने भडाग्नी दिला जातो. रावण अवाढव्य बनवतात. तो पूर्ण जळेपर्यंत सगळे उभे थांबतात. रावण दहन झाले की सगळे दमून थकून तरीही पुन्हा वाजत गाजत नाचत, ढोल टिपऱ्या तारपाच्या धुंदीत घरोघर परततात. आपट्यांची पाने वाटतात. दुख पचवून सगळ्यांना आनंद देतात.

'दसरा' म्हणजे अश्विनामधला सण, अंबामातेचा नवरात्र उत्सव. या नऊ दिवसात तुळशीच्या झाडावर दररोज एक याप्रमाणे माळ बांधतात. आपले कुलदैवत घरी बसले असे मानले जाते. या दिवसात उपवासही धरले जातात. देवाला नवस पुरवले जात नाहीत. विशेष म्हणजे मुली एक तांब्या घेऊन त्यात अनेक फुले कणसे, एकत्र करून तांब्यात खोचून साडी नेसून हातात कांड्या टिपऱ्या घेऊन गावोगाव प्रत्येक दारी जाऊन गाणे सांगून जोगवा मांगतात. त्या गाण्याला भोंडवाय म्हणतात. त्या ठिकाणी -

'तुझ्या माझ्या अंगणी
चाफा लावू चांदणी
चाफ्याला पाणी घालूनी
चाफा आला भरासी
चाफा आला भरासी
कळून कळी वाटली
कळून कळी वाटली
एक कळी गळाली
एक कळी गळाली
तीच कळीवेचूनी
नवशा हार मी गुंफिला
नवश्या हार गुंफूनी
देवीला मी वाहिला.'

असे गाणे गातात. नवव्या दिवशी मागून आणलेले धान्य जोगवा त्याचा नैवेद्य देवीला वाहतात. तो दिवस म्हणजे दसरा. दसरा म्हणजे घरी बसलेले देव सुटे करण्याचा दिवस. चेंडा, गांवदेवी, मऱ्ही, चव्हाट्या, मुंड्या या अनेक देवांना शेंदूर फासून पूजा केली जाते. पूर्वी अनेक ठिकाणी रेडा मारला जात असे. परंतु सध्या काही ठिकाणी कोंबडा, बकरा, यांचा बळी देतात. सायंकाळी आपट्यांच्या पानांची पूजा करून एकजण दुसऱ्याला ती पानं देतात. पाय धरतात. भेटी गाठी घेतात. आनंदी आनंद चोहीकडे पसरवितात. असा हा जव्हारचा दसरा सण पाहण्याजोगा - अनुभवावा असाच आहे. □□□

# आदिवासी मौखिक संपदा

आदिवासींच्या पारंपारिक व दैनंदिन जीवनातील गीते विस्मृत होवू नये म्हणून ती छापील स्वरूपात उपलब्ध व्हावीत असा प्रयत्न आहे.

### सीता हाक मारते

सीता गेलीय वारूळे तळेला सोनु कंबळायला |
हाक मारीते दशरथाला ग तिच्या सासऱ्याला ||
हाक मारीते कौसल्याला ग तिच्या सासूला |
सीता गेलीय वारूळे तळेला सोनु कंबळायला ||
हाक मारीते लक्ष्मणाला ग तिच्या दिराला |
हाक मारीते रामयाला ग तिच्या नवऱ्याला ||
सीता गेलीय वारूळे सोनु कंबळायला ||

आदिवासी संस्कृतीत रामायण रूजलेले आहे. हे या गीतातून उलगडते. नावे बदलून पुनरुत्पत्ती हे वैशिष्ट्य येथे दिसते. त्याचप्रमाणे कौटुंबिक नात्याला सासू, सासरा, दीर आणि शेवटी लाजत नवऱ्याच्या उल्लेखाला या गीतात प्राधान्य आहे. रामायणातील सीता वारूळ नावाच्या पाड्यावरील एका तळ्यात कमळे आणायला गेली ही कल्पना यात असून, सीता आपला सासरा दशरथ, सासू कौसल्या, दीर-लक्ष्मण आणि नवरा- राम यांना हाक मारीते. एवढीच कल्पना या गीतात आहे. येथे सोनू हे गाणे गाणारीच्या मैत्रिणीचे नावं आहे. आदिवासी गीतात आपले गाव आणि आप्त यांची नावे गोवायला कायम वाव असतो.

### जंगल

जंगल जंगल जंगल गं आई जंगलं गं ..
जंगलाच्या मध्ये मला दिलय गं.. ||
पायातले पैंजण केले न ग सीता केलें न ग

आता कशाले रडतेस ग || १ || जंगल जंगल
गळ्यातले गठण केले नग सीता केले ग
आता कशाले रडतेस ग || २ || जंगल जंगल
जंगल गं आई जंगल ग जंगलाच्यामध्ये मला दिलंय ग
हातातच्या बांगड्या केल्या न ग सीता केल्या न ग
आता कशाले रडतेस ग || ३ || जंगल जंगल
कानातल्या रींगा केल्या न ग सीता केल्या न ग
आता कशाले रडतेस ग || ४ || जंगल जंगल
नाकातली नथनी केली न ग सीता केली न ग
आता कशाले रडतेस ग || ५ || जंगल जंगल

जंगल या गीतात जंगलचे राजे म्हणविणाऱ्या आदिवासींच्याच लेकीचे दुःख उत्कटतेने चित्रीत केले आहे. ती लेक आईला रडून सांगते की मला जंगलामध्ये का दिले. याचा अर्थ नागरी जीवनाचे सुप्त आकर्षण या वनवासी सीतेला आहे. जंगल शब्दाच्या प्रासात्मक लयीतून जंगलाचा उबग प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. लेकीच्या समजुतीसाठी मग जंगलाच्या या राजाने (नवरा) केलेल्या दागिन्यांची यादी गाण्यात येते. त्यावरून पायातले पैंजण, गळ्यातले गठन, हातातल्या बांगड्या, नाकातली नथनी हे दागिने आदिवासींचे आवडते आहेत. याचा बोध होतो. शिवाय महिला जगताला प्रिय असलेल्या दागिन्यांची हौसही या गाण्यातून भागते. तांबे, पितळ, कथिल या धातूंच्याच दागिन्यांवर आदिवासी महिला बरा आनंद उपभोगतात.

### कुंतीचे गाणे

सांगते देवाला रे कुंती सांगते कृष्णाला
रे कर्ण हा पांडव रे पहीला रे कर्ण हा पांडव पहिला रे || धृ ||
फुल तोडण्यासाठी गेले जल देवीला
सूर्य मंत्राची आठवण मजला
सूर्य मंत्र जपीला रे देवा सूर्य मंत्र जपीला

रे कर्ण हा पांडव रे पहिला ||१||
नव महिने गर्भ जपिला
सूर्य मंत्राची कर्ण हा आला
काळा कर्ण अवतरला रे देवा काळा कर्ण अवतरला
रे कर्ण हा पांडव रे पहिला ||२||
नाही घेतले कधी बाळाला
प्रेमाणी नाही चुंबीले त्याला
केला अर्पण गंगेला रे कर्ण हा पांडव रे पहिला ||३||
नकुल, सहदेव, भीम, अर्जुन
पाचवा तो राजा हा तो धर्म
सहावा माझा कर्ण
रे कर्ण हा पांडव रे पहिला ||४||

रामायणाप्रमाणेच महाभारतही आदिवासींमध्ये पुरते मुरलेले आहे. या कुंतीच्या गाण्यात महाभारतातील उपेक्षित कर्णाची व्यथा तीव्रतेने साकार झालेली आहे. हे गाणे ज्या स्वरात आळवले जाते तो विलक्षण करूण आहे. आपले दुःख कुंती कृष्णाला सांगते ते असे कर्ण पहिला पांडव, सूर्य मंत्राने नऊ महिने गर्भ जपून अवतरला पण प्रेमविणा तो गंगेलाच अर्पण करावा लागला. पांच पांडवात सहावा कर्ण शोभला असता, पण प्रखर तेजापासून हाय रे देवा हा काळा कर्ण अवतरला. ही अत्यंत सूचक कल्पना आहे.

### सासरच्या घरी

सासरच्या घरी ग बाई मी बाबा कुणाला म्हणू
म्हण ग म्हण ग लेकी तुझ्याच ग सासऱ्याला
सासरच्या घरी ग आई मी आई कुणाला म्हणू
म्हण ग म्हण ग लेकी तुझ्याच ग सासूला
सासरच्या घरी ग आई मी भाऊ कुणाला म्हणू
म्हण ग म्हण ग लेकी तुझ्याच ग दिराला

सासरच्या घरी ग आई मी ताई कुणाला म्हणू
म्हण ग म्हण ग लेकी तुझ्याच ग नंदेला.

या गीतात "अर्थोही कन्या परकीय एवं !" ही कण्वाची व्यथा टिपली आहे. माहेरवाशीण जेव्हा सासरी जाते तेव्हा ती व्याकुळ होते. तीला आपले घर आणि नाती गोती आठवतात. या गीतात अत्यंत मौलिक उपदेश सासूरवाशिणीला केला आहे. यापुढे तू मी आई बाबा कुणाला म्हणू ? असा प्रश्न न विचारता सासू सासऱ्यालाच आई बाबा म्हण, असे समजावले आहे. त्याचप्रमाणे दीराला भाऊ म्हण व नणंदेला ताई म्हण. तात्पर्य सासर न मानता तेच आपले माहेर मान हे गीत आजही उद्बोधक आहे.

### हळदीन भरलंय पातळ बायचं

हळदीन भरलंय पातळ बायचं पातळ ग लग्नाचं
दोन दिवसाची आई बायची सासू ग जन्माची
दोन दिवसाचा बाप बायचा सासरा ग जन्माचा
दोन दिवसांची बहीण बायची नणंद ग जन्माची
दोन दिवसाचा भाऊ बायचा दिर ग जन्माचा
लग्नात बायनो उपास धरला उपास ग नवऱ्याचा

लग्नात हळद लागते तेव्हाच माहेर सुटतं म्हणून यापुढे विवाहित स्त्रीने माहेरच्या माणसांना विसरून सासरची माणसे जवळ करावीत, हा बोध या गीतात आहे. आई, बाप, बहीण, भाऊ ही दोन दिवसाची असून आता या आमच्या विवाहितेला सासू सासरा, नणंद, दीर जन्माचे मानावे लागणार आहेत. नवऱ्याचा उल्लेख मात्र मोठ्या खुमासदार रीतीने शेवटच्या ओळीत केला आहे. नवऱ्याच्या प्राप्तीसाठी नवस उपास तापास हिने केले होते आणि म्हणूनच तो योग प्राप्त झाला आहे.

## काजळ्या डोहो माजविला

काजळ्या डोहो माजविला माजविला काजळ्या डोहो माजविला
कुंभार नवरा सजविला सजविला कुंभार नवरा सजविला
कुंभार नवरा नको मला नको मला कुंभार नवरा नको मला
मटकी घडाय लाविल मला लाविल मला मडकी घडाय लाविल मला
काजळ्या डोहो माजविला माजविला काजळ्या डोहो माजविला
भंडारी नवरा सजविला सजविला भंडारी नवरा सजविला
भंडारी नवरा नको मला नको मला भंडारी नवरा नको मला
ताडी ओतायला लाविल मला लाविल मला ताडी ओतायला लाविल मला
काजळ्या डोहो माजविला माजविला काजळ्या डोहो माजविला
मास्तर नवरा सजविला सजविला मास्तर नवरा सजविला
मास्तर नवरा नको मला नको मला मास्तर नवरा नको मला
छडी घायला लाविल मला लाविल मला छडी घायला लाविल मला
काजळ्या डोहो माजविला, माजविला काजळ्या डोहो माजविला

या गीतात गोड काळिमा पसरलेला डोह भरतीला आला आहे. कोळी गीतांची लय पकडून हे गीत रचलेले असावे. यामध्ये मुलीची नवऱ्या बद्दलची आवड निवड व्यक्त झाली आहे. एकेका व्यवसायाला ती नकार देते. कुंभार नवरा मडकी घडवायला लावील म्हणून नको, भंडारी नवरा ताडी आणायला लावील म्हणून नको, मास्तर नवरा नको कारण तो मला छडी घायला लावील, असे करत करत प्रत्येक व्यवसायातील दोष खुबीने दाखविले आहे. याचा आनंद आदिवासी मुली गाणे गातांना लुटतात.

(काजळ्या प्रकारच्या मासोळ्यांनी युक्त असा डोह पालापाचोळा टाकून पाणी रंगवितात. त्या रंगाने मासे आंधळे बनतात आणि मरणोन्मुख होऊन आदिवासींच्या हाती लागतात अशी ही प्रक्रिया आहे.)

## चल पोरी भर पाणी

चल पोरी भर पाणी लवकरी ग ठाण्याला जायाला वेळ झाली....
ठाण्याला गेली पोर ठाणेवाली झाली ठाणेला गेली पोर ठाणेवाली झाली
भुलीन तुझ्या नखऱ्याला मला फसवले गरीबाला
भूलीन तुझ्या नखऱ्याला मला फसवले गरीबाला
चल पोरा भर पाणी लवकरी ग मुंबईला जायाला
वेळ झाली चल पोरी भर पाणि लवकरी ग
मुंबईला जायाला वेळ झाली
मुंबईला गेली पोर मुंबईवालीन झाली
भुलीन तुझ्या नखऱ्याला मला फसवले गरीबाला
भुलीन तुझ्या नखऱ्याला मला फसवले गरीबाला

या गीतात नित्याच्या पाणी भरण्याच्या क्रियेचे नादमय चित्रण धृवपदात आले असून एका प्रियकरांची व्यथा चटकदार पण वर्णिली आहे. चल पोरी तू लवकर पाणी भर कारण आपल्या ठाण्याला जायची वेळ झाली. पण ती ठाण्याला जाऊन ठाण्यावाली आणि मुंबईला जाऊन मुंबईवाली होऊन बसते. आणि तिच्या नखऱ्याला भुलून हा बिचारा गरीब प्रियकर नाहक फसवला गेला.

## दर्याच्या किनाऱ्याला उगवेला चंद्र

दर्याच्या किनाऱ्याला एक किनाऱ्याला उगवेला चंद्र |
सोडा सोडा सीताबाई आता सीताबाई आईचा छंद ||
धरा धरा सीताबाई आता सीताबाई सासूचा छंद |
दर्याच्या किनाऱ्याला एक किनाऱ्याला उगवेला चंद्र ||
सोडा सोडा सीताबाई आता सीताबाई बापाचा छंद |
धरा धरा सीताबाई आता सीताबाई सासऱ्याचा छंद ||
दर्याच्या किनाऱ्याला एक किनाऱ्याला उगवेला चंद्र |
सोडा सोडा सीताबाई आता सीताबाई भावाचा छंद ||

धरा धरा सीताबाई आता सीताबाई दिराचा छंद |
सोडा सोडा सीताबाई आता सीताबाई बहिणीचा छंद ||
धरा धरा सीताबाई आता सीताबाई नंदेचा छंद |
दर्याच्या किनाऱ्याला एक किनाऱ्याला उगवेला चंद्र ||

या गीतातही कोळी गीताची नक्कल आहे. पण काही आदिवासी किनाऱ्यालगत राहतात. सागराच्या किनाऱ्याला एक चंद्र उगवला आहे म्हणजे या गाण्यातल्या खुणा सीता नावाच्या मुलीचे लग्न झाले व तिला नवा प्रकाश लाभला म्हणून हे सीताबाई तू आता आईचा छंद सोड आणि सासूचा छंद धर, भावाचा, बहिणीचा सोडून दीर नणंदेचा छंद धर मुलीला शहाणपण शिकविणाऱ्या या गीतात छंद शब्दाला जोडीचा यमक जुळणारा चंद्र शब्द झाला आहे. अर्थात तो प्रेमाचे प्रतीक आहेच.

### श्रावण बाळ जातो काशीला

श्रावण बाळ जातो काशी ला रे जातो काशीला
मात्यापित्याची कावड खांद्याला रे कावड खांद्याला
मात्यापित्यांना तहान लागली रे तहान लागली
कावड उतरली वृक्षाफांदीला रे वृक्षाफांदीला
श्रावण बाळ गेला पाण्याला रे गेला पाण्याला
झारी बुडवतांना आवाज आला रे आवाज आला
दशरथ राजाने बाण सोडीला रे बाण सोडीला
श्रावण बाळाच्या छातीत घुसीला रे छातीत घुसीला
श्रावण बाळ धरती पडीला रे धरती पडीला
श्रावण बाळ जातो काशीला रे जातो काशीला

हे गीत श्रावणाची करुण कहाणी सांगणारे आहे. आदिवासी थाळगाण लावतांना सुध्दा श्रावणबाळाची कथा समरसून सांगतो. ही कथा खूपच लोकप्रिय दिसते. माता पित्याची कावड खांद्यावर घेवून श्रावणबाळ काशीला जातो.

आईबापांना तहान लागली म्हणून झारीने पाणी आणायला जातो आणि दशरथाच्या बाणाने मृत्युमुखी पडतो. विशेष म्हणजे श्रावणाच्या आई वडीलांचे नाव सुध्दा आदिवासींना माहित आहे. ते 'विठ्ठल रुखमाई' असे नांव सांगतात.

### आज मी नवस घेईन देवाला

आज मी नवस घेईन देवाला की गणपतीला
सोन्याचा टेबल वाहीन देवाला की गणपतीला
आज मी नवस घेईन देवाला की श्रीकृष्णाला
सोन्याची बासरी वाहीन देवाला की श्रीकृष्णाला
आज मी नवस घेईन देवीला की संतोषीला
सोन्याची तलवार वाहीन देवीला की संतोषीला
आज मी नवस घेईन देवीला की लक्ष्मीला
सोन्याचा कमळ वाहीन देवीला की लक्ष्मीला

नवसावर आदिवासींचा विश्वास आहे. तसाच देवावरही हे या गीताने स्पष्ट होते. देव आणि देवाच्या आवडीच्या वस्तू या गीतात आल्या आहेत. गणपतीला सोन्याचा टेबल देऊ, श्रीकृष्णाला बासरी, संतोषी मातेला सोन्याची तलवार, लक्ष्मीला सोन्याचे कमळ वाहण्याचा नवस येथे केला आहे. देव देवता आणि त्यांच्या आवडी आदिवासींना भिणल्याचे येथे नवल वाटते.

### आई तुझा नवस कोणी घेतीला

आई तुझा नवस कोणी घेतीला ग आई तुझा नवस कोणी घेतीला
घेतीला पाची पांडवांनी ग भीमा अर्जुनानी
आई तुझ देऊळ कोणी बांधील ग आई तुझ देऊळ कोणी बांधीलं
बांधीलं पाच पांडवांनी ग भीमा अर्जुनानी
आई तुझा नवस कोणी फेडीला ग आई तुझा नवस कोणी फेडीला
फेडीला पाची पांडवांनी ग भीमा अर्जुनानी

या गीतातील भाव मातृप्रेम नसून देवी किंवा कुंती हा अर्थ आई शब्दातून लागतो. कारण कुंतीची मुलं व पाची पांडव यांचा उल्लेख येतो. भीमाचे आणि अर्जुनाचा पराक्रम या सामर्थ्यावर या आईचे देऊळ बांधून नवस फेडला जाण्याची भावना या गीतात व्यक्त केली आहे.

शेवंतीची फुले

शेवंतीची फुले न गुंफूनिया हार न पाहिला हार कुणाला
पहिला तो हार न माया गणपती देवाला ग........२
शेवंतीची फुले न गुंफूनिया हार न दुसरा हार कुणाला
दुसरा तो हार न माया श्रीकृष्ण देवाला ग .......२
शेवंतीची फुले न गुंफूनिया हार तिसरा हार कुणाला
तिसरा तो हार न माया लक्ष्मी मातेला ग .....२
शेवंतीची फुले न गुंफूनिया हार चौथा हार कुणाला
चौथा तो हार न माया संतोषी मातेला ग ......२
शेवंतीची फुले न गुंफूनिया हार न पाचवा हार कुणाला
पाचवा तो हार माया रेणुका मातेला ग ......२

आदिवासींना उपजतच फुलांची हारांची आवड आहे. त्यांना फुले माळायला आवडते. तसेच देवाला वाहणेही आवडते. या गीतात सुगंधी शेवंतीची फुलं गुंफून किंवा माळून पहिला हार गणपतीला, दूसरा हार कृष्णाला, तिसरा लक्ष्मी मातेला, चवथा हार संतोषी मातेला वाहिला आहे. पाचवा हार रेणुका मातेला वाहिला आहे. नवल म्हणजे ज्ञानेश्वरांनी म्हटलेले ओम नमोजी अशा त्या गणपतीलाच पहिला हार आदिवासीही आपल्या लोकगीतातून अर्पण करतात. याचा अर्थ आदिवासींची हिंदू देव-देवतांना भजण्याची पूर्वापार परंपरा चालत आलेली आहेच.

□□□

# आदिवासी शैक्षणिक विकासाची भारतीय संकल्पना

आदिवासी शैक्षणिक विकासाच्या दिशेने विचार मंथन आणि चिंतन विपुल प्रमाणात झालेले आहे. तथापि प्रत्यक्षात आदिवासी बांधवांचा विकास उदाहरणावरुन वा अपवादात्मक परिस्थितीत झालेला दिसतो. आदिवासींसाठी स्वयंसेवी संस्था आपापल्या परीने प्रयत्नरत आहेत. स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचा ठसा शासनावर उमटवून शासनालाही त्या दिशेने विचार करुन विविध योजना स्वीकारायला लावलेल्या आहेत. शिवाय शासनाच्याही योजना आहेतच, पण अद्यापही आदिवासींचा विकास साधला आहे आणि नव्या औद्योगिक संगणकाच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या संस्कृतीत सहभागी होण्याचे सामर्थ्य किंवा कुवत आदिवासी बांधवात आलेली दिसत नाही.

यासाठी नेमके काय करायला पाहिजे हा प्रश्न भल्याभल्यांना भेडसावतो आहे. पुन्हा पुन्हा विचार करायला लावतो आहे. या भागात वावरणाऱ्याला वेदना होत आहेत. अजूनही आदिवासी मुख्य प्रवाहाला सामोरा जाऊ शकत नाही. खऱ्या अर्थाने समाजात तो का मिसळत नाही. तथाकथित मुख्य प्रवाहात का येत नाही हे प्रश्नच अनुत्तरीत आहेत.

**अनारोग्य, गरिबी, अडाणीपणा :**

या प्रश्नांचा जेव्हा आपण अंतर्मुख होऊन विचार करू लागतो, तेव्हा आपल्याला दिसते की आदिवासी बांधव कुपोषणाला सामोरा जातो आहे. त्याला अपेक्षित आहार अद्यापही मिळत नाही. त्यामुळे आरोग्याची ही समस्या स्त्री, पुरुष आणि बालकांनाही ग्रासून टाकीत आहे. दारिद्र्य हे तर आदिवासींच्या पाचवीलाच पूजलेले आहे. जरा कुठे दिलासा देणारी स्थिती निर्माण होत आहे. थोडी हिरवळ त्यांच्या जीवनात शिक्षणाने येत आहे पण त्यातही हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच. आदिवासी बऱ्यापैकी घरे बांधून राहत आहेत. पण अजूनही ते कर्जबाजारी आहेत. आता सावकारांचे नसतील पण बँकेचे आहेतच. नवीन जमीन खरेदीची ताकद अजून त्यात आलेली नाही. आहे ते सांभाळून आहेत. आदिवासी म्हणून मिळणाऱ्या नोकऱ्या आणि घरदार शेती करणारे थोडे बऱ्यापैकी सुस्थितीत

आहे असे म्हणता येईल.

जी गोष्ट आर्थिक परिस्थितीची तीच त्यांच्या अडाणीपणाचाही आहे. थोडे बहुत शिक्षण घेतलेले आदिवासी आता आढळतात, परंतु फार थोडे पदवीपर्यंत पोहोचलेले आहेत. बाकीचे जेमतेम वर्ग ३ किंवा ४ च्या नोकऱ्यात शासनाच्या खास राखीव जागेच्या मोहिमेत लागून त्यातच समाधान मानतांना दिसतात. हे शिक्षणही फारच थोड्या लोकांनी घेतलेले दिसते. आकडेवारी पाहिल्यास अद्यापही बहुसंख्य आदिवासी बांधव पुरुष स्त्रिया अशिक्षित आणि अडाणीच आहेत. अर्धवट शिक्षण घेतलेल्या या मुलांनी 'पाडा सुधारला' असे म्हणता येत नाही. एका पाड्यावर मोजकेच दोन चार शिकलेले बाकी सगळे अडाणीपणातच गुरफटलेले आढळतात. ही वस्तुस्थिती पाहता गरिबी; अनारोग्य, आणि अडाणीपणा दूर करणे, त्यांना भारतीय संस्कृतीची दिशा दाखविणे म्हणजेच आदिवासींना विकासोन्मुख करणे आहे. त्यासाठी शिक्षण हाच एकमेव दिलासा आणि आधार वाटतो.

भारतीय संकल्पना म्हणजे काय ?

अशा या अविकसित राहिलेल्या भारतीय संकल्पना समजावून घेतांना पहिल्यांदा भारतीय संकल्पना म्हणजे काय हे नीट स्पष्ट केले पाहिजे.

भारतीय संकल्पना म्हणजे ज्या योजनेत संकल्पनेत भारतीयत्व आहे, आपली भारतीय संस्कृतीची मूल्ये, जीवन आणि नैतिक मूल्ये जतन केलेली आहेत. सदाचाराला आणि अध्यात्मिक, जीवनाच्या बैठकीला प्राधान्य दिलेले आहे. संयुक्त कुटुंबपध्दतीला माणसामाणसातील विविध नाते संबंधाला प्राधान्य आहे. माता, पिता, गुरू, वृध्दांबद्दलचा आदरभाव ज्यातून व्यक्त होतो. धार्मिक आचरणाने मानसिक समाधान ज्यातून मिळू शकते ते सारे या भारतीय व्यापक संकल्पनेत साठवलेले आहे.

भारतीय संकल्पना आत्मौपम्यबुध्दी जागविते. त्यांच्या जागी मी आहे. सोऽहम् एका वेगळ्या अर्थाने लक्षात आणून देते. दुसऱ्याचे दुःख ते आपले दुःख

आणि इतरांचे सुख ते आपले सुख असे मानायला भाग पाडते. माणुसकीची जाणीव ठेवायला लावते. आणि माणसामाणसातले संबंध पाळायला टिकवायला भाग पाडते. कधी कधी रक्ताच्या नात्यापेक्षाही प्रत्यक्षात जुळलेले नाते मग ते सहवासाने वा परस्पर सहकार्य, सदभावनेने निर्माण झालेले नाते असले तरी त्याचे मोल अधिक असते हे लक्षात आणून देते.

भारतीय संकल्पनेत केवळ स्वतःचा व्यक्तिगत विकासाचा प्रगतीचा वा उन्नतीचा विचार नाही तर भारतीय संकल्पनेत सगळ्यात महत्त्व दिले जाते ते स्वतःबरोबरच, सभोवतालच्या, इतरांच्या, विकास, प्रगती, आणि उन्नतीच्या प्रक्रियेला. आपण शिकावे आणि इतरांना शिकवावे असे आहे. समर्थांनी म्हटलेच आहे -

जे जे आपणांसी ठावे |
ते ते इतरांशी शिकवावे ||
शहाणे करुन सोडावे |
सकळजन ||
**किंवा**
तुका आकाशाएवढा होऊनही म्हणतो,
"तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता." ||

आपण स्वतः विशाल, उदात्त होऊन केवळ परोपकारासाठी जगायला शिकावे. केवळ उपकार करण्यासाठी उरायचे असते.

स्वतःचे साधले म्हणजे सिध्द पुरुष होतो असे नाही. सिध्द्पुरुष संत ज्ञानेश्वर होते. कारण त्यांनी म्हटले आहे -

'जे जे भेटिजे भूत |
ते ते मानिजे भगवंत |'

भेटणाऱ्या प्रत्येक प्राणिमात्राला - माणसाला परमेश्वर, भगवंत मानून त्याची विकासाची जबाबदारी उचलली पाहिजे. म्हणजेच पूजा बांधली पाहिजे. म्हणूनच

श्रेष्ठ ज्ञानदेव पुढे असेही म्हणतात की सदोदित ज्ञानी, योगी अधिकारी माणसांनी समाजाभिमुख वृत्तीने जगावे. संतांच्या विभूती जगाच्या कल्याणासाठीच असतात म्हणूनच संत ज्ञानदेव म्हणतात -

मार्गाधारे वर्तावे
विश्व मोहरे लावावे |
अलौकिक नोहावे
लोकांप्रती ||

लोकांसाठी आपण अलौकिक असूनही अलौकिक होऊन राहू नये. तेव्हा भारतीय चिंतन आणि संकल्पना या 'सर्वे पि सुखिना सन्तु', 'आनो भद्रो कृतवो यन्तु विश्वतः,' 'सा विद्या विमुक्तये', 'सत्कर्मी रती वाढून', 'भूतो परस्परे जडो, मैत्र जीवाचे', 'जो जे वांछिल| तो ते लाहो, प्राणिजात', 'नहिज्ञानेन सदृश्यं पवित्रमिह विद्यते.' यासारख्या अनेक बोधवाक्यात गुंफलेल्या आहेत.

अध्यात्माच्या विचारकणांमध्ये भारतीय संकल्पना अनुस्यूत आहेत. पुन्हा हे सारे करित असतांना कोणा दीनावर आपण दया करणे, या भावनेने हे करायचे नाही तर निरपेक्ष, निःस्वार्थी निस्पृह भावनेनेतें करावयाला भारतीय संकल्पनेचा आधार भगवतगीता सांगते.

अशा वृत्तीने आणि दिशेने आदिवासींच्या विकासासाठी आपली वाटचाल व्हायला पाहिजे. मनात उदात्तभाव, बंधुभाव असावा, समान पातळीवर मुख्य प्रवाहात भारतीय तत्त्व जपून, आदिवासींच्या विकासासाठीच्या दिशा आपल्याला निश्चित करता येतील. अध्यात्माच्या तत्त्वज्ञानाच्या भक्कम भारतीय बैठकीतून आदिवासींचा विकास निश्चित रुपात प्रयत्नपूर्वक घडवून आणता येईल. ही भारतीय संकल्पनाच आदिवासी विकासाला उपकारक ठरणारी आहे.

**आदिवासी विकासात भारतीय संकल्पनेचे मोल :**

आदिवासींच्या विकासासाठी भारतीय संकल्पनेचे मोल फार महत्त्व आहे. विशेष आहे प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, आदिवासी विकास म्हणजे काही

वेगळा विकासाचा विचार आपल्याला करावा लागत नाही. जसा समाजातील इतर अनेक घटकांच्या विकासाचा आपण विचार करू तसाच तो आदिवासींचाही भारतीय संकल्पनेत केला जातो. मग आदिवासींचा विकास हे काम स्वतंत्रपणे वनवासी कल्याण आश्रम सारख्या स्वयंसेवी संस्थांनी का हाती घेतले. तर त्याचे उत्तर समाजातील मागे राहिलेला अविकसित, दुर्बल असा हा आदिवासी समाज आहे. आई ज्याप्रमाणे अशक्त मुलांवर अधिक लक्ष, संपूर्ण कुटुंब सांभाळून देत असते तशीच ही भूमिका आहे. शाहू महाराजांच्या संदर्भात एक आठवण सांगितली गेली आहे. त्यांना एकाने प्रश्न विचारला, बाकीचे सगळे घोडे एकटे हरभऱ्याचा तोबरा खातात मग त्या एका घोड्याला स्वतंत्र वेगळा तोबरा का. यावर शाहू महाराजांनी उत्तर दिले की, तो अशक्त आहे, दुबळा आहे. इतर घोडे त्याच्या वाट्याला हरभरा येऊ देणार नाहीत म्हणून त्याला इतरांच्या सारखा समान होईपर्यंत वेगळा तोबरा देणार. मात्र तो सशक्त तडफदार झाला की मग त्यालाही सगळ्यांसह हरभरा खाता येईल. अशीच ही स्थिती आहे. आदिवासी अनेक दृष्टीने रंजला गांजला म्हणून अशक्त बनला आहे. त्याला शिक्षण, आरोग्य, नोकरी या सुविधा सवलतींसह पुरवून समान पातळीवर आणले पाहिजे. मग विशेष सवलतींची गरजच राहणार नाही. आज जसे त्यांचे शोषण होते तसे होता कामा नये. असे झाले तर त्याला विशेष सवलतींची गरज राहणार नाही.

भारतीय संकल्पनेत मूळात आदिवासी हा संपूर्ण समाजाचा एक अंगभूत घटकच मानलेला आहे. महात्मा गांधींनीही त्यांच्या 1यंग इंडिया2 मधील एका लेखात आदिवासी हा हिंदूच आहे. त्याला वेगळा मानणारे चूक करतात असे सांगितले आहे. १९२१ पूर्वी जी जनगणना होत होती त्यात आदिवासींची वेगळी नोंद केली जात नव्हती. त्यांचा ब्रिटीश अधिकाऱ्यांनीही हिंदूमध्येच समावेश केलेला होता. या गोष्टी विशेष लक्षणीय व मुद्दाम उल्लेखनीय आहेत. आदिवासींचा म्हणून काही वेगळा विकासाचा विचार भारतीय संकल्पनेत मूळात नाहीच.

### भारतीय संस्कृतीची रुजवात :

आदिवासींमध्ये भारतीयत्व मूळात आहेच. भारतीय संस्कृतीच्या आधाराने आदिवासींच्या विकासाची दिशा ठरविणे महत्त्वाचे आहे. म्हणजे आदिवासी

विकासाच्या नावाखाली अनर्थ होणार नाही. जशा आज इतर काही संघटना - स्वयंसेवी संस्था चळवळीच्या मध्ये आदिवासीला एका प्रकारच्या नवीन वेठबिगारीला सामोरे जावे लागत आहे.

आपण रुद्राचे जर वाचन केले तर त्यात समाजातील सर्वच घटकांच्या विकासाचा उल्लेख केलेला आढळतो. कुसुमाग्रजांच्या प्रेम कोणावरही करावे, या कवितेतील निर्वैर मनोवृत्ती आपल्या भारतीय संस्कृतीत आणि संकल्पनेत आहे. तिथे कुणाचा दुःस्वास नाही. अनसूयावृत्ती आहे. वस्तुतः इतरांचे उल्लेख करण्याचीही आवश्यकता नाही. पण विकासाची भारतीय संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी नाईलाजाने उल्लेख करावे लागतात.

**ख्रिश्चन मिशनऱ्यांचे मूळ उद्दिष्ट :**

प्रगट व अप्रगट स्वरुपात का होईना पण धर्मांतर आहे हे निर्विवाद. कारण आरोग्य शिक्षण या सेवेची परिणती शेवटी धर्मान्तरात होतांना दिसते. किंबहुना अनुभव तर असाही आहे की कायदा, खर्च केलेला पैसा, केलेले उपकार, दाखविलेली दया, यांचे भांडवल करून एक प्रकारचा धाक निर्माण केला जातो. किंबहुना दहशत निर्माण केली जाते. आणि मग धर्मान्तराशिवाय पर्याय उरत नाही. एकदा धर्मान्तर झाले की, पुन्हा इच्छा असूनही या दहशतीच्या वातावरणामुळे पुन्हा हिंदू व्हायला ख्रिश्चन मंडळी मज्जाव करतात. जी गोष्ट ख्रिश्चन मिशनऱ्यांची तीच गत नक्षलवादी आणि साम्यवादी मंडळींची आहे. ते आदिवासींना वेळी अवेळी मदत करून त्यांच्यावर उपकार करून, मैत्री व सतत संपर्क दाखवून त्यांना बांधून घेतात. त्यांच्या उपकाराच्या व खरोखरच रात्री बेरात्री होणाऱ्या मदतीच्या भाराने आदिवासी पूर्णपणे त्यांना बांधला जातो. मग अज्ञान अनारोग्य, दारिद्र्य तसेच राखून त्याचा उलट सामुदायिक वापर करून गैरफायदा घेतला जातो. आणि हे सारे घडते ते मात्र आदिवासींच्या विकासाच्या नावाखाली. मग असे हे नक्षलवादी, साम्यवादी चळवळीचे पाडे बालेकिल्ले बनतात. तेथे शिक्षणाला खऱ्या विकासाची तळमळ बाळगणाऱ्या कार्यकर्त्यालाही मग अनाधिकृत प्रवेशाला बंदी असते. परिवर्तनाला तो भाग विन्मुख होऊन बसतो. चळवळीच्या नेत्यांना हाच अडाणीपणा टिकवून ठेवण्यात रस असतो.

### जेव्हा आदिवासी जागा होतो :

आदिवासी शिकला सुधारला का मग नक्षलवादी आणि साम्यवादी संकल्पनेत



कधीच बांधला जाऊ शकत नाही याच भीतीपोटी आपले नेतृत्व शाबीत रहावे म्हणून आदिवासी विकासाच्या नावाखाली वापर केला गेला आणि अद्यापही केला जात आहे. दहशतवादाने ही भयावह परिस्थिती आदिवासींच्या अडाणीपणातून, या प्रवृत्तीच्या चळवळींना यापुढेही चालूच ठेवावयाची आहे. अन्यथा आदिवासींच्या विकासासाठी काढावयाचे मोर्चे आणि करावयाची आंदोलने यासाठी त्यांनी आदिवासींना वेठीला धरले नसते. त्यांच्याकडून रुपयेही गोळा केले नसते. हा त्यांचा अज्ञानाचा राजकीय नेते मंडळी उठवित असलेला लाभ आहे.

मात्र आदिवासी जेव्हा खऱ्या अर्थाने जागा होतो, त्याला परिस्थितीचे भान, जाण आणि परिस्थितीची समज येते, तेव्हा तो या प्रवृत्तींच्या जवळही फिरकतांना दिसत नाही. आज शिक्षणाला सुसंस्कारांची जोड देऊन झालेल्या आदिवासींच्या विकासाला योग्य दिशा लाभणे महत्त्वाचे आहे आणि ते खरे सामर्थ्य आहे भारतीय संकल्पनेतच.

### आदिवासींचा भारतीय संकल्पनेतून विकास :

भारतीय आदिवासींना भारतीय संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आणायचे म्हणजे भारतीय पध्दतीचे, जीवनमूल्य नैतिक मूल्यांचे शिक्षण द्यायचे. महाविद्यालयीन-विद्यापीठीय शिक्षणासह, तंत्रज्ञानात कुशल बनवावयाचे आहेच पण त्याचबरोबर सुसंस्कारित करावयाचे आहे. भक्कम तत्त्वज्ञानाच्या पायावर त्यांना उभे करावयाचे आहे. हे तत्त्वज्ञान अध्यात्माला आणि धार्मिकतेला महत्त्व देणारे असेल. त्यासाठी आवश्यक तो वेळ आणि प्रशिक्षण विद्यापीठीय अभ्यासक्रम पूर्ण करतांनाच

आदिवासींना दिले पाहिजे. भारतीय संकल्पनेतून आदिवासींचा विकास साधणे म्हणजे सुशिक्षित, सुसंस्कारित आदिवासींनी पुन्हा आपल्या अडी अडचणींची आणि मागासलेल्या समाजाची जाणीव ठेवून त्याच आपल्या बांधवांसाठी कार्य प्रवृत्त होणे होय. आपल्या भागात जाऊन पुन्हा काम करणे, श्रमाची लाज न वाटणे, गरीब आई वडिलांना सांभाळणे, मातीशी काम करून इमान राखणे या गोष्टी त्यांनी करावयाच्या आहेत हे त्याने केले तो खरा विकसित आदिवासी कार्यकर्ता झाला असे समजावे. भारतीय संकल्पनेत केवळ स्वतःचा विकास अभिप्रेत नाही तर आपल्या बरोबरच सर्वांचाही विकास घडविला पाहिजे. असा दृढ विचार आहे. म्हणूनच भारतीय संकल्पनेतून आदिवासींचा विकास सुयोजित व अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकतो.

**भारतीय संकल्पना जतन केल्यानेच विकास :**

मुळामध्ये आदिवासी समाजामध्ये अनेक चांगल्या गोष्टी भारतीय संकल्पनेतल्याच मुरलेल्या आहेत. त्यांना नव्या काळाच्या ओघात जतन करणे हेच महत्त्वाचे आहे. आदिवासी नेहमी सत्य, खरे तेच बोलणारा आहे. सहसा तो कमी बोलतो पण खोटं बोलत नाही. ही प्रवृत्ती आपण टिकवून ठेवली पाहिजे. आदिवासींकडे आपण पाहुणचार घेतला तर आपल्याला मुद्दाम दुधाचा चहा तो देतो, पण स्वतः कोरा चहा पितो. याचा अर्थ केवळ दूध घेण्याची ऐपत नाही असा नाही, तर मूळात आईचेदूध जसे तिच्या मुलासाठी असते, तसे गाईचे दूधही तिच्या वासरासाठीच असते. आदिवासीचे स्वतःचे जरी शोषण होत असले तरी तो इतरांचे करीत नाही. त्याला शोषणच काय, पण गाईम्हशींचे 1दोहन2 सुध्दा मान्य नाही. ही प्राणीमात्रांवर दया करणारी संस्कृती भारतीय संकल्पनेत मोडते. हे आदिवासींचे सारे संस्कार मूळचे आधिकाधिक कसे वाढवता येतील हा त्यांना नव्या मुख्य प्रवाहात आणतांनाचा मोठा प्रश्न आहे.

आदिवासी भागात चोरीचे प्रमाण जवळ जवळ नाहीच, आदिवासी कधी चोरी करीतनाहीत. कोणाच्या वस्तूला हात लावत नाही, आदिवासी कधी भीक मागतांना दिसत नाही. म्हणजे स्वाभिमानी वृत्तीने न बोलता दिवसभर उपाशी राहणे तो पत्करतो. पण कोणापुढे हात पसरत नाही, ही गोष्ट शिकण्यासारखी व

शहरी सुशिक्षितालाही न झेपणारी आहे.

## आदिवासींचे स्त्री-दाक्षिण्य :

आदिवासी स्त्रिया कधी वेश्या म्हणून वावरतांना दिसत नाहीत. जवळ जवळ हा शरीर विक्रीचा व्यवसाय त्यांना वर्ज्यच आहे ही चालत आलेली परंपरा टिकली पाहिजे. आदिवासी भागात कधी आदिवासींमध्ये बलात्कार झाल्याचे ऐकिवात नाही. एक आदिवासी दुसऱ्या आदिवासींवर बलात्कार करूच शकत नाही, अशी त्यांची समाज व्यवस्था रुढ झालेली आहे. लग्न करायला पैसे नसले तर ते काही काळ तसेच सहवासात राहून सवडीने लग्न - तत्पूर्वी झालेल्या मुलांच्या साक्षीने करतात. आदिवासीत बाहेरख्यालीपणा किंवा विवाहबाह्य संबंध आढळत नाहीत. व्यभिचार नसल्याचे कारण म्हणजे पटत नसेल तर समाज पंचायतीकडून काडीमोड घ्यायची आणि दुसरा घरोबा त्या स्त्रिला करायची मुभा आहे. दुसरा घरोबा करतांनाही कमालीचे स्त्रीदाक्षिण्य व महोदात्त दृष्टिकोन आढळतो. समजात पुनर्विवाह करणारी स्त्री पहिल्या पतीपासून गरोदर असेल तर त्या भावी अपत्यासह त्या स्त्रीचे उत्तरदायीत्व स्वीकारले जाते. हे सारे राखता आले पाहिजे. आदिवासींच्या विकासाची भारतीय संकल्पना यापेक्षा वेगळी नाही. त्यात त्यांच्या उपरिनिर्दिष्ट चांगल्या गोष्टी जपणे अभिप्रेत आहे. हे सारे मूळात जे चांगले गुण आहेत ते सांभाळून जतन करून वाढीला लावूनच आदिवासींचा विकास खऱ्या अर्थाने साधता येईल.

## आदिवासी विकासाचा अंतीम टप्पा :

आदिवासी विकास होतो आहे किंवा झाला आहे असे केव्हा म्हणतायेईल, तर आदिवासींनी परंपरेने पूर्वापार चालत आलेल्या चांगल्या प्रथा टिकविल्या, वाढविल्या तरच. सुशिक्षणाबरोबर भारतीय सुसंस्कार घ्यावेत. जीवनाला अध्यात्माचे, धर्माचे अधिष्ठान प्राप्त करुन द्यावे. सदाचाराचा मूलमंत्र जपावा आणि आत्मोन्नतीनंतर का होईना समाजोन्नतीसाठी तत्पर व्हावे. मुख्य प्रवाहात जरुर यावे, पण जुन्या नव्यांचा सांधा योग्य जुळवूनच.

आदिवासींजवळ भारतीय संकल्पनेतील ज्या गोष्टी अगोदरच चालत आलेल्या

आहेत, त्यांची गरज आज संपूर्ण समाजालाच भासत आहे. चारित्र्यवान, सुसंस्कारित, सुशिक्षित, परोपकारी पिढी घडविणे म्हणजे आदिवासींचा खरा विकास आहे. केवळ आर्थिक वा भौतिकदृष्ट्या विकास करणे, उद्योजकता वाढविणे येथे पुरेसे ठरणार नाही. अन्यथा अमेरिकेतील दोन विद्यार्थ्यांनी २५ विद्यार्थी व शिक्षक ठार केले याचे जगात यापुढील काळात आश्चर्यच वाटणार नाही. अशी गुन्हेगारीची प्रवृत्ती दृश्य माध्यमांनी निर्माण करून ठेवली आहे. सुदैवाने आदिवासींना अद्याप याचा वाराही लागलेला नाही.

**भारतीय संकल्पनेतील वनवासी विकासासाठी दिशा :**

वनवासींच्या भावी काळातील विकासाची दिशा निश्चित करतांना पुढील उपक्रम आणि प्रकल्प परिश्रमपूर्वक राबविल्यास त्यांच्या हिताचे ठरणार आहे. त्यादृष्टीने काही प्रकल्प व उपक्रम सुचविता येतील.

वनवासी जीवनाच्या समृध्दीचे प्रतीक वनवासी कला आणि साहित्य निर्विवाद आहेत. वनवासींच्या दमदार आणि कसदार कला, साहित्य आणि संस्कृतीने वनवासींना आपली तहानभूक विसरून बेहोशीयुक्त, धुंद, आणि आनंदी जीवन जगायला शिकविले आहे. वनवासी लोकसाहित्य आणि विविध कलांमध्ये त्यांच्या भावना, संस्कृती आणि विचारही ग्रथित झालेले आहेत. त्यासाठी नवोदित आणि नवशिक्षित आदिवासी साहित्यिकांना उत्तेजन देणारे व्यासपीठ निर्माण केले पाहिजे. वनवासी लेखक मेळावे जिल्हावार भरवावेत. त्यात ठाणे, नाशिक, धुळे, अमरावती, नगर, नागपूर, भँडारा, गडचिरोली, चंद्रपूर, नांदेड या जिल्ह्यांचा म्हणजे वनवासीपट्ट्याचा समावेश असावा. लेखक लिहू लागले की त्यांची संस्कृती व्यक्त होईल. आवश्यकता भासल्यास वनवासी लेखकांसाठी खास लेखनशिबिरे आयोजित करण्यात येतील. त्याचप्रमाणे त्यांच्या लेखनाची प्रकाशने खास तरतूद करुन करण्यात यावीत. साहित्य प्रकाशनाबरोबरच वाङमयीन-सांस्कृतिक विचारांना संधी देणारे नियतकालिक नियमित प्रकाशित केले पाहिजे.

वनवासी लोकसाहित्याचे आमूलाग्र संशोधन होणे गरजेचे आहे. त्यासाठी संशोधकांकडून क्षेत्राय अभ्यास (फिल्डवर्क) केले पाहिजेत. वनवासी जातींचा

आणि त्यांच्या विविध बोलींचा अभ्यास भाषा आणि संस्कृतीच्या अंगाने अभिप्रेत आहे.


निर्मिती, दैनंदिन आचार, जीवनमान, राहणीमान आणि परंपरा इत्यादींच्या अनुषंगाने हा अभ्यास होऊ शकेल. त्यामुळे संस्कृतीचा उलगडा होईल. त्यांतील भारतीयत्वाच्या संकल्पना स्पष्ट होतील. त्यादृष्टीने या वनवासींना अवगत असलेली लोकविद्या खचितच उद्बोधक आहे. वनवासींची चित्रकला विशेष बोलकी आणि जिवंत आहे. वनवासींचे कलादालन समृध्द आहे. ते स्वतंत्र लोकमंच निर्माण करू शकतील. विविध ललित कला- उदा. संगीत, चित्र, शिल्प, नृत्य, इत्यादींमधून वनवासी भारतीय संकल्पना विविध रुपात साकार करीत आहेत. त्या जाणून घेण्याची आवश्यकता आहे. नुसते वनवासींचे थाळगान अभ्यासले तरी त्यात विविध पौराणिक कथा कौशल्याने या समाजाने गुंफलेल्या आढळतात तारपा नृत्यातील तारपा इतर वेळी ते देव्हाऱ्यात ठेवून त्याची पूजा बांधतात. बोहाडा हा विविध देवदेवतांची नृत्ये सादर करतो, पण त्याबरोबरच मानीत असलेली विविध सोंगेही तो प्राचीन परंपरेने चालत आलेली वठवितो. वनवासी काज म्हणजे जणू सामुदायिक श्राध्दविधी करतात त्यात कुटुंबाच्या पुनर्वसनाची कल्पना अनुस्यूत आहे.

वनवासींच्या ठायी असलेली प्रतिभा, प्रज्ञा आणि प्रसंगी विज्ञाननिष्ठा त्यात निसर्गप्रेम, पर्यावरण-रक्षणाचे भान समाविष्ट आहे हे सारे यातून स्पष्ट होते. वनवासींची हजारो वर्षांची सांस्कृतिक मूल्य परंपरा या कला -संस्कृती अभ्यासातून जतन केलेली दिसून येईल.

वनवासी हीच संज्ञा सर्वार्थाने योग्य आहे. कारण 'ॲब ओरिजनल' या इंग्रजी कल्पनेतल्या शब्दाचे आपल्याकडे आदिवासी हे भाषांतर केले, हा अनुचित 'आदिवासी' शब्द कालवाचक आहे. त्यातून जमात सूचित होत नाही. या शब्दाला चिकटलेले मागासलेपण आणि त्याच्या वापरातून अकारण दुजाभाव वाढविण्यापेक्षा वनवासी संबोधणे श्रेयस्कर आहे. त्यामध्ये भारतीय संस्कृतीतले सामावलेपण आहे.

**प्रादेशिक भाषामाध्यम खुले असावे :**

वनवासींच्या विकासासाठी त्या त्या प्रदेशातील भाषा प्रांतिक भाषामाध्यम सर्वत्र खुले असावे. म्हणजे उच्च शिक्षणाची आणि माहिती व तंत्रज्ञानाची कवाडे वनवासींच्या विकासासाठी खुली होतील आज इंग्रजीचा अट्टाहासाने होत असलेला अनाठायी वापर वनवासींच्या विकासात फार मोठा अडसर झालेला आहे. तळागाळातील माणसांच्या विकासात माध्यमभाषा आड येता उपयोगाची नाही. वनवासींच्या प्रवेशाच्या राखीव जागा स्पष्टपणे नमूद केलेल्या नसतात. त्या जाहीर करून वेळोवेळी अद्यावत केल्या पाहिजेत. वनवासींमध्येही अतिमागास कातकरी, ढोरकोळी सारख्या जमातींकडे विशेष लक्ष पुरविण्याची गरज आहे. त्याप्रमाणे पूर्वप्रभावाने वनवासींच्या नोकरी सेवा-योजनेतील ज्येष्ठता, नव्याने वाढविलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार दिली जावी. आजच्या व्यवस्थेत तशी सोय नाही. शिवाय नोकरी, सेवा योजनेतील जिल्हा मर्यादा त्यासाठी ठेवू नये. म्हणजे आदिवासी राज्य व देश पातळीवर पुढे येऊ शकेल.



(महाराष्ट्रातील आदिवासी महिला खेळाडू मलखम्भ प्रदर्शन करतांना)

**वनवासी क्रीडा क्षेत्रातही आघाडीवर :**

निसर्गाशी सुसंवाद जन्मतःच साधून उन, पाऊस, वारा, थंडी पचविण्याचे सामर्थ्य वनवासींमध्ये उपजत आहे. त्याचा योग्य मार्गदर्शनाने, सरावाने विकास करता येईल. पारंपारिक मल्लखांब विद्या, मॅरेथॉन शर्यती, व्यक्तिगत खेळ (ॲथलेटिक्स) यात वनवासी निश्चितच पुढे जाईल. क्रीडा कसोटीवर उतरलेल्या

वनवासी क्रीडापटूला वैद्यकीय सेवा आणि खुराक समतोल आहार उपलब्ध करुन दिला जावा. क्रीडा क्षेत्रातील वनवासी विकासाचा हा मार्ग आहे. निदान पहिल्या पिढीचे सुशिक्षण होण्यासाठी याची नितांत गरज आहे. हे सारे अपेक्षेप्रमाणे घडवून आणले तर वनवासींच्या विकासाची भारतीय संकल्पना यापेक्षा वेगळी नाही हे आपल्याला उलगडेल.

❑❑❑

# आदिवासी विद्यार्थी जीवन

आदिवासी हे सुधारलेल्या व सुखसोयींनीयुक्त अशा जगापासून शेकडो मैल दूर राहतात. आदिवासींमध्ये लिखित वाडमयाची परंपरा नाही. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीवनात आर्थिक, सामाजिक, मानसिक कुचंबणाच आहे. म्हणूनच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे व त्यांना अधिक मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे.

आदिवासी जीवनात शिक्षणाच्या मागासलेपणाची पाळेमुळे आपल्याला खोलवर रुजलेली दिसतात. जगणे आणि शिकणे याचा संबंध काय असतो हेच या आदिवासीला उलगडले नाही. जसे आपण जगलो तशी आपली मुलेही शिक्षण न घेताच जगू शकतील अशी त्याची समजूत आहे. मोल मजुरी करून हातावर मिळवायचे आणि पानावर खायचे. त्यामुळे स्वातंत्र्य मिळून बराच कालावधी उलटला तरीही ह्या दरिद्री माणसाची लंगोटी अद्याप कायम आहे. मुलाला शिकविण्यापेक्षा त्याला कामाला जुंपून त्याचे लग्न करुन देणे म्हणजे आपली जबाबदारी संपली असे ते मानतात. परंपरेने चालत आलेली दारु पिण्याची सवय, आपल्या मुलांना लावण्यात त्यांना आपण काही गैर करतो, असेही वाटत नाही. याचा अर्थ आदिवासी कुटंबातील विद्यार्थ्यांना स्वतःचे नशीब स्वतःच काढावे लागते. पालकांकडून शिक्षणाची प्रेरणा सध्यातरी मिळण्याजोगी परिस्थिती नाही. उलट त्यांच्या काही अंधश्रध्देमुळे "भगत वाक्य प्रमाणे" याचा अनुभव येतो व शिक्षणात अडसर निर्माण होतो. आदिवासी मुलगा शिकू लागला तर त्याच्या पालकाला ते भारभूत वाटते. कारण शेती कामात, घर कामात, कमाईत त्याची मदत घेता येत नाही. निसर्गाच्या सानिध्यात वाढल्यामुळे आदिवासी मुले लहानपणापासूनच स्वच्छंदी साहसी व भटकी बनतात त्यांना शिक्षण ही एक निरर्थक व कंटाळवाणी बाब वाटू लागते.

**भौगोलिक व सांस्कृतिक अंतर :**

आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीवनात केवळ भौगोलिक नाही तर सांस्कृतिक अंतरही आहे. नदीच्या प्रवाहातील स्वतंत्र बेटांप्रमाणे हे आदिवासी विद्यार्थ्यांचे

जीवन मुख्य प्रवाहापासून अलग पडलेले आहे. आदिवासीं सुधारलेल्या जगापासून शेकडो मैल दूर दुर्गम डोंगराळ भागात राहतात. त्यामुळे त्यांचा एक समूह बनतो. आणि ते विशिष्ट एक बोली वापरीत असतात. आदिवासींमध्ये लिखित वाडमयाची परंपरा नाही. त्यांच्या बोलीतील दुराव्याचे तेही एक कारण सांगता येईल. आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीवनात आर्थिक, सामाजिक, मानसिक व सांस्कृतिक कुचंबणाच आहे असे दिसते.

## निसर्गपुत्राचे जीवनमान सुधारले आहे :

सेवाभावी संस्थांच्या व शासनाच्या मदतीमुळे त्यांना आता शिक्षण शक्य होत आहे. काही प्रमाणात त्यांचा आहार, राहणीमान, आरोग्य सुधारते आहे. आदिवासींमधील शिकण्यासाठी धडपडणारी मुले आपल्याला दिसू लागलेली आहेत.

"मडक्यात / कणगीत दाणा तर भिल्ल उताणा" ही म्हण असे सुचविते, की या समाजाला थोडेसे जरी खायला असले तरी पुरे झाले. आजचे भागले की झाले उद्याची चिंता नाही. आदिवासींच्या गरजा कमालीच्या मर्यादित असतात याचा प्रत्यय "ते फडका घे, सुडका घे सूट". या म्हणीतून येतो. एक फडके असले की त्याचे जीवन सुरू होते. भामरागडचा निसर्गपुत्र माडिया या अनुसूचित जमातीबद्दल डॉ. श्रीकांत जिचकार यांनी नमूद केले आहे की माडिया लोकांनी अद्याप वीज पाहिलेली नाही. एसटीची बस पाहिलेलीही नाही. केळे सोलून खाणे त्यांना माहित नाही. पालाची वस्त्रे ते परिधान करतात. थोड्या फार फरकाने अशीच परिस्थिती महाराष्ट्रातील इतर आदिवासींची आढळते.

## सुखसोयींमधील असमानता :

तात्पर्य त्यांचे नित्याचे जीवन आणि त्यांना द्यावयाचे शिक्षण यांच्यात कोठेही सुसंवाद आढळत नाहीत. त्यामुळेच आदिवासी विद्यार्थी शिक्षणाचा कंटाळा करतो. नागरी किंवा शहरी विद्यार्थी व आदिवासी विद्यार्थी यांना एकाच मापाने मोजणे हा आदिवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत घडणारा अन्याय आहे. ते असमान परिस्थितीत असतात. सुविधा असमान असतात. तरीही त्यांना एकाच मापाने

कसे मोजले जाते. हा खरा प्रश्न आहे. शहरी नागरी जीवन कोठे आणि ग्रामीण आदिवासी जीवन कोठे ? यात महद्‌तर आहे. स्थळकाळ परिस्थितीचा संदर्भ सोडून आपल्याला विचार करता येणार नाही.

भारतात सहा कोटी आदिवासी आहेत. त्यातील महाराष्ट्रात सत्तावन्न लाख आहेत. तेव्हा एवढ्या मोठ्या संख्येने असलेल्या आदिवासींपर्यंत आपण जाऊन पोहचणार कधी असा प्रश्न मनात येतो. आदिवासींमध्ये आपण केवळ आदिवासी विद्यार्थी शब्द वापरत असलो तरी त्यात विविध उपजाती आहेत. नुसत्या ठाणे जिल्ह्याचा विचार केला तरी त्यात त्यांची संख्या आठ आढळते. महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी, कोकणा, वारली, ठाकूर, धोडी, कातकरी त्यातही, पुन्हा क ठाकूर, म. ठाकूर दुबळा असे उपप्रकार आहेत. महादेव कोळी, कोकणा या जाती अग्रेसर असून, कातकरी सारखा समाज पूर्णतः मागे राहिलेला आहे. तशात पारधी, भिल्ल गोंड, माडिया या जमाती अद्यापही शिक्षण संस्कारापासून दूर आहेत. पारधी एकलव्य यासारखी विरळ नियतकालिके सुचिन्ह मानायला हरकत नाही. बहुसंख्य आदिवासी विद्यार्थी थोड्याफार फरकाने भरडले जात आहेत. त्यांच्या उत्पन्नापेक्षा खर्च अधिक आहे. कमवणाऱ्यापेक्षा खाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. आदिवासींचे कुटुंब विस्कळीत व मोठे असते. मागच्या पिढीत प्रौढ शिक्षण फार तर प्राथमिक शिक्षणापर्यंतच ही कुटुंम्बे पोहचलेली आहेत.

आदिवासी जीवनात शेती महत्त्वाची. त्यातही जाळल्या शिवाय ती पिकत नाही. असा सीता माईचा शाप आहे. आणि नांगरायची प्रथा नाही. कारण भूमातेच्या हृदयाला जखमा होतात अशी त्यांची समजूत आहे. शेतीमुळेच आदिवासी पाड्यात गुरफटून बसला आहे. त्यामुळे धड ना शिक्षण मिळते. पण या आशेत गुरफटून तो राहतो. शेती कदाचित सोडली तर बुडेल म्हणून तेथे राहून त्याने स्वतःला दारूत बुडविले आहे. मुलांची शेती काम, मजुरी, पोरवाडा सांभाळणे, गुरे राखणे ही नित्याची कामे होऊन बसली आहेत. शाळा दाराशी आली तरी पोर गुराशी, अशा परिस्थितीमुळे हेच टिकेल असे दिसते. याच परिस्थितीचा परिपाक म्हणजे थोडं फार शिकलेल्यांना, लगेच नोकरीत अडकून पडावे लागते. समाजाच्या स्वतःच्या, अन्य आप्तांच्या शिक्षणासाठी काही करण्याचे

सुध्दा त्याला शक्य होत नाही. उच्च शिक्षणाची कळ सोसून करायचे ठरविले, तरी या विद्यार्थ्यांना घरून साथ मिळत नाही. शालांत परीक्षा उत्तीर्ण झाले की गंगेत घोडे न्हाले. डोक्यावरुन पाणी फिरले असे अल्पसमाधानी हे आहेत. शिक्षणाने दारिद्र्याचे चटके बसत नाही हे त्यांच्या अद्याप लक्षात आलेले नाही. आहे त्यात समाधान मानून ते स्वतःच्या आनंदात दंग असतात. वसतिगृह, आश्रमशाळा यातही त्यांना अधिक अनुकूल परिस्थिती व मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे, असे हे आदिवासींचे जगणे आणि त्यातच शिकणे चालू आहे. म्हणून शिकण्यातील अडचणींचा विचार आता केला पाहिजे.

❑❑❑

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या लक्षवेधी समस्या

वनवासींना जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनातर्फे विविध स्तरांवर प्रयत्न होत आहेत. त्यात प्रामुख्याने भर आहे तो शिक्षण आणि त्या अनुषंगाने विविध तरतुदी करण्याचा. व्यावसायिक वा अन्य अभ्यासक्रमांचे शिक्षण वनवासींना सहजरित्या उपलब्ध व्हावे व त्याबरोबरच वनवासींच्या निवासाच्या व इतर सोयीही करणे फार महत्त्वाचे आहे. पण त्याबाबत परिस्थिती फारशी आशादायक नाही.

औरंगाबाद, मुंबई, पुणे, कोल्हापूर नागपूरसारख्या मोठ्या वस्तींच्या नागरी भागांमध्ये प्रवेशासाठी वनवासी विद्यार्थ्याला किमान एक पंधरवडा/ महिना तरी रहावे लागते. माहिती मिळविणे, माहिती पुस्तिका मिळविणे. त्यातील नियम समजावून घेणे (कारण ते ही अवघड इंग्रजीतच छापलेले असतात.) इत्यादी बाबी नंतर फॉर्मची पूर्तता करणे, त्याला उत्पन्नाचा पुन्हा ज्या तहसीलमध्ये पाडा येतो तेथील तहसिलदार, मामलेदाराचाच दाखला आणावा लागतो. जातीचा दाखला आणावा लागतो. त्याची पडताळणी व्हावी लागते. पुन्हा उच्च शिक्षण क्षेत्रातील मुलाखती दमदारपणे चालतात. ग्रुप डिसकशन, लेखी परीक्षा यांच्यात कालावधी मोडतो. वसतिगृहातून तांत्रिक शिक्षण घेणाऱ्यांना प्राधान्य आहे असे सांगितले जाते. नियम म्हणून ठीक असेल, पण आलेल्या वनवासी विद्यार्थ्याला परतवून लावण्यासाठी अनेक बहाणे पुढे येतात. वनवासींच्या जागा ४० अर्ज १४० आले असे सांगितले जाते. प्रत्यक्षात वसतिगृह सुरू झाल्यावर कळते की वनवासी जागा रिकाम्या राहिल्या. मुले उपलब्ध झाली नाही. मग अन्य मागासवर्गीयांना संधी देऊन भरल्या. स्पर्धा फार तर महादेव कोळी, कोकणा या दोन पुढारलेल्या जातीत असतील पण अन्य वनवासींमधील मागासवर्गीय असलेल्या अतिमागासलेल्या जातीचे काय? कातकरी, ढोर कोळी, मल्हार कोळी, म. ठाकूर, वारली इत्यादी, यांचे तर अनेकदा एकेकही अर्ज महाविद्यालय वसतिगृह प्रवेशासाठी आलेले आढळत नाही. अशा अगोदर वनात भटकणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरात आल्यावर वसतिगृह प्रवेशासाठीही भटकावेच लागते, हे दुर्दैव दूर करणे गरजेचे आहे. त्यासाठी महाविद्यालय प्रवेश पूर्व कालावधीच्या किमान एक महिन्याची

आर्थिक जबाबदारी शासनाने उचलली पाहिजे. कारण महाविद्यालयात प्रवेश झाला की, मग यथावकाश वसतिगृह प्रवेश निश्चित होतो.

**मराठी माध्यमांची गरज :**

आज या ग्रामीण वनवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना सर्व उच्च शिक्षणाची माहिती इंग्रजीतून पत्रव्यवहारांवरुनच पुरविली जाते. त्याचे सुलभ मराठीकरण, एका अर्थाने तळागाळातल्या विद्यार्थ्यांना थेट मुद्याकडे घेऊन जाईल. महाविद्यालये शोधावी तर तिथेही मराठी माध्यम अध्यापनास नाही, अशी स्थिती आढळते. कला आणि वाणिज्य क्षेत्रातील नित्याच्या महाविद्यालयांनासुध्दा मुंबईसारख्या ठिकाणी, मराठी माध्यमांची व्यवस्था ११वी, १२ वी वर्गासाठी शोधून सापडत नाहीत. त्यामुळे वनवासी विद्यार्थ्यांना शहरात येऊन आरंभीचे शिक्षण मिळणे, दुरापास्त होते. म्हणून मराठीतून अध्यापन व्यवस्था हवी.


जाहिरातीमधून महाविद्यालयात विद्यापीठात विशिष्ट अभ्यासक्रमासाठी पदविका पदवीसाठी वनवासी विद्यार्थ्यांसाठी, जागा राखून ठेवलेल्या असूनही त्या जाहीर केल्या जात नाहीत. फक्त संबंधित महाविद्यालयांना आणि अभ्यासक्रम राबविणाऱ्यांना फार तर विद्यापीठाची परिपत्रके गेलेली असतात. वनवासींच्या राखीव जागा, स्पष्टपणे सर्वांना कळाव्या. यासाठी जाहिरातीतही समाविष्ट करणे आवश्यक आहे. तशी बंधने महाविद्यालयांवर घालण्यात यावीत. रिक्त जागा राहत असल्यास, तसा अहवाल प्रतिवर्षी विद्यापीठ वनवासी संचालनालयात सकारण सादर केला पाहिजे.

**नोकरीतील अडचणी :**

महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या वनवासी विद्यार्थ्यांनी दहावी बारावी गावाकडे करतांनाच आपली नावे सेवायोजनेत नोकरीसाठी नोंदविलेली असतात. समाजकल्याण वा पंचायत समितीतही नावे नोंदविलेली असतात. उच्च शिक्षणाचा आयुष्यात योग जुळून आल्याने पुढे नोकरी शोधायची तर नोकरी सेवायोजनकेंद्र संबंधित जिल्ह्याचेच असले पाहिजे, असा दंडक आहे. तिथेही वनवासी विद्यार्थ्यांची गैरसोय होते. नाव नोंदणी मागील दिनांकाच्या वर्षाच्या प्रभावासह

त्यांना जेथे नोकरी करू इच्छितात, तेथील कार्यालयात बदलून मिळण्याबाबतची तशी सुविधा असावी.

व्यक्तिगत पातळीवरील खेळ ॲथलेटीक्स उदा., मॅरेथॉन, रनिंग, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक अशा खेळांमध्ये त्यांना विशेष गती जन्मजात असते कारण निसर्गाशी सुसंवाद साधून उन, वारा, पाऊस, थंडी पचविण्याची सवय त्यांना असते. फक्त या काटक विद्यार्थ्यांना व्यवस्थित मार्गदर्शन मिळावे. त्यासाठी खास कोच नेमून कार्यशाळा, शिबिरे, क्रीडा सामने भरवायला हवेत. जे क्रीडा क्षेत्राचे तेच, सांस्कृतिक क्षेत्रातही आढळते. न दमता रात्रभर नाच करण्याची क्षमता वनवासी विद्यार्थ्यांमध्ये आहे. रात्रभर तारपा तोच फुंकू शकतो, थाळगान कथा लावू शकतो आणि बोहाड्यातील सोंग नाचविणे, ढोल नाच करणे, त्याच्या नित्याच्या सवयीचे आहे. जाणकारांकडून कलेचे मार्गदर्शन मिळण्याची व्यवस्था केल्यास विविध ललित कलांमध्ये वनवासी विद्यार्थी खचित महाविद्यालयात वरच्या क्रमांकाने चमक दाखवू शकतो. उदा. चित्रकला, अभिनय, गाणे, भजन याची त्याला मुळात आवड आहे. त्यागुणांचे संगोपन प्रशिक्षण महाविद्यालयातून करण्याची व्यवस्था व्हावी. मूर्तीकलेचीही उपजत आवड असलेले विद्यार्थी, मूर्ती कला सोडून पोलिसमध्ये भरती होतात कारण मूर्ती कलेचे शिक्षण कुठे उपलब्ध होईल, हे त्या पाड्यामध्ये त्याला कळण्याची व्यवस्था नाही. तेव्हा कला क्रीडा क्षेत्रात लक्ष घालावे.



(महाराष्ट्रातील आदिवासी पुरुष खेळाडू मलखम्भ प्रदर्शन करतांना)

एखादा वनवासी विद्यार्थी लांबच्या गावाहून आलेला मुंबईसारख्या परक्या ठिकाणी आजारी पडला, तर त्याला वसतिगृहामार्फत अधिकृत डॉक्टरकडून

तपासण्याची व्यवस्था असायला हवी. आजतरी आजारी मुलाला त्याची त्यालाच नवख्या ठिकाणी व्यवस्था करावी लागते किंवा मुंबईत येऊन राहिलेल्या आधीच्या सिनिअर मुलांच्या मदतीने स्वखर्चाने तो उपचार घेतो. वस्तुतः, वसतिगृह अधीक्षकाने त्यात लक्ष घालून शासकीय वसतिगृहाच्या अधिकृत विश्वासार्ह डॉक्टर नेमून मुलांची आरोग्य तपासणी व देखभाल केली पाहिजे. आणि त्यांच्या खर्चाची खास बाब म्हणून विद्यावेतन अनुदानात तरतूद असली पाहिजे. निवासी पब्लिक स्कूलप्रमाणे मुलांची सध्या विद्यावेतन रुपये १५० दरमहा आहे. मुलींना फार तर ५० एक रुपये जास्त असेल. पण आजच्या दिवसात या वेतनात काहीही भागू शकत नाही. कारण या वेतनातूनच बस वाहतूक खर्च, साबण, तेल, शैक्षणिक खर्च, लोकल ट्रेन पास इत्यादी खर्च करावा लागतो. कपडालत्ता पुरविण्याची काहीच सोय नाही. तोही खर्च यातूनच करावा लागतो. घरून काही शिक्षण घेतांना पैसे मिळत नाही.कारण ही खेड्यापाड्यातील पहिलीच पिढी शिक्षण घेत आहे. वनवासी विद्यार्थी कृती समितीने मासिक विद्यावेतनात वाढ व्हावी यासाठी गेल्या २-३ वर्षांपासून मागणी केली आहे. ती पूर्तता व्हावी व निदान ३०० रुपये दरमहा मिळावे. या मागणीच्या पूर्ततेचे आश्वासन मिळाले पण पुढे ? जाती निहाय किती टक्के शासनाच्या नियमानुसार भरावयाचे आहेत, त्याबद्दल २ वर्षे वसतिगृहात राहूनही विद्यार्थ्याला निवड पध्दती व जातीची वर्गवारी टक्केवारी कुठेही जाहीर करत नसल्याने माहिती नाही. ही पध्दती विश्वासार्ह पध्दती असावी. त्यासाठी शासनाचा जातीनिहाय टक्केवारीचा 1जी. आर.2 फलकावरच लावला जावा. वसतिगृहात पुस्तकांचे अर्धवट सेट मुलांमध्ये विभागून दिले जातात. त्यामुळे अभ्यास पुस्तके नसतांना कसा करावयाचा ? नुसत्या नोट्सवरच भागवावे लागते. तेव्हा याही परिस्थितीत सुधारणा झाली पाहिजे. निदान बाजारात उपलब्ध असलेली किमान सर्व क्रमिक पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याला मिळालीच पाहिज. तशी सुविधा शासनमान्य असूनही प्रत्यक्षात मिळत नाही.

कॉलेज वसतिगृहात आज स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन वा त्यांची माहिती उपलब्ध नाही. ही माहिती देणारे उद्बोधन वर्ग व या प्रशिक्षणाची असलेली व्यवस्था त्यात वनवासींसाठी असलेल्या राखीव जागा वेळच्यावेळी विद्यार्थ्यांना समजल्या पाहिजेत. सध्या ती व्यवस्थाच नाही. ती करावी. एकूणच स्पर्धा परीक्षेबाबत

महाराष्ट्रीयन मुलांमध्येही भरपूर उदासीनता दिसते. या परीक्षांमध्ये महाराष्ट्रीय मुले मागे असल्याबद्दल खंतही व्यक्त होते. पण प्रत्यक्षात शहरी काय किंवा वनवासी मुलांसाठी प्रशिक्षण सोयी फारशा उपलब्ध नाहीतच.

वनवासी मुलांना असलेली शिष्यवृत्ती वेळेवर मिळण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती विद्यार्थ्यांना मिळण्याची व्यवस्था व्हावी. आगावू रक्कम अकौंटिंगच्या त्रासांकरिता काही प्राचार्य घेतच नाहीत, ती घेऊन लगेच वितरित केली पाहिजे. राष्ट्रीयकृत बँकेत विद्यार्थ्यांचे खाते उघडणे, ब्रँच मॅनेजरला कटकटीचे वाटते. कारण खात्यात रक्कम शिल्लक राहात नाही. ही बँकेची गैरसोय. तरी सर्व बँकाना पुन्हा खास सूचना काढून आदिवासी मुलांच्या खातेपुस्तिका आवर्जून काढून त्यातच शिष्यवृत्तीचे धनादेश भरले जावेत.

या विद्यार्थ्यांच्या अनेक समस्या अनुत्तरीत आहेत. कागदोपत्री सोयी अनेक केलेल्या आहेत. पण तेवढ्या करून भागणार नाहीत. त्या सोयी अंमलात आणण्यासाठी मनापासून व नेटाने प्रयत्न होणे आवश्यक आहे. तसे प्रयत्न झाले तरच हा वर्ग मुख्य प्रवाहात येण्याची प्रक्रिया वेगाने सुरू होऊ शकेल.

□□□

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या उत्कर्षाची नवी दिशा

सर्वांच्या वाट्याला सारखेच विद्यार्थी जीवन येते असे नाही. महाराष्ट्रात तरी सर्वत्र स्थलकालपरिस्थितीनुसार विद्यार्थिजीवनामध्ये विशेष लक्षणीय जीवन एका सरधोपट मापाने मोजणे म्हणजे त्या विद्यार्थ्यांच्या जीवनावर फार मोठा अन्याय केल्यासारखेच आहे.

आदिवासी भागातील विध्यार्थ्यांच्या सहवासात काही काळ घालविल्यानंतर कोणत्याही विचारी माणसाला शहरी, ग्रामीण, नागरी, अनागरी जीवनातील तफावतीची तीव्र जाणीव झाल्याखेरीज राहणार नाही. म्हणूनच पुष्कळदा कोणत्याही प्रश्नाच्या संदर्भात विचार करीत असतांना स्थल, काल परिस्थिती संदर्भ सोडून विचार करणे गैर वाटते. येथे प्रश्न गुणवत्ता आणि दर्जेदार सूचनांचा नसून खरा प्रश्न आहे तो साधन सामग्री व सोयीसुविधांच्या असमान उपलब्धतेचा.

तळमळीच्या कार्यकर्त्यांची गरज :

चर्चा, परिसंवाद, आणि व्याख्यानमाला यातून ग्रामीण सुधारणा मोहीमेबद्दल विविध प्रकल्प आणि उपक्रमांबद्दल बरेच बोलले जाते. काही प्रमाणात ते राबविलेही जाते. क्वचित यशस्वीपणे अंमलबजावणीही झाल्याचे आढळते. पण तेवढ्यावरून ग्रामसुधारणा पूर्ती झाली आणि शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघर पोहोचली आहे ही कल्पना करणे निखालस चुकीचे ठरेल.

सर्वच क्षेत्रात आपल्या कामांची गती विलक्षण झपाट्याने वाढण्याची आवश्यकता आहे. सध्याची आपली एकूण कामाची गती आणि खालावलेली परिस्थिती यांचा मेळ बसत नाही. अपेक्षेपेक्षा खूपच मंदगती आहे. खऱ्या तळमळीच्या कार्यकर्त्यांची कमालीची उणीव आता सर्वच क्षेत्रात विशेष तीव्रतेने जाणवत आहे. म्हणूनच पुष्कळसे प्रश्न भिजत लोंबकळत पडलेले आहेत. आता खरी गरज आहे ती योजनेपेक्षा प्रकल्प राबविणाऱ्यांची. सगळे हात एका पोटतिडकीने आणि तळमळीने कामाला लागले पाहिजेत. म्हणजे मग उघड्या डोळ्यांनी दिसणाऱ्या गंभीर उणीवांचा आणि अडचणींचा पाढा वाचला जाणार

नाही. ओरड करण्याचीही गरज पडणार नाही. मात्र त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत सूक्ष्म निरीक्षण करणे आवश्यक आहे.

**रोगनिदानंतर उपचार :**

रोगनिदान झालं म्हणजे हमखास यशस्वी उपाययोजनाही करता येते. परिस्थितीचे सम्यक व मर्मग्राही अवलोकन करता आल्यास त्यावर रामबाण उपाय व तोडगाही सापडतो यास्तव, प्रस्तुत लेखकाने आदिवासी विद्यार्थीजीवन जाणून घेण्याचा प्रत्यक्षाच्या आधारे प्रयत्न केलेला आहे. त्याआधारे काढलेले निष्कर्ष व सुचविलेले उपाय फलदायी झाल्याशिवाय राहणार नाहीत याची खात्री वाटते.

आजच्या शिक्षणामधून स्वाभिमान आणि स्वालंबन या दोन गोष्टी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत याचे दुःख वाटते. आमची शिक्षणपध्दती आणि योजना कमी पडतात. राबविण्यात काही कसूर असेलही तथापि भुकेलेल्यांना मासे देऊ नयेत तर मासे पकडण्याचे जाळे द्यावे असे नुसते बोलले जाते. पण प्रत्यक्षात तसे प्रयत्न होत नाहीत आणि कोणी करू धजल्यास करणाऱ्याच्या माथी अपयश आणि निराशाही येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

ठाणे जिल्ह्याचा विचार केला तर त्यात आदिवासींच्या आठ जमाती आढळतात. महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी, कोकणा, वारली, ठाकूर, धोडी, कातकरी, त्यातही पुन्हा क ठाकूर, म ठाकूर, अशा उपजमाती आहेत. कोकणा या जमाती थोड्या फार पुढारलेल्या असून कातकरी, भिल्ल, गोंड या जमाती अद्यापही शिक्षण आणि संस्कारापासून वंचित आहेत. या जमातींना शिक्षणाचे महत्त्व हरप्रकारे पटवून देण्याची आवश्यकता आहे. पण आमचे हे प्रयत्नही कुचकामी आणि तकलादू ठरत आहेत. अशा या वातावरणातील आमच्या आदिवासी विद्यार्थी बंधुभगिनींचे जीवन फार वेगळे आहे असे मानता येत नाही. वाल्याचा वाल्मिकी झाला आणि मानवी गुरू भेटला नाही, तरी मानीव गुरुपासून विद्या संपादन करणारा एकलव्य झाला तरी अजूनही सगळ्यांना हे साध्य झालेले नाही ही आमची खंत आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांशी झालेल्या भेटीगाठीतून बहुतांशी सर्वांची समान परिस्थिती आहे. थोड्याफार फरकाने सगळेच भरडले गेलेले आहेत आणि जात आहेत हेच खरे. वर्षाकाठी ३,५८० रुपयांच्यावर त्यांचा पगार जात नाही. त्यांच्या कुटुंबात खाणाऱ्या माणसांची संख्या कमावणाऱ्यापेक्षा कितीतरी अधिक आहे. ४-५ पासून ३०-८० पर्यंत माणसे एका कुटुंबात आहेत. अर्थात ३४ माणसांचे कुटुंब म्हणजे एकत्र कुटुंब आहे. साधारणपणे कुटुंबात २-२ बायका आढळतात. त्यातही पुन्हा धरसोडीचे प्रकार आहेतच. त्यामुळे मुलांची संख्या अधिक झालेली दिसते. मागच्या पिढीचे शिक्षण प्रौढ शिक्षणाच्या फार पुढे गेलेच नाही. म्हणजे दुसरी, तिसरी,चौथीच्या आतच आटोपलेले आहे. मात्र आताच्या पिढीतील विद्यार्थ्यांचे वडील, भाऊ, बहीणी निदान ६वी, ७वी, ११वी पास नापास आहेत. तेच या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक आधार बनले आहेत.

### शिक्षणापासून वंचित राहण्याची कारणमीमांसा :

आदिवासी विद्यार्थ्यांची शिक्षणापासून वंचित राहण्याची आणि शिक्षण न घेण्याची अनेक कारणे दिसून येतात. प्रत्येकाची कारणे वेगवेगळी आहेत. याला केवळ प्रतिकूल आर्थिक परिस्थिती कारणीभूत नाही, ती बहुसंख्यांची निश्चित विकट आहे यात वाद नाहीच. भातशेती म्हणजे न पिकणाऱ्या खाचरांना पिकवीत बसावयाचा उद्योग आहे. तिथेही मनुष्यबळ कमी पडतेच असे म्हणतात, की सीतामाईला रावण पळवून नेत असतांना तिची सुटका केली नाही म्हणून या कोकण भूमीला तिने जळजळीत शाप दिला भाजल्याशिवाय ही जमीन पिकणार नाही आणि शेतकरी भाजला जातो तरीही ही भूमी भाजूनही पिकत नाही अशी स्थिती आहे. शेती ही स्थावर मालमत्ता सोडून अन्यत्र शहरात जाऊन राहता येत नाही. परिस्थिती अशी आहे की शेती सोडली तर आहे तेही उत्पन्न बुडेल आणि तिथे शेतीवर बसून राहिले तर पोट भरत नाही. मुलाबाळांना उघडेनागडे ठेवून शेतीतच पुन्हा मरावे लागते आणि शिकण्याचा गंध तेथपर्यंत पोहोचत नाही. शिकविणेही परवडत नाही कारण गुरे कोण राखील आणि पोरवडा कोण सांभाळील असा प्रश्न असतो. दारिद्र्य आणि गरिबी ही वस्तुस्थिती आहे शिवाय तांत्रिक अडचणीही आहेत. गावात शाळा नाहीत, जवळपास शाळा नाहीत, बाहेरगावी जाऊन शिक्षण घेणे परवडत नाही आपल्याहून धाकट्या भावंडांना सांभाळावे

लागत असल्याने शिक्षण पूर्ण करता येत नाही. ही एक वेगळीच अडचण निदर्शनास आली आहे. शासनाच्या वतीने पुढील (सातव्या) योजनेत पंचावन्न हजार नवीन प्राथमिक शाळा काढण्याचा संकल्प आहे. त्याची सिध्दी झाली तर गावातशाळा उपलब्ध नाहीत, ही सबबही यापुढे सांगता येणार नाही. पण धाकट्या भावंडांना दोण सांभाळणार पोटजाळण्यासाठी मोलमजुरी आईबापाला सोडता येत नाही. त्यांना जावेच लागेल. या सर्व परिस्थितीचा गंभीर विचार होणे आवश्यक आहे. एका मर्यादेपलिक डे बहुतेकांना शिक्षण घेता येत नाही. शिकू पाहणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या मनाला हलुवार फुंकर घातली म्हणजे ते बोलते होतात.

नोकरी की शिक्षण हा पेच :

आदिवासी विद्यार्थी पुढे शिकू इच्छितो उच्च शिक्षण घेऊ इच्छितो. पण कांहींच्या पुढे नोकरी की शिक्षण हा फार मोठा पेच निर्माण झालेला आहे. पहिल्यांदा शिक्षण असा कौल कमी पडतो. परिस्थितीमुळे नोकरी लक्ष्य आहे, हाही परिस्थितीचाच परिपाक पुन्हा शिक्षणासाठी कळ सोसली पाहिजे इतपत जाणीव नाही. नामदार गोखले, आगरकर, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र माहीत नाही. अशा कथाही त्यांना सांगणारे नाहीत. शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्या आणि विद्यावेतने संपूर्ण कुटुंबाला उभे करू शकत नाहीत. कुटुंबाच्या दुःखात तर शिक्षण घेतांना सहभागी व्हावेच लागते. ते दुःख नजरेआड कसे करता येईल या परिस्थितीत डी. एड. न होता केवळ ३०० रुपयांवर सरकारच्या मेहरबानीने मिळणारी शिक्षकाची नोकरी स्वीकारावीच लागते. आपण कमावते झाल्याचे समाधान मिळते पण शिक्षणाला कायमचा रामराम ठोकूनच. हाताशी आलेली पदवी सोडून एस.वाय.बी.ए., बी. कॉम पर्यंत झालेले शिक्षण सोडून याच नोकरीच्या आकर्षणासाठी आय.टी.आय. चा साधा मिळेल तो ट्रेड ही मुले स्वीकारतात. या सगळ्यातून हाती फारसे लागत नाही. स्वतःला सावरणारे, जीवनाला उभारी देणारे तत्त्वज्ञानही खऱ्या शिक्षणाअभावी दुरावलेले असते.

शिक्षण घेतांनाही हेळसांडच :

शिक्षण घेतांनाही अनंत अडचणी आहेत. वह्या, पुस्तके, मिळत नाहीत, चांगले शिकविले जात नाही शिकविणारे उपलब्ध होत नाहीत. गणित, इंग्रजी,

विज्ञान विषयाला तर शिक्षक नसतांनाच वर्ष पार पडते. ज्याला शिक्षणाची पायाभरणी म्हणतात, ती कधी केली जात नाही. मग हा विद्यार्थीजीवनाचा शिक्षणाचा इमला मधेच कोसळल्याशिवाय राहात नाही. नापास व्हावेच लागते पण या आपत्तीचा पाढा वाचण्यात अर्थ नाही. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील उत्कर्षासाठी काही निश्चित पावले टाकली गेली पाहिजेत.

उत्कर्षाची नवी दिशा :

आदिवासी समाजाच्या उत्कर्षासाठी पुढील सूचनांचा विचार होणे आवश्यक आहे.

१. परिस्थितीने गांजलेल्या अडाणी,अज्ञानी पालकांना, नातेवाईकांना गावातील भोवतालच्या माणसांना पचनी पडेल अशा बोल भाषेत समजावून सांगणे आवश्यक आहे, समजावल्यानेच समजेल असा हा समाज आहे. पायातल्या पायतणाने उन्हाचे चटके जसे बसत नाहीत तसेच शिक्षणाने जीवन सुधारते, दारिद्र्याचे चटकेही प्रसंगी कमी होतात. या भाषेत शिक्षण हे सर्वांगीण उन्नतीचे साधन आहे हे त्यांना पटवून द्यायला हवे.

२. तुलनेने व्यसनाधीन माणसे कमी अधिक प्रमाणात आढळतात, तंबाखू, बिडी, दारू यांची व्यसने सर्रास आढळतात. व्यसनांना पर्यायी मनोरंजनातील गुंतवणूक; त्याची व्यवस्था केली पाहिजे. मनोरंजनासाठी तारपा, बासऱ्या, ढोलकी, नाल,टाळ, तबला, पेटी इत्यादी वाद्ये उपलब्ध करून दिली पाहिजेत. कारण आदिवासी लोक हे देवभक्त आहेत. उत्सव, व्रतवैकल्ये त्यांच्या त्यांच्या पध्दतीने एकजुटीने साजरे करता येतील असे वातावरण निर्माण केले पाहिजे. अक्षय्यतृतीया, दसरा, दिवाळी, होळी, कोजागिरी, श्रीकृष्णजयंती, नवरात्र, गणेश उत्सव, सत्यनारायण हे सगळे उत्सव रात्रभर समूह नृत्य करून त्यांना जागवता आले पाहिजेत. आज पावसात त्यांचा बोहाडा थांबतो. त्यासाठी एक मोठा कम्युनिटी हॉल बांधून दिला पाहिजे. विद्यार्थ्यांसाठीही अशा प्रकारचे मनोरंजन गरजेचे बनले आहे. त्यांना डांबून ठेवण्यापेक्षा मुक्तपणे उमलू दिले पाहिजे. मग ते वसतिगृह, आश्रमशाळा, महाविद्यालये असो

३. आदिवासींसाठी जी वसतिगृहे आणि त्याहीपेक्षा ज्या आश्रमशाळा आहेत. त्याची स्थिती भयंकर आहे, शोचनीय आहे. ज्याठिकाणी कोवळ्या बालमनावर

संस्कार करावयाचे त्याच ठिकाणी या बालमनांना पावलोपावली घट्ट करकोचे पडावे अशी स्थिती आहे. शासनाचा मूळ हेतू सफल होत नाही. केवळ कार्यकर्त्यांना, परिस्थितीला नावे ठेवून चालणार नाही. त्यातून मार्ग हा काढलाच पाहिजे. अधीक्षक, हाऊसमास्टर, रेक्टर, पर्यवेक्षक अशी कामे स्वीकारणाऱ्यांनी बालमानसशास्त्र आणि शैक्षणिक मानसशास्त्र जाणून घेतलेच पाहिजे. युवकाची मने आणि आकांक्षा समजावून घेऊन वागले पाहिजे. आपले अपुरे पगार कुटुंबपासून दूर एकटं राहणे, सवलतींमुळे विद्यार्थी जीवनाचा विद्यार्थ्यांना पडणारा विसर सगळे असूनही तळमळीने मुलांसाठी काम केले पाहीजे. आपल्या व्यथा मुलांचे माथी मारून चालणार नाही. तर त्यांना समजावून घेऊन सगळ्या चुकाही पोटात घालून सामोपचारानेच मार्ग काढला पाहिजे. समाजातील आदर्शाच्या ढासळण्याने विद्यार्थीही काही प्रमाणात ढळणार हे गृहीत धरूनच गृहप्रमुखाने वागावे, आदिवासी भागात उलट जास्तीत जास्त अर्हता प्राप्त माणसांची विशेष गरज आहे, आणि नेमकी उत्तम गुणवत्ताप्राप्त माणसे महात्मा गांधींनी खेड्याकडे चला सांगूनही जायला तयार नाहीत. केवळ जेवणाचे हिशोब ठेवणाऱ्या वसतिगृहप्रमुखापेक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनाचे हिशोब मांडणारे हाऊसमास्टर्स पाहिजेत.

४. एकशिक्षकी शाळा हा तर या भागात अन्याय आहे. एकच शिक्षक चार वर्ग सांभाळतो त्यात कुटुंबनियोजनाच्या केसेस मिळविण्याची जबाबदारी, मग मुलांचे व्हायचे कसे ? शक्यतो विषयतज्ज्ञ सत्पात्र शिक्षक नेमून त्यांना उत्तम निवास व्यवस्था उपलब्ध करून सार्वजनिक बांधकाम खात्यामधील कर्मचाऱ्यांना धरणांवरील कामी नियुक्ती केल्यावर जसा साईट अलाऊन्स मिळतो. तसा पगारात विशेष चांगला लाभांश मिळावा यामुळे चांगले शिक्षक आकर्षित होतील, मन लावून कामे करतील.

५. दारुबंदी प्रकार प्रत्यक्षात आदिवासी वस्त्यांपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचला पाहिजे. तसा तो पोहोचत नाही. उलट घरात हातभट्ट्या चालतात असे कळते. दारू गाळली जाते, असे म्हणतात. यातले सत्यासत्य जाणण्यापेक्षा वेळीच ते थांबविले पाहिजे. पाड्यापर्यंत पोहोचणे खेड्यापेक्षाही महत्त्वाचे आहे. दारुबंदी प्रचार तेथवर पोहोचला नाही तरी निदान पोहोचलेली दारू काढून घेतली पाहिजे. काळ्या गुळाची विक्री बंद करावी.

६. मर्यादित कुटुंब राखण्यात कल्याण आहे. म्हणजे धाकट्या भावंडांना

सांभाळत शिक्षणाचा खेळखंडोबा होणार नाही.

७. रेडिओ, टि.व्ही. चित्रपट इत्यादी दृकश्राव्य माध्यमे उपलब्ध करुन दिली पाहिजेत. अनिच्छेने का होईना कानावर चांगले पडेल, डोळ्यांना पाहावेसे वाटणारे दिसेल, संस्कार ग्रहण करावेच लागतील दुसऱ्याच्या कहाण्या आपल्या जीवनाला काही प्रमाणात हितावह ठरतील म्हणून चांगले चित्रपट दाखविले गेले पाहिजेत.

८. सर्वप्रकारच्या सुशिक्षणाबरोबरच संस्कारासाठी सांस्कृतिक कार्यक्रम त्यातील प्रशिक्षणासह त्यांना उपलब्ध करून दिले पाहिजेत. आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये कलेची, संगीताची खेळाची, नीटनेटकेपणाची आवड आहे, ती जोपासली पाहिजे.

९. समाजाच्या आणि शासनाच्या मिळणाऱ्या मदतीबद्दल त्यांच्या मनात कृतज्ञतेची भावना जरुर आहे. चांगल्या शिक्षकाला, आपल्या हिताकडे लक्ष देणाऱ्या प्रशासकाला, जाणकार अधिकाऱ्याला ते न बोलताही मनोमनी फार मोठा मानसन्मान देत असतात. तो समजून घेऊन आणखी वाढेल कसा हे पाहिले पाहिजे.

१०. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अल्पवयातील मोलमजुरी, गुरे राखणे यासारखी कामे कायद्याने गुन्हा ठरवून बंद केली पाहिजेत. अशी मुले सापडली तर रिमांड होम नव्हे तर आश्रमशाळेत आणि वसतिगृहात दाखल केली पाहिजेत.

वाल्याचा जर वाल्मिकी होऊ शकतो, गुरुविना जर एकट्याच्या हिंमतीवर शिष्य जर एकलव्य होऊ शकतो, हनुमानासारखा श्रेष्ठ रामभक्त होऊ शकतो. तर आदिवासी विद्यार्थी आपला सर्वांगीण उत्कर्ष साधू शकेल. यात शंका बाळगण्याचे कारण नाही. यातूनच आदिवासी विद्यार्थ्यांच्या उत्कर्षाची नवी दिशा गवसण्याची शक्यता आहे.

□□□

# नवे शैक्षणिक धोरण आणि आदिवासी विद्यार्थी विकास

नवीन शैक्षणिक धोरणांचा मसुदा तयार झाला तेंव्हा त्यासंदर्भात आकाशवाणीवरुन बोलतांना या खात्याचे केंद्रीय मंत्री त्यानंतर पंतप्रधानपद भूषविणारे श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी सांगितले होते की आदिवासींचा विकास झाला पाहिजे. सर्वसामान्य माणसांबरोबर येण्याकरिता विविध सुविधा ह्या आदिवासी पर्यंत पोहोचल्या पाहिजेत. यातच शिक्षण सुविधांचाही समावेश होतो.

स्वातंत्र्यानंतर गेल्या ३८ वर्षात आदिवासींसाठी पुष्कळ काही केले. तरी अद्यापही बरेच काही करावयाचे बाकी आहे. आदिवासींचा खऱ्या अर्थाने विकास व्हावयाचा असेल तर शिक्षण हा एकमेव रामबाण उपाय आहे. पंतप्रधानांना असाच सर्वांचा विकास नव्या शैक्षणिक धोरणात अभिप्रेत होता. त्यासाठी स्वतःशी व कामाशी प्रामाणिक राहून योजनांची अंमलबजावणी करणारे कार्यकर्ते शिक्षण क्षेत्रातही निर्माण होण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यादृष्टीने शिक्षणाचे केंद्र बनलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी काही सूचना करून त्यावर उपायही सुचविलेले आहेत.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या उत्कर्षाच्या योजनांच्या संदर्भात जेव्हा आपण त्याचा विचार करतो. तेव्हा तो आदिवासी विद्यार्थी जगाच्या खूप मागे आहे हे आपल्या लक्षात येते. शहरातील विद्यार्थ्यात सुखसुविधांच्या मानाने त्याची खूपच पीछेहाट आहे. शैक्षणिक साधनसंपत्ती आणि वातावरणापासून तो वंचित आहे.

आजच्या काळातही प्राचार्यांच्या कार्यालयात भीत भीत चपला बाहेर काढून प्रवेश करणारा आदिवासी विद्यार्थी दिसून येतो. म्हणजे अशा खरी संस्कृती जपणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी समाजात राम, नारद, आणि द्रोणाचार्य संचारले पाहिजेत असे वाटते. म्हणजे त्यांच्याप्रेरणेने या वनवासातून संचोटीचे एकनिष्ठ भक्त हनुमान, वाल्मिकी आणि एकलव्य घडतील याची खात्री वाटते.

न्यूनगंड घालवावा :

एवढे निश्चित की आदिवासी विद्यार्थी कोणत्याही बाबतीत कधीच कमी पडणार नाहीत. कारण त्यांच्यात पराक्रम, निष्ठा, धाडस, जिद्द आहे. हा विद्यार्थी अतोनात कष्टाळू आणि प्रामाणिक आहे. त्याचे हे गुण जागविण्याची आज खरी गरज आहे. त्यासाठी योजना राबविणाऱ्यांनी व सर्वांनी त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे. मात्र आदिवासी विद्यार्थ्यांचा हा विश्वास कमावणे फार अवघड आहे. आतापर्यंत त्यांनी कोणावरच विश्वास ठेवू नये अशा भयानक एकाकी जीवनाला तोंड दिले आहे. त्याच्या झालेल्या उपेक्षेमुळेच त्यांना कार्यकर्त्यांच्या हेतूविषयी शंका वाटते. आदिवासी विद्यार्थ्यांचा विश्वास कमावणे अवघड असले तरी व्रती बनून आदिवासी वेळप्रसंगी किंमत देऊनही तो आता आपल्याला संपादन करणे भाग आहे.

आपल्या मनातील आदरभाव उघड बोलून दाखविणे त्याच्या स्वभावात नसले तरी काळजात तो जपून ठेवतो. अंतकरण हेलावून टाकणारी आदिवासी विद्यार्थ्यांची आज स्थिती आहे. अनवाणी पायाने डोंगरातील पाऊलवाटा तुडवीत रानोमाळ भटकणारे हे विद्यार्थी थकल्याभागल्या चेहऱ्याने आणि शरीराने कसेबसे शाळा महाविद्यालयापर्यंत येऊन पोहोचतात. तेथेही पुन्हा त्यांना कोणी पाठीराखा नसतो. "विचारु की नको" या संभ्रमात बराच काळ घालविल्यावर नशीब असेल तरच उशीरा का होईना, पण शिक्षणाला सुरुवात होते आणि वेळ व वर्षे पुरेशा मार्गदर्शनाअभावी त्यांची वाया जातात आणि याची फारशी दखल कोणी घेत नाही.

विखुरलेल्या पाड्यापाडयातील, पुन्हा पाड्यापाड्यातही अंतर राखून पुरेशा न पिकणाऱ्या शेतीच्या लोभापायी ग्रामीण वातावरणात गुरफटलेला हा विद्यार्थी शहरात कॉलेजात मनोमनी फारसा रमत नाही. तो शरीराने शहर वस्तीत येतो तरी त्याचे मन पाड्यावरच. कारण तेथे त्याचा समानधर्मी कळप असतो. यातून सुटका नाही, जमिनीबरोबरच तिला कसणारी आदिवासी माणसंही अशी भाजली जातात. पाणी पुरवठा, वीजपुरवठा, वाहतूक व्यवस्था, शिक्षण या पासून दूर राहतात. ही धावपळ आणि अवहेलना थांबविण्यासाठी आदिवासी विद्यार्थ्यांच्या

उत्कर्ष योजना गंभीरपणे राबविल्या जाण्याची आवश्यकता आहे. अडचणी आणि समस्या खूप आहेतच पण आदिवासी विद्यार्थी उत्कर्षासाठी उपाय शोधणे फार महत्त्वाचे आहे.

पाड्याचे एकत्रीकरण व्हावे :

आदिवासी समाज आणि विद्यार्थी वर्ग एकोप्याने नांदण्यासाठी पाड्याचे एकत्रीकरण केले पाहिजे. त्यामुळे आदिवासींना उपजातींचे बांध मोडता येतील. अधिक मोठ्या प्रमाणात सुसंघटीत होऊन एकमेकांच्या आधाराने ठामपणे उभे राहून सोयी प्राप्त करुन घेता येतील. उदा. अशा गटात किमान एक माध्यमिक शिक्षणाचे केंद्र व्यवस्थित चालेल. आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देतांना केली जाणारी आदिवासींमधील जाती उपजातींची वर्गवारी उदा. कोकणी, वारली, ठाकूर, कातकरी, महादेव कोळी, इत्यादी तूर्त विचारात घेतली जाऊ नये आणि विशिष्ट टक्केवारींचीही अट ठेवू नये. आदिवासींमधील कातकरी, ढोर, ठाकूर या अतिमागास जातींच्या भल्यासाठी ही वर्गवारी असली आणि अभ्यासाला दर्जा येण्यासाठी टक्केवारींची अट असली, तरीही नुकत्याच शिकू पाहणाऱ्या आदिवासी समाजातील विद्यार्थ्याला, निदान नाशिक, ठाणे जिल्ह्यात तरी अटी नसाव्यात, असे या भागातील आदिवासी विद्यार्थ्यांकडे पाहून म्हणावेसे वाटते.

शिक्षणाचा कंटाळा :

आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणाचा दर्जा पाया घालणारा असल्याने उत्तमच असला पाहिजे. त्यांचे भ्रम, अंधश्रध्दा, अपसमज याच वेळीच दूर झाले पाहिजेत. उदा. शिक्षणात हुशार असलेल्या मुलांना करणी केली जाते असे गैरसमज वेळीच दूर झाले पाहिजेत. काही वेळा आदिवासी विद्यार्थी याचा गैरफायदा घेऊन आपल्या अज्ञानी, अडाणी पालकांना नाडतात. त्यांचे दोन किस्से - एका मुलींच्या वसतिगृहातील मुलगी पाठीवर बिब्ब्याच्या फुल्या शिक्षणासाठी आले की उमटतात, अशी तक्रार करी. तीन चार वेळा असे झाले. पालकही काळजीत पडले. नंतर कळले की हात पोहोचतो तेथेच पाठीवर ती रात्री स्वतःच्या हाताने बिब्ब्याच्या फुल्या मारी. गावी जाण्यासाठी तिनेच हे ढोंग रचले होते. हाच प्रकार पोट दुखण्याच्या बहाण्याचाही आहे. शिकायला ठेवले की पोट दुखणे सुरू होई,

असा कांगावा एक विद्यार्थी करीत असल्याचे उघडकीला आले. ग्रामीण शिक्षक पालकांनी हा भोळा भाव सोडून दिला पाहिजे.

**आदिवासी मंडळे :**

"आदिवासी विद्यार्थी मंडळ" शाळा कॉलेजात स्वतंत्रपणे आपल्या अडचणी सोडविण्यासाठी स्थापन झाले पाहिजे. म्हणजे एकाकी न पडता संघटितपणे विद्यार्थी आत्मविश्वासाने शैक्षणिक वातावरणात रमतील. मागण्यांपेक्षा कर्तव्याच्या जाणीवेसाठी सामूहिक जीवनासाठी अशा मंडळांची गरज असते.

शिकतांना आदिवासी मुलांना विशेष मोकळीक दिली पाहिजे. त्यांना मुक्तपणे स्वतंत्र नाचू वागडू दिले पाहिजे खेळ खेळू दिले पाहिजेत. भजन, ढोल, तारपा, कोळी नृत्येही करू दिली पाहिजेत.

आदिवासी भागात ध्येयवादी समाजसेवा अंगी बाणलेल्या शिक्षकांची अधिक चांगल्या विशेष वेतनावर नेमणूक केली पाहिजे. त्यांच्या निवासाची, मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. थोडक्यात त्याला स्वतःला भवितव्याच्या विवंचना नसल्या तरच तो ग्रामीण आदिवासी भागात मनःपूर्वक काम करील. सुखवस्तू लोकांपेक्षा सोशिक गुणवत्ताधारक शिक्षकांची, आदिवासी भागात खरी गरज आहे.

वसतिगृहांची संख्या वाढविली पाहिजे. भोजन, निवासव्यवस्था असल्याखेरीज आदिवासी विद्यार्थी शिकणार नाहीत, हे सत्य आहे. ही वसतिगृहे संमिश्र जातीच्या विद्यार्थ्यांची असावीत, केवळ आदिवासी, बी. सी. अशी वसतिगृहे नसावीत. वसतिगृहात आदिवासी बी. सी. विद्यार्थ्यांच्या जागा नोकरीप्रमाणेच सर्वत्र राखून ठेवल्या पाहिजेत. म्हणजे सांस्कृतिक अभिसरण होईल. चांगली स्पर्धा होईल. परस्पर सहकार्याने संस्कृतीचा त्यांना बोध होईल. या वसतिगृहाचे प्रमुख आदिवासी विद्यार्थ्यांच्या केवळ जेवणाचा हिशेब मांडणारे नसावेत तर जीवनाचा हिशेब मांडणारे असावेत. पौगंडावस्थेतील, किशोरावस्थेतील, युवावस्थेतील, मुलांचे मानसशास्त्र जाणून त्यांना योग्य वळण

देणारे वॉर्डन निवडावेत.

निष्णात शिक्षकांच्या अभ्यासपूर्ण व्याख्यानमाला, मोबाईल लायब्ररी - लॅबोरेटरी, फिरते वाचनालय, प्रयोगशाळा, दवाखाने, शिक्षणोपयोगी पुस्तके, नियतकालिके यांचा पुरवठा आदिवासी विद्यार्थी जगतात असला पाहिजे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या पालकांना गावात रोजगार हमी असावी. प्रौढ शिक्षण सुविधा हवी. म्हणजे त्यांचा प्रतिसाद वाढेल. आदिवासी जमातीसाठी अनुकूल व गोडी वाढविणारे अभ्यासक्रम असावेत. सोपे मराठीचे माध्यम असावे. इंग्रजी ऐच्छिक ठेवावे, सक्तीचे नको, यातून वनवासींचा नव्या शिक्षण पध्दतीत विकास होईल.

❑❑❑

# आदिवासींचा शैक्षणिक विकास

आदिवासींच्या विकासात त्यांचा शैक्षणिक विकास हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. खऱ्या अर्थाने आदिवासींना जागृत करायचे असेल तर शिक्षण आवश्यक आहे आणि तेही मातृभाषेतून दिले पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणात प्रादेशिक भाषेला, राज्याच्या संबंधित भाषेला महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्या मागे तळागाळातील खालच्या थरातील माणसांच्या उन्नतीचा विचार गृहित आहे. त्या दृष्टीने आदिवासींना मराठी माध्यमातील शिक्षण निदान महाराष्ट्रात तरी पचनी पडल्यास ते सजग होतील. या शैक्षणिक समस्याही केवळ आदिवासींच्या नाहीत तर त्या साऱ्या समाजाच्या समस्या आहेत. म्हणून या समस्यांचा अग्रक्रमाने व सखोल विचार करणे आवश्यक आहे.

आदिवासींपर्यंत आज प्राथमिक शिक्षण जीवनाचा पाया असूनही सर्वत्र पोहोचलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. विखुरलेली वस्ती, आपसातील जाती वर्णभेद, भटक्या जमाती, दुर्गम डोंगराळ भाग, ध्येयवादी शिक्षकांचा अभाव, लोकभ्रम, दारिद्र्य, पायपीट, शिक्षणाबाबत उदासीनता या कोणत्याही कारणाने का होईना, पण अद्यापही शिक्षणाचा मार्ग त्यांना चालता येत नाही. भारतात ६ कोटी, महाराष्ट्रात ५७ लाख तर नुसत्या ठाणे जिल्ह्यात ५ लाख ७५ हजार आदिवासी असून सगळ्यांची अवस्था कमी अधिक सारखीच आहे. एवढ्या मोठ्या संख्येच्या आदिवासींपर्यंत जाऊन पोहोचणे अवघड आहे.

मुले आठ दहा वर्षांची झाली की पालक त्यांना बिनदिक्कत शिक्षणाऐवजी शेती, गुरे पाळणे, मोलमजुरी, मासे पकडणे, जंगलातील पाला पाचोळा, सरपण, लाकूड फाटा गोळा करणे, शिकार करणे, धाकटी भावंडे सांभाळणे इत्यादी कामे सोपवितात. त्यामुळे थोडीबहुत आर्थिक बाजूही सावरली जाते.

शिक्षणाचा कोणताही तात्कालिक फायदा आदिवासीला दिसत नाही आणि भविष्याचा विचार करायची त्याची कुवत नाही. उद्याचा विचार करायला लागणारी किमान आर्थिक शक्ती ही त्याच्याजवळ नाही. सुशिक्षितपणे शिक्षणाचा प्रसार

व्हायला पाहिजे व झाला आहे असे वाटते. तेवढा प्रसार झालेला दिसत नाही. पुढील (पानावर दिलेला) आदिवासी स्त्री पुरुष तक्ता पुरेसा स्पष्ट आहे.

| वर्ष | आदिवासी शिक्षण प्रमाण | पुरुष शिक्षण शेकडा प्रमाण | स्त्री शिक्षण शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९६१ | ०७.२१ | १२.५५ | १.७५ |
| १९७१ | ११.७४ | १९.०६ | ३.२२ |
| १९८१ | १९.३२ | २६.४१ | ९.०५ |
| १९८५ | २१.८७ | ३०.०६ | ९.४८ |

आदिवासी परिसर अद्यापही मागासलेला आहे. त्याला कारण संपर्काचा संज्ञापनाचा अभाव, समनुयोग साधत नाही. पालक शाळेत पाठवायला तयार नसतात. नेमक्या मुलींच्या स्वतंत्र शाळा खेड्यात नसतात. लोकभ्रमाचा कळस म्हणजे शिक्षणाने मुलगी विधवा होते, यासारख्या समजुती आढळतात. एक शिक्षकी शाळाही होणाऱ्या आदिवासी शिक्षणाच्या हेळसांडीला कारणीभूत आहे. याचा परिणाम म्हणजे शिक्षणातील स्थगन आणि गळतीत होतो. बालवर्गातील १००० मुलांपैकी एक मुलगाच पदवीधर होतो. परीक्षा पध्दतीचाही हा दोष असू शकेल. आदिवासी मुले चौथी पर्यंत ८ टक्के आणि सातवी पर्यंत ४ टक्के पोहोचतात. एका शाळेच्या पाहणीत तर १०० मुलांपैकी फक्त २३ मुले व १०० पैकीच फक्त १५ मुली पाचव्या इयत्तेपर्यंत जेमतेम पोहोचल्याचे आढळले.

सक्तीच्या सार्वजनिक ओफत प्राथमिक शिक्षण योजनेत ६ ते १४ या वयोगटातील मुलाला शाळेत न पाठविणे हा कायद्याच्या दृष्टीने गुन्हा आहे. पण जिथे याची सुजाण समाजात दखल घेतली जात नाही तेथे अडाणी आदिवासींची परिस्थिती अधिकच चिंता करायला लावणारी आहे. आदिवासींची शिक्षणगती अतिशय मंद गोगलगायसारखी आहे. ही गोष्ट क्लेशदायक आहे साधे कपडे नेसायला नाही. एवढ्या गरिबाने शिकून जगावे कसे हा प्रश्न आहे. म्हणून त्या आदिवासींना शिकण्यात फारसा राम वाटत नाही. प्रमाण मराठी इंग्रजी माध्यम भाषा माध्यम लवकर उमगत नाहीत, आपसातील भांडणे, परिस्थिती-अन्यायाबद्दल तक्रारी न करण्याची प्रवृत्ती, अंधश्रध्दा, असंघटितपणा, असंहकार,

हाच शिक्षणातील अडथळा आहे त्यामुळे एकदा पाया कच्चा राहिला की पुढील शिक्षण घेता येत नाही. विद्यार्थ्यांची अनुपस्थितीची कारणे, झोपडी पेटली, मारामारी झाली, भावाला अटक झाली, आत्महत्या केली असली भयानक असतात. यावरुन त्यांचे जीवन कळते. त्यांचे गांभीर्य उमगते.

प्राथमिक शिक्षणाच्या नुसत्या सार्वत्रिकीकरणात आनंद न मानता त्याचा दर्जा तपासला म्हणजे मग आश्रमशाळांची संख्या स्थिती-पुरेशी समाधान कारक नाही. शिक्षणाला लागणारा कालावधी लक्षात घेता गरीब आदिवासी पालकाला एवढी कळ सोसवत नाही. त्यामुळे शिक्षण गरजेचे व अत्यावश्यक वाटत नाही. पालकालाच शिक्षणाची प्रेरणा नाही. शैक्षणिक वातावरणाची उणीव ही फार मोठी बाधा आदिवासींच्या शिक्षणात झाली आहे.

ग्रामीण भागात रुचेल, त्यांच्या पचनी पडेल असा वेगळा अभ्यासक्रम त्यांना दिला जात नाही. शिक्षण म्हणजे आरोपण कलम करणे नव्हे, अंकुरण आहे, हे आपल्या शिक्षण पध्दतीत विचारात घेतले जात नाही. उन पाऊस थंडीत कित्येक मैल अनवाणी पायी चालणाऱ्या, फी साठी गवत कापणाऱ्या, अर्धपोटी राहणाऱ्या, अभ्यासक्रम समान पण सुविधा परिस्थिती समान नसलेल्या, भोवताली प्रगतीची चिन्हे नसतांना या मुलांनी शिक्षणाला रामराम ठोकला, तर दोष कुणाचा हा प्रश्न आहे पण उपाशी पोटी हे केवळ अशक्य होऊन बसते. कवी नारायण सुर्वेनी म्हटल्याप्रमाणे -

"कळलाच नाही भाकरीचा अर्थ
ग्रंथातले स्वर्ग कशासाठी"

हा खरा प्रश्नच आहे अशावेळी अभ्यास करून तो फारशी नवीदृष्टी प्राप्त करून घेऊ शकत नाही. शहरी शिक्षणाच्या संदर्भात असमानता ग्रामीण शिक्षणात असूनही गुणवत्ता आणि मूल्यमापन कसोट्या मात्र समान आहेत, म्हणून प्रमाण मराठीची लेखन, वाचन, संभाषण, श्रवण ही सारी कौशल्ये, आदिवासी विद्यार्थ्यांने आत्मसात करणे अगत्याचे वाटते.

सर्व सुधारणांची गुरुकिल्ली शिक्षण आहे. त्यामुळेच माणूस नव्या सुधारणा स्वीकारतो. तोच शिक्षणाचा मागास वर्गात प्रचारक बनतो. त्यामुळे शाळा दाराशी असूनही आता पोर ढोराशी ठेऊन चालणार नाही. हनुमंताला त्याची शक्ती ठाऊक नव्हती असे म्हणतात ती जांबुवताने जागविली. तशी नागरी माणसाची जबाबदारी आहे . आपला अहंगंड विसरुन त्यांच्यातल्या न्यूनगंडाला धक्का न लावता, आपण त्यांच्यात सोपे नसले, तरी समरस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या झोपडीला दार नाहीत, तशी मनालाही नाहीत. त्यामुळे तेथे प्रवेश सुलभ आहे. मात्र शिक्षक म्हणून आदिवासी भागात कोणी जात नाही. शिक्षक म्हणून जाणे हे एक आव्हान आहे. म्हणून ध्येयवादी व्रती बनून ते पेलले पाहिजे. मनस्वास्थ्य गमावलेला माणूस आदिवासी भागात विशेष काही करू शकत नाही.

आदिवासी भागात शिक्षकाच्या जागा, या ना त्या कारणाने रिकाम्या असतात. शाळांच्या सुट्ट्या आदिवासी जीवनाच्या संदर्भात दिल्या जात नाहीत. अभ्यासक्रमातही आदिवासी विद्यार्थ्यांची रुची वाढावी, असे फारसे नसते. अध्यापन साधन-सामग्रीला मर्यादा असते आणि शिक्षक विद्यार्थ्यात अनियमितपणा असतो, यावर उपाय म्हणजे आदिवासी या भागात राहाणारे, रमणारे शिक्षक नेमावे. शिक्षणाचे माध्यम निदान इयत्ता १ ली ते ४ थी आदिवासी बोली असायला हरकत नाही. निवासी शाळा, भरपूर शैक्षणिक सवलती, उत्तेजनार्थ बक्षिसे, शिक्षकांना घरे, अधिक वेतन, शाळेची सोयीनुसार वेळ, स्थानिक सोयीनुसार आणि या शेती हंगामानुसार सुट्ट्या असाव्यात, प्रशिक्षित शिक्षक असावेत. हे असते तेथे आदिवासी विद्यार्थी जागा होऊन प्रसंगी नोकरीपेक्षाही शिक्षणाला महत्त्व देतांना दिसतो. निसर्गाच्या सान्निध्यात वावरत असल्यामुळे आदिवासी विद्यार्थी विज्ञानाच्या अभ्यासातही अधिक रस घेऊन प्रगती करील असे वाटते. मात्र त्यासाठी आदिवासींची नुसती पाहणी करुन भागणार नाही. त्यांच्यात प्रत्यक्ष व्यसनमुक्ती, शिक्षण प्रसार यासारख्या सुधारणा करण्याची गरज आहे.

या गोष्टींचा समावेश झाल्यास नवे शैक्षणिक धोरण आदिवासींचा निश्चित शैक्षणिक विकास साधू शकेल असे वाटते.

□□□

# आदिवासी विद्यार्थी विकासासाठी विविध उपयुक्त योजना

वनवासींचे (आदिवासींचे) कल्याण हा केंद्रबिंदू मानून १९९३-९४ पासून वनवासींसाठी उपयोजना तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी आदिवासी विकास विभागाकडे (टी.डी.सी.) सोपविण्यात आली आहे. वनवासींसाठी या उपयोजना राबविणाऱ्या कार्यपध्दतीतील उणिवा दूर करणे, त्रुटी नाहीशा करणे, ही सुध्दा तेवढीच महत्त्वाची बाब आहे.

महाराष्ट्र राज्याच्या १९९४-९५ च्या वार्षिक योजनेचे एकूण आकारमान रु. ४४०० कोटी आहे. त्यात वनवासी उपयोजनेचे आकारमान रु. ३३० कोटी आहे म्हणजे राज्याच्या तुलनेने हे प्रमाण ७.५ टक्के येते. वनवासी उपयोजनेची टक्केवारी क्रमाने वाढवित ती राज्य योजनेच्या आकारमानाच्या ९ टक्के पर्यंत आणण्याचा शासनाचा संकल्प आहे.

वनवासी विद्यार्थ्यांनी आवर्जून अभ्यास करून लाभ घ्यावा अशाच योजनांची तपशीलवार माहिती येथे करून दिली आहे. त्यातही पुन्हा या योजना शिक्षण आणि उद्योग विषयावरील असून त्या योजनांनाच प्राधान्य दिले आहे.

भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख वनवासी जमाती असून कोलम (यवतमाळ), कातकरी (ठाणे, रायगड) मार्डीया गौंड (गडचिरोली) या वनवासी परंतु आदिम जमाती म्हणून केंद्रशासनाने अधिसूचित केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे पावरा, भील व ढोरकोळी या जमातींच्या वनवासींची आदिम जमाती म्हणून अधिसूचित करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. विविध योजनांच्या संदर्भात ही या आदिम जमातींना विशेष प्राधान्य मिळायला पाहिजे.

सर्व योजनांच्या अंमलबजावणीसाठी आदिवासी विकास विभागाच्या सचिवांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ नाशिक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि आयुक्त, आदिवासी विकास कार्यरत आहेत. त्यासाठी आदिवासी विकास आयुक्त नाशिक यांच्या जोडीला ४ अप्पर

आयुक्त व एकूण २४ प्रकल्पाधिकारी पुन्हा त्यांचे साहाय्यक म्हणून नेमलेले आहेत. तसेच ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गटात प्रशासकीय यंत्रणा बळकट केली आहे. अपर जिल्हाधिकाऱ्यांचे त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे अधिकार त्यांना प्रदान करण्यात आले आहेत. ते आय. एफ. एस. आणि आय.ए. एस. दर्जाचे आहेत.

अपेक्षा ही की जलद गतीने विकासाची कामे व्हावीत. त्यामध्ये आदिवासी विकास प्रकल्प गट जव्हार, डहाणू, नाशिक, कळवण, तळोदा, किनवट, धारणी, चिखलदरा, गडचिरोली, भामरागड, आणि अहेरी यांचा समावेश आहे. या गटात अनुक्रमे जव्हार, मोखाडा, तलासरी, पेठ, सुरगाणा, अक्राणी, अक्कलकुवा, सिरोचा, व अहेरी या तालुक्यांचा समावेश होतो. ही रचना येथे विस्ताराने राहून आपल्या भागातील विकासाची कामे गतीने शासनाच्या माध्यमातून पार पाडून घ्यावी. खास या नवीन नेमणूका असल्याने आदिवासी विकासाची कामे त्यांच्या मार्फत करवून घेण्याचा हक्क मांडता आला पाहिजे.

आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येणारी अशिक्षितता दूर करण्यासाठी आदिवासी क्षेत्रात शिक्षणाचा प्रसार करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नवीन प्राथमिक शाळा आणि आश्रमशाळा उघडून हा हेतू साध्य केला जात आहे. त्यासाठी १९९४-९५ मध्ये रुपये १६३२.७३ लाख एवढा व्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. महत्त्वाचे म्हणजे आदिवासी विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, संसदसदस्य व अन्य आदिवासी लोकप्रतिनिधींचा प्रत्यक्ष सहभाग आदिवासी उपाययोजनांचे कार्यान्वयन आणि अंमलबजावणी या दोन्ही बाबत घेण्यात आला आहे. आदिवासी लोकप्रतिनिधींचे उत्तरदायित्वही या निमित्ताने लक्षात घ्यावे. त्यांची ही जबाबदारी वाढली आहे.

**शैक्षणिक योजना :**

आदिवासी कुटुंबाच्या उत्पन्नाचा विचार न करता शिक्षणाच्या सर्व पातळीवरील अभ्यासक्रमासाठी प्रवेश, सत्र, परीक्षा, शिक्षण शुल्क देण्याची

सुविधा, विशेष म्हणजे विद्यार्थी एकदा नापास होऊनही या सवलतीला पुन्हा पात्र ठरतो. मात्र वार्षिक उत्पन्न २४००० रुच्या आत असेल तर वनवासी विद्यार्थ्याला वरीलप्रमाणे शिक्षण शुल्कात संपूर्ण माफी मिळूनही त्याला शैक्षणिक क्षेत्रात शिष्यवृत्ती दिली जाते. आणि रु. २४००० पेक्षा जास्त उत्पन्न असेल तर अशा आदिवासी विद्यार्थ्याला फक्त शुल्क माफी मिळते. शिष्यवृत्ती मिळत नाही.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहातील निर्वाह भत्ता मिळण्याची सुविधा ज्या ठिकाणी आदिवासी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आढळत नाहीत त्या ठिकाणी एकट्या आश्रमशाळेतून इच्छुक आदिवासी विद्यार्थ्यांची सोय करणे. (उदा. रत्नागिरीत वनवासी संख्या अत्यल्प आहे. त्या वनवासी विद्यार्थ्यांची सोय वेरळ व कांदवण (ता. मंडणगड, जि. रत्नागिरी ) येथे करण्यात येते.

आदिवासी उद्योजकांना अनेक प्रकारे शासकीय व उद्योगवाढीसाठी स्थापन झालेल्या वित्त संस्था भरघोस अर्थसहाय्य करीत असतात. प्रशिक्षणार्थींची निवास भोजन प्रवास खर्चाची त्यात तरतूद आहे.

ट्रायसेम योजना :

१५ ऑगस्ट १९७९ पासून "ट्रेनिंग फॉर रुरल युथ फॉर सेल्फ एम्प्लॉयमेंट" ही योजना सुरू आहे. दारिद्र्य रेषेखालील वनवासीसाठी ती राबविली जाते. ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ३००० च्या आत असेल व १.१/२ एकरपेक्षा जमीन नावावर नसेल अशांना त्यात सहभागी होता येते.

१८ ते ३५ या वयोगटातील युवकांना त्यात सहभागी होता येते. कोणत्याही औपचारिक शिक्षणाची त्यासाठी आवश्यकता नाही. विधवा स्त्रिया, प्रकल्पग्रस्त आणि लेप्रसी रुग्ण यांना ही वयोमर्यादा ४५ पर्यंत वाढविली आहे. या प्रशिक्षणाचा सर्व खर्च योजनेतूनच होतो. उलट रु. १५० ते ३०० रु. दरमहा भत्ता (स्टायपेंड) दिला जातो. तसेच ६००० रु. पर्यंतची सामुग्रीही पुरविली जाते.

### न्युक्लिअस बजेट :


एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकाऱ्यांपर्यंत न्युक्लिअस बजेट मधून अर्थसहाय्य वनवासींना उद्योग सुरू करण्यासाठी व उद्योगाच्या वाढीसाठी ५० टक्के अनुदान व ५० टक्के कर्ज अशी मदत देण्यात येते. ही मदत सर्व साधारणपणे रु. ५००० पर्यंत असते. या योजनेखाली किराणा माल दुकान शिवणकाम, सुतारकाम, वीटभट्टी, कुकुटपालन, दुग्ध व्यवसाय, बांबूकाम, पत्रावळी, इत्यादींसाठी यातून कर्ज दिले जाते. व्यवसाय रोजगारांमध्ये मोटर चालक, मेकॅनिक, लघुलेखन, टंकलेखन, केटरींग इन्स्टियूट ऑफ पुणे, बँकींग, विटा कौले तयार करणे, वेत बांबूच्या कामाचे प्रशिक्षण दिले जाते. गरजांनुसार अनुदान व कर्ज देऊन प्रकल्पाधिकारी अर्थसहाय्य देतात.

### शिक्षणाला प्राधान्य :

वनवासींच्या शिक्षणातील मागासलेपणाचा विचार करुन शिक्षणाला योजनेत प्राधान्य देण्यात आले आहे. आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाशिवाय भोजन, निवास, पाठ्यपुस्तके गणवेश इत्यादी सुविधा तसेच प्रोत्साहक रकमेची तरतूद आहे. इतर शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्यांना देखील मोफत शिक्षण पाठ्यपुस्तके, गणवेश, लेखन सामुग्री, विद्यावेतन इत्यादींचा लाभ मिळतो. आदिवासी मुलींना या सुविधांशिवाय हजेरी भत्ता देण्यात येतो. बालवाड्या सुरू करणे, शाळा नसलेल्या गावामध्ये प्राथमिक शाळा सुरू करणे (शासनाने शंभर लोकसंख्या असलेल्या ठिकाणी आणि एक किं. मी. अंतरावर जेथे शाळा शिक्षणाची सोय उपलब्ध नाही. अशा शाळा नसलेल्या गावांमध्ये नवीन प्राथमिक शाळां देऊ केल्या. स्वाभाविक वाढीमुळे, प्राथमिक शाळा शिक्षकांची चाळीस विद्यार्थ्यामागे एक अशी नेमणूक करणे. प्राथमिक शाळांमधील पुस्तक पेढ्या, इयत्ता पहिली ते चौथी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा म्हणजे गरीब विद्यार्थ्यांना ८० रुपये किंमतीचे गणवेशाचे दोन संच व लेखन सामुग्री पुरविण्यात येते. अर्थात ज्या गावी साक्षरतेचे प्रमाण १० टक्के पेक्षा कमी आहे आणि सहा ते अकरा वयोगटातील नाव नोंदणी ७५ टक्के पेक्षा कमी आहे. अशाच क्षेत्रात ही योजना आहे. प्राथमिक शाळा इमारतीचे बांधकाम करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणास अनुदान दिले जाते.

**खडू फळा मोहीम :**

यानुसार आदिवासी उपयोजनेखाली प्रत्येक प्राथमिक शाळेसाठी "१६ X २०" अशा दोन खोल्या असाव्यात एका खोलीवर ७८२०० रुपये खर्च व्हावा जवाहर रोजगार योजनेखाली ६० टक्के व ४० टक्के शिक्षण विभागाकडून रक्कम पुरविली जाते. दुर्बल घटकांतील मुलींना एका शैक्षणिक वर्षात २२० कामांच्या दिवसासाठी दरदिवशी रु १ प्रमाणे उपस्थिती भत्ता देण्यात येतो. मात्र मुलींच्या पालकांचे उत्पन्न ग्रामीण भागात १०००० रुपये व शहरी भागात ११८५० रु. येथपर्यंतच असावे. १०० टक्के अनुदान तत्त्वावर चौथ्या वर्षापासून नवीन अशासकीय माध्यमिक शाळा आदिवासी क्षेत्रात मंजूर केल्या जातात. तसेच शाळांच्या नैसर्गिक विकासाने लागणाऱ्या ज्यादा तुकड्या अनुदान तत्त्वावर मंजूर केल्या जातात.



(परिवर्तन)

उच्च माध्यमिक शिक्षणाच्या वाढीमुळे लागणाऱ्या जादा तुकड्या आदिवासी भागात मंजूर केल्या जातात. इयत्ता १ ली व २री मध्ये शिकणाऱ्या आदिवासी मुलांसाठी पोटभाषेत पाठ्यपुस्तके तयार होत आहेत.

इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना दरमहा ४० रुपये व मुलींना ५० रुपये तर ८ वी ते १० वीतील मुलांना दरमहा ५० रु. मुलींना ६० रुपये या दराने विद्यावेतन दिले जाते. ☐☐☐

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने पाठ्यपुस्तके

आदिवासी विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून इयत्ता १ ली ते इयत्ता ७वी पर्यंतच्या मराठी पाठ्यपुस्तकांचा विचार येथे केला आहे. एकंदरीत आदिवासी विद्यार्थ्यांची मराठी विषयाची अवस्था लक्षात घेता त्या मानाने पुस्तकांचा दर्जा त्यांच्या दृष्टीने न पेलणारा वाटतो. साररुपाने सांगावयाचे तर निसर्ग, पशुपक्षी, कृषिजीवन आणि संस्कृती याविषयावरील गद्य पद्य पाठ सोडल्यास ही पुस्तके आदिवासींना समोर ठेवून तयार केलेली वाटत नाहीत. प्रत्येक जातिजमातीला वा प्रदेशाला समान स्थान देणे हे जरी अशक्य असले तरी तितकेच खरे आहे की आदिवासी विद्यार्थ्यांना जिव्हाळा वाटावा, काही आपल्या ओळखीच्या जीवनाच्या खुणा त्यात दिसाव्यात. आपल्या मनाचे जगण्याचे, संस्कृतीचे, चालीरीतेच, श्रध्दांचे, काही प्रतिबिंब त्यात दिसावे अशी वस्तुस्थिती नाही. त्यामुळे फार तर हुषार विद्यार्थ्यांना पोपटपंची पध्दतीने ती पाठ असतीलही. परंतु प्रत्यक्षात आशयाच्या दृष्टीनेही पुस्तके आपल्यासाठी आहेत असे वाटले पाहिजे. असे फारसे काही कोठे गवसले नाही. म्हणूनच आदिवासींची मराठीची कुवत अधिक वाढविण्याची आवश्यकता विशेषत्वाने जाणवते. वस्तुतः आदिवासींसाठी काही गद्य पद्य पाठांचा समावेश, कोणत्या तरी वर्गाच्या पाठ्य पुस्तकात करता येणे सहज शक्य होते. पण प्रत्यक्षात आदिवासींचा विचार, पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीच्या वेळी केला गेला पाहिजे, असे आढळत नाही. असे पाठ्यपुस्तकांच्या स्वरूपावरून म्हणायला वाव आहे.

याचा अर्थ इयत्ता १ ली ते ७ वी ची मराठीची पुस्तके वयोगटानुसार रोचक नाहीत असे म्हणावयाचे नाही. खरोखरच काही गद्य पद्य पाठ उत्कृष्ट आहेत. संस्कारक्षम आहेत. विविध शैलीचे दर्शन, तसेच विविध वाङमयप्रकारंचे दर्शन यातून घडते. पण महाराष्ट्रात ५ लाखांहून अधिक आदिवासी असणाऱ्या, मराठी बोलणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचा गद्य व पद्याची निवड करतांना विचार केला गेला नाही असेच म्हणावे लागेल.

प्रामुख्याने शहरी मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गाचे चित्र शालेय पुस्तक निर्मात्यांच्या डोळ्यासमोर दिसते. सुशिक्षित घर आणि कुटुंब येते गृहीत असावे.

अडाणी आदिवासींच्या झोपडीचा विचार येथे झालेला दिसत नाही. निदान लेखकांची नावे न नोंदविता आलेले काही पाठ वगळून आदिवासींच्या जीवनाला व संस्कृतीला सामोरे जाता येणे सहज शक्य होते.

आदिवासींच्या दृष्टीने काही चांगले पाठ सांगावयाचे म्हणजे इयत्ता ३रीच्या पुस्तकातील -

| | | |
|---|---|---|
| पाठ क्रमांक १ | जमाडी जम्मत | वि. वा शिरवाडकर |
| पाठ क्रमांक ५ | तोडणे सोपे जोडणे अवघड | राम शेवाळकर |
| पाठ क्रमांक ८ | मुलांची तक्रार | त्र्यंबक बापूजी ठोंबरे |
| पाठ क्रमांक १२ | जिद्द | यदुनाथ थत्ते |
| पाठ क्रमांक १३ | सोन्याची जांभळे | व. दि. कुलकर्णी |
| पाठ क्र. १९ | सेनापती बापट | ना. ग. गोरे |
| पाठ क्रमांक २० | कळी | वंदना विटणकर |

हे उत्कृष्ट संस्कार पाठ आहेत.

तसेच इयत्ता ४थीच्या पाठ्यपुस्तकातील

| | | |
|---|---|---|
| पाठ क्रमांक ३ | झाडांची माया | बा. भ. बोरकर |
| पाठ क्र. १५ | आभाळाचा निरोप | अनिल सोनार |

| | | |
|---|---|---|
| इयत्ता ६ वीतील | भास्करराय | ग. प्र. प्रधान |
| | अप्पा पटवर्धन | गोविंदराव शिंदे; |
| | मोहिम फत्ते | अरुण परूळेकर |
| | महापूर | पु. भा. भावे |

हे लेख उल्लेखनीय आहेत. परंतु आदिवासी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने या पुस्तकातून छात्र छायाकृती, बहार, जैबुण, राजद्रोह, डोंब, रोड भडोरा, आगगाडी, विमान, वर्ग, वाचक, एस. टी. भाचरे, बेली परड्या, हाऊस बोर परडे, इत्यादी शब्द अवघड असून अपरिचित भावविश्वातील आलेले आहेत.

आदिवासींना आपली वाटणारी परिचित नावे मुलामुलींची सहज योजता

आली असती. पण पुस्तकात शरद, अभय, कुमुद, सुहास, नंदा, चंदा, अशी नावे आढळतात. यापेक्षा ग्रामीण भागातील, महादू, हरि, सोमा, गोमा, धर्मा, ही नावे संयुक्तिक झाली असती. साधी पुस्तकातील चित्रेही आदिवासींच्या दृष्टीने अनुकूल व त्यांना ओळखीची वाटतील अशी असती तर त्यामुळे विषय आपला अशी भावना मराठी मध्ये निर्माण झाली असती. पण वाव असूनही आदिवासींना अनुकूल अशी ओळखींची चित्रे पुस्तकात नाहीत. आदिवासींच्या दृष्टीने अनेक कठीण शब्दांचे अर्थ द्यायला हवे होते. पण नेमके कठीण शब्दांचे अर्थ दिले नाहीत. उदा. ४ थीच्या पुस्तकातील २१ व्या पद्य पाठातील महतू राजाची चाहूल या कवितेतील "बाहल्याने" या शब्दाचा अर्थ द्यायला हवे होते. पण नेमक्या कठीण शब्दाचे अर्थ दिले नाहीत असे अनेक शब्दांच्या बाबतीत झाले. क्वचित चुकीच्या शब्दांचे अर्थही दिले आहेत उदा. ४ थीच्या पुस्तकातील पान १९ वर दिगंतरा शब्दाचा अर्थ आकाशाऐवजी, दुसरी दिशा असा दिला आहे. काही ठिकाणी अपेक्षित तारतम्य पाळले नाही. उदा ४ थीच्या पुस्तकात पान १९ वर "हाऊस बोट" यासारखा इंग्रजी शब्द, इंग्रजी विषय सुरू नसतांना आलेला आहे. इयत्या ५वी सारख्या वर्गाला पद्यपाठ क्रमांक २७ अन्योक्ती / कृष्णशास्त्री चिपळूणकर सारखी कविता आहे. इयत्ता ५ वीच्या दृष्टीनेही कल्पना खरोखरच अवघड आहे. पण अन्योक्ती कल्पनेची सांगड घालावी म्हणून या कवितेचा समावेश झाला असावा. इयत्ता ५ वीच्या पुस्तकातील "बीज पेरलं गेलं" हा गद्यपाठ म्हणजे चंदू बोर्डे यांची आत्मकथा आहे. परंतु आदिवासी विद्यार्थ्याला हा धडा समजणे अवघड आहे. त्यांच्यापर्यंत क्रिकेट हा खेळ पोहोचलेलाच नाही. याचा अर्थ दुर्गम, डोंगराळ भागातील आश्रमशाळा व पाड्यापाड्यातील विद्यार्थ्यांचा विचार पाठ्यपुस्तक तयार करताना नीट केला जात नाही असे म्हणायला वाव आहे. याच पुस्तकातील ५ वा पाठ "आजीने पाहिलेला चोर" हा चांगला असला तरी आदिवासी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने त्यातील वातावरण परिचयाचे नाही. तसेच इयत्ता ६ वीच्या पुस्तकातील "उभा जन्म लोकसेवेला वाहीन", "विश्राम माझा विरंगुळा", "यशवंतराव चव्हाण", "झुबेलाल सर" / "इंदिरा" हे पाठ विद्यार्थ्यांच्या आकलनाच्या दृष्टीने अवघड वाटतात.

आदिवासींच्या दृष्टीने "खोप्यामधी खोपा" ही बहिणाबाईंची कविता अतिशय

चांगली समजण्याजोगी आहे. तशीच बालकवींची "निर्झरास" ही कविताही आदिवासींच्या दृष्टीने अप्रतिम समजण्याजोगी आहे. इयत्ता पाचवीतील पाठ ११ "कल्पकतेचे वरदान", "नानाशंकर शेठ" हा १६ वा पाठ किंवा इयत्ता ६ वीतील "साने गुरुजी" हा पाठ निश्चित चांगला आहे. इयत्ता पाचवीच्या पुस्तकातील एक ऐतिहासिक क्षण या पाठातील पान ९० वरील एक विधान संस्काराच्या दृष्टीने फार महत्त्वाचे व चमकदार आहे. कारण त्याचे प्रयत्न अनुभव व ज्ञान यांची शिदोरी आमच्या पाठीशी होती. म्हणूनच आम्ही हे भव्य यश मिळवू शकलो ही जमेची बाजू म्हणून सांगता येईल.

पाठ्यपुस्तकातील शुध्द लेखनाच्या व रचनेच्या दोषांचा विचार या ठिकाणी अप्रस्तुत असल्याने केलेला नाही. पाठ्यपुस्तके एक साधन आहे. त्याला साध्य न मानता त्याखेरिजही इतर अनेक साधनांनी ज्ञान संपादनाची भाषेची कौशल्ये प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मातृभाषा मराठीच्या दृष्टीने विद्यार्थ्याला प्राथमिक शिक्षणात सुसंगत व स्पष्ट बोलता आला पाहिजे. दुसऱ्याच्या बोलण्याचा आशय समजला पाहिजे. स्वतःचे विचार साध्या व सोप्या भाषेत स्वच्छपणे त्याला लिहिता आले पाहिजेत. साधारणपणे या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये याव्यात अशी अपेक्षा आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे आकर्षण निर्माण होईल. पुस्तके शिक्षण लेखन, वाचन, अर्थपूर्ण वाटेल अभ्यासात त्यांचे मन रमेल असे त्यांच्या रुचीचे बहुसंख्य पाठ पाठ्यपुस्तकांत समाविष्ट केले जावे. त्यांच्या ओळखीचे वातावरण गद्यपद्य पाठांतून घ्यावे. अमूर्त कल्पना न पाहिलेल्या गोष्टींची वर्णने व वस्तूंची माहिती यामध्ये त्यांचे मन रमणे अवघड आहे. शाळेत शिकविले जात असलेले विषय आपले नाहीत, ते परक्या भाषा विश्वातील आहेत, असे त्यांना वाटायला नको. विद्यार्थ्याला दसरा, बोहाडा, अक्षयतृतीया यासारखे परिचित सण उत्सव पाठ्यपुस्तकात समाविष्ट करावेत. कोकणी शब्दाप्रमाणे आदिवासी बोलीतील काही शब्द घेतल्यास त्यांना ते कळतील. पुस्तकातील मराठी भाषेतील संदर्भ, संकल्पना, परिस्थिती व वातावरण नित्यपरिचयाचे वाटेल. भाषा सुबोध असल्यास आकर्षणही सुलभ होईल, अन्यथा सर्वांसाठी समान असलेल्या शिक्षण पध्दतीचा फेरविचार करावा लागेल.

□□□

# आदिवासी महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व

**आदिवासी महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व :**

सामाजिक परिवर्तनासाठी स्त्रीयांना सुशिक्षित करणे अत्यावश्यक आहे. शिक्षणाचे हे मोल पंडीत जवाहरलाल नेहरुनी जाणले होते. त्यांच्या मते राष्ट्र निर्मितीत स्त्रीया देखिल पुरुषांच्या बरोबरीने समान भूमिका बजावू शकतात. म्हणून त्यांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रीयांना बरोबरीनेच बघितले. स्त्री मुक्तीसाठी स्त्री शिक्षण तेवढेच गरजेचे आहे.

अमेरिकन तत्त्ववेत्ता "प्युरिटन" यानेही म्हटले आहेच की,
"We will never be able to see humanity united and happy till God comes down to earth as a woman."

प्रत्येक देवच या भूतलावर स्त्रीरुपाने (स्त्री हृदयाने) अवतीर्ण होईपर्यंत आम्हाला मानवता, एकता व सांख्य यांचे दर्शन कधीच होणार नाही. या विचारातील मर्म लक्षात घेतले म्हणजे स्त्री शिक्षणाचे मोल विशेष स्पष्ट होते.

आदिवासी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ३४८० रुपयांचे वर जात नाही. कमावणाऱ्यांपेक्षा खाणाऱ्या माणसांची संख्या जास्त आहे. ४-५ पासून ते ३०-४० पर्यंत माणसे एका कुटुंबात आहेत. एका कुटुंबात दोन दोन बायका आढळतात. त्यात पुन्हा धरसोडीचे प्रकार . यामुळे मुलांची संख्या अधिक अशा दारिद्रय रेषेखालील जीवन जगणाऱ्या कुटुंबात महिला शिकल्या म्हणजे आपोआपच चांगले जगणेही शिकता येते. महिला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाली तर तो घराला आधार होईल. पुन्ही ती पुढच्या पिढीला शिकवील. संपूर्ण घर संस्कारित करील. मातृसत्ताक पध्दतीमुळे आदिवासी महिला सुशिक्षित होणे म्हणजे आमूलाग्र परिवर्तनाला व प्रगतीला सामोरे जाण्यासारखे आहे.

पहिल्यांदा स्त्री शिक्षण हा कौल मुलींना दिला पाहिजे. म्हणजे परिस्थिती आणि नोकरीकडे लक्ष राहात नाही. परिस्थिती आणि नोकरीचे सतत भान

ठेवायला हरकत नाही. पण त्यातच गुंतून पडल्यास शिक्षणासाठी योग्य कालावधी द्यावा लागतो आणि कळा सोसाव्या लागतात याची जाणिवच राहात नाही. त्यासाठी आदर्श सुशिक्षित स्त्रीयांची चरित्रे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणात संस्कारक्षम वयात या मुलींना वाचायला दिली पाहिजेत. शासनाच्या विद्यावेतनात भरघोस वाढ होणे गरजेचे आहे. वाटल्यास त्यातून शिकणाऱ्या मुलींच्या घराला हातभार लागला नाही तरी हरकत नाही. मुलगी शिकते याबद्दल घराला ते अर्थसहाय्य व्हायला हरकत नाही.

## आदिवासी सुशिक्षित महिला वर्गाचा विचार :

आदिवासी सुशिक्षित महिला वर्गाचा विचार करतांना आज चित्र आशादायक दिसते आहे. डी. एड. झालेल्या आदिवासी महिला शिक्षिकेच्या वाढलेल्या वेतनात समाधान मानून उत्साहाने शिकवितांना दिसतात. स्वतः जगलेले आणि भोगलेले आपल्या समोर बसलेल्या लहान मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून त्या मनःपूर्वक लोकशिक्षणाचे कार्यही करतांना दिसतात. क्वचित आदिवासी मुली राष्ट्रीयकृत बँकांमध्ये नोकरी करतांना दिसतात. त्या संपूर्णपणे शहरी वातावरणात रमल्या आहेत. परंतु आपल्या भागाचे स्मरण त्यांना सतावतांना दिसत नाही. उलट जी हौस लहानपणी भागली नाही ती भागविण्यात मोठ्या पगाराची नोकरी असलेल्या, आदिवासी महिलांमध्ये (शहरी वातावरणाचा परिणाम म्हणून) चुरस निर्माण झालेली दिसते. वस्तुतः आपल्या पूर्वस्थितीची जाणिव ठेवून आपल्या आदिवासी भगिनींच्या शिक्षणाची देखभाल त्यांना शहरात आणून त्यांनी करायला पाहिजे. सामाजिक जीवनातही काही आदिवासी महिला वावरतांना दिसतात. पण त्याही महिलांसाठी पाहिजे तेवढ्या मोठ्या प्रमाणावर स्वतः माफक सुशिक्षित असून काही करू शकत नाहीत असे दिसते.

आदिवासी सुशिक्षित मुलींना आणखी उच्च विद्या विभूषित करण्याची प्रेरणा देणाऱ्या वसतिगृह प्रमुखांनी आणि अधीक्षकांनी मार्गदर्शन करण्याची गरज भासते. गरिबीतून वर येवून शिकणाऱ्या मुलींचे मानसशास्त्र जाणून घेऊन त्यांना ती प्रेरणा देण्याची कुवत आणि प्रगल्भता त्या वसतिगृह प्रमुख स्त्री पुरुषांमध्ये असली पाहिजे. मुलींच्या जेवणापेक्षा, जीवनाचा हिशोब त्यांनी मांडला पाहिजे.

मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष दिले जाण्यासाठी कोणतीही शाळा एक शिक्षकी असू नये. उलट मुलींना आवडतील असे सणवार उदा. गोकुळाष्टमी, भाऊबीज, रक्षाबंधन, नागपंचमी साजरे करीत पारंपारिक आदिवासी कला वाद्य, संगीत, खेळ यामध्ये रमवीत शिक्षण चालू ठेवले पाहिजे. कायद्याने अल्पवयातील मोलमजूरी गुन्हा आहे त्याची कटाक्षाने अंमलबजावणी केल्यास अशा मुलींना शिक्षण घेण्याशिवाय पर्याय उरणार नाही.

मुली लहान असतांना त्यांच्याच बोलीत बोलून जिव्हाळा आणि जवळीक साधून शिक्षणात त्यांची गोडी वाढेल असें सतत पाहिले पाहिजे.

**लोकसंख्या शिक्षण आणि सुशिक्षित आदिवासी महिला :**

लोकसंख्या शिक्षण या नव्या उपक्रमाचे सार्थक आदिवासी महिलांच्या शिक्षणातच सामावले आहे. म्हणूनच येथे लोकसंख्या शिक्षणाचा विचार प्राधान्याने केला आहे. लोकसंख्या नियंत्रण कुटुंब कल्याण, आरोग्य, सकस आहार, पर्यावरण, रक्षण, विज्ञान निष्ठा, अंधश्रध्दा निर्मूलन, बचत, काटकसर इत्यादी सगळ्याच गोष्टींचे शिक्षण या एका घटकाने होते. आणि आपोआपच लोकसंख्या शिक्षणाचे भान आणि लोकसंख्या शिक्षणासाटी कार्य आपल्या हातून घडते.

सुशिक्षित आदिवासी महिला आपले जीवनमान उंचावेल, नैतिक मूल्यांची जाण बाळगील राहणीमान सुधारेल, शिक्षणातून अपेक्षित समाज पररिवर्तन आणि नव्या जबाबदाऱ्या आणि नव्या जबाबदार पालकत्वाची जडणघडण होऊ शकेल.

आज निरक्षरांमध्ये स्त्रियांची संख्या विपुल आहे. जगातील १/५ पुरुष तर १/३ स्त्रिया निरक्षर आहेत. प्राथमिक शिक्षणामध्ये मुलींचा प्रवेश अद्यापही मोठ्या संख्येने व्हावयाचा आहे. शाळेत जावून अगर प्रौढ शिक्षण वर्गातून ज्यांनी साक्षरता मिळविलेली असते त्यांना ती टिकविण्याची संधी फार क्वचितच मिळते. वाचनासाठी आवश्यक पुस्तके, वृत्तपत्रे त्यांच्या हाती पडत नाहीत आणि त्यांची साक्षरता वापरली न गेल्यास गंजून जाते. शिवाय दैनंदिन व्यवहारामध्ये आवश्यक असणारे तक्ते, पत्रके, अशांचे नमुने वाचून त्यांना उपयोगाची संधी उपलब्ध होत

नाही. आदिवासी महिलांच्या पाहणीचा अनुभव या संदर्भात लक्षात घेण्याजोगा आहे. निवडक १३५ विविध उपजातींच्या आदिवासी महिलांकडून प्रश्नावली भरुन घेतल्या त्यामध्ये

| | | | |
|---|---|---|---|
| क ठाकूर | ११ | कोकणा | ५० |
| वारली | ४५ | ढोरकोळी | ०३ |
| म. ठाकूर | ०४ | महादेव कोळी | २२ |

एकूण अशा १३५ महिला होत्या.

क ठाकूर जातीतील अजिबात शिक्षण न घेतलेल्या महिला ९, चौथीपास एक, कोकणा जातीच्या स्त्रीयांमध्ये शिक्षण अजिबात घेतलेले नाही. अशांची संख्या ३७, दुसरी पास एक, तिसरी पास दोन, चौथी पास दोन, पाचवी पास एक, सातवी पास दोन, आठवी पास दोन, नववी पास तीन, वारली जातीतील अजिबात शिक्षण न घेतलेल्या स्त्रीया - ३८, चौथी पास - १, सहावी पास - १, सातवी पास - २, नववी पास - ३, ढोरकोळी जातीतील अजिबात शिक्षण न घेतलेल्या स्त्रीया - ४, म-ठाकूर जातीतील अजिबात शिक्षण न घेतलेल्या स्त्रीया - ४, महादेव कोळी जातीतील अजिबात शिक्षण न घेतलेल्या स्त्रिया - १६, चौथी पास - १, सहावी पास - १, सातवी पास - २, नववी पास-१, दहावी पास-१, असे एकूण १३५ स्त्रीयातील शिक्षणाचे प्रमाण आहे.

महिलांनी सांगितलेली शाळा सोडण्याची किंवा शाळेत न जाण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत. शाळांचा व शाळेत विशिष्ट वर्गाचा अभाव, पुढचा वर्ग नसणे, वसतिगृहात दुर्लक्षामुळे प्रवेश न मिळणे, अनुत्तीर्ण होणे, आर्थिक प्रतिकूलता, कौटुंबिक जबाबदारी, घरकाम, धाकटी भावंडे सांभाळणे, गावापासून शाळेचे अंतर दूर असणे, शैक्षणिक दृष्टीचा अभाव असणे, अपंगत्व, बालविवाह, अनाथ, पोरकेपणा, मुलगी म्हणून शाळेत न पाठविणे, लाजेपायी शाळेत न जाणे, पतीने शिकण्यास परवानगी न दिल्यामुळे, समाजाच्या भीतीमुळे, आजारपणामुळे, शिक्षणाचे महत्त्व न पटल्यामुळे, मोठ्या बहिणीचे अनुकरण केल्यामुळे, मुलीने शिकून काय करायचे, या विचारांमुळे, बाहेरगांवी सतत स्थानांतर (कामासाठी जाण्यामुळे) अशी एकूण वीस एकवीस कारणे हाती आली आहेत. या सर्व

कारणांमध्ये निश्चितच अर्थ आहे. शिक्षण म्हणजे काय याबद्दलही खालील उत्तरे मिळाली.

जीवन जगण्याची कला म्हणजे शिक्षण, कुटुंब म्हणजे काय, समाजात काय चालले आहे वाचणे, लिहिणे, माहिती मिळवणे ज्याच्यामुळे मान मिळतो ते. समाज सुधारणा होते, ज्ञान मिळते, देशात काय चालले ते समजते, अशी मौलिक उत्तरे दिली. तर काहींनी प्रामाणिकपणे शिक्षण म्हणजे काय विचारले, तर माहित नाही असे सांगितले. तर काहींनी शिक्षण म्हणजे पैसा, नोकरी, सुसंस्कार, व्यवहार, नीटनेटकेपणा, हिशोबीपणा, अंधश्रध्दा निर्मूलन यावर भर दिला.

आश्रमशाळा म्हणजे किंवा वसतिगृह म्हणजे काय ? ते कशासाठी असते ? या प्रश्नांची उत्तरे चांगली मिळाली, शिक्षणासाठी राहाण्याचे ठिकाण त्यामुळे शाळेत वेळेवर जाता येते. शासनाकडून मोफत राहण्याची व जेवणाची सोय, गोरगरिबांना रहाण्याचे ठिकाण, चांगले वळण लावण्यासाठी, आदिवासींच्या शिक्षणाची केलेली सोय असे सांगितले.क्वचित आश्रमशाळा व वसतिगृहाबद्दल माहिती नाही असेही आढळले. १३५ पैकी ९७ महिलांनी आपल्या मुलांना शिकायला ठेवले आहे. तर ३८ महिलांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले नाही. यावरुन पाल्यांना शिक्षण देणाऱ्या वा न देणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या महिला आढळतात.

शिक्षणाचे फायदे या महिलांनी पुढीलप्रमाणे सांगितले. शिकल्याने उत्पन्न मिळते, समाजात चांगले राहाता येते, देण्या घेण्याचे व्यवहार, पत्रव्यवहार कळतात, स्वाभिमानाने उदरनिर्वाह करता येतो. आदिवासी महिलांचे अगोदरच असलेले महत्त्व आणखी वाढते, कुटुंबाची प्रगती होते, फसवणूक टळते, ज्ञान मिळते, अंधश्रध्दा कमी होते, इतरांना वाचून दाखविता येते, शासनाच्या योजना समजून त्याचा लाभ घेता येतो. नवीन अनुभव मिळतो, देशात काय चालले ते समजते, अन्याय दूर करता येतो, शहाणपण येते, विचार करता येतो, चांगले दिवस येतात, जगातल्या बातम्या समजतात, जास्त प्रवास करता येतो, चांगले संस्कार होतात, संसार सुखी होतो, तर काही स्त्रीयांना, जाहिराती वाचता येतात.

इतरांना शिकविता येते, याचे समाधान मिळते, सही करता येते, बसच्या पाट्या वाचता येतात, नवरा चांगला मिळतो, येथपर्यंत शिक्षणाचे फायदे सांगितले आहेत.

न शिकल्यामुळे झालेले तोटे सांगतांना अडाणीपणामुळे मजुरी करावी लागते, उत्पन्न मिळत नाही, व्यवहार कळत नाही, फसवणूक होते, नोकरी मिळत नाही, परावलंबी राहावे लागते, अन्याय होतो, पिळवणूक होते, समाजात मान मिळत नाही, प्रवासात त्रास होतो, डॉक्टरकडे जाता येत नाही, शेती सोडून इतर चांगली कामे करता येत नाहीत, चांगले राहाता येत नाही, मुलांना शिक्षणाला मदत करत येत नाही, दुसरे शिकले हे पाहून वाईट वाटते, वजनात सावकार फसवतात, वेठबिगारीची कामे करावी लागतात, समाजात काय चाललेय ते कळत नाही, नवऱ्याकडून होणाऱ्या हालाला, अन्यायाला तोंड देता येत नाही. बचतही करता येत नाही, तर एका महिलेने चक्क, अडाणी राहिलो याचा पश्चाताप होतो, असे सांगितले.

यापुढे आपण प्रौढ शिक्षण वर्गात भाग घेऊ, प्रगती करू, मुलांना भावंडांना शिकवू, सगळ्यांना शिक्षणाची गोडी लावू, एका शिकलेल्याने दुसऱ्याला शिकविले पाहिजे, स्वतः कष्ट सोसून मुलांना बाहेरगांवी शिक्षणासाठी पाठवायची तयारी दाखविली तर काहींनी आता आपली मुले शिकाविशी वाटतातपण मुले शिकत नाही याचे दुःख होते. आता तुम्हा आमच्यासाठी अंगणवाडी चालवा, शक्य तितक्या जवळ शाळा काढा, गरीब मुलांना सगळ्या मोफत सोयी द्या, कोणी शिकवायला आले तर आम्हाला आनंद वाटेल. वेळ पडल्यास शिक्षकांनी घरोघर जावून आई वडिलांना समजून सांगावे, खाऊ, कपडे, खेळणी, गाणी, गोष्टी, सिनेमा प्रोजक्टर प्रयोग, चॉकलेटचे वाटप, गणवेशाचे वाटप हे सारे करावे, मुलांना मागतील ते द्यावे म्हणजेच आमच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागेल. अशा या महिलांकडून आलेल्या उत्तरांचा परामर्श येथे घेतला आहे. कारण ही सर्व मिळालेली उत्तरे मौलिक आहेत. खरेतर शिक्षणातूनच लोकसंख्या शिक्षण उपक्रम यशस्वी होणार आहे. म्हणूनच त्यातल्या त्यात आदिवासी महिलांच्या शिक्षणाचा वसा घेणे नितांत गरजेचे आहे.

# आदिवासी मुलींचे शिक्षण - काही विचार

**लहान मुलींच्या शिक्षणाची हेळसांड :**

आदिवासी मुली आता आनंदाने वागडत शिकतांना दिसतात. त्यांना शाळेचा गणवेश आवडतो. लाल भडक रिबीन लावणे आवडते. पण हे सगळे चौथीच्या पुढे ! अगदी लहानपणी शिक्षण / शाळा काही कळत नाही. नुसता परकर, केस विंचरलेले नाहीत आणि उघड्या, फाटके कपडे, अस्वच्छ, भांडणाऱ्या, चिडक्या, डोके खाजवणाऱ्या, नुसती पाटी घेऊन शाळेत येणाऱ्या अशा अवस्थेत त्या मुली दिसतात.

त्यांना बालवाडी छोटी, मोठी प्रकार माहित नाही. सगळ्या जातात म्हणून हौसेखातर त्यांना शाळेत डांबले जाते. मग एखादी सावित्रीबाई फुले योजना मदतीला येते. गणवेश मिळतो. कोणी धनिक गणवेश, पुस्तके वाटपाचे कार्यक्रम करतात. विविध क्लबस, लायन्स, रोटरी इत्यादी मदतीला येतात. एक दोन दिवसाचे कार्यक्रम साजरे होतात. आश्रमशाळा शासनाच्या वतीने चालतात, त्यात मात्र निवास, भोजन, शालेय सामग्री योजना असते.

दोन दिवस आऊटिंगसाठी नागरी हौशी मंडळी येतात, पेपरला पुरवण्या निघतात. कार्यक्रमाचे फोटो छापले जातात. सामाजिक कार्य केल्याचे समाधान मिळते 'पण'. संपत नाही. महाभारतातल्या 'परंतु' सारखा.

जिल्हापरिषदा, पंचायत समित्या, आणि आदिवासी विकास मंडळे चालवीत असलेल्या प्राथमिक, माध्यमिक शाळांवर शेवटी सगळी शिक्षणाची जबाबदारी येऊन ठेपते. त्यांच्या मर्यादित कुवतीत ध्येयवादी व निष्ठावंत सहकारी कार्यकर्त्यांच्या अभावी कर्मचारी - सरकारी यांच्यावर विसंबून वर्षेच्या वर्षे पूर्ण होतात. आणि मुली शिकतात फार थोड्या ! स्वयंसेवी व समाजाला वाहिलेल्या संस्था प्रश्नांच्या मुळाला हात घालतात आणि मूलगामी उपाययोजनेचा विचार करतात. कार्यकर्त्यांचा संच जमवून विशिष्ट क्षेत्रावर आणि प्रश्नांवर लक्ष केंद्रित करुन काम करतात.

### नौकरीचे आमिष :

पुढे मात्र सहावी ते दहावीपर्यंत मुलींच्या शिक्षणाचे उल्हासाचे वातावरण आढळते. फार तर दहावी बारावीपर्यंतच. नंतर आदिवासी मुली पुढे टिकत नाहीत. कारण एस. एस.सी नंतर डी. एड्. करायचे शिक्षिका व्हायचे, फार तर ग्रामसेविका होण्यात धन्यता मानावयाची! नर्सिंग कोर्स करायचा. सिस्टर व्हायचे यापलिकडे त्यांचे फारसे मनोरथ नसतात आणि राखीव जागांची उपलब्धी असल्याने अधिकारी वर्गही त्यांना शोधून नोकरीकडे वळवतात. त्यांनाही गरज असते पहिली नोकरीचीच. कारण ज्यांनी कधी पैसेच पाहिलेले नसतात त्यांना १००० रुपये भरपूर होतात आणि टेचात (थाटामाटात) राहायला ते पुरे होतात. पण आपण शिक्षणापासून वंचित झालो नाही. जर उच्च शिक्षण घेतले आणि स्पर्धात्मक परीक्षा दिल्या तर अधिक मोठ्या वेतनावर अधिक चांगले काम अधिक मानाने करता येईल वा आले असते, हे त्यांच्या गावीही नसते. उच्च शिक्षणाचा हा असा खेळखंडोबा नोकरीच्या नादामुळे होतो.

बरं दहावीपर्यंत तरी शिक्षणात किती मुली टिकतात ? तर हजारात ५/१० च. कारण बालविवाह पध्दती ! अभ्यास झेपत नाही. घरकाम करावे लागते. शेतमजुरी करावी लागते. धाकटी भावंडे सांभाळावी लागतात. गुरे राखावी लागतात. अनारोग्य आणि अपसमजुती, अंधश्रध्दा यांच्याही शिकार बऱ्याच मुली होतात.

### स्थगन आणि गळती :

आदिवासी महिलांचे शिक्षणाचे प्रमाण नगण्य आहे. मुळात महिला शिक्षणाचेच प्रमाण १६ टक्के आहे तर आदिवासी महिलांचे शिक्षणाचे प्रमाण अवघे ३ टक्के आहे यावरून स्थगन आणि गळती चे प्रमाण या मुलींच्या शिक्षणात केवढे असेल याची कल्पना केलेली बरी. या स्थगन आणि गळतीची कारण मीमांसा काहीही असली तरी तो दुर्दैवी भाग म्हणावा लागेल की स्वातंत्र्यानंतर चाळीशी उलटल्यावरही आदिवासी महिला मुलींच्या शिक्षणाची ही दुःस्थिती आहे.

पाड्या पाड्यावर न शिकणाऱ्या मुली दिसतात. हल्ली शहरांमध्ये मोलकरणी

मिळत नाहीत किंवा जवळच्या तालुक्याच्या गावी नोकरदार वर्गही बऱ्याच मोठ्या प्रमाणात असतो. अशा वेळी पैशाच्या लोभात मुलींना धुणेभांडी, झाडकाम, मुलांना सांभाळणे, दिवसभर राबणे यासाठी पूर्णवेळ जेवण-खाण देऊन दोन-तीनशे रुपयांवर नोकरीत ठेवले जाते. त्या पैशाने या आदिवासी कुटुंबाला मदत होते. व्यसनाधीन बाप असेल तर मग त्याला ना मुलींच्या लग्नाची चिंता ना तिच्या भवितव्याची चिंता ! तो त्या पैशावर आपली व्यसनाधीनता भागवत असतो - राहतो. अगदी कमी गरजांवर जगणाऱ्या या आदर्श समाजाने मनावर घेतले तर मुलींचे शिक्षण करणे त्यांना अशक्य नाही. पण त्यात अनेक गोष्टींची सरमिसळ होते आणि सातवी -दहावीच्या पुढे मुलींच्या शिक्षणाची मजल पोहोचत नाही.

मुलींच्या शिक्षणाबाबत औदासीन्य :

पालक अज्ञान अडाणी त्यात पुन्हा बेपर्वा ! त्यांना आपल्या मुलींना शिकविणे महत्त्वाचे वाटतच नाही. कारण आदिवासी समाजात मुलगी ही तशी बापाला भार बनत नाही. उलट मुलींच्या लग्नाचे पैसे, धान्य, तांदूळ, सेवेच्या स्वरुपात, मुलीच्या बापाला फायदे होतात. घरजावई ठेवून त्याला आपल्या शेतात राबविता येते. वर्षदोन वर्षाची डाळ, तांदूळ, पोते मिळतात आणि पुन्हा मुलीच्या पक्षाचा सतत वरचष्मा राहतो. त्यामुळे पोरगी शिकली न शिकली त्याचे सुख दुःख त्याला नसते. पालक कमालीचा उदासीन दिसतो. मुलींना काही व्यक्तिमत्व विकसित करण्याचे असते, हे त्याच्या लक्षात नसते. तो त्याच्या कुटुंबात, व्यसनात आणि दारिद्र्यात पुरता गुंतलेला असतो.

आर्थिक दुःस्थिती, परावलंबन, अंधश्रध्दा यांच्या निर्मूलनावर शिक्षण हा महत्त्वाचा उपाय आहे हे या पालकांच्या लक्षात येत नाही. यासाठी खरोखर, मातृप्रबोधन आणि पितृप्रबोधनाचीही आवश्यकता आहे. ग्रामीण आदिवासी महिलांच्या शैक्षणिक परिस्थितीवर स्वतंत्र संशोधन होण्याची गरज आहे. मुलींच्या शिक्षणाच्या प्रश्नापासून त्याची सुरुवात होईल. प्रौढ शिक्षणातून ही जाणीव जागृती केली पाहिजे. शैक्षणिक उपलब्ध सुविधांची माहिती आदिवासी बोलीत त्यांना समजावून सांगितली पाहिजे. मुलींच्या स्वतंत्र शाळा (कन्याशाळा) आणि कन्या वसतिगृह प्रत्यक्षात अधिक संख्येने वाढवायला पाहिजे. जाहीर खूप काही होते,

पण प्रत्यक्षात कामे पूर्ण स्वरुपात यायला अक्षम्य विलंब होतो, तो टाळला पाहिजे.

**मार्गदर्शनाचा अभाव :**

मुलींना खऱ्या अर्थाने अगदी लहानपणीच म्हणजे इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच खऱ्या मार्गदर्शनाची गरज आहे. कारण पाया पक्का होतो तो इथेच आणि वळण लागते. वातावरण निर्मिती आणि शिक्षणाची गोडी लागते तीही इथेच. लहानपणी त्यांना महिला शिक्षिका व मुख्याध्यापिका वसतिगृह अधीक्षिका नेमल्या तर मानसिकदृष्ट्या सोयीचे होते. स्त्रियांकडे अत्यादराने पाहण्याची त्यांना सवय लागते अन्यथा ग्रामीण वातावरणात घरी दारी पुरुषांच्या बरोबरीने सहवासात वावरुन त्यांच्या मानसिक स्थितीमध्ये अनोळखीपणा येतो. त्या मुली मोकळ्या मनाने बोलत नाहीत. भावना व्यक्त करीत नाहीत. आणि आदिवासी अबोल हे समीकरण यातूनच रुढ झाले.

लहान वयात पुरुष सहवासाने त्या कौटुंबिक जीवनाकडे आकर्षिल्या जातात. त्यात पालकांच्याच मनानुसार बालवयात १३ ते १६ वर्षे वय असतांनाच विवाह घडून येतात. निदान लग्नाची बोल मागणी झालेली असते. आणि ही धनाची पेटी एका पोशाच्या स्वाधीन झालेली असते. वारुड (वाडनिश्चय) येऊन जाते. बालवयात हे थांबविले पाहिजे. मातृसत्ताक पध्दती असूनही स्त्रीच्या व्यक्तिमत्वाला वाव उरत नाही. मुलीही विवाहोत्सुक बनतात. चुली फुंकण्यात धन्यता मानतात. ७ ते ९ वी पर्यंतच्या शिक्षणातच हे घडून येते. व शिक्षणाला पूर्णविराम मिळतो. आदिवासी स्त्रीत पुरुषाच्या बरोबरीने सर्वच सामर्थ्य आहे. तेव्हा ती शक्ती केवळ शैक्षणिक मार्गदर्शनाअभावी दवडली जाते त्यासाठी जाणकार शिक्षणतज्ज्ञ मार्गदर्शक अतिग्रामीण भागात असावेत.

□□□

# आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती

**आदिवासी क्षेत्राचे शैक्षणिकदृष्ट्या वेगळेपण :**

आदिवासी क्षेत्रातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या वेगळेपण पाहताक्षणी डोळ्यात भरते. आदिवासी क्षेत्रात अद्यापही पाहिजे तसे अपेक्षित शैक्षणिक वातावरण आपण निर्माण करू शकलो नाही. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याबाबत फार पूर्वीच सांगितले होते. वेगवेगळ्या चौकशी समित्यांनी आपल्या अहवालात प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्याबाबतही भर दिला होता. तरी अद्यापही आदिवासी आणि ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण आणि दर्जेदार प्राथमिक शिक्षण सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. ही वस्तुस्थिती आहे.

आदिवासी जीवनाचे अवलोकन केले तर शिक्षणाच्या मागासलेपणामुळे जगणे आणि शिकणे यांचा काही संबंध असतो हेच आदिवासींच्या मागच्या पीढीला उलगडले नाही. आपण जसे कसे वसे जगलो तशीच मुलेही शिक्षणावाचून जगू शकतील अशीच त्यांची अजूनही समजूत आहे. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर प्रदीर्घ कालखंड उलटूनही आदिवासींचे दारिद्र्य हटले नाही. व्यसनाधिनते पासून ते परावृत्त होऊ शकले नाहीत. अज्ञान, अनारोग्य, बेरोजगारी, कुपोषण, महागाई आणि शोषण यांनी त्यांना पुरते ग्रासले आहे. मुलांना शिकविण्यापेक्षा लहानपणीच कामाला लावून त्यांचा विवाह केला म्हणजे या पालकांची जबाबदारी संपते. दारुची सवय मुलांना लावण्यातही आपले काही चुकले असे त्यांना वाटत नाही. त्यातच पुन्हा भर म्हणून विज्ञाननिष्ठेचा अभाव आणि अंधश्रध्देचा प्रभाव सर्वत्र दिसून येतो.

मुला-मुलींची अल्पवयातील कमाई आदिवासींना चालते पण विनामूल्य मिळणाऱ्या शिक्षणात गुंतलेली मुले त्यांना भार वाटतात. कारण शेतीकामात, घरकामात, रोजी कमाईत या मुलांची मदत होत नाही. धाकट्या भावंडांना सांभाळायला, गुरे वळायला ते आपली मुले वापरतात. त्यांना काही पर्याय दिसत नाही. पुढे निसर्गाच्या सानिध्यात वाढलेली ही मुले लहानपणापासूनच स्वच्छंदी, साहसी आणि भटकी बनतात. त्यांना शिक्षण ही एक निरर्थक व कंटाळवाणी

बाब वाटू लागते.

**आदिवासी भागातील शैक्षणिक समस्या :**

केवळ भौगोलिक नाही तर सांस्कृतिक अंतरही आदिवासींच्या जीवनात निर्माण झालेले आहे. नदीच्या प्रवाहातील स्वतंत्र बेटाप्रमाणेचं आदिवासी विद्यार्थी जीवन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून अलग राहून जाते.

सुधारलेल्या सुशिक्षित महानगरापासून शेकडो मैल दूर दुर्गम डोंगराळ भागात ते राहतात. जाति विशिष्ट बोली वापरणारा एक छोटा समूह या मुलांचा होऊन बसतो. ठाणे जिल्ह्यात महादेव कोळी, वारली, कोकणा, ढोरकोळी, मल्हार कोळी, ठाकूर क, म, आणि कातकरी अशा आठ जाती आढळतात. यातील कोकणा आणि महादेव कोळी समाज सुधारलेला आहे. शिक्षित आहे. त्यांना वजा केले तर, नागरी जीवनापासून दूर राहिलेली या आदिवासींची बोली; प्रमाण मराठीतील ज्ञान ग्रहण करण्यासाठी कमी पडते. त्यांची गावठी बोली हेही त्यांच्या शैक्षणिक वातावरणातील दुराव्याचे एक कारण होऊ शकते. त्यामुळे शिकू पाहणाऱ्या आदिवासींच्या जीवनातही आर्थिक सामाजिक आणि मानसिक व सांस्कृतिक कुचंबनाच आढळते.

शालेय साहित्य वेळच्या वेळी उपलब्ध होत नाही. महत्त्वाच्या विज्ञान, इंग्रजी, गणित विषयाला शिक्षक उपलब्ध होत नाही. शिक्षणाची गोडी लावून शिकविणारे भेटत नाहीत. होमवर्क करण्यासाठी होमच नाही. झोपडीत दिवाही नाही. त्यामुळे शिक्षणाचा प्रकाश पसरत नाही. आदिवासींची अल्पसंतोषी वृत्तीच त्याला कारणीभूत आहे.

आदिवासींचे नित्याचे जीवन आणि त्यांना द्यावयाचे शिक्षण यांच्यात कोठेही सुसंवाद आढळत नाही. त्यामुळेच आदिवासी शिक्षणाचा कंटाळा करतो. शहरी विद्यार्थी आणि ग्रामीण विद्यार्थी एकाच मापाने मोजले जातात. समान शैक्षणिक वातावरण नसतांना समान मोजमाप हा एकप्रकारे आदिवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत घडणारा उघड अन्याय आहे. ते असमान परिस्थितीत असतात. सुविधा

असमान असतात तेव्हा परिक्षा समान कशी ? हा खरा प्रश्न आहे. स्थळ काल परीस्थितीचा संदर्भ सोडून आपल्याला विचार करता येणार नाही.

भारतात एकूण ६ कोटी आदिवासी आहेत. त्यात महाराष्ट्रात ६० लाखांच्या जवळपास आदिवासी आहेत. एकट्या ठाणे जिल्ह्यात ६ लाखांवर आदिवासी आहेत. महाराष्ट्र राज्याच्या १६ क्षेत्रातील १५ जिल्ह्यांच्या ७५ तालुक्यांच्या ८२२५ खेड्यात आदिवासी आहेत. तेव्हा आपण या सगळ्यांपर्यंत शिक्षणासाठी केव्हा आणि कसे जाऊन पोहचणार हा खरा प्रश्न आहे. आदिवासींची कुटुंबसंस्था विस्कळित तरीही एकत्र आहे. या संयुक्त कुटुंबात, प्राथमिक शिक्षण फारतर प्रौढ शिक्षण येथ पर्यंतच मजल गेली आहे. शेतीच्या किरकोळ तुकड्यांसाठी आज आदिवासी पाड्यात पक्का गुरफटून बसला. त्यामुळे शाळा दाराशी आली तरी पोरं गुराशी ठेवणे त्यांना परवडते. आणि भाग पडते.

माध्यमिक शिक्षण मोठ्या कष्टाने जेमतेम पूर्ण केले जाते. उच्च शिक्षणाची दार खुली असूनही नोकरीला लागणे महत्त्वाचे ठरते. अल्पसमाधानी वृत्तीने शिक्षण सोडून नोकरी करणे त्यांना श्रेयस्कर वाटते.

शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्या आणि विद्यावेतने संपूर्ण कुटुंबाला उभे करू शकत नाही. शिक्षण घेतानाही कुटुंब शेवटी सांभाळावे लागतेच आणि तेच परवलीचे होऊन बसते.

### आदिवासी मुलींच्या शैक्षणिक समस्या :

ग्रामीण आदिवासी भागात बालवाडी (छोट्या मोठ्या) आस्तित्वात नाहीत. लहान मुलींना शाळा व शिकणे याची जाणिव नाही. पाड्यातील अन्य मुली जातात म्हणून त्यांच्याबरोबर त्या जातात. आणि त्यांच्या बरोबर सोबत नसल्यामुळे शिक्षणही मध्ये सोडून देतात. क्वचित सावित्रीबाई फुले योजना, गणवेश शिष्यवृत्ती, पुस्तकांचे वाटप, आश्रमशाळा यांच्या आधाराने व आमीषाने काही वर्ष शिक्षण पुढे चालू राहते. परंतु स्थगन आणि गळती या बाबतीत, मुलींचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण आदिवासी क्षेत्रात व्यापक जाणिव असलेले प्रगल्भ निष्ठावंत आणि

ध्येयवादी शिक्षण सर्वत्रच असायला पाहिजे; पण अशा शिक्षकांच्या आभावी स्थगन गळतीचे प्रमाण वाढले. काही वेळा महिला शिक्षिका असल्यास विनासंकोच आदिवासी मुलींना संपर्क साधणे शक्य होईल. परंतु आधिक तपशीलाने विचार केल्यावर असे उलगडले, की आदिवासी मुली आणि महिलांना सहशिक्षणाची आवड आहे कारण आदिवासी स्त्रीपुरुष, मुले मुली लहानपणापासून एकत्र वापरलेली असतात आणि असेच शिक्षणकाळातही चालू राहावे, असे त्यांना वाटणे गैर, वावदूक नाही. तेव्हा आदिवासी मुलींसाठी स्वतंत्र कन्याशाळा वा स्त्री शिक्षिकांची तेवढी आवश्यकता नाही.

## आदिवासी महिलांची सध्याची शैक्षणिक स्थिती :

आदिवासी मुली आणि महिला आता आनंदाने व दिमाखाने शिकतांना दिसतात. शाळेचा गणवेश त्यांना आवडतो. निटनिटकेपणा आणि टापटीप त्यांच्यात आली. शिक्षणाचा अर्थ कळत नसला, तरी राहणीमान सुधारते आणि जीवनमान सुधारण्याची ती सुरुवात असते. इयत्ता ६ वी ते १० वी या कालावधीतच मुली शिकतांना उल्हासाचे वातावरण असते. पण नंतर विवाह, डी.एड. करुन शिक्षिका होणे, नर्सिंग कोर्स करुन सिस्टर होणे, फार तर ग्रामसेविका होणे, त्यांना परवडते व आवडते. यापेक्षा अधिक मनोरथ त्या बाळगीत नाहीत. काही वेळा शिकलेल्या मुलींना अधिकारी वर्गही उच्च शिक्षणासाठी उत्तेजन न देता, नोकरीकडेच वळवितात. उच्च शिक्षण संपादन करुन अधिक मानाच्या व पगाराच्या जागा मिळाव्यात याची खंत न बाळगता त्या शहरी राहणीमानाचे अनुकरण करण्यात धन्यता मानतात.

हजारात ५-१० मुली दहावी पर्यंत टिकतात आणि त्यातील एखादी अपवाद म्हणूनच पदवीधर होते; अशी आज तरी नाशिक, ठाणे भागात स्थिती आहे. स्थगन आणि गळतीची कारणे काहीही असली तरी आजतागायत ते चालू आहेच; ही बाब असमाधानाची म्हणावी लागेल.

या अर्धवट शिक्षण घेतलेल्या मुली शेवटी मिळतील तेवढ्या पैशाच्या लोभाने जवळच्या तालुक्याच्या किंवा शहराच्या गावी कोणत्या तरी ओळखीने आणि

मध्यस्थीने धुणे, भांडी, झाडकाम, मुले सांभाळणे, स्वयंपाक व बाजारहाट करणे, दिवसभर राबणे अशी कामे पत्करतात. आदिवासी संयुक्त कुटुंबाला मुलींचे हे मिळणारे दोन तिनशे रुपये आधार वाटतात. व्यसनाधीन कुटुंब असेल तर मग त्यांना स्वतःच्या किंवा मुलीच्या भावी आयुष्याची चिंता नसते.

अगदी कमी गरजा असणाऱ्या आदिवासी समाजाने मनावर घेतले तर बारावीपर्यंतचे मुलींचे मोफतच शिक्षण करणे अवघड नाही. आश्रमशाळा आणि वसतिगृहाला ठरवून दिलेले विद्यार्थी संस्थेचे लक्ष्य पूर्ण होत नाही अशी आज स्थिती आहे. पालक बेपर्वा, त्यात पुन्हा अडाणी असल्यामुळे त्यांला मुलींना शिकविणे महत्त्वाचे वाटत नाही. कारण आदिवासी समाजात मातृसत्ताक पध्दतीचे अवशेष शिल्लक असल्यामुळे, अजूनही मुलगी ही बापाला भार बनत नाही. उलट मुलीच्या लग्नाचे पैसे, धान्य, तांदूळ जावयाकडून सेवा इत्यादी स्वरुपात वधूपित्याला फायदे होतात. घरजावई करुन आपल्या शेतात त्याला राबवता येते. वधूपक्षाचा हा सतत वरचष्मा असल्यामुळे मुलगी शिकली न शिकली, याचे त्याला सुखदुःख नसते. मुलींना काही स्वतंत्र व्यक्तिमत्व असते आणि त्यांचा काही विकास साधावयाचा असतो याचा विचार मुली आणि त्यांचे पालक करीत नाहीत. त्यासाठी मातृ पितृ प्रबोधनाची गरज आहे. प्रौढ शिक्षण माध्यमांतून ती जाणिव जागृती होऊ शकेल असे वाटते.

□□□

# आदिवासी महिलांची साक्षरता

भारतीय साक्षरता प्रमाण :

१९८१ च्या जनगणनेनुसार आपल्या देशाची लोकसंख्या ६८.५२ कोटी आहे. तर १९८१च्या जनगणनेनुसार आपल्या देशात फक्त ३६.२३ टक्के लोक साक्षर आहेत. यात पुरुषांच्या साक्षरतेचे प्रमाण ४६.८९ टक्के तर स्त्रियांचे प्रमाण २४.८२ टक्के एवढेच आहे. ग्रामीण भागात साक्षर स्त्रियांचे प्रमाण तर केवळ १७.९६ टक्के आहे. आणि त्यातल्या त्यात आदिवासी महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण नगण्य आहे अवघे अडीच ते तीन टक्के स्त्रिया साक्षर आहेत. त्यामुळे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, मनोरंजन आणि शिक्षण या साध्या मूलभूत गरजाही भागत नसून स्त्रीयांनाच त्याला सामोरे जावे लागते. कारण प्रपंचाचा भार त्यांच्यावरच पडतो. त्यामुळे निर्माण झालेल्या दारिद्रय, अज्ञान, अनारोग्य, बेरोजगारी, कुपोषण, महागाई, भ्रष्टाचार आणि व्यासनाधीनता या मुलभूत समस्यांनाही विशेष करून महिलांनाच तोंड द्यावे लागते. आपल्या देशातील ३५ टक्के लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहे. त्यांना एकवेळ पोटभर जेवण देखील मिळत नाही हे कटू सत्य आहे. हे लक्षात घेऊनच आपल्याला शिक्षणावर आणि त्यातल्या त्यात आदिवासी महिलांच्या शिक्षणावर फार मोठ्या प्रमाणात लक्ष आणि सारे बळ केंद्रित करण्याची आवश्यकता आहे.

घटनेमध्ये स्त्रीयांना स्वातंत्र्य दिलेले असले तरी प्रत्यक्ष त्यांना कुटुंबात दुय्यम स्थान दिलेले आढळते. या परावलंबित्वामुळे स्त्रीयांना मानसिक ताण जास्त सहन करावा लागतो. स्त्रीचे घर हेच विश्व बनते आणि स्त्री स्वतः निर्णय घेण्यास अक्षम ठरते. मुलींना मुलांपेक्षा कमी लेखून कमी दर्जाची वागणूक मिळते. सुधारलेल्या कुटुंबातही मुलींना शिक्षणात प्राधान्य दिले जात नाही तेथे आदिवासी स्त्रीयांची तर पंख छाटलेल्या जटायु सारखी स्थिती होते. आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वातंत्र्य प्रत्यक्ष मिळत नसल्यानेती समाजात मोकळ्या मनाने वावरु शकत नाही. शिवाय स्त्रीयांचे जीवन आज समाजात असुरक्षित आहे. महागाई, वाढती लोकसंख्या आणि परावलंबित्वामुळे स्त्री खचली आहे. पुरुषापेक्षा तिलाच कुटुंबाचा भार आणि मानसिक तणाव जास्त सोसावा लागतो. अत्याचार आणि अन्यायाला तिला

तोंड द्यावे लागते. तिच्या पदरी सर्वकाळ दास्यत्व येते. नागरी पेक्षा ग्रामीण जीवनातील अडाणी स्त्रीयांची स्थिती आणखी भयानकच आहे. चुलीवरच्या तव्यासारखे किंवा काळ्याकुट्ट कढईसारखे जीवन शिक्षणाचे अभावी स्त्री जन्मा ही तुझी कहाणी काव्यात वर्णिल्याप्रमाणे प्रत्यक्षात आहे.

'हृदयी अमृत, नयनी पाणी' अशी स्थिती आहे. याचा परिणाम स्त्रियांना सामाजिक दर्जा आणि प्रतिष्ठा नाही. फक्त हजारी २४९ स्त्रीयाच साक्षर आहेत असे १९८१ च्या जनगणनेत आढळते. वस्तुतः बुध्दिमत्ता, शौर्य यात महिला पूर्वापार कमी नाहीत आणि त्या असहायही नाहीत. रत्नावली, गार्गी, मैत्रेयी, लक्ष्मीबाई, चाँदबीबी, अहिल्यादेवी इत्यादी. मुक्ताई, जनाई, बहिणाई या साहित्य परंपरेतील गुणी स्त्रिया आहेत. जिजामातेने आपले कर्तृत्व सिध्द केले आहेच.

एक स्त्री कुटुंब सुधारते, म्हणून स्त्रीयांच्या विकासाला स्वातंत्र्य असावे. त्यांना शिक्षणाची समान संधी मिळावी. स्त्रीयांचे जीवनमान आणि राहणीमान उंचावून त्यांना व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणे भोगता यावे म्हणूनच महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण वाढविले पाहिजे आणि आदिवासी महिलांच्या निरक्षरतेचा कलंक पुसला गेला पाहिजे.

आदिवासी स्त्री शिक्षण आलेख

| वर्ष | आदिवासी शिक्षण शेकडा प्रमाण | पुरुष शिक्षण शेकडा प्रमाण | स्त्री शिक्षण शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९६१ | ०७.२१ | १२.२५ | १.७५ |
| १९७१ | ११.७४ | १९.०६ | ३.२२ |
| १९८१ | १९.३२ | २६.४१ | ९.०५ |
| १९८५ | २१.८७ | ३०.०६ | ९.४८ |
| १९९१ | २९.४२ | ३९.३३ | १९.१९ |
| २००१ | (अधिकृत उपलब्ध नाही) | | |

□□□

# आदिवासींचे प्रौढ शिक्षण - एक अनुभव

प्रौढ शिक्षणाकडे मी साधारणपणे १९८३ पासून वळलो. त्याला कराण झाले जव्हार मोखाडा या आदिवासी अतिग्रामीण भागातील नोकरीनिमित्ताने वास्तव्य ! ठाणे जिल्ह्यातील जव्हा, मोखाडा, तलासरी, वाडा, शहापूर आणि डहाणू या आदिवासी क्षेत्रातील प्रवास आणि पाहणी त्याला कारणीभूत झाली. खेड्यांपेक्षा पाडी लहान असतात. अशा अनेक पाड्यांवर जाण्याचा योग अनेक कारणांनी आला.

एक तर आदिवासी क्षेत्रातील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या जव्हारच्या नव्या महाविद्यालयानेच या कामाला गती दिली. राष्ट्रीयसेवा योजना आणि प्रौढ साक्षरता प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही या उदात्त व आत्यंतिक गरजेच्या समाजसेवेच्या कामाकडे वळलो. १९८४ ते १९९२ या ८ वर्षात आमच्या महाविद्यालयामार्फत आम्ही एकूण १०० केंद्र प्रत्यक्षात चालविली. या प्रौढ साक्षरता केंद्राच्या निमित्ताने १०० केंद्रम्हणजे १०० पाड्यांवर आमचे काम झाले आणि ५००० हून अधिक प्रौढांना आम्ही साक्षर करू शकलो. साक्षरते नंतरच्या जनशिक्षण निलयम Post Literacy सारख्या उपक्रमाला राबवू शकलो. या कामाबद्दल मुंबई विद्यापीठाने उत्कृष्ट योजना राबविली म्हणून आमच्या नागरमोडा या पाड्यातील जनशिक्षण निलयम केंद्राला एक टी. व्ही. भेट दिला होता.

आदिवासी भागातील ठाणे जिल्ह्याचा हा संपूर्ण पट्टा बारकाईने एकदा तुम्ही पाहिलात की अगदी निर्भयपणाने तुम्ही या प्रौढ साक्षरतेच्या कामाला लागावे, अशी अजून स्थिती आहे आणि या कामाचे मानसिक समाधान फार मोठे आहे. प्रौढांना नुसत्या अ आ इ ई या बाराखडी शिकण्यात आणि १ ते १०० आकडे शिकण्यात स्वारस्य नाही ते लगेच कंटाळतात. परस्परांकडे पाहून मिस्किलपणे हसतात, चेष्टेवारीने घेतात हे लक्षात घेऊन आम्ही त्यांच्यासाठी खास उपक्रम नेटाने राबविले. उदरनिर्वाह आणि रोजगारीला चालना मिळविल असे अभ्यासक्रम जनशिक्षण निलयम माध्यमातून आम्ही वापरले. उदा. पत्रावळी तयार करणे. कुक्कुट पालन, खडू तयार करणे इत्यादींचे प्रशिक्षण या प्रौढ शिक्षणाची गोडी लागण्यासाठी आवश्यक आहे. अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच आरोग्य, शिक्षण

आणि मनोरंजन या गरजाही पूर्ण करण्याच्या दिशेने शिकवतांना प्रयत्न व्हायला पाहिजे हे लक्षात आले. जाणीव जागृती आणि कार्यात्मकता यांची प्रौढ शिक्षणाशी आपल्याला सांगड घालता आली पाहिजे. परिपक्व आणि प्रगल्भ मुलांचे नव्हे, प्रौढांचे हे शिक्षण आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. या शिवाय प्रौढांसाठी अक्षर आणि अंक ओळखीच्या शिक्षणाबरोबर विविध सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले होते. नवसाक्षर प्रौढांचे आम्ही वेगळे स्नेहसंमेलनही भरवीत असू. अर्थात तारपा नृत्य, ढोल, नाच, तमाशातल्या सारखे संवाद, गप्पा, टप्पा असे कार्यक्रम आम्ही त्यात गोवीत असू. भजन मंडळ त्यांना स्थापन करायला लावून परिसरातील भजनी मंडळाच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. श्रमदानाचे कार्यक्रम घेतले. ओटे, पार आणि मंदिराचे बांधकाम त्यातून झाले. आणि शिकण्यालाही चालना मिळाली. नवसाक्षर प्रौढांच्या संदर्भात सांगता येण्याजोगे भरपूर अनुभव गाठी आहेत. त्यातील फक्त एक निवडक सांगतो.

एका प्रौढ शिक्षण वर्गात पाहुण्यांसह गेल्यानंतर सगळे विद्यार्थी वर्गात उठून उभे राहून स्वागत करावयाचे. एक माणूस बसूनच राहिला तेव्हा मी विचारले काय रे ! बाबा, तुम्ही उठून उभे राहू इच्छित नाही ? तुझी इच्छा नाही का ? तेव्हा दुसरा प्रौढ परस्पर उत्तरतो, सर तो कमरेत मोडला आहे. त्याला नीट उभं राहता येत नाही, मग आता आम्ही देतो हे शिक्षण कशासाठी आहे? तू काय करणार आहेस. त्याला असंच खेड्यात उपचाराविना ठेवणार? काय अडचण काय ? त्याला दवाखान्यात का नेत नाही. तेव्हा तो म्हणाला कंडक्टर जवळचा स्टॉप असल्याने बस थांबवित नाही. कंडक्टर म्हणतो अरे जवळच गांव आहे. गांवकरी मंडळींनी बसला आडवे व्हावे. ड्रायव्हरला नीट समजून सांगा, तुमची गर्दी पाहूनच तो डबल बेल मारतो. 'त्याला सायकलच्या कॅरिअरवर बसवून उद्याच कॉटेज हॉस्पिटलला नेणार आहे.' एक विद्यार्थी उत्तरला. दवाखान्यात गेल्यावर घडली ती घटना पुन्हा अजबच ! त्याला तिथल्या डॉक्टरने पैसे मागितले. तेव्हा सरळ त्या प्रौढाने डॉक्टराल विचारले की 'साहेब सरकारी मोफत दवाखाना मग कोणता आहे, जेथे पैसे लागत नसतात?' हे ऐकताच डॉक्टर खजील झाला आणि म्हणाला, अरे मी गमतीने तुला सहज सांगितले. इथे पैसे लागत नाही. जागरुकतेमुळेच तो साक्षर प्रौढ विनामूल्य योग्य उपचार घेऊ शकला.

# आदिवासी क्षेत्रातील उद्योजकता

आज युवकांना नोकरीपेक्षा शिक्षण प्रशिक्षण शासनाच्या सहकार्याने आत्मविश्वास आणि स्वावलंबनाच्या बळावर उद्योजक म्हणून पुढे यावे असे आवाहन केले जाते. सद्य परिस्थितीत ते अत्यंत उचितही आहे. पण आता ग्रामीण, अतिग्रामीण आणि विशेषतः आंदिवासी क्षेत्रात उद्योजकता वाढीला लागणे महाकठीण वाटते. प्रत्यक्षात उद्योजकता वाढीची कल्पना मूर्त रुपात साकार होण्यात कोणकोणत्या अडचणी आहेत, किंबहुना अडचणी असू शकतील त्याचा विचार प्रस्तुत लेखात संक्षेपाने करावयाचा आहे.

**दळणवळण सुविधांचा अभाव :**

या संदर्भात पहिली उणीव भासते ती म्हणजे वाहतूक आणि दळणवळण, सुविधांचा अभाव. आदिवासी क्षेत्र अतिग्रामीण क्षेत्रापुरताच विचार येथे करावयाचा असल्यामुळे कोठूनही झटकन संपर्क साधण्याची सोय नाही. किमान ७५ ते १०० किलो मीटर आत हा भाग असतो. रेल्वे, खासगी माणसांची वाहतूक करणारी बस, टॅक्सीची व्यवस्था तर दूरच, पण बस व्यवस्थाही त्याच्याही काही व्यावहारिक अडचणी असल्यामुळे, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या नियंत्रणानुसार अत्यंत मर्यादित असते. त्यामुळे सांस्कृतिक अभिसरण, प्रेरणा प्राप्ती, संपर्कातून नवीन गोष्टी शिकणे, नव्या जगाची आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होणे अवघड होऊन जाते. प्रवासखर्च भरमसाठ वाढतो. बेरोजगार युवा अवस्थेत तरी यावर काही उपाय योजूनही सापडत नाही. हा खर्चिक व कालापव्यय करणारा प्रवास खर्च झेपत नाही.

**जनसंपर्क माध्यमांचा अभाव :**

दूरभाष किंवा दूरध्वनी मुंबई, पुणे अशा उद्योगसमूह असलेल्या ठिकाणी संपर्क साधतांना फारसे उपयुक्त ठरत नाहीत. यात वस्तुस्थिती अशी आहे की कर्मचाऱ्यांचे संपूर्ण सहकार्य लाभूनही तासनतास टेलिफोन ट्रंककॉलसाठी वाटपाहावी लागते. शिवाय टेलिफोन लागला तरी बोलणारे म्हणतात तुमच्याशी टेलिफोन वरुन मोठ्याने बोलावे लागले की, दिवसभर डोके दुखते. अशा

परिस्थितीत तरी तातडीने मार्गदर्शन आदिवासी क्षेत्रातील उद्योजकांना मिळणे मुष्किल आहे. तार किंवा टेलिग्राम किंवा टपाल व्यवस्था यांचाही विचार केला तर कोणत्याही अतिग्रामीण आदिवासी क्षेत्रात सर्व संबंधितांनी नेटाने प्रयत्न करुनही व टपाल क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी सर्व काळजी घेऊनही, अपेक्षेपेक्षा जास्त विलंब हा होतोच. समोरच्या मार्गदर्शकाच्या प्रतिसादासाठी अनेकदा तिष्ठत किंवा खोळंबून रहावे लागते. त्यामुळे उद्योजकतेची उर्मी कंटाळून ओसरु लागते. प्रारंभीचा उत्साह अशा परिस्थितीत टिकवून ठेवणे अवघड होऊन बसते.

## प्रतिसादातही प्रतिकूलता :

समजा सगळ्या अडचणींवर मात करून कोणत्याही प्रकारे ना उमेद न होता समक्ष उठून कार्यालयांमध्ये वा मान्यवरांकडे युवक भेटण्यास गेला, तर तेथे त्याची निवास भोजनाची व्यवस्था नसते. बेरोजगारीच्या या काळात महापालिका असलेल्या मोठ्या औद्योगिक क्षेत्रात मार्गदर्शनासाठी जाणे, सतत आर्थिक अडचणी न सांगता टाळत राहणे, एवढेच शिल्लक उरते. समजा तो तरीही मोठ्या सहाय्यापर्यंत सल्ला घेण्यासाठी पोहोचला तरी, अशा वेळी अवेळी पोहोचणाऱ्याला लांबून आलेल्या घामाघूम झालेल्या युवकाला अपमानित होण्याचा प्रसंग येतोच. एक तर त्याने अपॉइंटमेंट घेतलेली नसते. अतिग्रामीण भागातून ती पत्राने घेताही येत नाही. दुसरे तो कोठेही नियोजित वेळेला पोहोचू शकत नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या विश्रांतीच्या, जेवणाच्या, काम संपविण्याच्या अशा अवेळीच, तो जेमतेम कार्यालयापर्यंत जाऊन पोहोचणार अशा वेळी माणुसकीचा ओलावा असलेले अधिकारी जरुर ती सर्व गैरसोय सोसून त्या युवकाला मार्गदर्शन करतील; पण पुष्कळदा उपेक्षाच पदरी पडण्याची शक्यता अधिक असते. क्वचित अवमान झाला तरी गिळावा लागतो. ही बुध्दी या उसळत्या युवकास नसते. तो पुन्हा मार्गदर्शनासाठी म्हणून कोणाकडे जायचे नाही, असेच ठरवित असेल तर नवल नाही.

## कौटुंबिक स्थितीमुळे माघार :

आपल्या अनेक युवकांमध्ये स्वतंत्र व्यवसाय थाटावा, उद्योजक म्हणून उभे राहावे अशी उमेद दिसते. पण कौटुंबिक स्थिती तर अनुकूल नसतेच पण पालकांची

मनःस्थितीही साथ देत नाही. उत्तम नौकरी हा भलताच समज रुढ होत आहे. वस्तुतः कनिष्ठ चाकरी, उत्तम शेती हा आपला महामंत्र होता. बरं त्यातूनही एखादा युवक प्रतिकूल परिस्थितीतही धडपडतो तरीही त्याला घरच्या नातेवाईकांकडून नाउमेद केले जाते. त्यांना उद्योजकतेऐवजी ते नसते उद्योग वाटतात. आर्थिक व मानसिक पाठिंबा आदिवासी ग्रामीण युवकाला धरून म्हणाल तर अक्षरशः शून्य असतो. कोणीही नोकरीचाच आग्रह धरतो. कारण घरची कमालीची गरिबी. त्यात शिक्षण घेतले आणि पुन्हा पुढे तात्काळ पैसा मिळणार नाही तर वाट पाहावी लागेल, जम बसावा लागेल अशा समस्या असतात. उत्साही युवकाने व्यवसायाचे नियोजन केले, समजा तो सुरू केला तरीही त्यात काही असे म्हणून बंद करणारे नाउमेद झालेले युवक भेटतात. याचे कारण आर्थिक नसो पण मानसिक पातळीवरही पाठिंबा मिळत नाही. जेथे मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाची ही स्थिती तेथे आदिवासी क्षेत्राची काय वर्णावी ! त्यामुळे आदिवासी क्षेत्रातील उद्योजकेतसाठी असलेल्या विपुल सोयी आणि सुविधांचा लाभही घेता येत नाही.

**प्रशिक्षण कौशल्य दुष्प्राप्य :**

यंत्रसामग्रीचा परिचय त्या क्षेत्रातील प्रशिक्षण, विक्री, उत्पादनकौशल्य, आदिवासी ग्रामीण क्षेत्रातील युवकांना दुष्प्राप्य असतात. अनोख्या दूरच्या क्षेत्रातील युवकास एक दिव्य असते. त्यांच्या निरनिराळ्या मुक्त कृषी संलग्न वातावरणाला आणि नवीन संस्कृतीला तो पारखा होतो, कंटाळतो. त्यात नित्याच्या गैरसोयींची भर पडते आणि कधी गावी परत फिरु, असे त्याला होऊन जाते. प्रशिक्षणसाठी आणि कौशल्यप्राप्तीसाठी बैठक लागते, चिकाटी लागते, मानेवर खडा ठेवून काम करावे लागते. यालाही आमच्या आदिवासी ग्रामीण युवकांची मनाने तयारी नसते. कारण ते विमुक्त ग्रामीण कृषी संस्कृतीत वाढलेले असतात. त्यांना कंपनीतील उद्योजकता कराव्या लागणाऱ्या सलग आठ तास कामाचे वळण नसते. त्यामुळे मनापासून प्रशिक्षण घेणे व त्यातून कौशल्य प्राप्त करुन घेणे, त्यांना सहज शक्य व सुसह्य होत नाही. उलट जिकिरीचे होते. शिवाय या कालावधीत मिळणाऱ्या तुटपुंज्या स्टायपेंड पुरेसा होत नाही. केवळ विद्यावेतनावर भागत नाही. त्यामुळे बरेचसे अर्धवट प्रशिक्षण सोडतात. आणि नागरी संस्कृतीत अर्धवट शामील होतात.

ग्रामीण जीवनात रमत नाहीत आणि नागरी जीवनात जमत नाही अशी स्थिती होते.

**उद्योजकतेसाठी लागणाऱ्या वृत्तीचा अभाव :**

समजा बँकेचे कर्ज घेऊन, सिकॉम किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे (महावित्त) विशेष अनुदान घेऊन काही छोटा मोठा उद्योग सुरू केला तरी, आदिवासींना आपल्या परंपरा, सणवार, संस्कृती जपणे स्वाभाविक महत्त्वाचे वाटते. त्यामुळे उद्योगप्रियता आणि सतत अहोरात्र न थांबता, जे कष्ट, उद्योग उभारतांना प्रारंभी अपेक्षित असतात, तो ते करू शकत नाही. कुणीतरी आपल्याकडून मुकादमी करून काम करून घेण्याची सवय, अंगवळणी पडलेली त्यामुळे बेसावध राहतो. शेवटी स्वतःचे उद्योगापेक्षा रोजंदारीची नोकरी बरी, कर्ज-व्याज फुगते, खर्च भागत नाही कारण अपेक्षित उत्पादन नाही. शेवटी घेतलेली मशीन विकायची तयारी असते.

**खरेदी विक्री व्यवस्थेचे अज्ञान :**

आपल्याला लागणारा कच्चा माल किफायतशीरपणे आदिवासी क्षेत्रात कोण पुरवू शकेल, पोहोच देईल, कोणत्या प्रमाणात खरेदी केली तर ते विशेष भावशीर होईल, याचे ज्ञान नसते. कोठून, कधी खरेदी करावी. पत नसल्याने कोणी उधार देईल काय हे सगळेच आदिवासी क्षेत्रातील उद्योजकांच्या पुढे प्रश्न असतात. बरं आयात उत्पादन एवढ्या अडीअडचणीतून जरी त्याने तयार केली तरी जाहिरात कला ही कलियुगातील १९ वी विद्या त्याला पारखी असते. तयार केलेला माल खपवायचा कसा ? कोण मोठ्या प्रमाणावर खरेदी करणार ? घाऊक विक्री व्यवस्था नाही. वाहतूक खर्च वाचविण्याचे कौशल्य अवगत नाही. आपली तयार केलेली वस्तू ओरडून विकण्याची फिरून विकण्याचा संकोच वाटतो. अशा परिस्थितीत ज्याला आयात मार्केटिंग म्हणतो त्याची सांगड घालणे जमत नाही. शासनाकडून, आदिवासी विविध मंडळांकडून एका मर्यादेपलिकडे हातभार लागत नाही. आणि त्यांना विशिष्ट मर्यादेतच असे सहकार्य देणे शक्य असते. परिणामी माल उठत नाही. गोडाऊनमध्ये पडून राहतो आणि उद्योजकातील धमक खचू लागते.

**चिकाटीनेच उद्योजकता वाढेल :**

आदिवासी क्षेत्रात स्त्रियांनी ना उमेद न होता केवळ नोकरी व्यवसाय मार्गदर्शन केंद्रात नावे नोंदवून, स्वस्थ न बसता मोठ्या ज़िद्दीने आणि चिकाटीने अशक्य काही नाही, असे समजून उद्योजकता वाढविली पाहिजे. फार तर त्यासाठी एखादी पिढी खर्ची पडते, पण मग पुढच्या अनेक पिढ्यांचा मार्ग सुकर होतो. "पंगुम लंघयते गिरिम" म्हटले जाते ते याच प्रयत्नांच्या बळावर; म्हणून सर्व समस्यांवर मात करुनच दाखवावे. समस्या सोडवतो त्याला युवक म्हणतात. हीच अपेक्षा आदिवासींकडून आहे.

□□□

# आदिवासी : व्यक्तिवेध

## पेठचे वनबंधू गंगाराम आवारी गुरुजी

आवारी गुरुजी गेले. त्यांना-वनयोगी म्हणण्यापेक्षा वनबंधू म्हणणे अधिक उचित होईल. ते कुटुंब वत्सल राहून वनवासींच्या हितासाठी आहोरात्र झटले. वनवासींचा विकास व्हावा ही त्यांची सुरवातीपासून तळमळ होती. त्यातूनच त्यांचे कार्य सिध्द होत गेले.

पेठच्या वनवासींबांधवांच्या आग्रहावरुन जरी नाशिकला आवारी गुरुजी यांचे दिनांक ८ जुलै २००३ मंगळवारी दुपारी १.४२ दु:खद निधन झाले होते. तरी त्यांचीं अंत्ययात्रा पेठमधील त्यांच्याराहत्या पाड्यावरुन पडत्या पावसात काढावी लागली. एवढा गुरुजींच्या विषयीची जिव्हाळा त्यांच्या आप्तेष्टांना, आणिचाहत्यांच्या परिवाराला होता. हेच या घटनेतून उलगडते. एवढेच नव्हे तर सुमारे ३००० चा समुदाय भरपावसात कशाबश्या छत्र्या सावरुन म्हणजे एक छत्री ४-५ लोक असे चिखलमाती तुडवत अखेरपर्यंत आपल्या आवडत्या गुरुजींच्यासाठी उभे होते. त्याही वेळी उंच बांबूंनी ताडपत्री हाती उभारून त्यापाड्यातील स्मशान भूमीत गुरुजींचे पोलिसी इतमामात शासकीय मानवंदना आणि सलामी देऊन दहन केले; अंत्यविधी आटोपला.

**उरल्या केवळ आठवणी :**

वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र प्रांताचे गुरूजी अध्यक्ष होते. एक वनवासी, हिंदू संस्कृतीचा जाणकार, जिद्दीचा व ठामपणे भक्कम कार्य करण्यास प्रवृत्त झालेला वनवासी कल्याण आश्रमाचा आधारवडच गुरुजींच्या दु:खद निधनाने कोसळला आहे. आता त्यांच्या असंख्या आठवणी केवळ उरल्या आहेत आणि त्याच मनामध्ये दाटतात.

अत्यंत साधेपणाने वावरणारे गुरुजी होते. तांबुस काळसर रंग, डोळ्यात बुध्दिमत्तेची चमक, अंगात स्वच्छ नेहमीचा कॉलरचा धुतलेला सदरा, धोतर, पायात

चप्पल आणि डोक्यावर किंचीत तिरकी पांढरी टोपी. अशी मध्यम उंचीची गुरुजींची मूर्ती होती. सहस्त्र दर्शन झाल्यावर म्हणजे ८० वय उलटूनही गुरुजींचे दात मजबूत होते. चावण्याची तक्रार नव्हती. कानाने कमी ऐकू येत नव्हते. आहाराच्या तक्रारी नव्हत्या. नजर नॉर्मल होती. दिसण्याची, डोळ्यांची तक्रार नव्हती. न थकता तरुणांनाही लाजवेल असे त्यांचे चालणे होते. हे विस्ताराने येथे सांगण्याचे कारण प्रत्यक्षात हे सारे गुरुजींच्या सहवासात प्रत्येकाला अनुभवायला मिळाले. गुरुजींची कार्यक्षमता, बुध्दीची चमक शेवटपर्यंत टिकली.

**अखिल भारतीय वनवासी कार्यकर्ता सम्मेलने :**

रायपूर, कानपूर आणि गतवर्षीचे वाराणसी येथे साजरा झालेल्या अशा तिन्ही अखिल भारतीय पातळीवरील कार्यकर्त्यांच्या संमेलनात महाराष्ट्र प्रांताचे वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष या नात्याने गुरुजी वयाची ८० वर्षे पूर्ण होऊनही उपस्थित होते. त्यानिमित्ताने तिन्ही वेळा २०-३० तासांचा रेल्वे प्रवास आम्ही गुरुजींसमवेत केला. त्यांना सांभाळून नेणे व परत आणणे ही जणू सोबतच्या प्रत्येकाला निदान मनातल्या मनात तरी जबाबदारी वाटत असली पाहिजे. पण हे तिन्ही संमेलनाच्या निमित्ताने केलेले प्रवास उलट गुरुजींच्या सोबत अत्यंत सुखावह झाले. माफक आहार, वाचन सतत चालू, इतरांनी विषयालातोंड फोडलेच तर त्यावर आपल्या अधिकारवाणीने गुरुजी बोलत. चर्चा करीत; आपली मत मांडीत. काही आठवले की मधूनच वही, डायरी काढून त्यातून वाचून दाखवीत किंवा त्यात टिपण नोंदी करीत असत.

त्यांची नोटबुक किंवा लिहलेली वही ते जीवापलिकडे कमालीची जपत असत. एकदा त्यांनी वही माझ्याकडे वाचायला दिली आणि त्याचा त्यांना विसर पडला. तर त्यांनी लगेच माईकवरुन निवेदन करायला लावले. महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष आवारी गुरुजी यांची वही कोणाला सापडली तर ती कार्यालयात जमा करावी. त्यांना माझ्याकडे 'वही तुम्हीच दिली होती' हे कळल्यावर सापडल्याचा केवढा आनंद झाला होता. याचा अर्थ टायपिंग, झेरॉक्स, डी.टी.पी. या काहीच सुधारणा आणि साधने हाताशी नसतांना खेड्यापाड्यात राहून गुरुजींनी क्षणाक्षणाला वेळ कारणी लावून सगळी वनसंपदा आणि वनविद्या टिपली होती. त्यांची दुसरी प्रतही

त्यांच्याकडे हातानेच लिहिलेली असणार : सुवाच्च हस्ताक्षर, टापटीप, नीटनेटकेपणा, स्वच्छता आखीवरेखीवपणा ही सारी गुरुजींची खास वैशिष्ट्ये लेकनात सामावलेली होती. म्हणून ते वही जपत असत.

काही दुर्मिळ आठवणी :

गुरुजींनी वनवासी शब्दांचा कोश तयार केला . त्यात सुमारे ३००० शब्द कातकरी, वारली, महादेव कोळी, कोकणा समाजातील आहेत. पेठ, सुरगाणा, धरमपूर भागातील आहेत. मराठी शब्दकोशात हे शब्द नसल्यामुळे त्यांचे मराठी अर्थ दिलेले आहेत. अशा त्यांच्या संग्रहातील हा शब्दकोश प्रकाशित होणे गरजेचे आहे.

गुरुजींच्या म्हणण्यानुसार सर्पाला आवाज स्वरयंत्र असते आणि ते आम्हा आदिवासी वनवासीना बरोबर कळते. मारूती चित्तमपल्लीच्या साक्षीने या घटनेची नोंद आहे. विशिष्ट वनौषधी पान, जवळ बाळगल्यास सापाची भीती राहत नाही. म्हणून आम्ही जंगलात एकटे आजवर सुरक्षित फिरलो, असे ते म्हणतात.

वाघाला तुमच्या स्त्रीया सुध्दा कशा भीत नाहीत, खुशाल त्या वाघाची डरकाळी ऐकतात आणि लहान मुलाला मांडीवर घेतलेल्या अवस्थेत बसून राहतात. यावर गुरुजी सांगत 1शेवटी जाणार कुठे ? कुडाचं झोपडं मोडून वाघ आत येऊन खाईलच मग संरक्षणच आतबाहेर कुठे नाही, तर मग घाबरून जीव वाचवायचा कसा?2

धर्मांतराबद्दल गुरुजींचे म्हणणे असे की ख्रिश्चन मिशनरी जर धर्मांतराचा हेतू न ठेवता सेवाधर्म पाळणारे असते, तर मग रात्रीच्या गुपचुप मिटींग ते का घेतात? उजागर सगळ्यांना सांगून जाहीर विचार ते का मांडीत नाहीत?

हिंदु महादेव कोळी याती 'हिन्दू' शब्द शासनाने दाखल्यातून गाळावा असे परिपत्रक काढले तेव्हा गुरुजींनी हिंदूच्याच परंपरा जोपासणारे आम्ही असून डोंगरदेव, शंभूनाथ, म्हणजे महादेव हे आमचे दैवत आहे. शेवट हा लढा यशस्वी झाला आणि हिन्दू महादेव कोळी लिहू नये हे परिपत्रक मागे घेतले गेले. ठाम

भूमिका घेणारे गुरुजी होते. आदिवासी हिंदूच आहे असे त्यांचे मत होते. राष्ट्रद्रोही चळवळी विरुध्द त्यांनी समाजजागृती सातत्याने केली. श्रध्दा जागविली.

**वनौषधी तज्ज्ञ गुरुजी :**

नाशिकच्या डॉ. वि. म. गोगटे यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने गुरुजींनी वनौषधीची माहिती प्रथम प्रकाशित केली. त्यांचा इंग्रजी अनुवादही झाला असावा. त्यानंतर स्वतः सखोल माहिती मिळवून ६५० वनौषधी त्यांनी नोंदवून काढल्या. औषधे रानावनातली (२००२) आदिवासींचे परंपरागत उपचार, ही त्यांची पुस्तके प्रसिध्द असून या कामी आयुर्वेद सेवा संघ नाशिकचा सहयोग त्यांना लाभला आहे. कोईमतूरच्या लोकस्वास्थ संवर्धन समितीचे ते आजीव सदस्य होते. कर्जत तालुक्यातील कशेळे येथील आयुर्वेद संशोधन संस्थेचे ते आजीव सल्लागार होते. पहिले अध्यक्षपदही त्यांना लाभले. पक्षांच्या पीसापासूनही विविध गुणकारी औषधी बनविता येतील याची नोंद त्यांच्याकडे असून त्यावर अधिक संशोधन ते करीत होते. लखवा आणि मूळव्याध ते हुकमी बरी करीत होते. या दोन रोगांवरील उपचारांसाठी त्यांची ख्याती होती.

**गुरूजींच्या नोंदी : टीपण वहीतील :**

माशांचे प्रकार त्यांनी शोधले होते. जलचरांचा अभ्यास ते करीत होते. १२२ पक्षी आणि त्यांची घरटी, त्यांचे प्रकार याची नोंद त्यांच्याकडे आहे. वेलींची नावे आणि प्रकार त्यांनी लिहीलेले आहेत. कीटक, वन्यपशू, पक्षी, सर्पांच्या जाती यांच्या नोंदी त्यांनी वहीत केलेल्या आहेत. थोडक्यात ग्रामजीवन, वनोपज, निसर्ग सृष्टीचे सूक्ष्म निरीक्षण करुन गुरुजींनी ही टिपणे अनुभवातून घेतली आहेत. त्याचे जतन तर केले पाहिजे पण त्यात पुढच्या अभ्यासकांनी विशेष भर टाकली पाहिजे. १९५७ मध्येच त्यांचे, 1आदिवासी लोकगीते2 हे पुस्तक प्रसिध्द झाले. त्यांचे पुनर्मुद्रण केले पाहिजे.

**आवारी गुरुजींचा चरित्रपट :**

गंगाराम जानू आवारी गुरुजी यांचा जन्म ५ जुलै १९१९ पेठ तालुक्यातील 'बोरवट' गावी जाला. त्यांचे शालेय शिक्षण फक्त सातवी पर्यंत १९३६ झाले

होते. १९३६ ते १९४२ या कालावधीत माळेगाव, शिरसगाव, बोरवट, जातेगाव येथेप्राथमिक शिक्षक म्हणून त्यांनी काम केले.

१९४२ मध्ये पेठ धरमपूर भागातील दुष्काळ निवारण्याचे काम ठक्कर बाप्पांच्या प्रेरणेने कार्य केले. सरकारी नौकरा सोडली आणि यावेळी डांगसेवा मंडळाचे कार्यकर्ते झाले. १९५० पर्यंत ते कॉंग्रेसचे सेक्रेटरी होते. मान्यताप्राप्त स्वातंत्र्य सैनिक होते. गुरुजींनी सर्वोदय योजना, जंगल कामगार सोसायची सारख्या संस्थांत जे कार्य केले, त्यांची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने १९७४ मध्ये दलित मित्र व १९८७ मध्ये आदिवासी सेवक पुरस्कार त्यांना बहाल केले. १९८४ पासून गुरुजी वनवासी कल्याण आश्रम कार्यात सहभागी झाले. महाराष्ट्र प्रांताचे ६ वर्षे उपाध्यक्ष व २००१ पासून महाराष्ट्र प्रांत वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष म्हणून २ वर्षे त्यांनी काम केले.

वनवासी कल्याण आश्रम ही भारतभर आदिवासींमध्ये संघर्षरहित काम करणारी सर्वस्पर्शी संस्था आहे, असे त्यांचे मत होते ते त्यांनी सर्वत्र मांडले आहे.

तात्पर्य २० व्या शतकातील एक आदिवासी साहित्यिक, आदिवासी संशोधक, आदिवासी संस्कृतीचा जाणकार काळाच्या पडद्या आड केला. त्यांची उणिव कायम जाणवतच राहणार आहे. गुरुजींना महाराष्ट्र शासनाने दलितमित्र (१९७४), आदिवासी सेवक (१९८७) या पुरस्काराने गौरविले, तसेच त्यांना पु.भा. भावे, नंदिनी, जीवनव्रती, वनयोगी, आणि डॉ. हेडगेवार सेवा पुरस्कार प्राप्त झाले. सुदैवाने हयातीत त्यांचा हा उचित पुरस्कारांनी गौरव झाला असला तरी गुरुजी हा स्वतःचा गौरव न मानता आदिवासींचा, असंख्य कार्यकर्त्यांचा प्रतिनिधीचा गौरव मानत होते.

□□□

# परिशिष्टे

## (अ.) आदिवासी कल्याण पदविका अभ्यासक्रम

अ. भारतातील आदिवासी संस्कृती

उद्दिष्टे : भारतातील विविध विभागातील आदिवासी संस्कृतीचा अभ्यास आदिवासींच्या विविध समूहाचे ठळक विशेष आणि त्यांचा संस्थात्मक अभ्यास.

१. जमातीचा अभ्यास कशासाठी ? आदिवासींचा अनुवंशिक इतिहास व परंपरा

२. भौगोलिक विभागणी -
हिमालय विभाग आणि पूर्व भारत - मध्यभारत
पश्चिम भारत - दक्षिण भारत

३. भारतातील आदिवासींची वर्गवारी
भाषिक नैतिक आर्थिक सांस्कृतिक

४. भारतातील आदिवासींच्या संघटना
आर्थिक संघटना
सामाजिक संघटना
कायदा आणि राजकीय संघटना धर्म आणि दैवी चमत्कार संघटना
कला आणि साहित्य विषयक संघटना

५. महाराष्ट्रातील कोणत्याही दोन शिलालेखांचा अभ्यास

ब. आदिवासी विकासाच्या समस्या :

उद्दिष्टे - आदिवासी विभागातील आदिवासींच्या विकासातील अडचणी आणि समस्यांच्या वेगळेपणाचा अभ्यास.

१. आदिवासींच्या समस्यांच्या अभ्यासाचे विविध मार्ग आदिवासी कल्याणाच्या कार्याचा (चळवळीचा ) भारतातील इतिहास, घटना, आणि अनूसुचित जमाती

२. आदिवासींच्या समस्या -
जिल्हावार समस्येचे वेगलेपण विभागीय व राष्ट्रीय समस्या

३. खालील समस्यांचा विचार -

| | |
|---|---|
| जमिन आणि शेती | वन |
| कर्जबाजारीपणा | संपर्क संज्ञापण समनुयोग |
| शिक्षण | औद्योगिकरण |
| सहकार | लोकशाही विकेंद्रीकरण |
| घर बांधणी | ग्रामीण उद्योग |

क. आदिवासी विकास प्रशासन

उद्दिष्टे : ऐतिहासिक दृष्टिकोनातून विकासाच्या योजनांच्या प्रशासकीय बाबींचा व त्यासाठी राबविल्या जाणाऱ्या यंत्रणेचा विद्यार्थ्यांना जवळून परिचय करुन देणे, ब्रिटीश काळातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील विशेषतः पंचवार्षिक योजनांच्याकाळातील समीक्षणात्मक अभ्यास.

१. राज्य आणि केंद्र पातळीवरील प्रशासकीय संघटना
२. आदिवासी कल्याण आणि विकासाच्या प्रशासनाचे ऐतिहासिक पूनर्मूल्यांकन
३. आदिवासी उपाय योजना आणि प्रशासकीय कार्यपध्दती.
४. आदिवासी विकास मंडळ
५. आदिवासी प्रशासन राज्य आणि जिल्हा परिषद पातळी प्रशासन
६. समाजसेवी मंडळाचे आदिवासी विकासातील कार्य
७. प्रशिक्षण संशोधन आणि मूल्यमापन

ड. प्रात्यक्षिक अभ्यास :

विद्यार्थ्यांकडून पंचयात समिती विकासातील आदिवासी विकासाच्या समस्या आणि कार्यपध्दती याचा अभ्यास ज्यामध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांचा समावेश होतो. लोकांनी सांगितलेल्या समस्यांचा अभ्यास आणि त्या समस्यांचा विकास विषयक प्रशासन देत असलेले तोंड यांचा अभ्यास.

इ. प्रबंधिका /निबंध :

यामध्ये प्रत्यक्ष विशिष्ट आदिवासी विभागाचा समावेश असेल याचा अभ्यास व विश्लेषण अभिप्रेत आहे. एखाद्या विशिष्ट आदिवासी समूहाचा जाती उपजातीचा विविध विभागातील अभ्यास शक्य आहे. परंतू तो प्रत्यक्ष करता येणे सुचविणे योग्य नाही. (संकल्पित पदविका अभ्यासक्रम आराखडा)

❑❑❑

## (ब.) आदिवासी निवडक साहित्य सूची

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | आदिवासी समाज | - | विज्ञान प्रकाशन, नाशिक | १९७६ |
| २. | आदिवासी कला विश्व | डॉ गोविंद गारे / उत्तमराव सोनवणे | आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे | १९८६ |
| ३. | आदिवासींचे सण उत्सव | डॉ. सरोजिनी बाबर | महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती | १९८३ |
| ४. | आदिवासी प्रश्न | डॉ. गोविंद गारे | आदिम प्रकाशन, पुणे | - |
| ५. | अेका नक्षलवाद्याचा जन्म | विलास मनोहर | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | - |
| ६. | आदिवासी वीर पुरुष | डॉ. गोविंद गारे | - | - |
| ७. | आदिम | भाऊ मांडवकर | सेवा प्रकाशन, अमरावती | १९८१ |
| ८. | Adivasis of India & their place in Indian Life. | B. S. Gupta | - | - |
| ९. | आदिवासी लोकगीते आ. से. पत्रिका | - | आदिवासी संशोधन व प्रकाशन संस्था पुणे | - |
| १०. | आदिवासी विकासाचे शिल्पकार | डॉ. गोविंद गारे | श्रीविद्या प्रकाशन, मुंबई | २००० |
| ११. | आदिवासी प्रश्न | डॉ. गोविंद गारे | ग्रामविकास प्रकाशन, पुणे | १९७५ |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १२. | आदिवासींच्या समस्या : विचार आणि विश्लेषण | डॉ. गोविंद गारे | आदिम साहित्य, पुणे | १९७५ |
| १३. | आदिवासी वीर पुरुष | डॉ. गोविंद गारे | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | १९८६ |
| १४. | आमची जात आणि माझे टीपण | गणपंतराव बोराडे | - | - |
| १५. | आदिवासींचे सामाजिक जीवन एक सामाजिक महाराष्ट्रीय अभ्यास. | विलास संगवे | पॉप्युलर प्रकाशन | १९७२ |
| १६. | आदिवासी समस्या : विचार आणि विश्लेषण | डॉ. गोविंद गारे | - | १९७६ |
| १७. | आदिवासी लोकगीते | डॉ. गोविंद गारे | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | १९८७ |
| १८. | आदिवासींची गोड गाणी | डॉ. गोविंद गारे / म. गो. कडू | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | १९८६ |
| १९. | आदिवासी बालगीते | डॉ. गोविंद गारे | गमभन प्रकाशन | १९८८ |
| २०. | आदिवासींची लोकनृत्ये | डॉ. गोविंद गारे | कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे | १९९० |
| २१. | आदिवासी विकासाचे शिल्पकार | डॉ. गोविंद गारे | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | १९९१ |
| २२. | आदिवासींचे शिक्षण | डॉ. गोविंद गारे | साकेत प्रकाशन, औरंगाबाद | १९९७ |

| अ. नं. | पुस्तकाचे नांव | लेखकाचे नांव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| २३. | आदिवासी विकासातील दीपस्तंभ | डॉ. गोविंद गारे | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | १९९८ |
| २४. | आदिवासी विकासाच्या योजना | डॉ. गोविंद गारे | आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे | १९९३ |
| २५. | आदिवासींच्या समस्या : बदलते संदर्भ | डॉ. गोविंद गारे | सुगावा प्रकाशन, पुणे | २००० |
| २६. | आदिवासी लोकगीते | गंगाराम आवारी गुरुजी | क्षीरसागर, नाशिक | १९८२ |
| २७. | आदिवासी कला विश्व | डॉ. गोविंद गारे | महाराष्ट्र साहित्य परिषद | १९८६ |
| २८. | आदिवासींचे सण आणि उत्सव | डॉ.सरोजिनी बाबर | महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग प्रकाशन | १९८३ |
| २९. | अुलगुलान | भुजंग मेश्राम | तथागत प्रकाशन कल्याण | १९९० |
| ३०. | A review of Tribal Research Studies | Editor Dr. Govind Gare | T. R. T. Publication (Pune) | १९९८ |
| ३१. | आदिवासी विशेषांक - सहकारी जगत | - | - | १९७६ |
| ३२. | आदिवासींची कृषिगीते | नारायण बोरुळकर | साहित्य सेवा औरंगाबाद | १९८८ |
| ३३. | आदिवासी विद्यार्थी मराठी सुधार (प्रबंधिका) | डॉ. भास्कर गिरधारी | बालभारती पुणे | १९८६ |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| ३४. | आदिवासी सण व उत्सव | भाई कडू | - | - |
| ३५. | आदिवासी साहित्य | विनायक तुमराम | विजय प्रकाशन, पुणे | - |
| ३६. | अरण्येर अधिकार | डॉ. गोविंद गारे | - | - |
| ३७. | भटक्यांचे लग्न | उत्तम भांवाळे | महाराष्ट्रातील भटक्या व विमुक्त जमातीच्या लग्नपध्दती पुणे | १९८८ |
| ३८. | बाबा आमटे | भ. ग. बापट | राजहंस प्रकाशन | १९९७ |
| ३९. | भारतीय आदिवासी : समाज आणि संस्कृती | डॉ. गोविंद गारे | आदिम साहित्य पुणे | १९७६ |
| ४०. | भटक्या विमुक्तांचे अंतरंग | रामनाथ चव्हाण | सुगावा प्रकाशन, पुणे | १९८९ |
| ४१. | बदलाच्या उंबरठ्यावर कोकणा आदिवासी | डॉ. गोविंद गारे | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | २००० |
| ४२. | भारतीय आदिवासी | प्रा. डॉ. गुरुनाथ नाडगोड | कॉन्टिनेन्टल प्रकाशन | १९७९ |
| ४३. | भारतीय स्त्रीयांचा मागोवा | विश्वनाथ खैरे | - | - |
| ४४. | Christans V/S Vanvasi | मिलींद भत्ते व शैलेश चव्हाण | रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी | - |
| ४५. | दाभोणच्या जंगलातून | अनुताई वाघ | साकेत प्रकाशन | १९९० |
| ४६. | डांगचा सिंह | सदाशिव दीक्षित | दीक्षित प्रकाशन, पुणे | १९८८ |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| ४७. | Friends & Foes of Adivasis & Dalits | Ed. Surya Narain Saxena | Akhil Bharatiya Vanvasi Kalyan Aashram, Delhi | - |
| ४८. | गोट बंजारे लोकांचा इतिहास | बळिराम हिरामण पाटील | कै. बळिराम पाटील स्मारक समिती यवतमाळ | १९३६ |
| ४९. | गुन्हेगार जाती | त्रिंबक अत्रे | लेखकाचे प्रकाशन. पारनेर | १९११, ११९० |
| ५०. | गोरा बंजारा लोकांचा इतिहास | बळिराम पाटील | भाऊसिंग दगडूसिंग राठोड अमरावती | १९३६ |
| ५१. | गोड गाणी | डॉ. गोविंद गारे | गमभन प्रकाशन, पुणे | १९९१ |
| ५२. | गोल्ला | डॉ. धोंडिबा वाडकर | मोरया प्रकाशन, पुणे | १९९१ |
| ५३. | Gram Mangal : An action programm for poverty education. | Ramesh Panse | - | - |
| ५५. | गोईण | राणी वंग | ग्रंथाली प्रकाशन, वावरेकर मार्ग, मुंबई | १९९९ |
| ५६. | गबाळ | दादासाहेब मल्हारी मोरे | श्रीविद्या प्रकाशन | १९९० |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| ५७. | होबदाहा चौपडी मावची (शब्दकोश) | जुलेश मावची, वाघमारे | सुवार्ता साहित्यसेवा प्रकाशन | १९७७ |
| ५८. | हिंगोली तालुक्यातील लोकसाहित्य | डॉ. शरद व्यवहारे | स्वतःचे प्रकाशन, औरंगाबाद | -- |
| ५९. | जंगलचे राजे | कुसुम नारगोलकर | मौनी विद्यापीठ, गारगोटी | १९५५ |
| ६०. | जव्हार कला प्रदर्शन | बी. जे. पेंढारकर | - | - |
| ६१. | जेव्हा माणूस जागा होतो. | गोदावरी परुळेकर | मौज प्रकाशन, मुंबई | १९७० |
| ६२. | जंगलाचं देणं | मारूती चित्रमपल्ली | साहित्य प्रसार केंद्र, नागपूर | १९८५ |
| ६३. | जंगलाची छाया | आचार्य भिसे | साधना, पुणे | १९४५ |
| ६४. | जांभूळ पाडा | मीरा पटवर्धन | ज. का. सावळे समाधी प्रकाशन, नाशिक | - |
| ६५. | कल्याणी शबरी (अेकांकी नाटक) | उम्मेदसिंह बॅक | श्रेयस प्रकाशन, कलकत्ता | - |
| ६६. | कथा वनवासींच्या : कथा सर्वांच्या | पं. पो. गांगल / सौ. योगिता गांगल | श्रीगंधर्ववेद प्रकाशन, पुणे | १९८९ |
| ६७. | किनवटचे दिवस | डॉ. अरुण गद्रे | ग्रंथाली प्रकाशन, मुंबई | १९९३ |
| ६८. | कोलम | भाऊ मांडवकर | सेवा प्रकाशन अमरावती | १९३६ |
| ६९. | कोसबाडच्या टेकडीवरुन | अनुताई वाघ | ठाणे | १९८० |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| ७०. | खाजगी आश्रमशाळा मार्गदर्शिका | मुरलीधर सौकुदे | - | - |
| ७१. | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | राजहंस प्रकाशन, पुणे | १९७२ |
| ७२. | वारल्याचे शेंडी धर्म | द. ता. लोटलीकर | - | - |
| ७३. | लोकसाहित्य उदगम आणि विकास | डॉ. शरद व्यवहारे | स्वत:चे प्रकाशन, औरंगाबाद | - |
| ७४. | लोकसाहित्य रंग आणि रेखा | डॉ. शरद व्यवहारे | स्वत:चे प्रकाशन औरंगाबाद | - |
| ७५. | लोकराज्य (कर्मवीर भाऊराव पाटील विशेषांक) | - | - | १९८७ |
| ७६. | लोककला | डॉ. धोंडिबा वाडकर | दास्ताने, पुणे | २००१ |
| ७७. | लोकसाहित्य : लोकपरंपरा | डॉ. रमेश वरखेडे | का. स. वाणी, धुळे | १९९३ |
| ७८. | लोकसाहित्य व लोकसंस्कृती | डॉ. विद्या व्यवहारे | प्रतिमा प्रकाशन, पुणे | २००२ |
| ७९. | लोकायन (विशेषांक) | संपा. रमेश वरखेडे / वडोदेकर / कदम | लोकसत्ता प्रतिष्ठान, नाशिक | १९९५ |
| ८०. | लढा बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासींचा | मा. ग. डोंगरे | भारतीय श्रमशोध मंडळ | - |
| ८१. | गोदाराणी | वि. वां. हडप | - | - |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| ८२. | लोकसंख्या शिक्षण आणि आदिवासी महिला शिक्षण (प्रबंधिका) | डॉ. भास्कर गिरधारी | म. रा. शै. सं. व. प्र. परिषद, पुणे | १९८९ |
| ८३. | लोकसाहित्यातील स्त्री प्रतिमा | डॉ. तारा भवाळकर | सुगावा प्रकाशन, पुणे | १९८९ |
| ८४. | लोकसंस्कृतीचे उपासक | डॉ. रा. चि. ढेरे | पद्मगंधा प्रकाशन, पुणे | १९९६ |
| ८५. | लोकसाहित्याचे स्वरुप | डॉ. प्रभाकर मांडे | गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद | १९९५ |
| ८६. | लोकसाहित्याची रुपरेषा | दुर्गा भागवत | वरदा, पुणे | १९७७ |
| ८७. | लोकसाहित्याचे अंत : प्रवाह | डॉ. प्रभाकर मांडे | कॉन्टीनेन्टल, पुणे | २००२ |
| ८८. | लोकसाहित्याचे अंतरंग | डॉ. प्रभाकर मांडे | गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद | १९७५ |
| ८९. | लोकसाहित्य : स्वतंत्र अभ्यास केंद्र | ग. ना. मोरजे | दास्ताने, पुणे | १९८५ |
| ९०. | मादिमा गौंडाची बोली | डॉ. शैलजा देवगांवकर | महाराष्ट्र रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई | १९९० |
| ९१. | महाराष्ट्रातील आदिवासी : त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे प्रश्न आणि कल्याणाच्या योजना. | - | स. व. प्र. सं. पुणे | १९८० |
| ९२. | मनोरमभूमी अरुणाचल | माताप्रसाद | प्रभात प्रकाशन, दिल्ली | १९९५ |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| ९३. | महाराष्ट्रातीलआदिवासींची आर्थिक पाहणी | - | गांधी स्मारक सिंधी, नाशिक | - |
| ९४. | मऱ्हाटी लोकधर्मी नाट्य | डॉ. शरद व्यवहारे | स्वतःचे प्रकाशन, औरंगाबाद | - |
| ९५. | मराठी लोकगीत स्वरुप विशेष | डॉ. शरद व्यवहारे | स्वतःचे प्रकाशन, औरंगाबाद | - |
| ९६. | महाराष्ट्रातील आदिवासी : संस्कृती, समस्या आणि विकास | डॉ. गोविंद गारे | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | १९८८ |
| ९७. | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती : सामाजिक आणि सांस्कृतिक अध्ययन | डॉ. गोविंद गारे | कॅन्टीनेन्टल पुणे | २००० |
| ९८. | मणिपूर | आर. के. झालजितसिंह | - | - |
| ९९. | महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न | डॉ. सुधीर फडके | पुणे प्रकाशन | १९६३ |
| १००. | मी वनवासी. | सौ. सिंधूताई सपकाळ | स्वतःचे प्रकाशन | १९८९ |
| १०१. | महाराष्ट्रातील दिव्य वनौषधी | सदाशिव सावंत | कॉन्टीनेन्टल प्रकाशन | १९७४ |
| १०२. | महाराष्ट्रातील वन्य प्राणी | शैलजा | महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ | १९७८ |
| १०३. | महाराष्ट्र स्त्री गीते | श्री. कृष्णराव मुळे | - | - |
| १०४. | मुत्रकुंद दरी | वि. ल. बर्वे | - | - |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १०५. | महापूर | विं. द. चिंदूरकर | - | - |
| १०६. | महाश्वेता देवी | अनुप्रभा श्रीनिवास | - | - |
| १०७. | मराठी लोकगीत स्वरुप विशेष | डॉ. शरद् व्यवहारे | विश्वभारती | १९९० |
| १०८. | मराठीतील स्त्रीधन | सरोजिनी बाबर | - | - |
| १०९. | मराठीतील लोककथा | सरोजिनी बाबर | बहिशाल दिक्षीत, पुणे | १९५७ |
| ११०. | मराठी तमाशा | नामदेव व्हटकर | चंद्रकांत शेट्ये, कोल्हापूर | १९५९ |
| १११. | मातंगी | डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे | मोरया प्रकाशन, डोंबिवली | १९९० |
| ११२. | नक्षलवादी आणि शोषित आदिवासी | डॉ. गोविंद गारे | सुगावा प्रकाशन, पुणे | २००२ |
| ११३. | पालावरचं जिणं | गिरीश प्रभुणे | साप्ताहिक विवेक, मुंबई | - |
| ११४. | नादब्रम्ह | संपा. सरोजिनी बाबर | महाराष्ट्र शासन लोकसाहित्य समिती, पुणे | १९९५ |
| ११५. | पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध्र आदिवासी | डॉ. गोविंद गारे | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | २००१ |
| ११६. | प्राचीन माणसे (मराठी अनुवाद) | कृष्णाबाई मोरे | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | १९५३ |
| ११७. | सेवाव्रती ठक्करबाप्पा | गिरीशचंद्र मिश्र | लोकहित प्रकाशन | - |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| ११८. | Review of Tribal Research Studies | Dr. Govind Gare | TR & TI, MS Pune | १९८६ |
| ११९. | रानातली माणसं | शेखसळी महमद | साहित्य रेखा प्रकाशन, वितरण, नाशिक | - |
| १२०. | सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी | डॉ. गोविंद गारे | सहाध्याय प्रकाशन, मुंबई | १९७४ |
| १२१. | सातपुड्यातील भिल्ल | डॉ. गोविंद गारे | अमृत प्रकाशन, औरंगाबाद | १९९८ |
| १२२. | सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील ठाकूर (ठाकर) आदिवासी | डॉ. गोविंद गारे | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | २००२ |
| १२३. | सावलीच्या उन्हात | श्रीराम अत्तरदे | - | १९४६ |
| १२४. | शिक्षण घेता घेता आदिवासी लोकगीते | लीला पाटील | - | - |
| १२५. | Socio cultural Drynamics of Tribal Development | R.S. Negi & John Gaikwad | Tribal Research & Training Inst. Maha. State Pune Publn. | १९९० |
| १२६. | Story of Higher Education in Tribal Area | Dr. B. V. Girdhari | (Research paper) | १९८९ |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १२७. | सुलभ वनस्पती विज्ञान | शंकर परांडेकर | कोल्हापूर | १९३७ |
| १२८. | सातपुड्यातील वनलक्ष्मी | दुर्गा जोशी | - | - |
| १२९. | साहित्याचे मूलधन | द. बा. कालेलकर/ वा. कृ. चोरघडे | साहित्य, नागपूर | २००२ |
| १३०. | Story of education in Dahanu an innate school experiment | Ramesh Panse | - | - |
| १३१. | ठक्करबाप्पा | डॉ. गोविंद गारे | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | १९८७ |
| १३२. | ताराबाई मोडक | सौ. पदमजा पाठक | - | - |
| १३३. | Tribes of assam | B. S. Gupta | - | - |
| १३४. | Tribal Handicrafts in Maharashtra | डॉ. गोविंद गारे | TR and TI Pune | - |
| १३५. | Tribes of Maharashtra | डॉ. गोविंद गारे | TR and TI Pune | - |
| १३६. | Tribals in an Urban settings | डॉ. गोविंद गारे | Sarswat Publication, Pune | १९७२ |
| १३७. | ठक्कर बाप्पा | कांतिलाल शाह | ठक्कर बाप्पा स्मारक समिती, दिल्ली | १९५५ |
| १३८. | Thakurs of Sahyadri | L. N. Chafekar | Oxford university press | १९६० |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १३९. | The Warlis | K. J. Save | University of Mumbai | १९४५ |
| १४०. | The Mahadev Koli's | G. S. Ghaurye | Popular Prakashan, Mumbai | १९६५ |
| १४१. | Tribals Guerrilas (The Santals of west Bengal & the Naxalite movement) | Edward | - | - |
| १४२. | The coming of the devi (Adivasi Assertion in Western India) | David Hardima | - | - |
| १४३. | तंट्या भिल्ल | श्यां. मो. गुप्ते | - | - |
| १४४. | वैदर्भीय आदिवासी जीवन संस्कृती | शैलजा देवगांवकर | श्रीमंगेश प्रकाशन | १९८९ |
| १४५. | वनयोगी | ल. त्र्यं. जोशी | भारतीय वनवासी कल्याण आश्रम प्रकाशन, मुंबई | १९८४ |
| १४६. | विमुक्त जमातीच्या लग्न पध्दती | - | पुणे | १९८८ |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १४७. | विकास वाडीचे वारली विद्यार्थी मानसशास्त्रीय सर्वेक्षण | इंदुमती गोखले | कोसबाडहील | १९७० |
| १४८. | वारली चित्र - संस्कृती | डॉ. गोविंद गारे | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | २००० |
| १४९. | वनवासी जनजाती | आर. के. झालाजितसिंहं | - | - |
| १५०. | विधिनाट्य | डॉ. धोंडिबा वाडकर | स्फूर्ती, नगर | १९९४ |
| १५१ | वारली | खंडेराव सावे | - | - |
| १५२. | वनवासी व उपेक्षित जग | डॉ. भीमराव पिंगळे | - | - |
| १५३. | वाडगीण | वा. भ. कर्णिक | - | १९५१ |
| १५४. | आदिवासी कथा आणि व्यथा | डॉ. धैर्यशील शिरोळे | स्नेहवर्धन, पुणे | २००२ |
| १५५. | वनवासी राजा | प्रा. डॉ. एन. एल. जाधव | राहूल बुक, नाशिक | १९८९ |
| १५६. | हमारे आदिवासी | राजेंद्र अवस्थी | बम्बई प्रकाशन, बम्बई | १९६२ |
| १५७. | कुरणशाळा | ताराबाई मोडक / अनुताई वाघ | - | १९६४ |
| १५८. | आदिवासींची न सुटलेली समस्या | ए. बी. वर्धन | - | १९७६ |
| १५९. | आदिवासी | बाळकृष्ण प्रभु देसाई | अभिजीत, कोल्हापूर | - |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १६० | The Tribal World of Verrier | Elvin | - | १९६४ |
| १६१ | Tribes of India | Raghaviad | - | १९६९ |
| १६२ | Bhils | Shambulal Doshi | - | - |
| १६३ | भिल्ली गीते | डॉ. सुदाम जाधव | औरंगाबाद | - |
| १६४ | संस्कृतीच्या पाऊलखुणा | द. ता. भोसले | पद्मगंधा, पुणे | २००१ |
| १६५ | आदिवासी पावरांच्या कथा | प्रा. डी. जी. पाटील | गोदावरी, औरंगाबाद | २००० |
| १६६ | वाळवण | गोपाळ गोवारी | मयुरव्रत, नाशिकरोड | २००२ |
| १६७ | लोकबंध | डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे | दास्ताने रामचंद्र, पुणे | १९८९ |
| १६८ | लोककला दशावतार | अर्जुन परब | शलाका, मुंबई | १९९९ |
| १६९ | लोकनाट्य उदगम आणि विकास | डॉ. पु. भा. कालभुत | विजय, नागपूर | १९९७ |
| १७० | लोकनाट्याचे स्वरूप | डॉ. सुदाम जाधव | सुलभा, औरंगाबाद | १९९२ |
| १७१ | झाडीपट्टीची दंडार | हरिश्चंद्र बोरकर | दास्ताने, पुणे | -- |
| १७२ | लोकसाहित्य विचार | डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे | सविता औरंगाबाद | १९९३ |
| १७३ | तमाशाचे अंतरंग | डॉ. सुदाम जाधव | सुलभा, औरंगाबाद | १९९४ |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १७४ | लोककला रंगभूमी | डॉ. प्रभाकर मांडे | गोदावरी, औरंगाबाद | १९९४ |
| १७५ | लोकसाहित्य सागशिणगार | डॉ. सरोजिनी बाबर | लो. सा. स., पुणे | १९६५ |
| १७६ | महाराष्ट्र भटकासमाज संस्कृती व साहित्य | डॉ. नागनाथ | प्रतिभा पुणे | १९७४ |

## (क.) आदिवासी नियतकालिके

| अ. नं. | नियतकालिकाचे नाव | संपादकाचे नाव | स्थळ | प्रकाशन कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | आदिवासी दर्शन | डॉ. हरिश्चंद्र सलाम | नागपूर | साप्ताहिक |
| २. | आदिवासी संशोधन पत्रिका | डॉ. गोविंद गारे | पुणे | षण्मासिक |
| ३. | आदिरंग | श्री विश्राम दळवी | नंदुरबार | मासिक / वार्षिक |
| ४. | क्रांतिपत्र | श्री. राजेंद्र धात्रक | जव्हार | साप्ताहिक |
| ५. | देवधनू | श्री निलेश महाले | कल्याण | त्रैमासिक |
| ६. | ढोल | अरुणा जोशी | वडोदरा | षण्मासिक |
| ७. | एकलव्य | प्रा. श्री. कैलास सर्वेकर | धुळे | वार्षिक |
| ८. | एकजूट | श्री विनय सावंत | राजूर | साप्ताहिक |
| ९. | गोंडवाना | श्री अशोक कोटकर | चंद्रपूर | साप्ताहिक |
| १०. | हाकारा | प्रा. रा. के. मुटाटकर | पुणे | त्रैमासिक |
| ११. | जव्हार वार्ताहर | श्री. चित्रांगण घोलप | जव्हार | साप्ताहिक |
| १२. | जागृती | श्रीमती रंजना सिरम | अमरावती | वार्षिक |
| १३. | जंगोराईताड | श्री. व्यंकटेश आत्राम | चंद्रपूर | वार्षिक |
| १४. | कालतरंग | श्री. संदीप मुकणे | जव्हार | साप्ताहिक |
| १५. | मूलनिवासी | डॉ. शिवराम आत्राम | चंद्रपूर | साप्ताहिक |

| अ. नं. | नियतकालिकाचे नाव | संपादकाचे नाव | स्थळ | प्रकाशन |
|---|---|---|---|---|
| १६. | महासंग वार्ता | डॉ. गोविंद गारे | पुणे | मासिक |
| १७. | मर्मस्पर्श | डॉ. नामदेव सरकुंडे | यवतमाळ | त्रैमासिक |
| १८. | नाहार कंद | श्री भगतसिग पाडवी | मुंबई | मासिक |
| १९. | प्रेरणा | प्रा. आर. आर. नवले | नंदुरबार | वार्षिक |
| २०. | सा. आदिवासी संघर्ष | महात्माजी गेडाम | नागपूर | साप्ताहिक |
| २१. | ट्रायबल वेलफेअर | सौ. सिंधूताई तुकाराम नंदनवार | नागपूर | साप्ताहिक |
| २२. | तारपा | श्री. शंकर बळी | नंदुरबार | वार्षिक |
| २३. | वनगुंजन | - | लातूर | नियतकालिक |
| २४. | वनवार्ता | सौ. वृषाली पांचाळ | नाशिक | त्रैमासिक |
| २५. | वनस्वर | श्री. शेंदूर्णीकर | मध्यप्रदेश | नियतकालिक |
| २६. | वनसखा | श्री. रघुनाथ धिंडे | डहाणू | त्रैमासिक |
| २७. | वनराज | श्री. प्रदीप केंगले | मुंबई | मासिक |
| २८. | वनबंधू | एस. के. कौल | दिल्ली | मासिक |
| २९. | वीर वनवासी | श्री. विठ्ठलराव मेश्राम | नागपूर | साप्ताहिक |



आरसा : आदिवासी जीवन शैलीचा ! हा प्राचार्य भा. व्य. गिरधारी यांचा ग्रंथ, जव्हार कालखंडातील त्यांच्या वास्तव्यातून साकार होत आहे. याचा विशेष आनंद होत आहे.

संस्थेने सोपविलेली जबाबदारी ओळखून डॉ. भा. व्यं. गिरधारी यांनी तत्परतेने जव्हारसारख्या आदिवासी, अतिग्रामीण महाविद्यालयाचे पहिले प्राचार्यपद स्वीकारले. आदिवासी परिसराचे सतत निरीक्षण, अभ्यास आणि चिंतन केले. त्याला ग्रंथरुप लाभत आहे, ही विशेष गौरवाची बाब आहे. आदिवासी समाजाची सेवा त्यांनी अत्यंत निष्ठेने केली, उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आदिवासींच्या लोकजीवनाचा त्यांनी मन:पूर्वक अभ्यास केला, त्याचे हे सुफलित आहे. महाराष्ट्रभर त्यांच्या या आदिवासी क्षेत्रातील कार्याची या ग्रंथामुळे नोंद घेतली जाईल याची खात्री वाटते.

**डॉ. मो. स. गोसावी**
सेक्रेटरी : गोखले एज्युकेशन सोसायटी
नाशिक – ४२२००५

